# मनूचं पत्र

समोर पडलेल्या पत्राच्या ढिगाऱ्यातून पोस्टमन रवी पत्रांची विभागवार छाटणी करू लागला. जवळजवळ सर्व पत्रांची त्या-त्या विभागानुसार छाटणी त्याने केली. आता खाली फक्त दोन-तीन पत्रं राहिली होती. ती कोणत्या विभागातली आहेत, हे पाहण्यासाठी त्याने हातात घेतली तोच त्याला गावातल्या कुंभार गल्लीत राहणाऱ्या आबाची आठवण आली, कारण त्यांच्या मनूचं पत्र आलं होतं. त्याचं नाव मनोज होतं, पण प्रेमाने आबासाहेब त्याला मनू म्हणत. महिना भरत आला की आबा रोज न चुकताच पोस्टमन रवीला पत्राविषयी विचारत असत.

आबासाहेबांचं पत्र पाकिटात न येता पोस्टकार्डवर आलं म्हणून रवीनं ते उलट करून पाहिलं, तर त्यात दोनच ओळी लिहिल्या होत्या 'आजपर्यंत मी पैसे पाठवीत आलो, पण आता पाठवणं शक्य नाही. गावातलं घर विकून तुमचा खर्च भागवा' हे वाचताच रवीला आश्चर्याचा धक्का बसला. दर वेळेला पान भरून लिहिणारा नि महिन्याच्या महिन्याला न चुकता मनिऑर्डर करणारा त्यांचा एकुलता एक मुलगा मनोज, त्यानं चक्क असं पत्र पाठवावं? रवी क्षणभर गांगरून गेला.

''रवी, पत्राचं वाटप करायचं नाही काय?'' पोस्टमास्तर श्री. राऊतसाहेब रवीला म्हणाले.

आबासाहेबांच्या पत्राच्या विचारचक्रात असणारा रवी राऊत यांच्या हाकेने खडबडून उठत म्हणाला, ''हो साहेब, तीच तर आवराआवर करीत होतो.'

पोस्टरमास्तर राऊत तसे खूप प्रेमळ, पण वेळेचे खूप पक्के होते. रवीला दररोजपेक्षा आज पत्रवाटपास जरासा उशीरच झाला होता.

म्हणून गडबडीने आपल्या बटव्यात सर्व पत्रं व्यवस्थित ठेवत त्यानं सायकलला टांग मारली. नेहमीप्रमाणे तो पत्राचे विभागवार वाटप करू लागला. पण त्याच्या मनाला कसली तरी रुखरुख लागल्यासारखं वाटत होतं. पेठेतून सर्व पत्रांचे वाटप करून त्याने तीर्थधाम परिसरातील सर्व पत्रांचे वाटप केले. आता तो कुंभार गल्लीत येऊन पोहोचला होता. तेथे येताच त्याला आबासाहेबांच्या पत्राची आठवण झाली. पत्र देण्यासाठी घरासमोर आला. बाहेर कोणी नव्हतं का कोण जाणे, रवीचे हात-पाय पत्र देण्यासाठी पुढे जात होते. पण त्याचं मन मात्र त्याला मागं ओढत होतं. शेवटी त्यानं मनाची हाक ऐकली आणि पत्र न देता तसाच मागे फिरला.

दुपार होत आली होती. रवी पोस्ट ऑफीसमागे एक रूम घेऊन राहत होता. उरलेली पत्रं वाटून तो खोलीवर आला. जेवणासाठी खूप उशीर झाला होता म्हणून त्यानं झटपट डाळ-भात शिजवण्यास टाकला. जेवण तयार झालं. पोटात भूक मावत नव्हती तरी त्याला जेवावंसं वाटेना. आज त्याला काही तरी चुकल्याचुकल्यासारखं वाटत होतं. त्यानं दोन-चार घास खाल्ले आणि तसाच पलंगावर कलंडला. त्याला जरा अस्वस्थ वाटत होतं. तो वर छताकडे पाहू लागला, तेव्हा त्याला आबासाहेबांचा मनूचं पत्र आल्यानंतरचा आनंदी चेहरा आठवू लागला. आबासाहेब अडाणी असल्याने त्यांना लिहिता-वाचता येत नव्हते. शहरात नोकरी करणाऱ्या त्यांच्या मुलाचं (मनूचं) पत्र आल्यावर ते पोस्टमन रवीकडून वाचून घेत असत. जन्मभर मडके घडवून, चिखल तुडवून त्यांनी मनूला शिकवलं, नोकरीला लावलं. त्यांनी उराशी बाळगलेली सारी स्वप्नं त्यांच्या मुलानं पूर्ण केली होती. आबासाहेब म्हातारे झाले होते. पहिल्यासारखे कष्ट करण्याची ताकद त्यांच्यात नव्हती. आबासाहेबांप्रमाणे त्यांची पत्नी रुक्मिणी-मनूची आई-ती सुद्धा उतारवयाला लागली होती. रुक्मिणीबाईंना सारी कुंभार गल्ली 'माई' म्हणून हाक मारीत. त्या स्वभावानं खूप मायाळू होत्या.

'मनू' म्हणजे त्यांच्या काळजाचा तुकडा होता. वर्षातून एखाद्या वेळेस तो गावाकडे येत असे. त्यामुळे एरवी त्याचं पत्र म्हणजेच आबा-

माईंना त्याची भेट वाटत असे. त्यामुळंच त्याच्या पत्राची ते आतुरतेने वाट पाहत असत. या वेळेस त्यांच्या मनूचं पत्र आलं होतं.पण फक्त दोन ओळींचं नि त्यात नव्हती खुशाली, आपुलकी! त्यात उल्लेख होता तो फक्त कर्तव्यशून्यतेचा, स्वार्थाचा!

ही सर्व हकिगत रवीला माहीत होती. त्यामुळं हे पत्र जर आबासाहेबांच्या हातात पडलं तर त्यांना किती धक्का बसेल याची कल्पना रवीला होती. कारण त्यांचं मनूवरील प्रेम, जिव्हाळा, त्याची काळजी हे रवीनं अगदी जवळून पाहिलं होतं. म्हणूनच रवी ते पत्र वाचताक्षणी अस्वस्थ झाला होता.

पत्र येऊन तब्बल तीन दिवस झाले होते, तरी द्यावं की नाही, या विचारात त्यानं पत्र आबासाहेबांना दिलंच नाही. आबासाहेब मात्र येणाऱ्या तारखेला पत्र आलं नाही म्हणून पोस्टात चकरा मारत होते. आबांचं पत्र येऊनही न देणं, हा मोठा धोका आहे आणि जर दिलं तर पुढे काय प्रसंग येईल याची कल्पनाच त्याला करवत नव्हती. त्यामुळे तो खूप मोठ्या धर्मसंकटात सापडला होता.

त्यात पत्राच्या चौकशीसाठी आबासाहेबांच्या चार-पाच चकरा झाल्याने एक दिवस पोस्टमास्तर राऊत यांनी रवीला विचारलं,

''अरे रवी, त्या आबासाहेबांचं पत्र आलं का नाही रे?''

राऊतसाहेबांचा प्रश्न कानी पडताच रवी थोडा गडबडला.

''हो साहेब, आलं ना !'' रवी म्हणाला.

''मग दिलं का नाही त्यांना?'' राऊत जरा रागात उद्गारले.

एकामागून एक होणाऱ्या प्रश्नांच्या भडिमारामुळे रवी थोडा घाबरला.

''देणारच होतो, पण...'' रवी अडखळत म्हणाला.

''हे बघ रवी, आलेल्या पत्रांचं वेळेवर वाटप करणे तुझं काम आहे. तुझा असा हलगर्जीपणा काही उपयोगाचा नाही. पण..वगैरे.. काही नाही, ते पत्र पहिलं पोहोचतं कर.'' राऊत समज देत रवीला म्हणाले.

आधीच द्विधा मनःस्थितीत असलेल्या रवीला काय करावे, हेच कळेना, परंतु सत्य राऊतसाहेबांना सांगण्याशिवाय पर्याय नव्हता.

त्यानं खुंटीला टांगलेल्या त्याच्या बटव्याच्या एका कप्प्यातून 'ते'

पत्र काढलं आणि राऊत यांच्या हातावर टेकवलं.

''हे काय पत्र!'' रवी म्हणाला.

त्यांनी ते पत्र उलटे केले व वाचू लागले. त्याचं पत्र वाचून होतं न होतं तोच रवी उद्‌गारला,

''हे पत्र आल्यावर ते पोहोच करण्याची घाई तुमच्यापेक्षा मलाच खूप असते. पण साहेब, आजपर्यंत माता-पित्यांना परमेश्वर मानून त्यांची सेवा करणाऱ्या आबासाहेबांच्या मुलानं त्यांना असं बेजबाबदारपणाचं पत्र पाठवावं? आणि त्या आबासाहेबांना की, जे त्याच्या पत्राच्या आशेवर तो भेटला, यात आनंद मानून जगताहेत?''

आता मात्र राऊत यांच्या सर्व हकिगत लक्षात आली. रवीनं पत्र न देण्याचं कारणही त्यांना कळलं होतं. इतका वेळ गरम झालेले राऊतसाहेब रवीचं बोलणं ऐकून शांत झाले.

''बघ रवी, तुझ्या भावना मी समजू शकतो, पण आपण पडलो सरकारी नोकर. आपलं काम आपण केलंच पाहिजे आणि या पोस्टात दररोज पन्नास-साठ पत्रं येतात. आपण कोणा-कोणाच्या समस्या सोडवणार आहोत?'' राऊत म्हणाले.

त्यांनी व्यावहारिक भाषेत रवीचं मन वळवण्याचा हलकासा प्रयत्न केला.

''पण साहेब, एखादा जर दुःखाच्या सागरात बुडत असेल तर त्याला वाचवणं आपलं कर्तव्य नाही का?'' रवी म्हणाला.

''रवी, त्यांचा स्वतःचा रक्तामांसाचा मुलगाच जर त्यांच्यावर ही वेळ आणीत असेल तर आपण त्यांचे कोण? नि आपण करणार तरी काय?'' राऊत म्हणाले.

राऊतसाहेबांचं बोलणं योग्य होतं, पण रवीच्या बुद्धीला ते पटत नव्हतं. तो विचारमग्न झाला. आता दुपारचे चार वाजून गेले होते. वाऱ्याची एक थंड झुळुक खिडकीवाटे रवीच्या शरीराला स्पर्श करून गेली. त्यानं रवी भानावर आला. खिशातील रुमालाने त्यानं चेहऱ्यावरील घाम टिपला नि उद्‌गारला,

''बस्स ! साहेब, मी ठरवलंय, हे पत्र मी आबासाहेबांना देणार

नाही.''

''रवी, तू काय बोलतोस तुझं तुला तरी कळतंय का?'' इतका वेळ समजावूनही रवीनं असं बोलावं? राऊत गोंधळल्यागत रवीला म्हणाले.

''होय साहेब, मला पूर्ण कळतंय की, मी काय बोलतोय ते. जर खोटं बोलण्यानं एखाद्याचं भलं होत असेल तर जरूर बोलावं. आबासाहेबांना जर हे पत्र दिलं तर कदाचित त्यांच्या मुलाचं असं वागणं ते आणि माई सहन करू शकणार नाहीत. आणि जरी केलं, तर ते जगणार कोणाच्या आधारावर? शेवटी त्यांच्या वाट्याला येणार हाल, अपेष्टा आणि क्षणोक्षणी लगणाऱ्या ठेचा आणि हे सगळं टळू शकतं फक्त एकदा खोटं बोलल्यानं, त्यांना हे पत्र न दिल्यानं. राहिला प्रश्न नात्याचा. साहेब, देव जरी दिसत नसला तरी पृथ्वीवरील माणसात आणि आकाशातील परमेश्वरात भक्तीचं नातं आहेच ना? एका माणसानं दुसऱ्या माणसाला माणुसकीच्या नात्यानं मदत केली तर काय फरक पडतो?''

''पण रवी, तू त्यांना मदत ती कशी करणार?'' इतका वेळ रवीचं बोलणं शांतपणे ऐकणारे राऊत मध्येच रवीला म्हणाले.

''साहेब, मी ठरवलंय-आजपासून आबांच्या मनूचं कर्तव्य मी पार पाडणार. मी त्यांचा कोणी लागत नसलो तरी एक माणूस या नात्यानं त्यांना मदत करणार. मनू पत्र कसं लिहायचं हे मला चांगलं ठाऊक आहे. त्यामुळं त्याच्याऐवजी पत्र मी लिहितो आबासाहेबांना. आबासाहेब कधीच शहराकडे गेलेले नाहीत. पत्रं वेळेवर आल्यावर जाणारही नाहीत. प्रश्न फक्त पैशांचा. ते मी माझ्या पगारातून दर महिन्याला ८०० रुपयांप्रमाणे पत्राबरोबर त्यांना देत जाईन. आई-वडिलांशी रक्ताचं नातं असं ऐकाएकी तोडणारा मनू मला नाही वाटत की त्यांची कधी विचारपूसही करायला येईल. त्यामुळं आबा नि माईंना ही गोष्ट कळणारच नाही, मग तर बस? कोणाला कधी त्रासही नाही आणि आबासाहेब अन् माई तरी सुखात राहतील.''

रवीनं त्याच्या मनातील सारी योजना राऊतसाहेबांना सांगितली.

त्याला जरा मोकळं झाल्यासारखं वाटू लागलं. त्यानं राऊतसाहेबांकडे पाहिलं तर ते एकटक स्तब्धपणे त्याच्याकडे पाहत होते.

ते पाहून रवी म्हणाला, ''काय बघताय साहेब?''

स्वप्नभंग झाल्याप्रमाणे भानावर येत राऊत म्हणाले, ''रवी, आज खरंच साक्षात तुझ्या रूपात परमेश्वर भेटल्यासारखं वाटलं. अरे, आजपर्यंत वाटायचं परमेश्वर कोठे असेल? स्वर्गात? छे रे! तो तुझ्यात आहे, तुझ्यात! या यंत्राच्या नि सिमेंट कॉँक्रीटच्या माणुसकी नसलेल्या युगात कोण करेल कोणासाठी एवढं? आज मला जाणीव झाली. अरे, हुद्द्यानं जरी मी तुझ्यापेक्षा मोठा असलो तरी मनानं, तुझ्या निःस्वार्थीपणापुढे आणि परोपकारी वृत्तीसमोर मी खूप लहान आहे.

''रवी, तुझा या सत्कार्यास माझी पूर्ण संमती आहे.''

''धन्यवाद साहेब! मला माहीत होतं, तुम्ही मला साथ देणार म्हणून. पण साहेब, आणखी एक विनंती आहे.'' रवी उद्‌गारला.

''अरे बोल ना! काही अडचण आहे का?'' राऊत साहेब म्हणाले.

''नाही, तसं नाही. आता मी जे काही करणार आहे, ते कुणालाही कळता कामा नये. स्वतः आबासाहेब व माईंनासुद्धा. तरच हे सर्व शक्य होईल.'' रवी अडखळत म्हणाला.

''अरे वेड्या, हे सर्व मला माहीत असताना मी ही चूक कशाला करेन? ठीक आहे, तुझ्या म्हणण्याप्रमाणं ही गोष्ट शेवटपर्यंत आपल्या दोघांतच राहील, मग तर झालं? रवी, खूप उपकारी पाहिले, बलिदानी पाहिले. केलेल्या कार्याबद्दल कोणताही अभिमान न बाळगणारा, कोणतीही अपेक्षा नसणारा तुझ्यासारखा निःस्वार्थी पाहिला नाही!''

केलेल्या कामाबद्दल गावभर ढिंडोरा पिटणारे भरपूर जण असतात, पण उपकार करूनही काही अपेक्षा न बाळगणे म्हणजे साक्षात परमेश्वर वृत्तीच. आणि तेच रवी करीत होता.

''साहेब, तुम्ही वेळेला खूप महत्त्व देता ना? त्याचप्रमाणे मी काही विशेष करीत नाही. आज वेळ आबासाहेबांवर आहे. उद्या तुमच्यावर–माझ्यावर, कोणावरही असू शकेल. मी फक्त त्यांना परमेश्वराचं माध्यम, सेवक म्हणून मदत करणार आहे. कर्ताकरविता तो तर परमेश्वरच आहे.

मी आजच त्याचं म्हणजे मनूचं पत्र तयार करतो नि उद्या पत्र वाटपाच्या वेळी आबासाहेबांना देऊन टाकतो. असं म्हणत रवी बाहेर जाण्यासाठी दरवाजाकडे निघाला. तोच राऊत उद्‌गारले,

''रवी, ईश्वर तुला मदत करो.''

''थँक्स साहेब!'' रवी नम्रपणे म्हणाला नि पोस्टाच्या बाहेर पडला.

'सूर्यास्त व सूर्योदय बरोबरच बघत आहे की काय?' असं राऊतांना वाटलं.

रवी पोस्टातून बाहेर पडला तेव्हा सूर्य समोरच्या झाडाआड अस्ताला चालला होता.पाठमोऱ्या रवीकडे राऊत पाहत होते. त्यांना वाटले-आता आबासाहेबांच्या जीवनातील एकसूर्य-मनू जरी अस्ताला गेला असला तरी निःस्वार्थी आणि उपकाराचं तेज असलेला हा तेजस्वी रवी निश्चित आबासाहेब आणि माईंच्या अंधकारमय जीवनात प्रेमाचा लख्ख प्रकाश देणार होता.

घरी गेल्यावर रवीने झोपण्याआधी आबांच्या 'मनूचं पत्र' लिहिण्यास सुरुवात केली. याआधी त्याने मनूची अनेक पत्रं आबांना वाचून दाखविली होती. त्यामुळे तो पत्र कसा लिहायचा, हे रवीला माहीत होतं. आताही पत्र रवीच वाचणार होता. आबासाहेब अडाणी असल्याने त्यांना वाचता तर येत नव्हते. रवीनं एखादं-दुसरं पत्र हातात धरून मनू जे लिहितो तसं वाचून दाखवलं असतं, तरी चाललं असतं. पण आबासाहेब नि माई मुलाचं पत्र अगदी कानात तेल घालून ऐकत असतं. त्यामुळं त्यांना जर काही संशय आला तर? म्हणून की काय, सावध पवित्रा घेत रवीनं तब्बल सव्वा तास वेळ खर्च करून आबांच्या मनूच्या पत्रासारखं पत्र तयार केलं.

आता प्रश्न होता पैशांचा. मनू दर महिन्याला आबासाहेबांना आठशे रुपयांची मनिऑर्डर पाठवत असे. दोन दिवसांपूर्वीच रवीचा पगार झाला होता. रवीनं त्यातून आठशे रुपये बाजूला काढले व ते एका बंद पाकिटात घातले. पत्र व पाकीट टेबलावर ठेवून तो पलंगावर झोपला. पडल्या-पडल्या तो टेबलावरील पत्राकडे व पाकिटाकडे पाहू लागला. तेव्हा त्याला वाटत होतं, आपण केलेल्या कष्टाचं चीज तेव्हाच होईल

जेव्हा हे पत्र नि पाकीट आबांच्या हातात दिल्यावर त्यांना जो आनंद होईल तेव्हा. अशी कल्पना करीतच सकाळ होण्याच्या प्रतिक्षेत रवी झोपी गेला.

सकाळ होताच रवी सर्व आवरून पोस्टात दाखल झाला. दररोजच्याप्रमाणे त्याने पत्रांची छाननी केली. गावातील सर्व पत्रांचे वाटप करून आता तो कुंभार गल्लीत आला. इतका वेळ ज्या क्षणाची वाट पाहत होता तो क्षण आता खूप समीप आला होता. गल्लीतील एक-दोन पत्रं व़ाटून तो आबासाहेबांच्या घरासमोर आला.

''आबा, ओ आबासाहेब!'' रवी म्हणाला.

चष्मा डोळ्यावर चढवीत हळुवार पावलांनी आबासाहेब दारात आले. समोर रवीला पाहताच मनूचं पत्र आलं, हे त्यांच्या लक्षात आलं.

''अरे रवी, ये की ! मनूचं पत्र आलं वाटतं?'' आशावादी मुद्रेने आबा उद्‌गारले.

''हो, आलं ना! '' चटकन् रवी म्हणाला.

रवीच्या तोंडून सकारात्मक उत्तर ऐकताच आबांचा आनंद गगनात मावेनासा झाला. आनंदाच्या भरात ते पत्नीला म्हणाले,

''अगं रुक्मिणी, मनूचं पत्र आलं बघ!''

''काय? माझ्या मनूचं पत्र आलंय?'' असं म्हणत माई हातातील काम टाकून बाहेर आल्या.

रवीनं जी कल्पना रात्री पत्र लिहिताना केली होती, ती आता प्रत्यक्ष अनुभवत होता. पत्र आल्यामुळे आबा नि माईंच्या चेहऱ्यावर उमटलेल्या आनंदी छटा, पत्रातून मनू कसा असेल याची वाढती उत्सुकता पाहून रवीनं मनूचं पत्र त्यांना वाचून दाखवलं अन् ऑर्डर रजिस्टरवर आबांच्या अंगठ्याचा ठसा घेतला. रवी सर्व आवरून निघाला तेव्हा याआधी आबांच्या नि माईंच्या चेहऱ्यावर पत्र आल्यावर जी आभाळमाया दिसत असते, तीच त्याला आताही दिसत होती. त्यामुळे आपलं काम फत्ते झाल्यासारखं रवीला वाटलं. रवी अतिशय आनंदी व समाधानी झाला होता. ही आनंदाची वार्ता राऊत साहेबांना सांगण्यासाठी तो लगबगीने पोस्टाकडे निघाला.

रवी पोस्टात गेला तेव्हा राऊत कामात मग्न होते. रवी जवळ येताच त्याचा हर्षदायी चेहरा पाहून ते रवीला म्हणाले,

''रवी, दिलं मनूचं पत्र?''

''होय सर! आणि.....'' रवी उद्‌गारला.

''आणि मला सर्व माहितीये. अरे, तुझा चेहराच सांगतोय की तू निश्चितच यशस्वी झाला ते.'' रवीचं बोलणं मध्येच थांबवत राऊत म्हणाले.

''सारी देवाची कृपा!'' रवी म्हणाला.

''रवी, येथून पुढे महिना भरण्याच्या आधी तीन दिवस तू मनूचं पत्र तयार करीत जा. आपले पगार आठ तारखेस होतात. म्हणजे पगार झाले की, मनिऑर्डर नि पत्र लगेच आबांना पोचतं कर, म्हणजे आबासाहेब पत्रास उशीर झाला म्हणून पोस्टात चकरा मारणार नाहीत.'' राऊत रवीला म्हणाले.

''होय सर, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. मीही तेच ठरवलं आहे.'' राऊत यांच्या बोलण्याला दुजोरा देत रवी उद्‌गारला आणि दुपारच्या गाडीत टपाल पाठवण्याच्या कामाला लागला.

नियोजनाप्रमाणे रवी महिना भरण्याच्या आत पत्र तयार करून पगार होताच पैसे व पत्र आबासाहेब नि माईंना देऊ लागला. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद नि समाधान पाहण्यासाठीच जणू काही दोन तास वेळ खर्च करून लिहिलेले पत्र व दरमहा आठशे रुपये ही किंमतच तो मोजत होता.

एक दिवस रवी नेहमीप्रमाणे कुंभार गल्लीत पत्रं वाटप करीत होता. तोच माईंनी रवीला हाक मारली.

''अरं रवी, उद्या गुडीपाडव्याची तुला सुट्टी असेल ना?'' -माई म्हणाल्या.

''सुट्टी आहे ना माई!''- रवी म्हणाला

''मग ये ना उद्या दुपारी सणाचा जेवायला!''

माईंनी जेवणाचं आमंत्रण देताच रवी थोडा चपापला.

''सणाला जेवायला.... मला ना उद्या मित्राकडे जायचं होतं.''

रवी म्हणाला.

''अरं पोरा, दुपारनंतर जावा. तू येच बाबा-'' असा आग्रह धरीत माईंनी आबांना हाक मारीत बाहेर बोलावलं.

''अहो ! हा रवी काय माझं ऐकंना बगा...''म्हणत माईंनी रवीचा नकार आबांपर्यंत पोहोचविला.

''काय? रवी का नाय म्हणतोय? असं कसं चालेल! तुला यावाच लागंल, तसा मी पण ताटावर बसणार नाही बा !'' आबा रवीला कोंडीत पकडत म्हणाले. आता मात्र रवीलाही नाही म्हणायला जीभ रेटेना !

''बरं ठीक आबा, मी येतो उद्या एक वाजता!'' म्हणत रवीनं थांबलेले पत्रवाटप सुरू केले. आबांकडे जेवायला यायचं म्हणजे उगाच आपण आपल्या उपकाराची परतफेड करणं.आबांना माहीत नसलं तरी आपल्याला तर माहीत आहे ना? आबासाहेबांकडून निघल्यावरही रवीचं विचारचक्र सुरूच होतं. म्हणूनच आबांकडे जेवायला जायला त्याला अवघड्यासारखं होत होतं. शेवटी मनात नसतानाही केवळ आबा अन् माईंच्या आग्रहामुळे त्यानं आमंत्रण स्वीकारलं.

सुट्टी नसली तरी पोस्ट कार्यालय उघडून दररोजच्या कामातून हात न लागणारी कामे राऊतसाहेब न सांगताच तो करत असे. त्याच्या कार्यमग्न प्रवृत्तीचा अनेकांना हेवा वाटायचा, तर 'सुट्टीत काम करतंय' अशी टीकाही काही गावच्या पारावर बसणारे टवाळखोर करीत. पण त्यांच्याकडे लक्ष देण्यास आपल्याच कामात रमणाऱ्या रवीला कुठं वेळ होता? पाडव्याची सुट्टी असून आजही त्याने पोस्टातील कागदपत्रे, रेकॉर्ड ठेवण्याच्या रॅक झटकल्या.

घरी येऊन हातपाय धुऊन तो आबासाहेबांकडे जाण्यास निघाला. त्यांनी दिलेल्या वेळेत रवी आल्याने रवीला पाहत आबा म्हणाले, ''रुक्मिणी, अगं आवरलं का तुझं? रवी आला बग!''

''आरं पोरा, बस वाईच! भजं सोडल्याती. गरम गरम वाढते.'' म्हणत माईने रवीला बसण्यास चटई टाकली.

ताट येईपर्यंत रवी मोकळ्या वेळात आबांचं घर न्याहाळू लागला. मनूचे फोटो, पुस्तकाची रॅक, कपडे, इव्हन बूटही आबा नि माईंनी

जपले होते. त्यांच्या आजपर्यंतच्या बोलण्यात जाणवणारा त्याच्याविषयीचा मायेचा झरा रवीला आबांच्या घरात दिसत होता. रवी काय न्याहाळतोय, हे लक्षात येताच समोर बसलेले आबासाहेब म्हणाले, ''अरं हे सारं मनूचं. तो गेला नोकरीला. त्याच्या या साऱ्या वस्तूंच्या रूपानं आम्ही त्याला तो घरात असल्याचं समजतो. रुक्मिणी तर रोज सारं पुसून ठेवती. आईची माया ना शेवटी..!''

आबा मनूच्या एक-एक आठवणींचा पाढा वाचत होते, तस तसं मनूचं 'ते' पत्र रवीला आठवलं. पण तो अस्वस्थ होण्याच्या आधीच माईंनी दोघांच्या समोर ताटं ठेवली.

''खावा दमानं!'' माई म्हणाली. तोच रवीनं हात धुवायचे राहायल्याचं खुनावलं.

''अरं देवा, मला वाटलं तुम्ही धुतलं हात-'' म्हणत माईंनी पात्येलं अन् तांब्या दिला.

हात धुऊन हात पुसतानाच रवीनं ताटावर नजर टाकली, तर पुरणाच्या पोळीबरोबर माईंनं सणाचं सारं गोडधोड केलं होतं. त्यानं कुरडईला हात लावताच सारात लिंबू पिळत आबा म्हणाले, ''जुपा आता.''

ताटातले पदार्थ संपण्याआधीच माईंची दुसरी वाढी आलीही. ती आग्रहानं वाढू लागली. रवीच्या 'नको'ला जणू वाढच समजून तिनं भजाची सारी प्लेट त्याच्या ताटात ओतली.

''नकोय माई, एवढी भजी!'' रवी म्हणाला.

''आरं खा रं, लाजायचं नाय!'' असा हक्कानं जणू दमच भरत माई गुळवणी आणायला आत गेल्या.

सार-भातावर फुरक्या मारत आबाही रवीच्या ताटावर काय कमी, काय जादा लक्ष ठेवून होते. रवी खाली मान घालून जेवू लागला.

मधल्या दारात पदराला हात पुसत माई उभ्या राहिल्या. एकटक रवीकडं पाहू लागल्या. त्यांना पाहून आबासाहेब म्हणाले,

''काय पाहती?''

''अहो बघा ना, सेम माझ्या मनूसारखाचं जेवतोय की रवी. मला

त्याची लय आठवण झाली हो. सणासुदीचं काय खाल्लं का नाय देव जाणे..'' माई काळजीच्या सुरात म्हणाल्या. तेव्हा रवीला माई आपल्याकडे पाहत असल्याचे लक्षात आले. त्याने कपाळावरील घाम पुसत माईंना पाणी मागितले.

ज्या घरात मनूची क्षणाक्षणाला आठवण निघते, त्या घरालाच मनू विसरला होता. हाच विचार आता मात्र रवीला अस्वस्थ करू लागला. हातावर पाणी पडताच पानसुपारीचा पाहुणचार घेत रवीनं माई अन् आबांचा निरोप घेतला. आबा-माईंची मनूवरील माया पाहून खोलीवर जाणाऱ्या रवीच्या मनात नाना विचारांचे आभाळ दाटून आले. रक्ताची नाती एवढी घट्ट असतात, तर मनोजसारखे लोक क्षणात तोडतात कशी? प्रेमरूपी वेलीवर करवत चालवताना यांना काहीच कसं वाटत नाही? खोली आली तरी उत्तर मात्र एकाचंही मिळेना!

दुसऱ्या दिवशी पहिल्या एस.टी.नं आलेली टपालाची थैली त्याने आणली. उघडता क्षणी पहिली नजर त्याची 'ऑफीस पार्सल' मार्क असलेल्या लिफाफ्यावर पडली. त्याने ते चटकन राऊतसाहेबांच्या टेबलावर ठेवलं. अर्ध्या तासात त्यानं पत्रे भरून बटवा खांद्याला अडकविला. तोच पोस्टमास्तर राऊत आले. ते खुर्चीत बसताच रवीनं 'ऑफीस पार्सल' त्यांच्या हातावर टेकविलं व त्याच्या वाटपाच्या कामाला निघून गेला.

पत्रं आज कमीच होती. सूर्य डोक्यावर येण्याआधी वाटप संपवून रवी पोस्टात आला. त्याला पाहताच राऊतसाहेबांनी आवाज दिला-

.

''अरे रवी..''

त्यांच्या टेबलाकडे येत रवी म्हणाला, ''काय साहेब?''

''अरे, मला जावं लागेल!'' राऊत म्हणाले.

''कुठे ?'' कपाळावर आठी पडलेल्या मुद्रेत रवी म्हणाला.

''हे बघ, बदलीचं पत्र तू दिलेल्या ऑफिस पार्सलमधून मिळालं.'' पत्र रवीला दाखवत राऊत म्हणाले.

''पण साहेब, अचानक कशी? आपल्या पोस्टाची तर काही

तक्रारही नाही!'' रवी म्हणाला.

''अरे, प्रशासनापुढे आपलं काय चालतं? चल, मला रोज आणखी आठ कि.मी. जावंच लागेल.'' राऊत निराशेच्या सुरात म्हणाले.

''पण साहेब...!''

''तू टेन्शन घेऊ नकोस! मी वर फोन केलाय. मी जेथे चाललोय त्या लाख स्टेशनचे कांबळे येतायत येथे. माणूस खट्याळ, पण तुला त्रास देणार नाही.''

पण –मनूच्या पत्राचं प्रकरण राऊतांची आधार एक्स्प्रेस थांबवत मध्येच रवी म्हणाला.

''अरे, तू तर वेळेत पत्र लिहून मनिऑर्डर देतोच ना? मग काय गडबड होणार? जरी झाली तरी मी सांगतो त्या कांबळ्याला.'' राऊतांनी रवीला धीर दिला.

राऊत येण्याआधी रवी त्या पोस्टात असला तरी ते आल्यापासून रवीला त्यांनी कधीच पोस्टमन म्हणून वागवलं नाही. पोस्टमन व पोस्टमास्तर यांच्यातील अंतर केव्हाच त्यांनी मैत्रीनं कमी केलं होतं. आता ते चालल्याने रवीचा मोठा आधार जाणार होता.

''अरे वेड्या, लाख स्टेशनला जाताना मी भेटेन ना तुला!'' असे म्हणत त्यांनी रवीच्या पाठीवर सांत्वनाची थाप टाकली.

राऊत गेल्यानंतर कोणताही पोस्टमास्तर आला तरी रवीला अडचण नव्हती. त्याचं काम चोख. पण अडचण होती 'मनूच्या पत्रा'ची! नव्या पोस्टमास्तरने काही आक्षेप घेतला, आबांना सांगितलं तर? राऊतांनी आधार दिला तरी अशा अनेक प्रश्नांच्या भोवऱ्याने रवीला वेढले. राऊतांच्या बदलीमुळे त्याच्या चांगल्या कामाचीही त्याला चोरी वाटू लागली. परिस्थितीनं श्रद्धा ढळण्याची वेळ आली तरी आपण कोणाचं वाईट तर केलं नाही ना? मग कशाला घाबरायचं, हाच विचार करीत रवीनं स्वतःवरील श्रद्धा ढळू दिली नाही.

राऊत लाख स्टेशन पोस्ट ऑफिसला हजर झाले, पण कांबळे चार दिवस उशिरा येणार होते. रवी पोस्टमनबरोबर तोपर्यंत पोस्टमास्तरही झाला होता. राऊत गेल्यावर दुसऱ्याच दिवशी तालुका

पोस्ट ऑफिसमधून आलेल्या फोनप्रमाणे महत्त्वाचं टपाल येणार म्हणून रवी एस.टी. येण्याआधीच थांब्यावर वाट पाहू लागला. एस.टी. नेमकी त्या दिवशी जरा उशिराच आली. टपालाची थैली उतरवून रवी लगबगीने पोस्टात आला. थैली उघडली. टपाल पाहू लागला. त्यात त्याला एक शासकीय पाकीट आढळलं. हेच महत्त्वाचं असावं, असा अंदाज बांधत त्याने फोडलं; तर रेल्वे मार्गात शेतजमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या जमिनीच्या मूल्याचे धनादेश होते. त्यात एकूण बारा शेतकऱ्यांची यादी. कोणाकोणाची लॉटरी लागली, या उत्सुकतेपोटी रवी पाहू लागला, तर त्यात आबांचंही नाव होतं. सर्वांत जास्त जमीन गेल्याने त्यांचा सर्वाधिक चार लाख रुपयांचा धनादेश आला होता.

रवीलाही आनंद झाला नाही तर नवल! त्यानं पत्र वाटप करता करता गावात जणू दवंडीच दिली. इतरांप्रमाणे आबा, माईलाही आधी त्याच्या बोलण्यावर विश्वास बसेना. पण जेव्हा त्याने चार लाखांचा धनादेश आबांना दाखविला, मात्र आबासाहेबांच्या खुशीला सीमाच उरली नाही. माईनं तर घरातून साखर आणून त्याचं तोंडही गोड केलं. पुढचे धनादेश देण्यासाठी रवी आबासाहेबांकडून निघाला. तोच आबासाहेब म्हणाले,

''रवी पोरा, एक काम केलं तर उपकार होतील रे!''

''अहो आबा, उपकाराची भाषा काय करता? हक्काने सांगा.'' रवी म्हणाला.

''अरं, ही खूशखबर पत्तर लिहून मनूला सांग ना! अन् म्हणावं, आता आम्हाला पैसं न पाठवता बँकेत टाक. तुला खर्च कर. आनिक एकदा ये म्हणावं. आता त्याला कधी डोळे भरून पाहीन असं झालाय रं! करशील काय?'' आबासाहेब म्हणाले.

आता मात्र रवी थबकलाच.. पण आबांपुढे त्याला 'हो' म्हणावंच लागलं. आता आपल्या खोट्या मनूच्या पत्राचा भांडाफोड होणार, या विचाराने रवी व्यथित झाला. पण दुसऱ्याला मदत करणं ही चोरी नाहीच. अन् कोणी म्हटलं तर देतील ती शिक्षा भोगूच, असा ठाम

निर्धार करीत रवीने त्याच रात्री झोपण्याआधी मनोजला आबांनी सांगितल्याप्रमाणे पत्र लिहिलं आणि दुसऱ्या दिवशी सकाळच्या टपालात टाकूनही दिलं.

पत्र मिळताच क्षणी चार लाखांच्या आशेने मनोज घरी यायला निघाला. पनवेलवरून लाख स्टेशनला सायंकाळी उतरला. लाखवरून काही मिळेना म्हणून टांगा करून दिवेलावणीच्या वेळी गावात आला. तो गावात आल्याची वार्ता कळताच आबासाहेबांनी वाजत गाजत त्याचं स्वागत केलं. दुसऱ्या दिवशी सकाळीच कुंभारगल्लीतील मुक्ताजी रवीच्या खोलीवर आला. आबासाहेबांनी बोलविल्याचा निरोप देऊन तो चालता झाला. त्याच्या निरोपाने रवी डगमगला नाही; उलट सकाळीच आपल्याला बोलावणं येईल याची त्याला जणू खात्रीच होती. चहाचा कप तोंडाला लावून रवीनं कपडे चढविले. सायकल पंक्चर म्हणून आबासाहेबांकडे पायीच निघाला. तो अंगणात पोहोचला तोच घरातून गप्पा, हसण्याच्या तुषारांची मुक्त उधळण मनू अन् आबासाहेबांत सुरू होती.

रवीला पाहताच आबासाहेब 'ते' पत्र व पैशावरून भडकतील, असं त्याला वाटलं. पण झालं उलटंच. रवीला पाहताच आबासाहेबांनी त्याचं नेहमीच्या आनंदी चेहऱ्याने स्वागत केलं.

''मनू, अरे हाच बरं का, तो तुझे पत्र आम्हास्नी वाचून दाखवायचा, तुला उत्तरं पाठवायचा तो रवी.'' अशी ओळखही मनूशी करून दिली. रवीचे जसे यामुळे आपल्या आईवडिलांवर व आपल्यावर खूप उपकार झाले म्हणून मनूने त्याला शहरी रिवाजात फक्त 'थँक्यू' म्हणत त्याची परतफेड केली. पण त्याने खरे केलेले 'उपकार' अद्याप तरी त्याला समजले नव्हते, जरी समजले असते तरी त्याची परतफेड करण्यासाठी मनूकडे शब्दही नसते अन् लायकीही..

रवी आल्यापासून आबा-माईचं मनुपुराण सुरू होतं, तेही मनूच्या साक्षीने ! ते पाहता रवीनं सुटकेचा निःश्वास रवीनं सोडला. मनूही त्यांच्या काळजीचे, आठवणीचे पोवाडे गात होता. हे किती खरं, किती खोटं ते फक्त रवीच समजू शकत होता. मनूची ओळख झाली. चहा

झाला. पाहुणचार झाला अन् 'मनू पत्र' प्रकरणातून सुटकाही झाली म्हणून की काय, रवी जाण्यास निघाला. तोच माई म्हणाल्या,

''आरं पोरा, बस की! आता काय तुला आमचा पतराचा ताण राहणार नाय... ''

''काय! मनू इथंच राहणार की काय?'' रवी म्हणाला.

''अरं नाय, आम्हास्नी घेऊन चाललाय तो शहराला.'' आबा म्हणाले.

''माई-आबांचे हाल आता मला पाहवत नाहीत. माई त्यांच्याविना राहणार नाही. म्हणूनच नेतोय त्यांना.'' मनू म्हणाला.

''अरे खूपच छान.. छान..! ते बिचारे सारखी तुझी आठवण काढतात. चांगला निर्णय घेतलास तू.'' रवी म्हणाला.

''उद्या सकाळी नऊच्या पॅसेंजरनं जातोय, लाख स्टेशनवरून.'' आबा म्हणाले.

''आज रातच्याला सामान भरून ठेवू बघ.'' माई म्हणाल्या.

''तू येशील ना आम्हास्नी ठेसनापर्यंत सोडवायला?'' आबा म्हणाले.

''नाही... कांबळेसाहेब आले नाहीत ना?''

''ते काय नाय, तुला यावं लागंल.'' माई म्हणाल्या.

''अरे रवी ये ना, टांगा केलाय स्टेशनपर्यंत. आम्ही गेल्यावर तू परत ये टांग्याबरोबर.'' मनू म्हणाला.

''ठीक-ठीक ! येतो मी !'' म्हणत रवी पोस्टाकडे निघाला. पत्राचा घोळ झालाच नाही. आता आबा-माईला मनू घेऊन चालला. त्यामुळे मनूच्या 'त्या' पत्राचा विषय मिटला. त्यामुळे सर्वार्थाने रवी सुटला तरी मनूच्या चेहऱ्याआड लपलेला स्वार्थीपणा रवीला स्पष्ट दिसत होता. आबा-माईसाठी नव्हे, तर त्यांना मिळालेल्या चार लाखांसाठी तो पत्र मिळताच गावाकडे आला. आता माई-आबाला नेऊन... पुढे रवीला विचार करावा वाटेना ! शेवटी रक्ताचा मुलगा! त्यांचे आपण कोण? सांगणार कसं? आपलं ऐकणार कोण? त्यापेक्षा न बोललेलं बरं, असं ठरवून रवी त्याच्या कामाला लागला. कांबळे हजर झाले नव्हते. त्यांच्या

रिकाम्या खुर्चीकडे पाहून रवीला राऊतांची आठवण झाली. ते असते तर सारी व्यथा त्यांना तरी सांगता आली असती; पण तेही शक्य नव्हतं.

भल्या पहाटेच माईंनी उठून सर्व सामानाची आवराआवर, निघण्याची सारी तयारी केली. आबासाहेबांचं आवरलं. मनूलाही लवकरच उठवलं. आठलाच निघण्याची तयारी झाली. टांगाही आला. सामान, पिशव्या टाकून माई, आबा अन् मनू टांग्यात चढले. टांगा रवीच्या खोलीपुढे थांबला.

''रवी.. रवी .. आवरलं का?'' आबासाहेबांनी रवीला हाक मारली.

लुंगी काढून पँट चढवत ''आलो-आलो...'' रवी आतूनच म्हणाला. शर्टच्या गुंड्या अर्ध्याच लावल्या. तशातच त्याने दाराला कुलूप लावलं. टांग्यात चढला. माई-आबांना वाटं लावायला गावाच्या हनुमान मंदिरापर्यंत चांगलीच गर्दी जमली. ''परत लवकर ये, आम्हास्नी विसरू नकोस'' हौसाबाई, कलाबाई म्हणाली.

''तुम्हीच पनवेलला आल्यावर यावं, बरं का?'' उलट उत्तर आबा देत होते. गावकऱ्यांचा निरोप घेत गावाबाहेर टांगा पडला तरी दोघं मागे वळून दृष्टीआड होत चाललेल्या गावकऱ्यांना हात हलवून निरोप देत होते.

अवघ्या वीस मिनिटात टांगा लाख स्टेशनवर आला. आबा, माई उतरले. मनोजने सामान खाली घेतलं.

''रवी, मी आलोच तिकीट काढून, तू थांब तोवर.'' मनू म्हणाला.

''ये काढून, मी यांना फलाटावर नेतो तोवर!'' रवी म्हणाला.

पहिलीच गाडी. त्यात पॅसेंजर असल्याने चाकरमाने, विद्यार्थ्यांची गर्दी जास्त होती. गर्दीतून वाट काढीत रवीनं माई-आबांना फलाटावर नेलं. सामान टेकविलं, तोच गाडी दुसऱ्या फलाटावर येईल, अशी सूचना स्टेशन मास्तरनं भोंग्यातून केली. पलीकडे जाण्यासाठी ओव्हर ब्रिजकडे प्रवाशांनी धाव घेतली. तिकिटे घेऊन येणाऱ्या मनूनेही ते ऐकलं. तशी 'चला, चला' म्हणत दुसऱ्या फलाटावर जावं लागेल म्हणून त्यानं सामान उचललं. तो तडक निघाला. रवीनं माई-आबांना आधार

देत हळूहळू ओव्हर ब्रिज चढून पुन्हा त्यांना सावकाश उतरवीत दुसऱ्या फलाटावर आणलं. तोच पहिल्या फलाटावर मालगाडी आली. घड्याळाचा काटा काटकोनात आला. नऊ वाजले. पण गाडी येण्याची चिन्हे दिसेनात. गाडीला उशीर होतो की काय, अशी चर्चा सुरू असतानाच गाडी अर्धा तास उशिरा येत असल्याची पुन्हा अनाऊन्समेंट झाली. तोच रवी म्हणाला,

''माई-आबा, उशीर होईल, मी चलतो.''

''मनू, जा व्यवस्थित!''

''पोरा लई केलं आमच्यासाठी.'' माईंचा स्वर दाटून आला.

''अरं, पनवेलला आला तर ये बरं का?''सांगत आबांनी कोपरीच्या बटव्यात हात घातला. तोच रवीनं त्यांचा हात दाबत, ''आबा, मला लाजवू नका,''म्हणत त्यांच्या, माईंच्या पाया पडून तो निघाला.

मनूशी हस्तांदोलन करीत त्याने तिघांचा निरोप घेतला. ब्रिज चढून एक नंबरच्या फलाटावर आला, तेव्हा सव्वानऊ झाले होते. रवीने निघायला पाहिजे. त्याचं मनही त्याला सांगत होतं. पण पाय चालेना, काहीतरी चुकल्यासारखं, कोणीतरी आपल्याला एकटं पाडलंय, अशा मनःस्थितीत उशीर होतोय, हे लक्षात येऊनही तो एका रिकाम्या बाकावर टेकला. मांडीत हात दाबून मान खाली घालून बसला. आबा-माईंचं पुढचं भवितव्य काय, हे माहीत असूनही आपण त्यांना जाऊ दिलं. त्याला स्वतःविषयी गुन्हेगारीची भावना वाटू लागली. सत्य कितीही कटू असलं तरी त्यांना ते आता येणाऱ्या काळात स्वीकारावंच लागेल. शेवटी तीन वर्षे त्यांना जे दुःख-यातना होण्यापासून वाचवलं, त्या तीन दिवसांत त्यांना मिळणार होत्या. आपण त्यांना नाही वाचवू शकलो. तोच गाडी आल्याच्या भोंग्याने तो भानावर आला. गाडीत लोक चढले-उतरले. गाडी आल्या वाटेने पुढे निघून गेली. क्रॉसिंगला थांबलेली मालगाडीही गेली. इतका वेळ असणारा प्रवाशांचा गोंगाट आता संपला होता. मालगाडी जाताच निर्मनुष्य झालेल्या दुसऱ्या फलाटावरील आबा-माई उभ्या असलेल्या जागेवर नजर टाकून रवीने पुन्हा खाली मान घातली. तोच 'रवी' म्हटल्याचा परिचित आवाज

आला म्हणून रवीनं वर पाहिलं. पाहतो तर राऊत पुढे उभे!

''साहेब, तुम्ही..!'' रवीला शब्द सुचेना! तोच माई अन् आबाही त्यांच्या पाठोपाठ दिसले.

''अरे गाडी गेली, तुम्ही गेले नाही का? मनू कुठंय?'' आपण किती व्यथित आहोत यापेक्षा आबा-माईला न गेलेले पाहून रवीला त्यांची काळजी वाटली.

''कोण मनू ?'' आबासाहेब रागात म्हणाले.

रवीला काहीच कळेना!

''काय झालं राऊतसाहेब? मला सांगा ना!'' रवी म्हणाला.

''अरे रवी, सकाळीच तुम्ही गेल्यावर गावात गेलो. तुझी खोली बंद होती. शेजारी विचारलं तर तू यांना वाटं लावायला आल्याचं कळलं. धावपळ करीत आलो. मला माहिती होतं, मनू का, कशासाठी या दोघांना घेऊन जातोय ते! म्हणून त्याची परीक्षा पाहण्यासाठी थेट स्टेशनमध्ये आलो. मला मनूचा संशय होताच म्हणून आबा-माईंना म्हणालो,

''अहो आबा, तुम्हाला महत्त्वाचा निरोप द्यायचा होता, म्हणून इथपर्यंत आलो. ज्यांना नुकसानभरपाई मिळाली नाही, अशा शेतकऱ्यांनी आक्षेप घेतल्याने तुमच्या पैशाला स्टे लागलाय. त्याचे वाटप आता होणार नाही, हे ऐकताच आबा-माईंपेक्षा मनूला जास्त धक्का बसला.

''काय पैसे मिळणार नाहीत? खरंच? आता काय उपयोग?'' चिडलेला मनू म्हणाला. आबा-माईंना सरळ घरी जाण्याची भाषा त्यानं वापरली. ''माझं भागत नाही, तुम्हाला कुठं नेऊ? म्हणून तर पैसे पाठवणं बंद केलं होतं. निघा घरी-'' असा आरडाओरडा तो करू लागला. तोच रेल्वे आली. रेल्वेत बसून माई-आबांना सोडून तो गेलाही.'' राऊतांचं बोलणं ऐकून रवीच्या अंगावर काटाच आला.

''रवी, तू म्हणाला होतास, एखाद्याच्या भल्यासाठी खोटं बोलल्यानं काय बिघडतं. अरे, मी पैसे मिळणार नसल्याचं खोटं सांगितल्यानंच मनूचा खरा अवतार कळला. आबा अन् माईंना तू त्यांच्यासाठी केलेल्या

‘मनू पत्रा’चंही सांगितलं. मला माफ कर, त्यांच्या भल्यासाठी मला त्यांना खरं सांगावं लागलं... खोटंही!'' राऊत म्हणाले.

तोच माई नि आबांनी रवीसमोर येऊन हात जोडले.

''पोरा, तू माणूस नाय देव हायंस देव..देव!'' माई म्हणाल्या.

''का म्हणून केलं रं.. अन् आम्हास्नी नाय कळू दिलं..'' आबा म्हणाले.

''तो आमचा रक्ताचा गोळा... आमच्यावर उलटला. आम्हाला वाऱ्यावर सोडून गेला.. पण तू रं कोणत्या नात्यानं केलं बाबा..?'' आबा म्हणाले.

रवीला शब्द सुचेना अन् आता त्याचाही बांध फुटला.

''आबा, रक्ताचं नाय पण माणुसकीच्या नात्यानं केलं.'' भिजलेल्या शब्दानं रवी म्हणाला. तसं आबा-माई त्याच्या गळ्यात पडले. त्यांना घेऊन तो टांग्याकडे जाऊ लागला. त्याला पाहत राऊतांना स्टेशनगार्डनं विचारलं, ''कोण हा त्यांचा?''

''अनाथ मूल दत्तक घेतलेलं ऐकलं असंल, पण अनाथ आईबाप दत्तक घेतलं ऐकलंत का कधी?'' त्यांच्या प्रश्नानं गार्डही चाचरलाच.

''या पोरानं अनाथ आई-बापाला पोराचं प्रेम दिलं. आता तोच त्यांचा मनू झालाय. रक्ताच्या नात्यानं नाही, पण माणुसकीच्या नात्यानं!''म्हणत राऊतांनी पाणावलेल्या डोळ्यांना रुमाल लावला.



# प्रतिष्ठा

नांगराला काहीतरी गुतलं म्हणून सर्जेरावानं ते काढण्यासाठी बैल उभे केले. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत बैल हाकून तो पार शिणला होता. थोडा दम घेण्यासाठी खाली टेकला. समोरच्या डोंगराआड जाणाऱ्या रविराजाला पाहून क्षणभर त्याला आठवण झाली की, आपल्याही जीवनाचा सूर्य असाच अस्ताला गेला होता. त्याला त्याच्या आयुष्याचे ते दिवस आठवू लागले....

खानदानी श्रीमंती लाभलेल्या राघोबारावांचा तो एकुलता एक मुलगा. सुरुवातीपासून सर्जेरावाला फक्त श्रीमंती-पैसा माहीत होता. गरिबी म्हणजे काय, हे त्या काळात त्याला एखाद्या कोड्यासारखं वाटायचं. वडिलोपार्जित संपत्ती आणि त्यापासून मिळत असलेल्या समाजातील प्रतिष्ठेचा त्याला फार अभिमान वाटायचा. घरातील परिस्थिती शिक्षणास अनुकूल असतानाही केवळ या श्रीमंतीचा मालक शिकून काय करणार म्हणून त्याने शिक्षणाला रामराम ठोकला. त्यानंतर मौजमस्ती करणे, हाच त्याचा जीवनक्रम बनला. मनुष्याच्या आसपासच्या वातावरणाने मनुष्य घडत असतो. जसजसा तो तारुण्यात येऊ लागला तसतसा श्रीमंती व प्रतिष्ठेचा त्याचा ज्वर वाढू लागला. याच कालावधीत त्याचा विवाह कुसुम नावाच्या एका घरंदाज मुलीशी झाला. विवाहानंतर काही काळ आनंदाचा गेल्यावर त्याच्या वडिलांना अचानक देवाज्ञा झाली. पितृविरहाच्या दुःखातून सावरून सर्जेराव पुन्हा जीवनाचा रहाटगाडा हाकू लागला. पण आता परिस्थिती बदलली होती. गावात, शेतात त्याला 'लहान मालक' ऐवजी 'मोठे मालक' हा बढतीचा व प्रतिष्ठेचा शब्द वापरला जाऊ लागला.

आता वडिलांना मिळणारा मान-सन्मान सर्जेरावाला मिळू लागला.

सर्जेराव आता गावातील प्रत्येक क्षेत्रातील आघाडीचा कार्यकर्ता झाला होता. गावातील राजकारणात जेवढे त्याने लक्ष घातले तेवढे घराकडे व शेतीकडे दुर्लक्ष होत गेले. शेतीतील नियोजनबद्धतेची जागा उन्मत्त कारभाराने घेतली होती. कोणत्याही व्यवसायात मुबलक द्रव्य किंवा मनुष्यबळ असून चालत नाही तर त्याला कर्तबगारीची जोड लागते आणि तेथेच सर्जेराव कमी पडत होता. परिणामतः राघोबादादांची शिखरावर असलेली प्रगतीची वाटचाल आता सर्जेरावकडून अधोगतीकडे चालली होती. त्याच्या अंदाधुंद कारभारामुळे उत्पादन शून्य, खर्च मात्र भरमसाट असल्याने त्याची आर्थिक परिस्थिती खालावत होती पण संपत्ती, पैसा, प्रतिष्ठा यात अडकलेल्या सर्जेरावाच्या हे लक्षात येत नव्हते. त्यातच एका साली वरुणराजाने दगा दिल्याने खरिपाचे पीक पूर्णतः वाया गेले. पाऊस पुरेसा नसल्याने रब्बी पिकाच्या तर आशाच धूसर झाल्या होत्या. पाण्याअभावी सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. त्याची सर्जेरावाच्या नवकोट नारायण असामीलाही झळ पोहोचली होती. इतरांप्रमाणे त्याला चरितार्थाची चिंता भासू लागली. पण या परिस्थितीतही तो त्याची अधोगती स्वीकारीत नव्हता, कारण समाजात मिळणारी प्रतिष्ठा-मान त्याला सोडत नव्हता आणि तीच टिकविण्यासाठी त्याने या गावातील सावकाराचा आश्रय घेतला. मात्र ती त्याच्या आयुष्यातील खूप मोठी चूक ठरली. मणिकलाल सावकाराकडे शेत-जमीन, वाडा गहाण ठेवून त्याने कर्ज उचलले; पण ते फेडणार कसे याचा काही मार्ग त्याला दिसत नव्हता. कर्जाच्या पैशात काही काळ निभावल्यावर मात्र पुन्हा तीच विवंचना त्याला भासू लागली. सुरुवातीला अंगणापासून घरापर्यंत गुणगान करणारा मणिकलाल सावकार आता सर्जेरावाला दारातही उभा करीत नव्हता तर एखादा, फुटका ढब्बू देणं लांबच.

एकदा का मनुष्य दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकला की त्यातून बाहेर पडणे कठीण असते. इकडे सर्जेरावाची अवस्था बिकट झाली होती. ज्या प्रतिष्ठेसाठी त्याने हे सर्व केले होते, ती केव्हाच धुळीस

मिळाली होती. लोकांच्या तोंडातील सर्जेराव जाऊन 'कंगाल सर्जा' ही नवी उपमा मिळू लागली. अखेर कर्जाला दिलेली मुदत संपली. सावकार मणिकलालने कायदेशीर कारवाई करून सर्जेरावाच्या शेती-वाड्यावर जप्ती आणून मालमत्ता ताब्यात घेतली. तरीही कर्जाची रक्कम शिल्लक राहिल्याने ती मणिकलालच्या इथं राहून सर्जेरावनं फेडावी, असा ठराव संमत झाला. एकेकाळी ऐश्वर्यात लोळणारा सर्जेराव आता लंकाधिपती बनला होता नि मणिकलालकडे रात्रंदिवस कष्ट उपसत होता.

''अय्यो व्यंकटरमना, तू इथे असते? मी तुला तिकडे पाहते.'' मूळचा दाक्षिणात्य असलेला मणिकलाल सर्जेरावाला पाहून उद्गारला.

त्याच्या आवाजाने भूतकाळात गेलेला सर्जेराव वर्तमानात आला.

''अरे सर्जा, असे रात्रीपोस्तर काम आधीच केले असते तर आज ही कर्मफळं आली असती का रे?'' मणिकलाल म्हणाला.

मणिकलालचा टोमणा ऐकूनही न ऐकल्यासारखा करीत सर्जेरावनं नांगर दटवण्यास सुरुवात केली. रात्री उशिरापर्यंत नांगर दटवून सर्जेराव धरतीला डोके टेकवत असे. तेव्हा मणिकलालने दिवसभर केलेल्या टोमणेबाजीची त्याला आठवण होत असे. तेव्हा तो त्याला शिव्या देत तसाच तणतण करीत झोपी जाई.

दर वर्षीप्रमाणे गावची यात्रा जवळ आली होती. याआधी यात्रेतील पालखीच्या मिरवणुकीचा मान सर्जेरावाला मिळत असे ; पण 'असतील शिते तर जमतील भुते' या म्हणीप्रमाणे मणिकलाल आता गर्भश्रीमंत झाला होता. त्याला हा मान देण्यात येणार होता. मणिकलाल मोठा धूर्त मनुष्य होता. त्याला सर्जेरावाचा पावलोपावली अपमान करण्यात समाधान मिळत असे म्हणून की काय, पालखीमागे चालण्यासाठी गाडीबैलात उभे राहून मिरवणुकीत सामील होण्याचा बेत त्याने आखला.

एका संध्याकाळी सर्जेराव बैल घेऊन घरी येत असताना मणिकलाल त्याला म्हणाला, ''सर्जेराव, बैलास्नी चांगला धुऊन, नटवून उद्या सकाळी तयार ठेव!''

''का म्हणून सजवायचीत बैलं?'' सर्जेराव म्हणाला.

''तुला मी सांगते तेवढं कर तू! अरे भल्या माणसा, उद्याला यात्रा की रे गावची, आपल्या गावची. त्यात जायचं बघ की आम्हाला!'' मणिकलाल अधिक माहिती देत म्हणाला.

हे शब्द कानावर पडताच सावकाराची बिलंदर वृत्ती सर्जेरावाच्या लगेच लक्षात आली. त्या रात्री त्याला झोप लागेना, कारण उद्या घडणारं चित्र त्याच्या डोळ्यांसमोर दिसू लागलं. गावच्या यात्रेतील पालखीच्या मिरवणुकीचा मान वर्षानुवर्षे सर्जेरावाच्या घराण्याकडे होता, तो आता मणिकलालला मिळणार होता आणि त्या मिरवणुकीत मणिकलालचा गाडीवान मी? या विचारानेच त्याच्या जीवाची कालवाकालव होत होती.

सारी रात्र त्याला झोप आलीच नाही. सूर्यनारायणाच्या पहिल्या किरणाआधी त्याने सर्व आटोपून बैल सजवून मणिकलालसमोर उभे केले. मणिकलाल सर्व आटोपून गाडीकडे आला. घरी इतर नोकर-चाकर असतानाही त्याने गाडी दटवण्यासाठी सर्जेरावाला हाक मारली. त्याच क्षणी सर्व वातावरण स्तब्ध झाल्यासारखं सर्जेरावाला वाटलं, पण पर्याय नव्हता. शेवटी नशिबाचे भोग भोगल्याशिवाय गत्यंतर नाही म्हणून त्यानं बैल दामटवण्यास सुरुवात केली. थोड्याच वेळात बैलगाडी यात्रेच्या ठिकाणावर आली.

सर्जेरावानं एक वार सर्वत्र नजर भिरकवली, तर सारा गाव त्याच्याकडं टकमका बघत असल्यासारखं त्याला दिसू लागलं.

''अरं ए सर्जा, मोरं घे की रं गाडी, सावकारास्नी उतरायचं हाय!''

गावातला नाईक सर्जेरावला उद्देशून म्हणाला, की जो एकेकाळी सर्जेरावाची खुशामत करीत होता. सर्जेरावानं गाडी पुढं घेताच गावकऱ्यांनी उतरणाऱ्या मणिकलाल सावकाराला गराडा घातला. सर्जेराव गाडी बाजूला घेऊन उभा राहिला. सावकारानं पालखीला नारळ फोडलं, गुलाल वाहिला. सावकार गाडीकडं येऊ लागला तर कुणीतरी म्हटलं, ''सावकार, सर्जास्नी चांगलं काम दिलं.''

''अरं, त्यो हायच त्या गुणाचा. बापजाद्याच्या पैशावर केली मौजमस्ती; आता भोगतोय लेकाचा!''रामड्या नाईक सर्जेरावाकडं पाहत उद्‌गारला. त्याच क्षणी सर्जेरावाच्या अंगाची लाही-लाही झाली.

रागाच्या भरात तो तडकला, ''रामड्या तोंड आवर, नायतर तोंडच फोडीन!''

''सर्जा, तुला गाडी दटवायला आणलं, बाकीच्या उचापती बंद कर नि मुकाट्यानं गाडी हाक!'' सावकार रागात उद्‌गारला. सर्जेरावानं सावकाराची आज्ञा पाळली. गाडी मिरवणुकीमागे चालू लागली. तुताऱ्या फुंकल्या गेल्या..ताशे वाजण्यास सुरुवात झाली..लोकांच्या गर्दीनं मिरवणूक आणखीनच सजली होती. मनाला उत्साही व मोहित करणारं दृश्य होतं हे. प्रत्येक व्यक्ती लहान-थोर तन-मनाने मिरवणुकीत सामील झाले होते. फक्त एक सोडून...

रामड्या नायकानं केलेल्या अपमानाबद्दल सर्जेरावाला त्याचा राग आला खरा, पण त्याचं मन त्याला सांगत होतं, तो बोलला ते खरं व्हतं. 'तू चुकला आणि चुकतच गेलास. आता येणाऱ्या वेळेबद्दल याला-त्याला दोष देण्यात काय अर्थ?' पण माझ्या चुकांचं, मूर्खपणाचं प्रायश्चित्त मी भोगत असताना मणिकलालचं पावलोपावली खिजविणारं व अपमानाचं वागणं हा तर अन्याय आहे. पूर्णतः अन्याय. देहभान हरपलेल्या सर्जेरावाचं मन त्याला सांगत होतं. जेव्हा तो ध्यानावर आला, तेव्हा मिरवणूक समारोपाच्या ठिकाणापर्यंत येऊन धडकली होती.

सावकाराने सर्जेरावाला गाडीबैल घराकडं नेण्यास सांगितले. तो मागून येणार होता. कारण यात्रेत सर्वांत जास्त देणगी दिल्याबद्दल गावकऱ्यांतर्फे त्याचा सत्कार करण्यात येणार होता.

सर्जेराव गाडी घेऊन निघाला तेव्हा त्याचं मन तडफडत होतं. माझ्या पन्नास हजार कर्जाचे तीन लाख करून माझी संपत्ती हडप करणाऱ्या राक्षसाचा हे वेडे सत्कार करतायत. त्याचं मन त्याला सांगू लागलं, 'अरे, पण तू किती महावेडा आहेस त्यांच्यापेक्षा. तू त्याला खेटलाच कशाला? त्यांच्यासाठी संपत्तीमुळे तो देव आणि तू भिकारी.'

तो घरी गेला तेव्हा दिवे लावण्याची वेळ झाली होती. बैलं बांधून तो तसाच कोपीबाहेर बसला. ''वाईच भाकरी खावा की, दमलं असशाल!'' थकलेल्या पतीला पाहून पत्नी कुसुम उद्‌गारली. ''भूक

न्हाय!'' सर्जेराव म्हणाला. ''मला माहित्याय, आज काय झालं असंल ते, पण आता डोक्यात इचार घालून घेऊन काय फायद्याचा हाय?'' दिवसभर काय झालं असेल, हे तिने ओळखले होते. म्हणून सर्जेरावाची समजूत काढत कुसुम म्हणाली. ''अगं तस्स न्हाय, पर सावकाराचं वागणं दिवस दिवस बिथरतच चाललंय'' सर्जेराव उद्‌गारला.

''ह्याप्रसंगी तरी आपण काय बी करू शकत न्हाय. जोपोस्तर कर्ज फिटत न्हाय तोपोस्तर तरी सहावंच लागल.'' कुसुम म्हणाली.

''हट, म्हणं गुलाम! अरं जनावराच्या वर वागीवतो की!'' सर्जेराव म्हणाला.

''जाव द्यावा, रोजचं मढं त्याला कोण रडं! घ्यावा दोन घास पोटास्नी घालून.'' समजूत घालीत कुसुम म्हणाली.

पोटात आग पडण्यापेक्षा इच्छा नसतानाही सर्जेरावानं दोन घास खाल्ले. पण दिवसभर घडलेली घटना सारखी त्याच्या डोळ्यांपुढं येत होती. रात्रभर त्याने झोपण्याचा खूप प्रयत्न केला. पण डोळ्याला डोळा लागला नाही.

सकाळ होताच तो रोजच्याप्रमाणं शेतात जाऊन राबू लागला, पण जीव काही कामात लागत नव्हता.

''अरे वेड्या, तू तुझं प्रायश्चित्त भोगतोस. तू आता चुकत नाहीस; चुकतोय तो फक्त मणिकलाल, तुझी संपत्ती घशात घालून. तू गुलामाप्रमाणं राबत असतानाही तुला अशी वागणूक..पिळवणूक.. कशाच्या जीवावर माजलाय हा सावकार? या संपत्तीच्या, प्रतिष्ठेच्या नि तीच जर मातीत मिळवली तर?''

आभाळाच्छादित आकाशात प्रचंड वीज कडाडली. तसं सर्जेरावाच्या मनात विचार आला, सावकाराला धडा शिकवायचाच.

त्या दिवसापासून सर्जेरावानं पूर्ण चंग बांधला, सावकाराला धुळीस मिळवायचा. त्याची सूडबुद्धी पूर्णतः जागृत झाली होती. मणिकलालविषयी त्याच्या मनात ज्वालामुखी निर्माण झाला खरा, पण त्याचा उद्रेक होण्यास त्याला वाट मिळत नव्हती. सर्जेराव संधीच्या शोधात होता, पण ती काही त्याला सहजासहजी मिळणार नव्हती.

सर्जेरावाच्या मनात ज्वालामुखीचा प्रलय वाढत होता. त्यात एक दिवस सावकाराच्या वरच्या मळ्यात राखणीस असलेला रामड्या नाईक की ज्यानं यात्रेच्या मिरवणुकीत सर्जेरावाची खिल्ली उडवली होती, तो मुलीच्या लग्नासाठी पगारावर उचल मागण्यासाठी सावकाराकडं आला.

''राम -राम सावकार!'' रामड्या म्हणाला.

''अरे रामड्या, इतक्या सकाळी-सकाळी कसा इकडे? न्हाय, मळ्यात सर्व ठीक हाय ना?'' घरातून पडवीत येत सावकार शंकीत मुद्रेने म्हणाला.

''न्हाय मालक, मळ्यात सारं बेत ठिक हाय, पर काम होतं तुमच्यापास्नी.'' रामड्या गुतत-गुतत उद्गारला.

''काम नि माझ्याकडं? बोल!'' सावकार उद्गारला.

''मालक, पोरीचं लगीन करायचं म्हणून...'' रामड्या उद्गारला.

''अरं मग कर की! लग्नाचं आमंत्रण द्यायाला आला तर येऊ की आम्ही!'' रामड्याचं बोलणं पूर्ण ऐकण्याआधीच सावकार उद्गारला.

''आमंत्रण बी द्यायाला आलो पर...''

रामड्याची जीभ रेटाना. तो थांबला.

''पर काय?'' सावकार गरजला.

''मालक, थोडी उचल द्याल तर लई उपकार व्हतील.'' रामड्या भीत भीत म्हणाला.

''काय? उचल नि तुला? अरं, पहलेच अडीच हजार फिटले न्हाय, नवीन उचल तुला कुठून देणार?'' रागात सावकार गरजला.

''म्या कामात फेडीन की! गरीबावर दया करा मालक. लई उपकार व्हतील तुमचे. जास नाय फकस्त तीन हजार तरी द्या.''

तीन हजार आकडा ऐकताच सावकाराचा राग अनावर झाला. रागात तो रामड्यावर उखडला.

''साले दरिद्री ते दरिद्रीच राहणार. अठरा विश्वे याच्या घरी दरिद्री. पहिली उचल तुझा बाप फेडणार? बघ रामड्या, तुझ्या पोरीला घरी बसव न्हाय तर कोणाचा हात धरून पळून लाव.''

''मालक, बस! आता लय बोललास. मी माझ्या हिमतीवर उचल फेडील.''

रामड्याची व्यथा ऐकून दगडाला पाझर फुटला असता, पण सावकाराच्या क्रूर वागण्याने हताश रामड्या घराकडे जायला निघाला तर त्याला समोरून सर्जेराव येताना दिसला. दोघांची नजरेला नजर भिडली, पण सर्जेराव समोर येताच नेहमी ताठ मान करून चालणारा रामड्या खाली मान घालून निघून गेला.

सर्जेराव घरी येताच त्याला पत्नीकडून रामड्याबद्दल सारी हुकूम बातमी कळली. रामड्यावषयी मनात तिरस्कार असला तरी त्याला त्याची कीव आली नि त्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

सावकारानं केलेल्या अपमानामुळं रामड्याची काय मनःस्थिती झाली असेल याची त्याला कल्पना त्याला आली न् आपल्याला सावकाराला मातीत मिळवायला न् आपलं मनोरथ पूर्ण करायला ही संधी पुन्हा मिळणार नाही म्हणून वेळ न् गमावता आलेल्या संधीचा फायदा उठवायचा, असा त्यानं विचार केला. त्यासाठी सकाळ होताच सर्जेरावानं रामड्याची गाठ घेण्यासाठी वरल्या मळ्याचा रस्ता धरला.

सर्जेरावाच्या मनातील सावकाराविषयीच्या ज्वालामुखीचा उद्रेक होण्यासाठी वाट सापडली होती. तो झपाझपा पावलं उचलीत वरच्या मळ्याकडं चालला होता. त्याचं प्रत्येक पाऊल सावकाराच्या बरबादीला जवळ आणीत होतं. तब्बल अर्ध्या तासाची पायपीट केल्यावर सर्जेराव वरच्या मळ्यात दाखल झाला, तेव्हा रामड्या नाईक खिन्न मनानं एका झाडाखाली बसला होता. सर्जेराव अचानक समोर दिसताच तो थोडा गोंधळला, पण सर्जेरावाशी बोलण्याचं त्याचं धाडस होईना.

''मग रामड्या, लई निवांत बसलाशी?'' मागे घडलेल्या कोणत्याही घटनेचा संकोच मनात न ठेवता सर्जेराव रामड्याला म्हणाला.

''काय न्हाय..कामाला जुपी करायची व्हती.'' रामड्या गुतत म्हणाला. कारण सर्जेरावाशी आपण यात्रेत केलेली हुल्लडबाजी तो विसरला नव्हता. तरी सर्जेराव आपल्याकडं कशाला आला, हा प्रश्न त्याला सतावत होता. तो शंकित मुद्रेनं सर्जेरावाकडं पाहत होता. तोच

सर्जेराव म्हणाला, ''अरं, काय कामाचं घेऊन बसलास! एवढं राब-राब राबतोस न् तुझी कष्टाची कमाई मागितली तरी सावकार बापाची-पोरीची इज्ज़त काढतो? मग कशाला एवढा राबतो की रं?''

आता रामड्याच्या लक्षात आलं, सर्जेराव माझ्या जखमेवर मीठ चोळायला आलाय तर! पुढच्या क्षणी सावध पवित्रा घेत रामड्या म्हणाला,

''सर्जेराव, माझ्या म्होरं लग्नाच्या खर्चानं पार डोस्कं फुटाण्याची येळ आली. तवा तू यात्रात घडलंय त्याविषयी मला माफ कर, पर सावकारास्नी काही इद्रं बोलू नगंस.''

''अरं दोस्ता, सावकारानं शेण खाल्लं म्हणून म्या तसं करंल व्हय रं? अरं जुने दोस्त की आपण. तू चुकलास, पर म्या चुकलो तर न्हाय!'' सर्जेराव म्हणाला.

सर्जेरावाच्या तोंडून एवढे आपुलकीचे शब्द ऐकताच रामड्याला थोडा धीर आला. झाडाला टेकून उभ्या सर्जेरावला पाहून रामड्या म्हणाला,

''सर्जेराव, घोंगड्यावर बस की!''

रामड्याला मान देऊन सर्जेराव घोंगड्यावर बसला.

''बोल, काय काम काढलंयस माझ्याकडं?'' रामड्या उद्गारला.

मुख्य विषयाला हात न घालता अतिशय हुशारीनं सर्जेरावानं बोलण्यास सुरुवात केली.

''तुझ्याविषयी सावकाराची सारी हकिगत कळली. फार वंगाळ वाटतं बघ!'' रामड्याचं सांत्वन करीत सर्जेराव उद्गारला.

''पर काय करणार? नशीबच फुटकं आपलं!'' निराश रामड्या उद्गारला.

''न्हाय, तसं न्हाय! नशिबाला दोषी ठरवू नगंस! अरं, नशीब आपल्या हातात हाय. ह्या दगडाचं काळीज असल्याल्या सावकाराला आपल्या कष्टाची किंमत कळणार न्हाय अन् तो दगड पाझरणारबी न्हाय!'' सावकाराविषयी आक्रमक पावित्रा घेत सर्जेराव उद्गारला.

''पर लगीन तर मोडता येणार न्हाय नि सावकाराशिवाय मला पैकाबी कोण देणार न्हाय!''

''अरं, मी देतो की!'' सर्जेराव उद्गारला.

''कोण? तुमी? पर तुमी सावकाराचं कर्जदार, नि तुमी कुठून देणार?'' रामड्या म्हणाला.

''अरं रामड्या, त्ये कर्ज म्या कव्हाच फेडलंय, पर हा राक्षसच खोटं कर्ज फेडतोय.''

''मग तुम्ही कुठून मदत करणार?'' रामड्या म्हणाला.

''अरं रामड्या, ह्यो सावकार काह्याच्या जीवावर माजलाय, ह्या पैसा, प्रतिष्ठा न् संपत्तीच्याच ना? ह्ये सारं आपलंच हाय. त्यानं माझी प्रापर्टी लुबाडली. आता आपण राब-राब राबतोय, म्हणून हा उड्या मारतोय.''

सर्जेराव बोलत असताना रामड्या मध्ये म्हणाला,

''ते समदं खरं हाय, पर आपण काय बी करू शकत न्हाय!''

''न्हाय, रामड्या, न्हाय! अरं, ज्या पैशावर ह्यो गुर्मीत बोलतो तोच मातीत मिळवला तर?'' सर्जेराव म्हणाला.

''म्हणजे? म्या समजलो न्हाय!'' रामड्या उद्गारला.

''अरं खुळ्या, जी गोष्ट सरळ मागून मिळत न्हाय, ती वाकड्यानं घुसून मिळवायची. सावकाराला धडा शिकवायचा. सावकार लुटायचा.. तू फक्त मला साथ दे. वांग मार्ग हाय, येळंला म्हत्व!''

रामड्याला सर्व वातावरण स्तब्ध झाल्यासारखं वाटलं. पण परिस्थिती त्यालाही सर्जेरावाला साथ द्यायला सांगत होती. कारण लग्नाला पैसा उपलब्ध करण्यास दुसरा मार्ग नव्हता.

क्षणाचाही विचार न करता रामड्या उद्गारला, ''सर्जेराव, दिली साथ!''

रामड्याच्या तोंडचं शब्द ऐकताच सर्जेरावाला खूप वेळ झुंज देऊन एखादा गड सर केल्याचा आनंद प्राप्त झाल्यासारखे वाटले.

त्यानंतर तब्बल दोन तास चाललेल्या चर्चेतून त्यांनी दोघांनी सावकाराला लुटून बरबाद करण्याचा आराखडा तयार केला. यासाठी अमावस्येचा दिवस निवडण्यात आला.

सर्जेरावाच्या मनातील सावकाराविषयीच्या ज्वालामुखीच्या उद्रेकाला रामड्यच्या रूपानं बाहेर पडण्यास मार्ग मिळाला.

सर्व बेत आखून रामड्यापासून सर्जेराव निघाला. पण त्याच्या मनात सावकाराविषयी सूडबुद्धी जागृत झाली होती. अमावस्येची रात्र अजून पाच दिवस लांब होती, पण सर्जेरावला एक-एक क्षण त्याच दिसाची ओढ लागली होती. कारण त्यांनी आखलेला बेत साकार झाला तर सावकार तर मातीत मिळणार होताच, पण त्याचबरोबर सावकाराला लुटून मिळणाऱ्या संपत्तीतून आपण ऐषारामाचं नि पुन्हा प्रतिष्ठेचं जीवन जगू, हा विचार तर त्याला फार सुखावून गेला होता.

वेळ कधीही कोणासाठी थांबत नाही. झालं, वाट पाहण्याचा क्षण संपला. अमावस्येची रात्र उगवली. रामड्या नि सर्जेराव सर्व तयारीनिशी मध्यरात्रीची वाट पाहत होते. रात्रीचे दोन वाजले. ठरल्याप्रमाणे रामड्या, सर्जेराव, रामड्याच्या तीन सहकाऱ्यांनी सावकाराच्या वाड्याला घेरले. सुरुवातीला आजूबाजूच्या घरांच्या कड्या लावल्या. सावकार ज्या खोलीत पैसा व दागिने ठेवी, त्याच खोलीत झोपत असे. वाड्याच्या इतर खोल्यांना कड्या लावण्यात आल्या. अंगावर घोंगडी, कापडानं पूर्ण चेहरा झाकलेले मूळचे दरोडेखोर नसणाऱ्या पण नियतीनं दरोडेखोर होऊ घातलेले सर्जेराव नि त्याचे सहकारी ठरलेल्या बेताप्रमाणे वाटचाल करू लागले.

सर्जेरावानं सावकार झोपतो त्या खोलीवर थाप मारली. दोन-चार थापा मारल्यावर सावकार खडबडून जागा झाला. एवढ्या रात्री कोण दार वाजवतं? पण झोपेत त्याला काही सुचेना. थोडी झोप झटकून दरवाजा उघडला. त्याच क्षणी रामड्याबरोबर आलेल्या दोघांनी सावकाराला मागं रेटत खोलीत प्रवेश केला.

सावकाराला काही कळण्याच्या आत त्या दोघांनी त्याचं तोंड दाबून तो ओरडू नये म्हणून त्यात कापूस भरून त्याचे हातपाय बांधले. तोपर्यंत रामड्या व सर्जेरावानं कपाटाकडे धाव घेतली. पण कपाट बाहेरून बंद होतं. चावी कुठाय, हे विचारण्यासाठी सावकाराचं तोंड सोडलं तर ओरडंल म्हणून वेळ न गमावता चौघेही खोलीत चाव्या सापडू लागले. सावकाराच्या उशाखाली सर्जेरावाला त्या सापडल्या.आपल्या नशिबाची चावी सापडल्यागत आनंद त्याला झाला.

पुढच्या क्षणी कपाट उघडून कपाटातील पैसे व दागिन्यांची पेटी बाहेर काढण्यात आली. पेटी उचलून जायच्या आधी सावकाराने दिलेल्या पावलोपावली अपमानाचा प्रसाद म्हणून की काय, रामड्या-सर्जेरावानं सावकाराला यथेच्छ बदडून तेथून पोबारा केला.

पेटी उचलून रामड्याचे चौघे सहकारी झपाझपा वरच्या मळ्यात आले. तोपर्यंत रात्र उतरतीला लागली होती. तेथे आंब्याच्या झाडाखाली पेटी ठेवून सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. नंतर रामड्यानं दगड घालून पेटीचं कुलूप तोडलं. सर्जेरावानं पेटी उघडली तेव्हा पुढच्या क्षणी चौघांचेही डोळे दिपले. कारण पेटी पूर्णतः नोटांची बंडले आणि दागिन्यांनी भरलेली होती. रामड्यानं त्यातून ठरल्याप्रमाणं त्या दोन साथीदारांना दहा हजार देऊ केले व उरलेली रक्कम आणि दागिने सर्जेराव व त्याच्यात वाटून घेतले. काही पुरावा राहू नये म्हणून ती रिकामी पेटी तिथंच खड्डा खोदून गाडून टाकली. सर्व जण तेथून पसार झाले. तोपर्यंत तांबडं फुटण्याची वेळ झाली होती. येणारा सूर्योदय त्यांच्यासाठी आज वेगळा भासत होता.

इकडं सावकाराच्या वाड्यावर हाहाकार उडाला होता. सावकार हातपाय आपटत रडत होता. सकाळ होताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. सारा गाव वाड्यावर जमा झाला होता. काही सावकाराचं सांत्वन करीत होते, तर काहींनी फक्त बघ्याची भूमिका घेतली होती. त्यात सर्जेरावही होता. पोलिसांनी सावकाराला सर्व हकिगत विचारली तसेच कोणाशी वैर, दुश्मनी, संशय? सावकारानं कुणाचंही नाव घेतलं नाही. इन्स्पेक्टरनं पंचनामा करून कम्प्लेट लिहिण्यास सांगितले. पोलिसांची गाडी गावाबाहेर गेली. त्याच क्षणी सर्जेरावाचा आनंद गगनात मावेनासा झाला. कारण त्याने आखलेला बेत पूर्णतः यशस्वी झाला होता. त्याचं सावकाराला मातीत मिळवण्याचं स्वप्न साक्षात उतरलं होतं.

एवढ्या नियोजनबद्ध दरोड्यानं गावातलं वातावरण बदललं होतं. गावात दरोडेखोरांविषयी दहशतीचं वातावरण तयार झालं होतं. रात्री सारा गाव शेकोटी पेटवून जागा राहू लागला. लोकांच्या डोळ्याला

डोळा लागत नव्हता, पण सर्जेराव मात्र खूप वर्षांनंतर शांत झोपत होता. पोलिस रात्री गस्त घालत होते. दरोडेखोरांचा ठावठिकाणा तर लांब, पण काही धागादोरासद्धा मिळत नव्हता.

इकडं दरोड्याची रात्र संपेपर्यंत सर्व काही रामड्या नि सर्जेरावानं ठरवल्याप्रमाणं केलं. पण त्यानंतर मात्र ठरल्याप्रमाणं झालं नाही. दरोड्याच्या दुसऱ्याच दिवशी रामड्या कुणालाही न सांगता गायब झाला. हे हळूहळू लोकांच्या लक्षात आलं. लोकांच्या मनात रामड्याविषयी शंका निर्माण झाल्या. कारण सावकारानं त्याला उचल दिली नव्हती, हे सर्वांना माहीत होतं. लोकांनी सावकाराच्या ही गोष्ट लक्षात आणून देताच सावकारानं पोलिसांत जाऊन रामड्यावर संशय व्यक्त केला.

आता मात्र सर्जेराव थोडा अस्वस्थ झाला. पोलिस तपासाला दिशा मिळाली होती. पोलिसांनी रामड्या राहत होता तिथं वरच्या मळ्यात तपास सुरू केला. त्याच्या छपराची झडती घेण्यात आली. पण तिथं काही सापडलं नाही. तेव्हा आसपासचा प्रदेश पिंजून काढण्यास पोलिसांनी सुरुवात केली. गुन्हेगार कितीही चलाख असला तरी तो गुन्हा करताना चुकतोच, हे पोलिसांचं म्हणणं खरं ठरलं. कारण पुरावा नष्ट करण्यासाठी रामड्या नि सर्जेरावानं पेटी पुरली खरी, पण तिचं तोडलेलं कुलूप मात्र वरच तुटलेल्या अवस्थेत पोलिसांना सापडलं. सावकारानं ते लगेच ओळखलं. नीट तपास करताच पेटीही पोलिसांनी खोदून वर काढली.

रामड्या नायकानंच हे सर्व काम केलं, हा संशय खरा ठरला होता. पण तो कुठं गेला, हे कळायला काहीच मार्ग नव्हता. गावात रामड्यानंच दरोडा टाकला याची गावकऱ्यांना नि सावकारालाही खात्री पटली होती. सर्जेराव अजूनही 'निल'मध्ये होता त्यावर साधा कुणाचा संशयही नव्हता. प्रत्यक्षात मात्र सर्जेराव पूर्णतः धास्तावला होता. पोलिस रामड्याचा शोध घेत होते.

त्यातच एक दिवस रामड्याच्या दोन साथीदारांपैकी एकाने दारू प्यायला पैसा संपला म्हणून रामड्यानं बक्षीस दिलेला हार सोनाराकडं

मोडायला आणला. सोनाराला संशय आला. या दरिद्री, व्यसनी माणसाकडं हा किमती हार आला कसा? त्याने पोलिसांना कळवले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. सावकाराला बोलावून हार दाखवताच क्षणी त्याने हार ओळखला. आता मात्र पोलिसांना तपास करणं सोपं झालं. रामड्याच्या साथीदाराला पोलिसी हिसका दाखवताच त्याने दरोड्याची सारी हकिगत पोलिसांना सांगितली. आता मात्र इतके दिवस पडद्याआड असलेला सर्जेरावाचा चेहरा पोलिसांसमोर आला.

पोलिसांनी सर्जेरावाला अटक करून केस दाखल केली. कोर्टानं सर्जेरावाला सात वर्षे तर त्या साथीदारांना तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. आता पोलीस रामड्याच्या मागावर होते.

ज्या संपत्तीच्या-पैशाच्या जोरावर सावकार मोठेपणाचा आव आणत होता, तो पैसा गेल्यानं त्याची प्रतिष्ठाही केव्हाच धुळीस मिळाली होती. तोसुद्धा भिकारी झाला. इकडं तुरुंगात विजयी होऊनही हार पदरी पडलेल्या सर्जेरावाची पत्नी केव्हाच देशोधडीला लागली होती. सर्जेरावानं सावकाराची आणखी काही वर्षे मजुरी करून कर्ज फेडलं असतं. पण सूडबुद्धी नि त्यातून जागृत झालेला प्रतिष्ठेचा मोह त्याला लयाला घेऊन गेला. आता तुरुंगातून बाहेर पडल्यावरही हा समाज सर्जेरावाला प्रतिष्ठा देणार होता...पण कोणती? तर, एका 'दरोडेखोराची-चोराची!' ही कल्पनाही त्याला करवत नव्हती.



# लक्ष्मी नव्हे, ‘लक्ष्य’ मी !

मैत्रिणीला भेटून अनुराधा जसजशी घराजवळ येऊ लागली तसतसं घरात कोणीतरी पाहुणे मंडळी आल्याचं तिच्या लक्षात आलं. ती गेट उघडून अंगणात येताच तिच्या नानीने तिला पाठीमागच्या दरवाजाकडे नेलं. अनुराधाही नानीपाठोपाठ मागच्या दरवाजाकडे गेली. तिला वाटले, नेहमीप्रमाणेच नानांचा त्यांच्या पेताड मित्रांबरोबर ‘तीर्थ’ घेण्याचा कार्यक्रम चालू असेल म्हणून नानीने आपल्याला मागच्या दारानं घरात नेलं असेल.

प्रेमाने तिला सर्व जण ‘अनू’ म्हणायचे. घरात येताच नानीने अनूला ‘तुला पहायला पाहुणे आलेत, तू लवकर तयार हो’ म्हणून सांगितले. नुकतीच अठरा वर्षे पूर्ण केलेल्या अनूच्या हृदयाची स्पंदने नानीचं वाक्य ऐकताच वाढली. कारण याआधी ही वेळ तिच्यावर कधीच आली नव्हती; पण विचारचक्रात मग्न अनूपुढे नानीने एक चांगली साडी पटकन आणून टाकली आणि लवकर तयार हो म्हणून बजावून सांगितले. नानीच्या आज्ञेची अंमलबजावणी करीत अनू तयार झाली. लगेच नानीने चहाचा ट्रे तिच्या हातावर टेकवला.

काहीशी भीत भीत अनू दिवाणखान्यात आली. थोडंसं दबकत-दबकत सर्व पाहुणेमंडळींना तिने चहा दिला. नंतर त्यातील एका वयस्क गृहस्थाने तिला बसण्यास सांगितले. रितीरिवाजाप्रमाणे तिच्यावर प्रश्नांचा भडीमार झाला. काहीशी अडखळत तिनं त्या प्रश्नांची उत्तरे दिली. त्यानंतर तिला जाण्यास सांगितले.

रिकाम्या चहाचा ट्रे स्वयंपाकाच्या ओट्यावर टेकवीत अनूने सुटकेचा निःश्वास सोडला. अनू दिसायला तशी मध्यमच; पण

चुणचुणीत बोलणं, लांबसडक केस यामुळे तिचं सौंदर्य खुलून दिसायचं. नुकताच तिनं पदवीला प्रवेश घेतला होता. आई-वडील नोकरीनिमित्त मुंबईला असत. पण मुंबईच्या धावपळीच्या जीवनापासून तिला तिच्या आई-वडिलांनी चुलत्याकडेच ठेवले होते. अनू तशीच स्वयंपाकाच्या ओट्याच्या कडेला उभी होती. तोच थोड्या वेळात नानी लगबगीने अनूला शोधत तिथे आली.

''अगं अनू, तू इथे काय करतेस? अगं पोरी, भाग्य उजळलं तुझं! त्या पाहुण्यांनी तुला पसंत केलं!'' अतिशय हळू आवाजात नानी म्हणाली.

नानीचं बोलणं ऐकताच अनू गांगरून गेली. थोडी लाजलीही. तोच नानी म्हणाली, ''अगं लाजतेस काय? अगं, ती मंडळी लग्नालाही तयार आहेत. चला, आता नव्या नवरीला सजवायला हवं! मी शेजारच्या काकूना बोलावून आणते,'' असे म्हणत नानी दरवाजाकडे निघाली. तो अनूही तिच्या पाठोपाठ जात नानीला म्हणाली,

''नानी, आई-तात्यांना काही कल्पना...''

तोच अनूच्या तोंडावर हात ठेवीत नानी म्हणाली, ''अगं वेडाबाई, चांगला नोकरदार नवरा मिळतोय. पोस्टात कामाला आहे मुलगा. आता बोलणी झाली सारी.'' नानी अनूला पटवून सांगत होती. तोच नाना डुलत-डुलत स्वयंपाक खोलीत आले. डुलत-डुलत येण्याचं कारण म्हणजे दारू पिणारा माणूस डुलणारच.

''चला, अनूची चिंता मिटली!''

''अनू, तू तयार हो..'' नशेतलं बोलणं... तोडकंमोडकं का होईना, नाना अनूला म्हणाले.

''पण नाना....'' अनू म्हणाली.

तोच नाना तोंडावर बोट ठेवून म्हणाले, ''शूऽऽऽ! पण बिन आता इथं नाही, नवऱ्याच्या घरी! समजलं? आणि तू काय पुतळ्यासारखी उभी? आवर पोरीचं.'' नानीवर गर्जत नाना म्हणाले व आले तसेच डुलत-डुलत दिवाणखान्याकडे गेले.

आता मात्र हताश झालेल्या अनूला ओढावलेल्या परिस्थितीला तोंड देण्याशिवाय पर्याय नव्हता, कारण नानासाहेबांचा कडक स्वभाव

नि व्यसनीपणामुळे ती त्यांना खूप घाबरत असे.

तिकडची दहा-बारा माणसं, इकडची सात-आठ.. यांच्या उपस्थितीत अनूचा विवाह मोहनशी संपन्न झाला.

ज्या चुलता-चुलतीकडे लहानाची मोठी झाली, जे घर आजपर्यंत तिचं होतं; ते क्षणात तिला परकं झालं. शेवटी मानवी स्वभावच.. अनूला जाताना रडू आवरेना. आई-वडिलांच्याच रूपात नाना-नानीचाच आशीर्वाद घेऊन अनू एका नव्या जगात पाऊल टाकण्यास निघाली.

इकडे स्वतःच्या (नवऱ्याच्या) घरी आल्यावर रितीरिवाजाप्रमाणे सर्व विधी उरकून लग्न झालं तरी सासरच्या मंडळींनी वरात काढली. सर्व रात्र नाचत-गातच गेली.

दुसऱ्या दिवसापासून अनूचा नव्या जीवनातील नव्या नात्याचा, माणसांचा परिचय होऊ लागला. अनूच्या सासूबाई शांताबाईंनी तिला घरातील सर्व प्रमुख माणसांची ओळख करून दिली, तर सासरे बाबासाहेबांनी सारं घर निवांत दाखवलं.

नदीच्या पाण्याबरोबर एखादी मासोळी वाहत सागरात जावी, तिला ते सागराचं प्रचंड निळं पाणी व लाटा सगळं कसं निखळ वाटावं.. प्रचंड सागरात लाटांशी खेळत आनंदानं तिनं सागरात मनसोक्त, मुक्त भ्रमण करावं.. जगण्याचा वेगळा आनंद लुटावा, तशी अनूही तिच्या नव्या दुनियेत रमली होती. सासू शांताबाई नि मोहन हेच तिचं विश्व होतं. अनू कामाला चपळ अन् चलाख होती. त्यामुळे शांताबाईंना मनासारखी सून मिळाली म्हणून त्या खूश होत्या, तर आज्ञाधारक सून मिळाली म्हणून बाबासाहेबही. माता-पित्यांची सेवा करणारी, सांगणारे ऐकणारी गोड बायको मिळाली म्हणून मोहनही आनंदी होता. अनूनं आपल्या मायेनं या माणसांची मने जिंकली.. त्यांचं प्रेमही जिंकलं..!

सगळं सुखात-सुरळीत चाललं होतं. इकडं अनू गेल्यावर तिच्या वडिलांना सर्व हकिगत समजली. ते ताबडतोब गावाकडे गेले नि नानासाहेबांना खूप बोलले, पण व्यसनी माणसाला काही म्हटलं तरी अमृताहून गोडच वाटतं. दोघांत खूप वाद-विवाद झाले. तेव्हा नानासाहेब गुर्मीत म्हणाले, ''मी लग्न केलं.. मीच सारं पार पाडीन. तू

मध्ये यायचं नाहीस. नाय तरी ती माझीच पोर हाय! तू फक्त जन्मच दिलास!'' नानाचं गुर्मीचं बोलणं ऐकूण अनूचे वडील तात्या तेथून निघून गेले. अनूकडं जावसं वाटलं.. पण ज्या माणसांनी मला कधी पाहिलंच नाही, ती माणसं मला ओळखतील का? दारात तरी उभं करतील का? या विचारांनी तात्यांच्या मनात प्रश्नचिन्ह उभं राहिलं. ते आले तसेच अनूच्या सासरी न जाता परत मुंबईला परतले.

दिवसापाठोपाठ दिवस जात होते. आता अनूच्या लग्नाला चार-पाच महिने झाले. अनू आनंदात संसारात रमली होती. लग्नानंतर एक-दोन सण आले, पण अनूच्या माहेराहून तिला न्यायला कोणी आलंच नाही. तेव्हा अनूने नवऱ्यापाशी नानांची चौकशी करण्यास सांगितले. तेव्हा मोहनने शेतीची कामं चालू असल्यामुळं ते आले नाही, असं तिला सांगितलं. आता अनू पुढच्या आठवड्यात येणाऱ्या नागपंचमीची वाट पाहत होती; कारण ती जरी तिच्या संसारात सुखी असली तरी तिला माहेरची ओढ होतीच. नाना-नानी, विशेषतः आई-तात्यांना लग्नाआधी दोन महिने भेटली होती. त्यांच्या भेटीची तिला आस लागली होती.

झालं ! नागपंचमीचा दिवस उगवला. अनूनं डोळ्यांत तेल घालून वाट पाहिली. पण माहेरून कोणी आलं नाही. तात्या पण आजपर्यंत आले नाहीत. सर्व काही कुशल-मंगल असेल? नको ते विचार तिच्या मनात येऊ लागले.

नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी शांताबाई मोहनबरोबर काहीतरी बोलत होत्या. तोच अनू चहा घेऊन गेली, तर तिच्या कानावर शब्द पडले. ''आता दिलेली मुदत संपली.. तू जा नि तिला पोहचतं कर..'' शांताबाई मोहनला म्हणत होत्या.

''अगं आई, पण ते पोहच करतो म्हणाले ना ! मग थोडी वाट पाहिली तर...! '' मोहन म्हणाला.

''ते काही नाही, मी सांगते तसं कर-'' तोच अनूला खोलीत येताना पाहताच दोघेही चूप झाले.

''काय पोहचतं करायचं आई?''अनू म्हणाली.

तेव्हा हसत-हसत जवळ येत शांताबाई म्हणाल्या, ''अनू नागपंचमी

झाली. तुझ्या घरचं कोणी आलं नाही. असेल काम काही, तुला जायचं ना?'' हे शब्द ऐकताच अनूचा आनंद गगनात मावेनासा झाला. मोहन अनूला सोडायला गेला.. पण घरात न येता ताबडतोब कामाचं निमित्त करून तसाच मागे फिरला.

मोहनच्या अशा वागण्यानं अनू क्षणभर आश्चर्यचकित झाली. पण तिला वाटलं, असेल काही तरी काम. नाना-नानींना पाहताच तिच्या आनंदाला पारावार उरला नाही. काय बोलू नि काय नाही, असं झालं. पहिल्यांदा आई-तात्यांविषयी तिने विचारलं.. पण नानीनं, तू दमली असशील म्हणून टाळलं. पण दुसऱ्या दिवशी तात्या नि नानाच्या भांडणाची सर्व हकिगत तिला समजली. तिला खूप वाईट वाटलं. आता आई नि तात्यांची भेट कधी होणार, या विवंचनेत तिने तेथे दोन-तीन दिवस घालवल्यावर तिला सासरची ओढ लागली. तिने नानीला, मला घरी जायचं आहे, म्हणून आग्रह धरला.. पण नानीनं 'खूप दिवसांनी आली.. राहा चार-आठ दिवस' म्हणून सांगितलं. चार-आठचे तब्बल आता बारा दिवस झाले. आता न राहवल्याने तिने नानांसमोर विषय मांडला. तेव्हा नेहमीप्रमाणे नाना नशेत गुंग होते. अनूचं बोलणं ऐकताच ते मोठमोठ्याने हसू लागले नि मध्येच म्हणाले,

''कोणतं तुझं घर? अगं, तुझ्या सासूला नि नवऱ्याला तुझी गरज न्हाय, त्यांना हवाय पैसा..पैसा.. भीक लागली..!''

''म्हणजे नाना, मी समजले नाही?'' अतिशय गोंधळलेल्या अवस्थेत अनू म्हणाली.

''अगं, तुझ्या लग्नात मी त्यांना हुंडा म्हणून एक लाख कबूल केले होते. ते पाच महिन्यांत देण्याची बोली होती; आता आठ महिने होऊन गेले. ते म्हणतात, पैसे द्या; मगच पोरीला पाठवा!''

हे ऐकून अनूच्या पायाखालची जमीनच सरकली. ''काय ? एक लाख? कुठून येणार एवढा पैसा!'' पण तिचा नानाच्या बोलण्यावर विश्वास बसेना.

ती म्हणाली, ''नाना, माझ्या माणसांना मी ओळखते. ते असं करणार नाहीत.तुम्ही मला माझ्या घरी पोहोच करा.. ते असं करणारच नाहीत!''

नानीनेही अनूला समजावलं. पण अनूचा सासू, नवरा यांच्यावर खूप विश्वास होता. तिच्या आग्रहाखातर नानीने तिला सासरी नेले. पण सासरी गेल्यावर हुंड्याची रक्कम मिळाल्याशिवाय आम्ही तुला घरात घेणार नाही, असं दारातच शांताबाईंनी तिला बजावलं. तोपर्यंत आम्ही तुला मेलो.

अनूनं त्यांच्या खूप विनवण्या केल्या, हाता-पाया पडली; पण पैशाच्या लालसेने मनाची शांती भंग झालेल्या शांताबाईचं प्रेमळ हृदय आता पाषाण झालं होतं. तिने अक्षरशः ओढत अनूला घराच्या बाहेर काढलं. तेव्हा मोहन फक्त चेहरा पाडून उभा होता. आईसमोर बोलण्याची त्याची हिंमत होईना. मग सासरे बाबासाहेबांनी मध्यस्थी करून एका महिन्याची मुदत वाढवून दिली. नाना दुःखी मनानं परतले. इतके दिवस दारूची धुंद नशा त्यांना चढली होती. अनूचे हाल पाहून ती पार उतरली.

अनू पुन्हा तिच्या संसाराचा गाडा ओढू लागली. पण आता चित्र पालटलं होतं. याआधी पावलोपावली प्रेम, स्तुती ऐकायला मिळणाऱ्या अनूच्या कानांवर क्षणाक्षणाला द्वेष, शिव्या, तिरस्कार येऊ लागला. घरात कोणीही तिच्याशी बोलत नसे. शांताबाईंनी तर दररोज नव्या स्टाईलने तिचा छळ मांडला होता. मोहन तर रात्र-रात्र घरी येत नसे. मारहाण, शिव्या, तिरस्कार हे तर तिला आता रोजचं पोटभर मिळू लागलं. अनू बिचारी कधी न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा फक्त अश्रू ढाळून सहन करीत होती.

महिना संपला. इकडे नानानं दारू सोडली. पण व्यसनीपणाच्या कलंकामुळं कोणी दारात उभं करेना. रक्कम काही गोळा झाली नाही. म्हणतात ना, पैशापुढं भूत नाचतं. शांताबाई, बाबासाहेब, मोहन ही तर माणसं! त्यांना हुंड्याचे पैसे मिळण्याच्या भुतानं पछाडलं होतं. पुन्हा शारीरिक, मानसिक छळ करून अनूची रवानगी माहेरी करण्यात आली. ज्या घरात ती लक्ष्मी म्हणून आली, तेथेच तिला 'लक्ष्य' करण्यात आलं, तेही धनलक्ष्मीसाठी...

अतिशय काळवंडलेला चेहरा... अशक्तपणामुळं अनू पार बदलली होती. नानीला पाहताच ती धावत तिच्या गळ्यात पडून रडू लागली. आता मात्र कधीही न नेण्याचा दम देऊन मोहन तिला सोडून गेला

होता. तिच्यावर दुःखाचा डोंगरच कोसळला.

तिकडे मुंबईत तात्यांना नानांनी पत्रानं सर्व हकिगत कळवली. तात्या नि माई गावाकडे आले. तात्या-माईला इतक्या दिवसांनी पाहताच अनूला रडू आवरेना. तात्या आल्यावर नानासाहेबांनी सर्व वाद विसरून अनूचा संसार सुरळीत करण्याचं ठरवलं. तेव्हा दोघांकडचे मिळून पासष्ट हजारांची रक्कम गोळा झाली.

रक्कम घेऊन अनू, तात्या नि नाना अनूच्या सासरी निघाले. अतिशय दुःखद अंतःकरणाने तिने आई नि नानीचा निरोप घेतला. पण आज ती खूप शांत व गंभीर दिसत होती. अनूच्या सासरी जाताच सासू शांताबाईने अंगणात तिचं तोंड सुरू केलं. पण, तात्यांनी अनूच्या वडिलांची ओळख सांगताच नि पैसे आणले सांगताच तिने त्यांना घरात घेतलं. लगेच बसण्यास सांगितले. पाहुणचार झाला. तोपर्यंत मोहन घरी आला. चहा-पाणी झाल्यावर बाबासाहेबांनी म्हणजेच अनूच्या सासऱ्यांनी हुंड्याच्या पैशाची मागणी केली. तेव्हा तात्या अतिशय थबकत, केविलवाण्या स्वरात म्हणाले, ''पाहुणे हो, आम्ही लई प्रयत्न केला, पण पासष्ट हजारच ॲडजेस्ट झालं.!''

''काय पासष्ट हजार?'' मध्येच शांताबाई खेकसल्या. ''काय भीक-बीक देता काय आम्हाला? सरकारी नोकरीस आहे आमचं पोर!'' रागात गर्जत शांताबाई म्हणाली.

''पाहुणे, लग्न म्हणजे काय पोरखेळ नाही. लग्नातले व्यवहार तेव्हाच पूर्ण होतात. तुमच्या भावाचा शब्द होता. आता बदलून पडू नका. द्यायचे तर पुरे द्या, नाही तर पोरीला घेऊन निघा.'' बाबासाहेब बायकोच्या बोलण्याला दुजोरा देत म्हणाले.

''पण व्याही, आम्ही शब्द दिला, मान्य करतो; पण आता जेवढे आहे ते घ्या, उरलेले पोहोच करतो.'' असं म्हणून नानांनी पिशवी पुढे केली.

बाबासाहेब पिशवी घेणार तोच शांताबाई पुन्हा गरजल्या, ''अहो, या भामट्यांचा काय भरोसा! पाच महिन्यांचे आठ झाले. पुन्हा तेच करतील. ते शक्य नाही.'' असं म्हणत पैशाची पिशवी तात्यांच्या हातात दिली.

आता मात्र सर्व संपले म्हणून की काय, हताश झालेल्या तात्यांनी

शांताबाईचे पायच धरले व रडत म्हणाले, ''असा अनर्थ करू नका, माझी पोर रस्त्यावर येईल..''

पैशासमोर माणूस आंधळा होतो. तेच शांताबाईच्या बाबतीत झालं होतं. पैशासमोर तिला एका बापाची आर्त हाक, त्याचं दुःख दिसतच नव्हतं. तिला फक्त दिसत होता पैसा! फक्त पैसा !!

त्या नादातच तिनं तात्यांना समोरील भिंतीवर लोटलं नि म्हणाली, ''ए थेरड्या, उचल तुझ्या पोरीला, न्हाय तर तिच्यावाणी हाल करील तुझेपण!''

उद्धटपणाच्या आता सर्वच सीमा शांताबाईंनी पार केल्या. तिचं हे वाक्य नि कृती पाहून इतका वेळ शांत असलेल्या अनूची तळपायाची आग मस्तकाला गेली नि तिने धावत जाऊन तात्यांना उठवलं.

''बस्स ! बस्स! अहो, मला छळा पण माझ्या वडिलांशी असं वागू नका! त्यांची काय चूक आहे?'' अनू गरजली.

''ए, चूकबिक तिकडंच सांग. चल निघ.'' शांताबाईनं उत्तर दिलं.

तेव्हा रडत अनू म्हणाली, ''चला तात्या, चला नाना! या घरात माणसं नाहीत पैशासमोर नाचणारी भुतं आहेत भूतं! यांनी हाडामांसाच्या माणसांची कदर नाही, यांना पाहिजे फक्त घबाड..'' तात्यांना उभं करीत अनू म्हणाली..

''आता मीच स्वतः चालले. सासूबाई, उद्या फक्त घटस्फोटाची कागदपत्रं पूर्ण करायला कोर्टात या. मलाच हौस नाही तुमचा मार नि शिव्या खायची!'' अनूचा संताप आता अनावर झाला होता. वडिलांची दशा पाहून तिनं हा कठोर निर्णय घेतला होता.

तिचे हे वाक्य ऐकताच इतका वेळ बघ्याची भूमिका घेतलेला मोहन मध्येच अनूला थांबत म्हणाला, ''थांब अनू! आई, इतका वेळ खूप सहन केलं. आता होत नाही. अगं, लग्न मी केलं. बायको माझीचं. अनूचा निर्णय मला मान्य नाही! अगं, काय दोष आहे तिचा बिचारीचा? ती जर जात असली, तर मीही हे घर सोडतोय. कारण मला पैसा नको, मला प्रेम हवं आहे नि ते फक्त अनूच देऊ शकते!''

एखाद्या सैनिकाने आपल्याच साथीदारावर वार करावा तसा मोहन

स्वतः आईवर उखडला. हे ऐकून बाबासाहेब म्हणाले, ''अरे तू, काय बोलतोस? आई-बापाला सोडतोस?''

''होय बाबा, तुम्ही तुमची मर्यादा सोडली.. आता मला सोडणं भाग आहे. असं म्हणून अनू, मोहन, तात्या जाण्यास निघाले; तोच शांताबाईंच्या तोडून शब्द उमटले, ''अनू, मोहन- थांबा रे! अनू, चुकलं माझं. अरे, तुम्ही नाही तर पैशाचं मी काय करणार? मला सोडून जाऊ नका रे! मी चुकले तात्यासाहेब! मला हुंडा नको. मला हवं आहे. माझ्या मुलांचं सुख! नि तुझ्या सुखांतच त्याचं सुख असेल तर तू जाऊ नकोस!''

''होय मोहन, आम्ही चुकलो!'' बाबासाहेब म्हणाले.

आता अनूचा संसार सुखात सुरू आहे. मित्रहो, आपण एकविसाव्या शतकात जगत असलो तरी आपले विचार-आचार अजूनही मलिन, स्वार्थीच आहेत. आजही भारतात अशा अनेक अनू व मोहनच्या आयुष्याची राखरांगोळी होते आहे ती केवळ हुंड्यामुळं, पैशामुळं. पण धनाच्या मोहात गुंतलेल्या माता-पित्यांना आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भविष्यातही हा मोह आवरता येईल का?



# मैत्रीची भेट!

मोत्याचं भुंकणं ऐकून सर्वांचीच झोप मोडली. त्याचं भुंकणं थांबेना म्हणून ताई त्याला मारायला उठली, तोच पवनने तिला दापलं. पण तरीही मोत्याचं भुंकणं काही थांबेना. शेवटी स्वयंपाक खोलीच्या दारात जेवायला बसलेल्या अजयनं त्याच्या दिशेनं भाकरीचा तुकडा भिरकावला, तसा तो भाकरीवर तुटून पडला. त्याचा इतका वेळ भुंकण्याचा आटापिटा भाकरीसाठीच चालू असल्याचे लक्षात येताच ताई म्हणाली, ''मोत्या, भामट्या, मघाशी मी भाकरी दिली तर खाल्ली नाही. आता पुन्हा भाकरीसाठी भांडतोस.'' असं म्हणत तिने त्याची सुटायला आलेली साखळी घट्ट केली. जेवण आटोपून पुढच्या खोलीत आलेल्या अजयला पाहताच मोत्याने शेपटी हलवीत त्याचे स्वागत केले. त्याच्याकडे पाहत अजय म्हणाला..

''झोप आता. पिल्लू आहेस तोपर्यंत मज्जा कर. नंतर राखण न करता झोपलास तर भाकरी बंदच.'' अजयचं बोलणं पूर्ण होतं न होतं तोच चादर अंगावर ओढत ताई म्हणाली, ''कसला मेला राखण करतो.त्यालाच घेऊन चोरटे जातील तरी हा ढाराढूर घोरणार!'' तिचं बोलणं ऐकून इतका वेळ जणू गाढ झोपलेला पवन रागात म्हणाला,''मोत्याला नाव ठेवशील तर बघ..'' त्याच्या सूचनावजा दमाला ताई किंवा अजयनं उत्तर देण्यापेक्षा झोपणं पसंत केलं. घड्याळाचे काटे बारावर आले होते. भूक शांत झाल्याने भुंकणारा मोत्याही केव्हाच घोरू लागला.

पवन, ताई नि अजय तिघं भावंडं शिक्षणासाठी गावातच राहत होती. आई-वडील शेतावर राहायचे. आईला कुत्रे आवडत नव्हते,

पण पोरांना मात्र जाम आवडायचे. त्यामळे अवघ्या पंधरा दिवसांच्या मोत्याला अजयने मळ्यातून गुपचूप गावात आणले. आता मोत्या महिन्यापेक्षा जास्त दिवसांचा झाला तरी बालगोपाळांसारख्या त्याच्या नानाविध लीला सुरूच होत्या.

रंगाने पांढराशुभ्र, गुबगुबीत शरीरयष्टी, त्यावर तपकिरी पट्टे. त्यामुळे मोत्याविषयी चटकन् कुणीही 'इंग्लिश कुत्रा का हो हा?' अशी विचारणा केल्याशिवाय राहत नव्हते. कधी कधी या प्रश्नाचं उत्तर देण्याआधीच रांगड्या आवाजात मोत्या भुंकला की समोरच्याला मोत्याची गावरान ओळख पटत असे. अजय ज्या गल्लीत राहत होता, त्या गल्लीत कुत्री तशी भरपूर पण पाळीव एकही नाही. त्यामुळे गल्लीतील इतर मंडळींनाही अजयने आणलेल्या मोत्याविषयी फार आकर्षण. त्यात अजयसारखीच ताई अन् पवनची त्याच्यावर मोठी माया. म्हणून त्याला रात्री बाहेर बांधण्याऐवजी त्यांच्या झोपायच्या खोलीत घेऊन ते झोपत असत.

सकाळी कॉलेजला जाण्यासाठी ताई लवकर उठली. तिने पाणी तापविण्यासाठी स्टोव्ह पेटविला. स्टोव्हच्या आवाजाने जाग्या झालेल्या मोत्याने नेहमीच्या भुंकण्याच्या शैलीपेक्षा वेगळा आवाज काढला. त्याचा आवाज ऐकून ताईनं त्याला मोकळे केले. तोच त्याने घरालगतच्या मोकळ्या जागेत 'सकाळच्या कार्यक्रमासाठी' धूम ठोकली. तोपर्यंत ताईने अंघोळ करून कॉलेजला जाण्यासाठी दप्तर भरलं. तोच बाहेरून कुत्र्यांचा मोठमोठ्याने भुंकण्याचा आवाज आला. ती घाईघाईने घराबाहेर आली. पाहते तर काय, गल्लीतली चार कुत्री मोत्याला घेरून भुंकतायत. परंतु, मोत्या मात्र न घाबरता त्यांना त्यांच्याच भाषेत भुंकून उत्तर देत होता. ताईने पळत जाऊन कुत्र्यांना दामटण्याआधीच त्यांनी पळ काढला. ताई येताच जणूकाही आपण कुत्री पळवून लावली, अशा आविर्भावात मोत्या तिच्या दिशेने पळत येऊन पुन्हा मागे वळत कुत्रे पळालेल्या दिशेने भुंकत होता. ताईने त्याला दारासमोरच खांबाला बांधून कॉलेजला जाण्यासाठी दप्तर उचललं.

ती गेल्यावर उठलेल्या पवनने मोत्याला भाकरी टाकली, पण मोत्या

भाकरीकडे ढुंकूनही पाहिना. मग मात्र न रहावलेल्या पवनने खाली बसून त्याच्या तोंडासमोर भाकरी धरली, तरी तो भाकरी खाईना. त्याचा मोत्याशी सुरू असलेला एकतर्फी संवाद ऐकून झोपमोड झालेला अजय संतापात म्हणाला, ''पवन, नसंल खायची त्याला, तुझा काय आग्रह? झोपू दे मला. उगाच त्याचा पुळका करू नकोस!''

अजयचं बोलणं ऐकून आधीच प्रयत्नांची पराकाष्ठा करून दमलेल्या पवनने तो तुकडा तसाच ठेवला आणि तो अंघोळीसाठी गेला. मोत्या मात्र भाकरीच्या तुकड्याला न शिवता जमिनीवर डोकं टेकवून रस्त्याने जाणाऱ्या- येणाऱ्यांची टेहळणी करू लागला. सकाळची वेळ असल्याने घरासमोरील रस्त्यावरून जाणारी शाळेतील मुले, महिला तो डोळ्यांत साठवू लागला. अंघोळ आटोपून आलेला पवन आवरून गावात जाण्यासाठी निघाला.

''अजय, मी चाललो गावात. येताना मोत्याच्या मापाचा गळ्यातला पट्टा घेऊन येतो बरं का!'' असे पवन म्हणताच अजय म्हणाला, ''नको, तुला माप जमणार नाही. अरे मी नारू चांभाराशी बोललो. तो म्हणाला, एक तर कुत्रे आणा नाय तर त्याच्या गळ्याचं माप सुतळीनं घ्या!''

''मी नेऊ का मोत्याला गावात?'' असे पवन म्हणताच इतका वेळ झोपेत असलेला अजय ताडकन् उठला. कारण पवन एका पायाने अधू असल्याने हा चपळ मोत्या केव्हाच त्याच्या हातावर तुरी देऊन पसार होईल, हे त्याच्या लक्षात आले.पण पवनला त्याच्या अधुपणाची जाणीव करून दिल्यावर तो नाराज होतो, हे अजयला माहीत असल्याने त्याला काही न बोलता अजयने सुतळीचा तोडा आणला.

पवनने मोत्याला एका हाताने पकडले. अजयने पटकन् त्याच्या गळ्याभोवती सुतळी टाकून गळ्याचे माप घेतलेली सुतळी पवनला तोडून दिली. तो तोडा घेऊन पवन गावात गेला. त्याला जाताच झोपेतून उठलेल्या अजयने मोत्याशी खेळणे सुरू केले. तो त्याला 'पंजा दे पंजा दे' म्हणून शिकवू लागला. मुके जनावर ते, पण अजयशी खेळताना जसे बोले तसे मोठ्या सकारात्मक काहीतरी कृती करीत असे. त्यामुळे

आपले बोलणे मोत्याला समजते, असा अजयचा पक्का समज होता. त्याच्याशी खेळत- खेळत अजयने त्याला पवनने टाकलेला व बराच वेळ जमिनीवर लोळत पडलेला तुकडा खाऊही घातला. अंघोळ करून ताईने केलेल्या चहातील शिल्लक चहा गरम करून तोच पीत त्याने गाडी बाहेर काढली.

अजयच्या सर्व कामाचे चित्रीकरणच जणू मोत्या त्या वेळी करीत होता. तो जाण्याच्या तयारीत असतानाच मोत्या मोठ्याने भुंकू लागला. कारण त्याला कळून चुकलं होतं, आता अजय आपल्या एकट्यालाच कोंडून जाणार. ती गोष्ट त्याला बिलकुल आवडत नसे. त्याला असे एकटे कोंडणे अजयलाही आवडत नव्हते. पण पर्याय नव्हता. पवन, ताई पाठोपाठ त्यालाही मळ्यात जाण्यासाठी घराबाहेर पडणे गरजेचे होते. मनात नसताना त्याने मोत्याची साखळी सोडली. पण तो काही जागा सोडेना. शेवटी अजयने त्याला उचलून घेत घरामागच्या मोकळ्या, परंतु चोहो बाजूंनी बंदिस्त जागेत बांधलं. तेव्हा मात्र अक्राळविक्राळ आवाजात मोत्यानं ओरडणं सुरू केलं. पिल्लूच ते! पण त्याच्या ओरडण्याकडं लक्ष न देता अजय गाडीवर मळ्याच्या दिशेने निघून गेला.

कॉलेज सुटून ताई घराकडे निघाली तर तिला घराबाहेर अनेक लोकांची गर्दी दिसली. गर्दी पाहून तिच्या पावलांची गती आणखी वाढली. घराजवळ जाताच सारा प्रकार तिच्या लक्षात आला. मोत्याचा 'तो' आवाज ऐकून गल्लीतील बच्चे कंपनीसह आबालवृद्धांनी गर्दी केली होती.

''पोरी, मुक्या प्राण्याला कोंडू नगं-'' असा सल्ला दाराचे कुलूप उघडणाऱ्या ताईला समोरच्या आजीने देताच ताई म्हणाली,

''मोकळा बाहेर बांधला तर गल्लीतले कुत्री ठेवतील का त्याला?''तोच गर्दीतून आवाज आला,

''कालपासनं कुत्र्यानं इवळून इवळून डोकं उठवलं. पाळता तुम्ही, त्रास आम्हास्नी कशापाई?'' आवाजावरूनच तो गल्लीतल्या राघोबाचा असल्याचं तिनं ओळखले. तिकडे न बघता ताईने घरात जात

ओरडणाऱ्या मोत्याची सुटका करीत त्याला पुढच्या खोलीत आणले. सोडल्यावर शांत झालेला मोत्या घरासमोर जमलेली गर्दी पाहून आणखी भुंकू लागला. तसा गल्लीतील लहान पोरांनी पळ काढला. ताईनं त्याला दाराच्या खांबासमोर बांधताच तो शांत झाला. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत पट्टा बनवण्यास टाकून पवन घरी येताच स्वयंपाकात गुंतलेली ताई म्हणाली, ''तुमच्या मोत्यानं गल्ली गोळा केली सारी. लोक आपल्याच नावाने शंख फुंकू लागलेत. अजयला म्हणावं, नेऊन सोड याला लांब.''

तिचं बोलणं ऐकताच ''माझ्या मोत्याला हात लावशील तर..!'' म्हणतच पवनने तिच्या पाठीवर चापट मारली. त्यामुळं रडू कोसळलेली ताई स्वयंपाकघरात घुसली. तेवढ्यात अण्णा व अजय मळ्यातून घरी आले. पवनचं मोत्याशी खेळणं सुरू होतं. त्याला दारात बांधलेलं पाहून अण्णा पवनवरच भडकले.

''याला पहिला बाहेर बांध. कुत्रं घरात नको.त्याच्या या पिसा घरात होतील तव्हा तुमास्नी समजंन..''अण्णांचा पारा चढलेला पाहून पवनने चकार शब्द न काढता मोत्याला घराच्या ओट्यावर बांधलं. पाणी पिण्यासाठी स्वयंपाकघरात गेलेल्या अजयला ताईच्या डोळ्यांत पाणी पाहून काहीतरी बिनसल्याची कल्पना आली. पण अण्णा घरात असल्याने त्याने तिला विचारायचं मुद्दाम टाळलं. ताईनं तिघांना जेवायला वाढलं. सर्वांची जेवणं झाली. अण्णा पुन्हा मळ्यात गेले. ते जाताच एवढ्या वेळ शांत ताई बूट पुसत कारखान्यात कामाला जाण्याच्या तयारीत असलेल्या अजयला म्हणाली,

''आता या घरात हे कुत्रं राहील, नाही तर माणसं!''

बुटाची लेस सरळ करीत अजय म्हणाला, ''काय झालं?''

''तुझ्या त्या मोत्यानं आज कहर केला. आपण सगळे गेल्यावर त्याने ओरडून-ओरडून सारी गल्ली गोळा केली. मी आल्यावर त्याला बाहेर सोडलं. याला सांगितलं...'' पवनकडं हात करीत ती म्हणाली, ''तर त्याने मलाच मारलं. उगाच अण्णांना माहीत झालं असतं तर त्यांनी स्वतःच त्याला लांब नेऊन सोडलं असतं. मग बसा बोंबलत...''

हे सांगताच ताईच्या डोळ्यांच्या कडा पुन्हा पाणवल्या.

अजयने हे सर्व रामायण ऐकून कामावर जाण्यासाठी उचललेली बॅग कॉटवर टाकत पवनला बोलावले. ''मोत्यावरून ताईला मारलं तर बघ. अण्णांना सांगतो, मग कुत्रही नाही काहीच नाही.'' असा सज्जड दम भरला.

''तिला सांग, माझ्या मोत्याला नावं ठेवू नकोस.'' त्याचं वाक्य मध्येच तोडत ताई म्हणाली, ''एवढी काळजी हाय तर गळ्यात बांधून हिंड त्याला गावात!'' अजयनं दोघांना शांत केलं. कारखान्यात जाण्यासाठी तो निघाला. तो गाडीपाशी जाताच इतका वेळ ज्याच्यावरून घरात रामायण चालू होतं, तो मोत्या निवांत धरतीवर लोळत होता. अजयला जाताना पाहताच तो साखळी ओढून त्याच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करू लागला. गाडी चालू करण्याच्या तयारीत असलेल्या अजयने मोत्याची सुटण्याची धडपड पाहून पुन्हा गाडीवरून खाली उतरत त्याला सोडून दारात बांधलं व कारखान्याची वाट धरली.

तो गाडी चालवीत होता, पण मन मात्र घरीच विसरला होता.पवन सर्वांत मोठा, पण अधूपणा. रागीट स्वभावामुळे त्याच्या वाटेला ताईही कधी जात नव्हती. काही चुकीचं असेल तरच ती चिडायची. आज नेमके मोत्या प्रकरणावरून तेच झाले. मोत्या जर असाच ओरडत राहिला तर हा प्रकार अण्णांच्या कानावर जाताक्षणी त्याची हकालपट्टी अटळ. या विचारचक्रात अजय कारखान्यात पोहोचला. त्याचे मन काही कामात लागेना. त्यामुळे की काय, आज वेळही त्याला मोठा वाटू लागला. रात्री बारा वाजता ड्युटी संपताच तो घरी निघाला. पण मोत्याचं काय, या प्रश्नाच्या चिंतेने त्याला ग्रासलं होतं.

त्याची गाडी घरी येताच इतका वेळ झोपण्याच्या प्रयत्नात असलेल्या मोत्यानं गाडीचा आवाज ऐकताच उड्या मारण्यास व साखळीला हिसके देण्यास सुरुवात केली. गाडीचा आवाज ऐकून ताईनं दरवाजा उघडत अजयला आत घेतलं. अजयने बॅग ठेवली, पण मोत्याच्या जवळ गेला नाही. नेहमी स्वयंपाक खोलीच्या दारात जेवायला न बसता तो मध्ये मोत्याला दिसणार नाही, अशा ठिकाणी

जेवायला बसला. पण मनःस्थिती ठीक नसल्याने अर्धी भाकरी पोटात टाकत त्याने हातावर पाणी ओतलं. ताईच्या अंथरुणालगत अंथरूण टाकले. अजयचा मूड ऑफ असल्याचे आता मोत्यानेही ओळखले. त्यामुळे त्यानेही ना भाकरीसाठी आरडाओरडा केला, ना मोकळे सोडण्यासाठी.

एका कुशीवर मोत्याच्या तोंडाकडे तोंड करून त्याला पाहता पाहता अजयही झोपी गेला. सकाळ होताच ताई कॉलेजला जाण्याआधीच अजय उठला. ताई जाताना म्हणाली,

''मोत्याचं काय करायचं?''

तिच्या प्रश्नाचं उत्तर अजय रात्रभर शोधत होता.

''बघतो मी....'' असं अजय म्हणताच ताई कॉलेजला निघून गेली. पवनला उठवत अजयने त्याचे सर्व आवरून दिले. इतका वेळ घरात असूनही आपली कोणी दखल घेत नाही, दररोजसारखे पुढे-पुढे कोणी केले नाही; त्यामुळे मोत्याही शांतच होता. अजयची त्याच्यावरून झालेली बेचैनी त्यालाही जणू काही कळत होती. त्यामुळे दररोज कंपाऊंडमध्ये जाण्यास आढेवेढे घेणारा मोत्या अजयने साखळी सोडताच कनाट त्याच्यामागे निघाला. अजयने तेथेच त्याला भाकरी व पाण्याचे भांडे भरून दरवाजा लावला. पवनलाही गावात जायचे होते. तोही अजयबरोबर निघाला. आता मोत्या काय वाढवून ठेवणार, या विचाराने अजयने घराचं कुलूप लावलं. पवनला गावात सोडून तो मित्राला भेटण्यासाठी कॉलेजवर गेला. दुपारी तीन वाजता घरी आला, तर घरचे वातावरण त्याला वेगळेच जाणवले. ताई नि पवनचा खिदळण्याचा आवाज त्याला आला. त्यावरून दोघांतील राग गेल्याचं अजयला कळून चुकलं. त्याने गाडी लावताच मोत्याने त्याचं जंगी स्वागत केलं, तेही बेल्ट घालून रुबाबात. तेव्हा दोन दिवसांपासून नाराज अजयच्या चेहऱ्यावर हलकेसे स्मित उमटले.

''कधी आणला बेल्ट या ठोल्याला?'' अजय म्हणाला.

''अरे, आणला नाही, मोत्याच गेला होता आणायला!'' ताई बाहेर येत म्हणाली.

''काय? मोत्या कसा जाईल?'' अजयने नकारात्मक प्रश्न केला. तोच पवन खिडकीतून डोकावत म्हणाला,

''मीच नेलं होतं त्याला. नारू चांभारानं सुतळीच्या मापावर दिलेला बेल्ट मोठा झाला.''

'' अरे, बेल्टमधून मुंडकं काढून मोत्या पळाला होता.'' ताई म्हणाली.

''मग कोणी पकडला?'' अजय म्हणाला.

''मीच पकडून आणला.'' ताई म्हणाली.

पायात सँडल अडकवीत बाहेर निघालेला पवन म्हणाला, ''अजय, मोत्या आता जाम शहाणा झालाय. आपण गेल्यावर मी बेल्ट घेऊन परत आलो तर तो शांत बसला. आज त्याने अजिबात आरडाओरडा केला नाही. ''

''काय! मोत्या एकटा राहिला?'' विश्वास न बसल्याच्या स्वरात अजय म्हणाला.

''कदाचित तू रुसल्याचं त्याच्या लक्षात आलं असेल.'' ताई म्हणाली.

''अन् दुसरा बेल्ट कसा आणला?'' अजयनं उत्सुकतेनं विचारलं.

''अरे, पहिला बेल्ट त्याला मोठा झाल्याने मीच त्याला हळूहळू घेऊन गेलो. त्याला पाहताच गल्लीतल्या कुत्र्यांनी एकत्र येत भुंकायला सुरुवात केली. पण मी बरोबर असल्याने मोत्या माझ्या आड लपत, तर कधी त्यांच्यावर धावून जात असे.'' हे सांगताना पवनला हसू आवरेना. अजयला मग राहवेना. तो म्हणाला,

''पुढं काय झालं ते सांगशील, का नुसता एकटाच हसशील?''

''पवन हाऽऽऽहाऽऽऽहाऽऽऽ अरे, तुझ्या मोत्याने नारू माप घेऊस्तर त्याच्या दुकानात शू केली..हाऽऽहाऽऽहाऽऽ''

'' काय शूऽऽ?'' अजयनं मोठ्यानं विचारलं.

''नाऱ्या तर भयंकर चिडला. मोत्याला दोन चापटी मारीत मी घाईघाईने बेल्ट उचलून पळ काढला,'' हे सांगतानाही पवनला हसू आवरेना. त्याच्या हास्यानंदात ताई अन् अजयही बुडून गेला. ज्याच्या

अजब करामतीमुळे हे तिघेही हसत होते, तो मोत्या मात्र निःशब्द पण मूकपणे त्यांच्या पायाशी घोटाळत आपणही तुमच्यात सामील असल्याचेच दाखवत होता.

एकंदरीत घरातल्या वातावरणात मोत्या पूर्णतः रमला. त्याला त्यांची दिनचर्या कळू लागली. तो कुठलेही आढेवेढे न घेता अजय, ताई नि पवनच्या जीवनाशी समरस झाला. इतका की, त्यांचा जीवलग मित्रच! आता या तिघा भावंडांचं मोत्याप्रेम भाकरीपुरतं मर्यादित न राहता मोत्याला पाव, बिस्किटे, खारी, ब्रेकफास्टचे अॅटम त्याच्या लंचचे झाले. दूध, अंडी न चुकता दररोज सायंकाळी मिळायचीच. मग मोत्या वर्षाचा होण्याआधीच धिप्पाड, सुदृढ शरीरयष्टीचा झाल्याने तो भुंकला तरी भल्या-भल्यांना घाम फोडू लागला. रात्री जेवण झाल्यावर पवन त्याला गल्लीतल्या शेवटच्या टोकापर्यंत रपेट मारून आणीत असे. त्यामुळे या तिघा भावंडांचा मोत्या आता साऱ्या गल्लीला चांगलाच परिचित झाला होता अन् मोत्यालाही गल्ली.

सायंकाळी त्याला ओट्यावर बांधून ताई स्वयंपाकात गुंतली की मोत्या खेळणार..खेळणार.. मध्येच भुंकणार. पण त्याच्या भुंकण्याकडे ताई मात्र दुर्लक्ष करी. कारण एखादा अनोळखी किंवा जरा वेगळी वेशभूषा असलेला माणूस दिसला की मोत्याचा भोंगा सुरू होई. शाळेतून घरी जाणाऱ्या लहानग्यांचा तर मोत्या चांगलेच आकर्षण बनला होता. शांत मुद्रेत मोत्या रस्त्याकडे पाहत असला तरी चिमुरडे त्याला रस्त्यानेच 'मोत्या..मोत्या' म्हणत असत. पण त्यांच्या हाकेला मोत्या ओ देत नसे. कारण त्याला ताई, अजय नि पवनच्या 'मोत्या'मधला प्रेमळपणा, आपुलकी, मित्रत्व आवडत होतं.

एकदा असाच ताईचा स्वयंपाक सुरू असताना मोत्या जोरजोरात भुंकू लागला. म्हणून ताईनं पीठ मळायचं सोडून भरलेल्या हातानेच त्याच्या दिशेने धाव घेतली. समोरचं दृश्य पाहून तिला तोंडातही बोट घालता येईना! कारण हात पिठाने भरलेले होते ना! ''मोत्या, काय केलं हे?'' ताई मोत्यावर चिडत म्हणाली. तिचं चिडणं स्वाभाविक होतं, कारण हे महाशय त्याला बांधलेली जागा सोडून अजयच्या

गाडीच्या चाकात पाय गुंतवून केकटत होते. ताईनं पिठाच्या हातानेच त्याचा अडकलेला पायाचा पंजा बाहेर काढला.. पण मोत्या पाय खाली टेकवेना. ताईला त्याचा क्रोधही आला अन् दयाही.

रात्र झाली. अण्णा येऊन गेले, पण पोरं जेवण करीनात. ताईने सांगितलेला प्रकार पाहून अजय तर आणखीच खिन्न झाला. कारण मोत्याचा पाय बाजूला काढूनही तीन तास झाले तरी त्याला पाय जमिनीवर टेकवता येईना! पवन म्हणाला,

''माझ्या मित्राचा हा नंबर. त्याला फोन करून जनावरांच्या डॉक्टरला बोलव.''

''रात्री कोण येत सुटलं..?'' अजय म्हणाला...

''ते पण कुत्र्यासाठी..'' अजयचं अपुरं वाक्य ताईनं पूर्ण केलं..

चाकाच्या स्पोकमध्ये मोत्याचा पाय अडकून चांगलाच सुजला होता. त्याने आज दुधाला तोंड लावलं नाही, ना अंड्याला. त्यामुळे त्याला मोठ्या हौसेने अंडे आणणारा पवनही हिरमुसला.

''अरे, सकाळी लवकर उठायचंय.. जेवा आता..'' वरच्या आवाजात ताईचं बोलणं ऐकून दोघेही स्वयंपाकघरात घुसले. ताईचंही जेवणात मन लागेना. तिनं अर्ध्यावरच हातावर पाणी घेतलं. नेहमी अण्णा तिघांपैकी एखाद्यावर खवळल्यावर घरात जसा सन्नाटा असतो त्यापेक्षाही जास्त मोत्याच्या नसत्या उद्योगाने तिघांना बेचैन करून आज झाला होता.

तिघांना झोपण्यासाठी अंथरुण करीत असताना मोत्याने दुधाच्या भांड्याला तोंड लावलं अन् तिघा भावंडांनी डोळ्यांच्या पापण्या मिटविल्या.

सकाळी सहाचे ठोके पडण्याच्या आतच अजयने ताई व पवनला गदगदा हलवून उठविले. त्याने जे सांगितले, ते ऐकून ते दोघेही गोंधळात पडले. पण डोळ्यांनी पाहून खात्री करण्यासाठी त्यांनी अंथरुण सोडून बाहेर ओट्याकडे पळ काढला.मग मात्र तेही मोत्याला पाहून आणखीच गोंधळले. कारण मोत्या अंगणात पळत होता..बागडत होता. पण..पण त्याचा 'तो' गुंतलेला पाय..पंजापाशी वाकडा झाला होता.

पंजा वाकडा होऊ द्या हो.. पण ताई, अजय नि पवनचा मोत्या त्यांना पुन्हा खेळता-बागडताना दिसू लागला, याचाच त्यांना मोठा आनंद झाला.

आता मोत्या एका वर्षाचा झाल्याने वाढत्या वयाबरोबर दमदार अन् हुशारही झाला होता. घरातील माणूस कितीही थकून-भागून घरी आले तरी मोत्या त्याचं जंगी स्वागत करणार. भुकंण्यापेक्षा एक विशिष्ट आवाज काढीत तो अंगावर पुढचे दोन्ही पाय टेकविणार. ती व्यक्ती कितीही त्रस्त असली तरी मोत्याचं स्वागत पाहून मस्तच होणार. हे झालं घरच्यांसाठी. बाहेरच्या पाहुण्याचं स्वागत करण्याचंही मोत्या चांगलाच हुशारीनं शिकला होता. अनोळखी माणसानं अंगणात पाऊल जरी ठेवलं तरी मोत्या भुंकण्याचा जो सूर लावणार तो समोरचा माणूस त्याच्या नजरेआड जाईपर्यंत. त्याच्या या स्वागताची प्रचिती अनेकांनी घेतल्यावर बिनदिक्कतपणे घरात येणारी मंडळी दहा फूट लांब राहूनच ''अजय! ताई! पवन!'' करू लागली.

मोत्याला बांधून ठेवल्याने तो इतर कुत्र्यांसारखा रागीट बनला नाही; उलट माणसाळला, फक्त घरच्यांसाठीच. कारण ताई, अजय, पवननं त्याला नजरेआड कधी होऊ दिलंच नाही. त्यामुळे 'मोत्या' म्हणून जे काही हे तिघे बोलत, तो ते निमूट ऐकत..म्हणू तशी कृतीही करी. मोत्याची ही हुशारी पाहिल्यावर नवखा माणूस तर आणखी भावुक होऊन त्याला पाही. आता तर मोत्या रात्री ओट्यावर एकटाच राहू लागला. फक्त त्याला ओट्यावर गाडी लागायचे, बस. तो रात्रभर न झोपता पहारा देणार. त्याची परीक्षा घेण्यासाठी अजयनं अनेकदा बाहेरची लाईट विझविली. ताईनं हळूच दाराच्या फटीतून डोकावलं. पवननं खिडकीतून हाक मारली.. पण मोत्या जागाच. जो यापैकी एक कृत्य करी त्याला इतर दोघे 'पोपट झाला.. पोपट झाला' म्हणून चिडवीत..

पवन, अजय, ताई नि मोत्या हे नातं आता रक्ताच्या नात्यासारखं घट्ट झालं होतं. पण नियतीला हे नातं जास्त दिवस टिकावं, हे मान्य नव्हतं. अजयची आई आजारी पडली. त्यामुळे आता ती मळ्यात

राहिना. तिला गावात आणायचं. मग मोत्याचं करायचं काय, या प्रश्नाचं उत्तर शोधण्याइतका वेळ तिघांनाही नव्हता. कारण अण्णांनी ज्या सकाळी आई आजारी असल्याचं सांगितलं, त्याच संध्याकाळी तिला गावात आणायचं होतं. पवन, ताईचा चेहरा पार पडला. अजयने मात्र भावनांना आवर घालत त्याला मळ्यात नेण्याचा प्लॅन सांगितला. प्लॅन जरी त्याचा असला तरी 'मोत्या' एकटा राहील का? ताई अन् पवनसारखा त्यालाही प्रश्न होताच. पण त्याचं उत्तर त्याच्याकडंही नव्हतं. ते देणार होता येणारा काळच.

अजयनं गावात जाऊन त्याच्या मित्राला आणलं. ताईकडून घरातील सर्वांत मोठी पिशवी घेतली. पण त्याचा प्लॅन फसतो की काय, असं वाटू लागलं. त्यानं पिशवी घेतली होती मोत्याला तिच्यात घालून गाडीवरून मळ्यात नेण्यासाठी; पण अगडबंब झालेला मोत्या तिच्यात मावेना! अचानक पिशवीत मला कोंबण्याचं कारण काय, म्हणून तो राहून राहून बाहेर उडी घेई. शेवटी त्याला निम्मा पिशवीत निम्मा बाहेर, अशा फिफ्टी-फिफ्टी अवस्थेत अजयनं गाडीवर टाकला. ताई, पवननं तर त्याला जाईपर्यंत डोळ्यांत साठवून ठेवलं होतं. काय होतंय, हे कळायच्या आतच त्यांचा जीव की प्राण मोत्या आता त्यांना सोडून एकटाच राहणार होता, तेही मळ्यात, निर्जन स्थळी. जिथं माणूस रात्री घराबाहेर झोपायला घाबरतो; हे तर मूक जनावर. नव्या वातावरणात तेही त्याची काळजी घेणारे नसताना.. मॅच होईल का? तो जेवेल का? रस्ता तर चुकणार नाही ना? अशा एक ना अनेक प्रश्नांनी तिघांच्या मनात काहूर केलं. ताई, पवननं उघड तर अजयनं आतल्या आत. कारण त्याला मोत्या मळ्यात नेऊन का होईना जपायचा होता. प्राणिमात्रांमधील दयेचा भाव नव्हे, दोघांतील मित्रत्वाचा भाव. मोत्याला मळ्यातील एका झाडाला बांधून अजय घाईघाईनं आईकडे गेला. त्याला जाताना पाहून मोत्या भुंकू लागला.. तेही जोरजोरात. अजयसारखेच अनेक प्रश्न त्यालाही सतावत होते, पण अजयप्रमाणे त्याच्याकडेही त्याचे उत्तर नव्हते.

आईला घेऊन अण्णा, अजय गावात आले. दवाखाना झाला.

आईला घरी आणले. अजय आला. मोत्या कसा आहे? राहिला का? असे अनेक प्रश्न मूकरीत्याच ताई, पवनच्या चेहऱ्यावरील अजयने वाचलेही अन् मूक राहून कृतीतूनच त्यांना उत्तरेही दिली. आतापर्यंत मोत्याचा राग-राग करणाऱ्या अण्णांचा मनातल्या मनात पोरंही राग-राग करीत होते. पण आता मोत्या रात्रंदिवस त्यांच्याच तावडीत राहणार होता. म्हणून गुपचूप पोरं येऊन अण्णांना भिडली. अण्णांच्या डब्याच्या पिशवीत मोत्याला सकाळ संध्याकाळ भाकरी, दूध पिशवी, अंडी जाऊ लागली.

मोत्याने पहिल्याच रात्री कहर केला. भाकर खाईना.. सारखा साखळी ओढायचा. हातपाय आपटायचा.. त्याचा हा प्रताप पाहून रागावलेल्या अण्णांनी दांडकं काढताच मोत्या धरतीवर आडवा पडला..पण अन्नाला न शिवताच. इकडं ताई, अजय, पवनची अवस्था वेगळी नव्हती. घरात जशी स्मशानशांतता. आईदेखत त्याच्याविषयी बोलताही येईना. म्हणून पोरांची आणखीच कोंडी झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच अजयनं मळा गाठला. त्याला पाहताच मोत्याने उड्या मारून त्याचं जंगी स्वागत केलं. अजयनं पिशवीतून आणलेल्या खाऊवर तो तुटून पडला. बघता-बघता मोत्या मळ्यात त्याचा राग करणाऱ्या अण्णांबरोबरच रमू लागला. त्याचा राग-राग करणाऱ्या अण्णांनी नव्हे तर मोत्याने त्यांच्याशी जुळून घेत साखळीचं लोढणं काढण्यापर्यंत मजल मारली. दिवसभर मोत्या, अण्णा सारं वावर तुडवीत असत. रात्री अण्णा डब्याला गावात येतील तेव्हा वस्तीपुढे बस्तान मारून कितीही अंधार पडला तरी वाट पाही. ते आल्यावर त्यांचं जंगी स्वागत करून, त्यांच्या उशालाच बसून राखण करी. फक्त वस्ती नव्हे, तर शेताचंही. मोत्या रमल्याचं ऐकून ताई, पवनला हायसं वाटलं.

त्याचा राग-राग करणारे अण्णाही मोत्याचे कारनामे अजयला हसून हसून सांगू लागले. अण्णा असोत किंवा नसोत, मोत्या वावर, वस्ती सोडून जात नसे. गावातल्या गल्लीप्रमाणे मळ्यातही त्यानं भुंकण्याच्या आवाजानं आपलं प्रस्थ निर्माण केलं. मोत्याला मळ्यात नेल्यापासून

अजय तर न चुकता मळ्यात जात असे. पण पवनला रोज आणणे शक्य नसल्याने दर रविवारी त्याला नेत असे.

आठ दिवसांनी पवनला पाहून मोत्याला आनंदाचा पारावार उरला नाही. तो गाडीवरून उतरताच मोत्या विशिष्ट आवाजात जणू पवनशी भांडू लागला. आता आला काय मला पहायला, हेच म्हणायचं असेल त्याला. मोत्याच्या गंमतीजमती पवन मग संध्याकाळी गुपचूप हळू आवाजात ताईला सांगे. मोत्याची ही दुसरी इनिंगही नीट सुरू होती. पण काळाला हेही मान्य नसावं. एक दिवस सकाळीच आलेल्या अण्णांनी मोत्या रात्रीपासून गायब असल्याची बातमी आणली. तशी अजयनं अंघोळ न करता मळ्यात धाव घेतली.

'मोत्याऽऽ मोत्याऽऽ मोत्याऽऽ' करीत त्याने सारं शेत पालथं घातलं. पण मोत्या त्याच्या हाकेला ओ देईना, की ज्या हाकेसाठी अजयचे कान आतूर होते. तास झाला, दोन तास झाले. आसपासचे शेत अजयने तुडविले. येणाऱ्या-जाणाऱ्यांना, शेजाऱ्या-पाजाऱ्यांना विचारले. पण, सारे व्यर्थ. अण्णा पुन्हा मळ्यात आले. तेही अजयबरोबर मोत्याला पाहू लागले. पण.. पण.. मोत्या सूर्य ढळला तरी सापडलाच नाही. हताश मनानं, थकलेल्या शरीरानं अजय गावात आला. त्याचा काळवंडलेला चेहरा, चिखलाने भरलेले पाय, विस्कटलेले केस अन् डोळ्यांत आलेले पाणी पाहून ताई, पवन खिन्न झाले.

रात्रभर मोत्या कुठं असेल? कोणी नेला? का काही खाऊ घातलं? असे अनेक तर्कवितर्क लावत तिघांनी रात्र घालविली. सकाळी पुन्हा अजयने मळ्याची वाट धरली. पण मोत्याची मोकळी साखळी पाहून त्याला आता रडू आवरत नव्हतं. पण मोत्या गेला, हे कटुसत्य स्वीकारण्यापेक्षा त्यानं शेजारचा सालगडी घेऊन पुन्हा कालचाच शोधाशोधीचा कार्यक्रम राबविला. शेजारचे दोन शेत सोडून असलेले मोख्याचं शेत, विहीर पाहून झाली. वरच्या तळ्याला चक्कर देऊन झाली. फिरून-फिरून पायाला गोळे आले. अजय पुन्हा वस्तीवर येताच अण्णांनी त्याचं अवसान पाहून त्याच्यावरच पट्टा सुरू केला. ''गेल असंल कुत्र, तू कवर फिरतो त्याच्या शोधापायी?'' त्यावर

मोत्याविना रडकुंडीला आलेल्या अजयनं त्यांच्यापेक्षा मोठा सूर लांबवीत ''मी शोधणारच!'' म्हणत पुन्हा उठला. तोच अण्णांनी त्याला एक शिवी हासडली.

मग मात्र संतप्त झालेला अजय म्हणाला, ''मारलं तरी मी त्याचा शोध घेतल्याशिवाय नाय राहणार!'' तोच खालच्या माळावरच्या कचरूबाचा आवाज आला, ''अण्णासाहेब! अरे ये अण्णासाहेब! बाहेर ये की!'' त्याचा आवाज ऐकून आण्णा व अजय बाहेर आले. अजयकडं पाहत कचरूबा म्हणाला,

''तुमचं कुत्रं हारवलं म्हणं? होय?''

''होय. दिसलं का तुम्हाला? सांगा ना कोठे दिसलं?'' अजय कचरुबाच्या जवळ जात म्हणाला.

''अरं पोरा, त्या भक्तांच्या उसात लई कुत्र्यांची मुंडकी पडली हायती.. मग तुमचं कुत्रबी नेलं काय तरसानी?''

''काय ? काय? मुंडकी? कचरूबा, कायपण सांगू नका. माझा मोत्या असा हार मानणारा नाय. जावा तुम्ही.'' अजयच्या आवाजात थरकाप आला.

''ए आण्णासाहेब, तुमचं कुत्रं गावंत नाय म्हणून म्या सांगायला आलो. जाऊन बघा. जातो म्या!'' असं म्हणत कचरुबा आल्या वाटेने परतला. पण आता मात्र अजयच्या जीवाची उलघाल सुरू झाली. इतक्या वेळ अण्णांशी भांडणारा अजय अण्णांना म्हणाला, ''अण्णा, आपला मोत्या नसंल ना नेला? तुम्हाला काय वाटतं सांगा ना? अण्णा, सांगा ना?'' त्याच्या या लडिवाळपणानं आता अण्णांचं काळीजही पाझरलं.

अण्णा म्हणाले, ''पोरा, मग मोत्या आभाळानं खाल्ला काय?''

''अण्णा.. पण?'' तो पुढं बोलण्याआधीच त्यांनी पर्वतबाबा, कुशाबाला हाक मारली. पण-बिन काय नाय. जाऊनी खात्री करू. अजयचं मन धजना. पण अण्णा निघाले म्हणून पाठोपाठ त्या तिघांबरोबर तोही निघाला.

निमुळत्या बांधा-बांधाने ते भक्तांच्या उसापर्यंत आले. पण उसात

घुसणार कोण? ऊस इतका दाट! त्यो कचरूबा म्हणतो तसं काय जनावर असंल तर? म्हणून टोळक्यानं कटाकटानंच फिरण्यास सुरुवात केली. अर्धा तास फिरूनही काही दिसेना! सारं असं फिरून पुढे चालणारा कुशाबा एका कटावर थबकला. तसे सारेच थबकले.

''काय दिसलं?'' अजय म्हणाला.

तोच कुशाबानं स्वतःच्या तोंडावर बोट ठेवून 'शूऽऽशूऽऽशूऽऽ' असा आवाज काढला. त्याला त्या कटाच्या शेवटाच्या वाफ्यात काहीतरी दिसलं. म्हणून थबकून तो पुढे सरसावला. तोच त्याने धोतराचा सोगा नाकाला लावला. इतरांनाही काहीतरी सडल्याची दुर्गंधी आलीच. हातातल्या काठीनं त्यानं ऊस बाजूला लोटला अन् एकच पळ काढला.

तसे सारे मागे पळाले. ''काय-काय! कुत्र्याची मुंडकी! खरंच हाय!'' कुशाबा ओरडला.

''पण आपल्या मोत्याचं..?' अजय म्हणाला,

''म्या नाय पाहिलं.'' कुशाबा म्हणाला.

''बघा ना प्लीज, माझ्यासाठी! प्लीज.!'' अजय विनवणी करू लागला. तोच पर्वतबाबानं दुसऱ्या बांधाची शेवरी तोडली. लांबूनच ऊस बाजूला केला. अण्णा पुढे सरसावले. पाठोपाठ अण्णांना मागे करून अजय पुढे झाला अन् गपकन अण्णांना त्यानं घट्ट आवळून आवंढा गिळला.

''काय रं पोरा?'' अण्णा म्हणाले.

तोच रडू कोसळल्या स्वरात अजय म्हणाला, ''आपला मोत्या!'' अन् त्याने जोराचा हंबरडा फोडला. कारण समोरच्या कुत्र्यांच्या मुंडक्यात मोत्याचंही मुंडकं होतं.

मोत्याला अशा अवस्थेत पाहून अजयचं रडू थांबेना. वस्तीवर आल्यावर सर्वांनी अजयची समजूत काढली. पण अजय काही रडायचा थांबेना. अण्णांनी अंधार पडल्यावर अजयला मागं बसवत स्वतः गाडी चालवत गावात नेलं. गावाची लाईट दिसताच अजयनं डोळे पुसले. कारण त्याला आता ताई अन् पवनला तोंड द्यायचं होतं. अजय कुणाशी काही न बोलताच खाटेवर पडून राहिला. रात्री सर्वांनी जेवण घेतलं.

अण्णा मळ्यात जायला निघाले. तसे त्यांनी मोत्याला तरसांनी खाल्ल्याचं सांगताच ताई, पवनला भूकंप झाल्यासारखंच वाटलं. पण कसं? कधी? विचारण्याआधीच आईचा स्वयंपाकघरातून आवाज आला, काय? कशानं खाल्लं?'' अजय दोघांना शांत करीत अण्णांना जाण्याचा इशारा करीत ''काही नाही, काही नाही'' म्हणत त्याने टी.व्ही.चा आवाज वाढवला.

''मोत्या गेला रे आपला..'' असं सांगताच त्याला पुन्हा रडू आवरेना ! त्याचं बोलणं ऐकून ताई, पवनचेही डोळे पाणावले.

त्यांचा सखा, मित्र मोत्या त्यांना आता भेटणार नसला तरी त्याच्या सहवासातील आठवणी हाच त्यांचा ठेवा, हीच त्याची मैत्रीची भेट आठवत तिन्ही भावंडं झोपी गेली. तीही 'मैत्रीची भेट' पुन्हा कधीच होणार नाही, हे कटुसत्य स्वीकारून!



# झेंडूची फुलं

''दादा, तू चुकवला ना राव हिशेब ?''

''नांगरटीनंतर हारूवाल्याला काय चिचुके दिलं?'' प्रश्नामागं प्रश्न करीत धनंजयनं सायकल भिंतीवर आदळली. त्याच्या प्रश्नाचा भडिमार सहन करीत रामनाथानं चक्क मौनच धारण केल्याने कॉलेजच्या वह्या रॅकवर आपटीत धनंजय पुन्हा बरसला, ''दादा, हे बरं काय..? मला सारं कळतं, इतर पिकांसारखं गव्हात आपल्याला काय बी ऱ्हायलं नाय...

''अरं पोरा, किती बोलूशी रं तू ?'' मौन सोडत रामनाथ म्हणाला.

''ते काय नाय दादा ? म्या ठरविलंय, काय बी करायचं नाय!'' धनंजय म्हणाला.

''मग का पडीक ठेवितो का सारं शेत तू ? ईट आला तर ईक अन् हिंड गावभर बोंबलत.'' आता मात्र रामनाथ पेटले होते.

''दादा, माझं तसं मत नाय..पण सारं पैकं असंच गेलं तर खायचं काय?'' बापाचा आवाज वाढल्याने पोराच्या नात्यानं नमतं घेत धनंजय आवाज खाली घेत म्हणाला.

''तुव्हं कॉलेज नीट चालू हाय ना? तू तेच कर.. म्या एकला पाहतोय शेती..'' रामनाथ म्हणाले.

''ठीक हाय ना? पाय तूच!'' म्हणत  धनंजय उठला नि ताडकन विहिरीच्या दिशेने निघाला.

धनंजय व रामनाथ या दोघांचं नातं बापलेकाचं. पण धनंजयची आई त्याच्या बालपणीच वारल्यावर रामनाथनं त्याला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपत वाढवलं. त्याच्या प्रेमात अंतर नको म्हणून त्यानं

आईची भूमिकाही तेवढ्याच मायेनं पार पाडली. दोघांचं नातं इतकं घट्ट की त्यातील बाप-लेकांतील अंतर केव्हाच संपलं होतं. दोघं मित्रासारखे राहत असत. म्हणून धनंजय वडिलांना 'आरं..कारं' करीत असे. पण उद्धटपणा नव्हे तर प्रेमाचा भावच रामनाथाला भावत असे.

चिडल्यावर धनंजय जातो कुठं, हे रामनाथला पक्क माहीत होतं. स्वयंपाक झाकून तो नांगरट, ढेकळं तुडवत विहिरीवर आला. विहिरीपासून फर्लांगभर अंतरावर जागीच थबकला. तसा त्याच्या पायाच्या हालचालींमुळे येणारा गवताचा आवाजही विरला.

डुबुक..डुबुक... आवाज त्याच्या कानी पडला. पाहतो तर काय, धनंजय एक-एक दगड विहिरीच्या पाण्यात टाकत कठड्याच्या कडेला पाय हलवत बसला होता. त्याला पाहून रामनाथ म्हणाला, ''पोरा चुकलो म्या.. सैंपाक केलाय.. वाईच दोन घास खा की..तू म्हणशील ते करू, पण चाल रं आता..''

धनंजयलाही भूक आवरत नव्हती. त्यामुळे आता उगाच 'री' ओढण्यात फायदा काय, म्हणून निघण्याआधी एक दगड पाण्यात टाकत त्यानं रामनाथमागं घरची वाटत धरली. घरी येईपर्यंत धनंजयचाही पारा खाली आला होता. दोघांनी हातपाय धुऊन बैठक खोलीतच बस्तान मांडलं अन् पुन्हा शेताचाच विषय सुरू झाला. पण भांडून नाही, प्रेमाने.

''धनू बाळा, शेती पडीक ठिवून भाऊबंदास्नी हसू करायचं काय?'' रामनाथ धनंजयला म्हणाला.

''दादा, तू म्हणतो ठीक हाय रं.. पण तूच सांग ना, गेल्या तीन पिकांत काय राम राहिला?'' धनंजय भाकरीचा काला कालवीत म्हणाला.

''सारं कुठं रं आपल्या बाचं असतं? जो शेर हाय, त्यो मिळणारच...!'' भाकरीचा घास चावत बोबड्या आवाजात रामनाथ म्हणाला.

दोघांचं जेवण झालं. खाऊपर्यंत भाजी तिखट नाहीच म्हणून काला करून फुरके मारणाऱ्या धनंजयला हुस-हुस करताना पाहून रामनाथनं

घाई-घाईनं बडीशेप त्याच्यापुढं केली. तोच बोटाच्या चिमटीत बडीशेप धरीत धनंजय म्हणाला,

''म्या काय म्हणतोय दादा.. आपण जर गहू, बाजरी, कांद्यापेक्षा येगळं काय बी केलं तर ?''

''आरं पर काय? '' लांब कपाळ आखूड करीत रामनाथ म्हणाला.

''त्येचं तर म्या तुम्हास्नी इचारतो हाय?'' धनंजय म्हणाला.

''मग माळवं करायचं...का?'' का जरासा जास्तच लांबवीत रामनाथ म्हणाला. कारण मागे दोनदा माळवं केलं तेव्हा काय झालं, हेच धनंजय उजारणार होता, हे त्याला माहीत होतं.

''बस्स कर ! तुमचं माळवं पुराण.. लावणी, काढणी, फवारा दररोज बाजार गरके मारून तुमच्या मागच्या वांग्यानं औषधावाल्याचं देणं पण नाय दिलं. चालला पुन्हा माळवं करायला ते.''

रामनाथला अपेक्षित आधीचा भाजीपाल्याचा तोट्यात गेलेला हिशेब मांडत धनंजय म्हणाला.

तोच बाहेरून आवाज आला, ''धनू .. धनू.. हाय कावं? आवाज शेजारचा गणपतचा असल्याचे ओळखल्याने आतूनच धनंजय म्हणाला, ''काय रं गणपत? आत ये की?'' हाका मारीत दारापर्यंत आलेला गणपत धापा टाकत दाराजवळच थांबत म्हणाला,

''चाल ना.. पटकन.. गाय सुटली!''

त्याचं वाक्य कानी पडताच हातातील टॉवेल रामनाथच्या दिशेने फेकत शर्ट चढवीत धनंजय म्हणाला, ''दादा, आलो रं मी.'' तोच काळजीच्या स्वरात रामनाथ म्हणाला, ''पोरा, जपून..'' त्याच्या स्वरात फक्त बापाची नव्हे, आईचीही काळजी होती. कारण त्याचं बापाचं काळीज धनंजयच्या बाबतीत केव्हाच आईचं झालं होतं.

तो गेला, पण वेगळं काय करायचं, या प्रश्नाच्या गर्तेत रामनाथला सोडून.

रामनाथनं तासभर विचार केला. पण, नवीन काय पीक लागवड करावी, याचं उत्तर काही सापडेना ! पारंपरिक सर्व पिकं त्यानं केली होती. कधी भाव नाही, इनमिन दीड एकराचं शेत, कधी ऐन पीक

उभारीत येण्याआधीच पाण्याचे टचके बसायचे. कधी मजूर वेळेवर मिळाले नाहीत म्हणून  पीक चांगलं येऊनही हातचं जायचं.

शेतीत पैसा मुबलक नसू द्या, पण माणूस मुबलक असलं तर शेती फुलायची, हे जुन्या लोकांचं समीकरण पूर्ण करण्यासाठी रामनाथकडं तर दोन्ही गोष्टी नव्हत्या. त्यामुळे त्याच्या शेतीची होणारी परवड धनंजयसाठी नवीन नव्हती. तो लहानचा मोठा हीच परवड पाहत झाला होता, पण आता कॉलेजमध्ये जाऊन चार बुकं शिकून त्याला शेती आणि रामनाथ या दोघांची परवड पाहवत नव्हती. शेताच्या तोट्यामुळं रामनाथवर  रागवायचा, पण त्यांच्या भल्यासाठीच! त्यांना होणाऱ्या त्रासासाठी ! अर्थात हे न कळण्याइतका रामनाथही दुधखुळा नव्हता, पण शेत पडीक ठेवणं म्हणजे त्याला दुभत्या गाईला चाऱ्याविना ठेवल्यासारखं होई..

जून उजाडला तशी पहिल्याच दिवशी वरुणराजानं भरभरून हजेरी लावली. त्याचं येणं दोन दिवसाला झालं. उन्हानं तापून तहानलेल्या काळ्या मातीची तृष्णा त्यानं भागविली. चौथ्या-पाचव्या दिवशीच हिरवे अंकुर फुटलेला शालू काळ्या आईनं पांघरला. बैलामागची गाणी रानारानात घुमू लागली. अनेकांनी पेरी केल्या, काहींनी चारा; पण रामनाथचं दर वर्षी पावसानंतर सर्वांत आधी पेरीनं भिडणारं शेत मोकळच पाहून जाणाऱ्या येणाऱ्यांनी त्याला टोमणं मारण्यास सुरुवात केली, पण तो डगमगला नाही.

बाजारचा दिवस म्हणून रामनाथही पिशवी सायकलला अडकवीत बाजारात गेला. बाजारात त्याचा जुना मित्र भेटला. ख्यालीखुशाली झाली. गप्पा रंगल्या अन् रामनाथ बोलण्या-बोलण्यात आनंदी झाला. मित्राचा निरोप घेऊन घाईघाईने त्यानं बाजार नि खाऊ पिशवीत टाकला. त्याची सायकलचं पायडंल मारण्याची गती चांगलीच वाढली होती.त्यानं घाईत घर गाठलं; पण घर जागेवर, पोर मात्र नव्हतं. त्याने देवळीतील किल्ली घेऊन कुलूप उघडलं. बाजार टेकवला. स्वयंपाक खोलीत ते बैठक खोली गरके मारू लागला. तो वाट पाहत होता अर्थातच धनंजयची. कारण त्याच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं.

धनंजयची वाट पाहत पाहत गरके मारून तो दमलाही. थोडं बसावं असं वाटलं, तोच सायकलचा आवाज आला. धनंजयच असणार.. म्हणून तो दारात डोकावत पुढे सरसावला. त्याचा अंदाजही बरोबर होता. धनंजयला पाहताच त्याची वाट पाहण्यात वेळ गेला म्हणून त्याच्यावर चिडण्यापेक्षा त्याला तो आल्याचाच आनंद जास्त झाला.

''धनू...पोरा, यगळं करायचं ठरलं.'' जसा कबीराचा खजिना मिळाला, अशा आवेशात रामनाथ म्हणाला.

'''दादा, पण काय?'' आशाळभूत नजरेनं रामनाथकडे पाहत धनंजय म्हणाला.

''झेंडू...झेंडूची फुलं...'' रामनाथ जोर देत म्हणाला.

''काय झेंडू...? कोऽऽऽ कोणी सांगितलं तुला?'' धनंजय म्हणाला.

''आरं, बाजारात मपला मैतर दत्तोबा भेटला. मागच्या दसऱ्याला त्यानं तीस हजार केली. ती पण एकरात. कीड नाय, फवारा नाय. अडीच महिन्याचं खेळ अन् नोटाच नोटा रं..''

प्रत्येक माणसात मार्केटींगचा गुण दडलेला असतो, असं म्हणतात. रामनाथनं जणू काही तोच वापरत धनंजयच्या गळीही झेंडू उतरविलाच. झालं, दोघा बापलेकाचं झेंडूची फुलं करण्याचं पक्क झालं. पहिल्यांदा वडील आपलं ऐकून काहीतरी वेगळं करतायत म्हणून धनंजयही रामनाथच्या 'झेंडूची फुलं' या नव्या मोहिमेत कधी नव्हे ते आनंदानं सामील झाला.

दुसऱ्याच दिवशी रामनाथनं शहराला जाऊन चांगल्या कंपनीचं झेंडूचं बी आणलं. येताना धनंजयनं बजावून सांगितलेलं झेंडूचं बिलही कधी नव्हे ते जपून घेऊन आला.

तो आला, पण शेतात पाऊल ठेवताच अवाक् झाला. कारण त्याला येईपर्यंत धनंजयनं बी टाकण्यासाठी रान तयार करून वाफेही बांधले होते. रामनाथला पाहताच तो म्हणाला, ''दादा, आणलं ना बी? फोड की पाकीट..!'' पोराचा उत्साह पाहून बाप तरी मागं राहील कसा ? रामनाथनं दातानंच पाकीट फोडून बी टाकत झेंडूच्या फुलाचा श्री गणेशा केला.

सायंकाळपर्यंत तर धनंजयनं पाण्यानं वाफे तुडुंब केले. चिखलानं भरलेलं खोरं दगडावर आदळीत धनंजयनं तोंडावर पाणी मारलं. रामनाथनं पुढं केलेल्या टॉवेलनं तोंड पुसत तो म्हणाला, ''दादा... झेंडू लागवड होईल खरी. पर हिशेबात घोळ करायचा नाय! त्यात मी खपून घेणार नाय!''

पुढचा पाढा पाठच असल्याने हिशेबाची वही पुढे करीत रामनाथ म्हणाला, ''धनू बाळ्या, त्वा म्हणूस्तोर म्या ब्याचा खर्च लिवला; पण बघ की!'' तो पाहण्यासाठी वहीत डोकावत धनंजय जे उठला तसा रामनाथच्या मांडीवर डोकं ठेवून विसावला. त्याचा लडिवाळपणा पाहून त्याच्या डोक्यावर हात ठेवून रामनाथ म्हणाला, ''दमला माहा धनू!''

तोच मायेनं इशारा करीत धनंजय म्हणाला, ''दादा, झेंडूला फुलं आल्यावर कसं दिसंल रं शेत...?''

त्यावर रामनाथ म्हणाला, ''सांगू का रं..?''

''सांग ना?'' धनंजय म्हणाला.

''तू चिडल्यावर दिसतू तसं...!'' खो-खो हसत रामनाथ उद्गारला.

''दादा, उगाच मला चिडवायला लावू नगंस.'' म्हणत त्यालाही हसू आवरेना.

झालं! झेंडूचं रोप लावणीला येईपर्यंत हारू मारून, दंड पाडून रामनाथनं रानं बांधूनही ठेवली. रोप महिन्याचं झालं. म्हणून ते लावण्यासाठी त्यानं टोळीच्या बायांना बोलावलं. पण इतर उपत्या कामामुळे त्या येईनात. मग रामनाथसह धनंजयलाही जरा काळजीच वाटू लागली. त्यामुळं न राहवलेल्या धनंजयने थेट नजीकच्या गावातील टोळीला बोलविल्याचे कळताच स्थानिक महिला शेतमजुरांनी अखेर हुज्जत घालीत झेंडू लागवड करून दिली.

दोन दिवसांत सारं रान पार भिडलं. रोपंही संपली. वाऱ्याबरोबर रानात डोलणारी इवलीशी झेंडूची रोपे पाहून इतक्या दिवस न थांबणारी अन् टोमणे मारणारी मंडळी रामनाथकडे मुद्दामहून थांबू लागली. झेंडूच्या नव्या पिकाविषयी माहिती घेऊ लागली, पण धनंजयला ही

गोष्ट आवडत नसायची. कारण लोक फक्त माहिती ऐकून घेतात अन् त्याच्या मागं त्याची 'उडवतात', हे धनंजयला माहीत होतं. झेंडू लागवडीपासून दोन डोक्यांच्या रामनाथच्या घरातील वातावरण पार बदललं होतं. लागवडीच्या पहिल्या दिवसापासून प्रत्येक बारीकसारीक खर्चाचा हिशेब टिपणारा धनंजय कॉलेज सुटलं की घर गाठू लागला. रामनाथच्या झेंडू खर्चाचा पै-पैचा हिशेब ठेवणारा हा मुनीमजी दिवसभर रामनाथबरोबर झेंडूसाठी खपू लागला.

पहिली खुरपणी पूर्ण होण्याआधीच पावसाने दिलेली उघडीप, बापलेकांची काळजी वाढवणारी ठरली. जुलै सरता-सरता पावसाने उघडीप दिली. श्रावण उजाडला तरी तो परतायचं नाव घेईना! मग मात्र सर्वांच्याच तोंडचं पाणी पळालं. एक तर पाऊस पण नाही अन् विजेचे भारनियमनही वाढून बसलं. पाणी दंडात आलं की लायटीनं झटका दिलाच समजा. त्यात दिवसा तर ती टिकायचं नावंच घेईना. इतरांप्रमाणे रामनाथच्या झेंडूलाही पाऊस, वीजटंचाईची झळ बसू लागली.

झेंडू पाण्याअभावी माना टाकू लागला. पण पाऊस काही येईना ! मग मात्र धनंजयला राहवेना. त्यानं रामनाथच्या मदतीनं रात्री झेंडूला पाणी द्यायला सुरुवात केली, कारण दिवसापेक्षा रात्री लाईट विनाझटका चालायची. दिवस उगवेपर्यंत धनंजय रामनाथच्या मदतीने दारे धरू लागला. रात्र-रात्र जागून काढू लागला. पाणी लावून बांधावर पडल्या-पडल्या निरभ्र आकाशातील चांदण्यांना पाहून माझे कष्ट पाहताना, पाऊस पाडा ना, म्हणून प्रार्थना करू लागला. अखेर श्रावणाच्या सरत्या दिवशी का होईना, वरुणराजा पावला अन् आपल्या कष्टाची 'त्या' चांदण्यांना कीवच आली म्हणून त्यांनी पाऊस पाठवला म्हणून धनंजयही सुखावला.

झेंडू लागवडीपासून धनंजयची दिनचर्या पारच बदलली होती. दुपारची झोप, मित्र, हिंडणं सारं-सारं तो पार विसरला. दुपारपर्यंत कॉलेज, नंतर झेंडूच्या बागात सूर्य अस्ताला जाईपर्यंत तो झेंडू नि झेंडूच्या फुलातच रमू लागला. त्याच्यातील हा बदल पाहून रामनाथला

त्याचा हेवा वाटू लागला. पण त्यानं धनंजयला कधी बोलून नाही दाखवलं. एक दिवस भल्या सकाळीच झेंडूला चक्कर देऊन आलेल्या रामनाथनं कॉलेजला जाण्याच्या गडबडीत असलेल्या धनंजयला हटकलं.

''पोरा, झेंडू पोटारलेत.. म्या काय म्हणतोय, आपण मालाचा एक डोस दिला तर?'' दबकत-दबकत रामनाथ म्हणाला.

खर्च म्हटलं की धनंजय चिडणार, नकोच म्हणणार, हे त्यानं गृहीत धरलं होतं. पण झालं उलटं..

''दादा, मी पण त्येच म्हणणार होतो.'' म्हणत धनंजयनं सायकलला वह्या अडकवीत टांग मारली. त्याच्या अनपेक्षित उत्तरानं, हिरवा कंदील मिळाल्यानं तो गेला तरी मोठ्या आवाजात रामनाथ मागून ओरडला, ''मग आजच्यालाच आणतो रं माल.. चालंल कावं?''

तोच मागे पहात बराच लांब गेलेल्या धनंजयनं हातातं खुणवत, ''बरं बरं'' म्हटल्याचं ऐकताच रामनाथ कामाला लागला. त्यानं शहराला जात रासायनिक खतांच्या चार गोण्या रिक्षा करून आणल्या. गोण्या येऊन चार दिवस झाले, पण खत टाकायला गडी मिळेना ! मग मात्र भल्या सकाळीच उठलेल्या धनंजयनं कुदळ हातात घेतली. ते पाहून रामनाथ जरा अचंबितच झाला. पण त्याला काही म्हणण्यापेक्षा त्यानंही तडक गोणी फोडून धनंजयनं झाडालगत घेतलेल्या खड्ड्यात माल टाकण्यास सुरुवात केली. झेंडूच्या फुलांना माल घालताना पाहून शेतावरून जाणाऱ्या येणाऱ्यांनी कुरापती काढल्या. पण त्या ऐकायला रामनाथला वेळ नव्हता अन् धनंजयला तर बिलकुलच नाही. त्याचे कष्ट तंबाखू आणायला चाललेल्या शेजारच्या गणपतने पाहिले, तोही त्यांच्यात सामील झाला. बोलता-बोलताना तिघांनीच दोन दिवसांत रान भिडवलं. त्याच रात्री मुसळधार पाऊस झाला. आपल्या कष्टाची मूक दखलच निसर्गानं घेतल्याचं धनंजयला वाटलं.

मालाचा फरक आठच दिवसांत दिसू लागला. कळ्या लागलेली झाडं आता कंबरेला लागत होती. एकदा भल्या सकाळीच प्रातर्विधीला

शेतात गेलेला धनंजय पळत-पळत घरी आला. माठात पाणी भरणाऱ्या रामनाथला त्यानं तसंच ओढलं. ''दादा, चाल ना, लवकर चाल-'' रामनाथाचा हात ओढत धनंजय म्हणाला.

''आरं पर कुठं?.. झालं काय ते तर सांग...'' म्हणत रामनाथनं त्याला मागं ओढत भरलेल्या माठावर झाकण ठेवलं. तसा धनंजय त्याला ओढत घेऊन शेतात आला. झेंडूच्या मध्यावर एका झाडालगत थांबत म्हणाला, ''दादा, हे बघ.. हे बघ..''

काही म्हणण्याआधीच त्यानं रामनाथला शेकडो झाडांतून पहिली उमललेली झेंडूची कळी दाखविली. ती दाखवताना त्याच्या चेहऱ्यावरील कष्टाचं फळ मिळाल्याचा आनंद पाहून रामनाथला आभाळाएवढा आनंद झाला. ती एक उमललेली कळी धनंजयला एवढी प्रेरणा देऊन गेली की, तेव्हापासून रोज सकाळी तो आज नव्या किती कळ्या उमलल्या..उद्या किती उमलणार.. हे शोधू लागला. बघता-बघता सारं शेत फुलांनी भरलं. धनंजय ज्या क्षणाची वाट पाहत होता तो दिवस उगवला. झेंडूच्या प्रत्येक झाडाला टपोरी फुलं...फुलांनी सारं शेत फुलून गेलं.. वाऱ्याच्या हलक्याशा झुळुकीनं सारी फुलं एका तालात डुलत असत. ते पाहून धनंजयला जणू शाळेत दर शनिवारी सकाळी होणाऱ्या कवायतीचीच आठवण होत असे. हे मोहक दृश्य सूर्यनारायणाच्या पहिल्या किरणाबरोबर आणखी मोहक दिसायचं. ते नजरेत साठवून ठेवण्यासाठी धनंजय रोज लवकर उठून शेतात जाऊ लागला.

तोच एक दिवस कोणीतरी काही झाडांची फुलं तोडून नेल्याचं त्याच्या लक्षात आलं. तसा तो तडातडा घरी आला. कॅलेंडर चाळू लागला. दसऱ्याला तब्बल पंधरा दिवस होते. तोपर्यंत काय? माझ्या कष्टाचं फळ हे चोर-भामटे खाणार? छे ! धनंजय पेचात पडला. त्यानं जेवढा हा प्रकार गांभीर्यानं घेतला तेवढा रामनाथनं नाही. त्याच दिवशी त्यानं कॉलेजवरून येताना दुपारी वायर अन् बल्ब आणला. विहिरीनजीक बल्ली ठोकून लावला.. एवढंच करून थांबला तो धनंजय कसला! रामनाथची इच्छा, हिंमत नसताना त्यानं शेतात बल्ब खालीच

त्यालाही झोपायला नेलं. रात्री किर्रर अंधारात रामनाथ घोरू लागला. साधा रातकिड्यांचा आवाज थांबला तरी धनंजय उठून बसे.

सकाळी कॉलेज, दुपारी झेंडू, रात्री झेंडू.. त्याच्या राखणासाठीच तो रात्र-रात्र जागून काढू लागला. आता दसऱ्याला अवघे पाच दिवस राहिले होते. कॉलेजच्या लायब्ररीत पेपर चाळता-चाळता धनंजयची नजर एका बातमीवर स्थिरावली. बातमी होती झेंडूच्या फुलांविषयीची- तीही यंदा झेंडूला चांगला भाव मिळणार, अशी. ते वाचून तर धनंजयचे पाय जमिनीवर राहतील तर नवल.. त्यानं नाचतच घर गाठलं. रामनाथाला सांगितलं. पण रामनाथनं 'पेपरावाल्यांचं काय खरं हाय!' म्हणत टाळलं. पण तरीही धनंजय मात्र जाम खूश होता.

झेंडू खुरपणीला येण्यास टाळाटाळ करणाऱ्या बायांच्या टोळीनं मात्र कामच कमी झाल्यानं फुलं काढण्यास लगेच येण्याचं सांगितलं. एवढ्या फुलांच्या विक्रीचं नियोजन करायचं कसं? गेल्या तीन-चार दिवसांपासून अनेक जण रामनाथला वेगवेगळे सल्ले देत होते. कुणी म्हणायचं, काट्यानं वीक, तर कुणी मोंढ्याला. पण रामनाथनं निम्मी फुलं हातकाट्यावर तर निम्मी मोंढ्याला विकायचं ठरवलं. त्यानुसार पोते, फुलं अंथरायला लागणारा बारदाना, सारी तयारी झाली.

दसऱ्याच्या आदला दिवस उगवला. ठरल्याप्रमाणे सकाळी आठलाच बाया झेंडूच्या फडात घुसत फुलांनी ओट्या भरून बांधावर आणून टाकू लागल्या. बघता-बघता बांधावरचा ढीग वाढू लागला. बारदाना अपुरा पडू लागला. म्हणून धनंजयनं शेजारच्या गणपतला मदतीला बोलावून जादा फुले पोत्यात भरून घरासमोर आणून टाकण्यास सुरुवात केली. तोडणाऱ्या बाया थोड्या गहाळ झाल्या की, धनंजय त्यांना दटावी. थोडा वेळ वाया गेला की त्याला धाकधूक वाटे. बायांची सुट्टी होईपर्यंत तोडणी भिडली पाहिजे. सूर्य अस्ताला गेला अन् शेतातील सारा झेंडू घरासमोर आला. बापलेकानं सुटकेचा निःश्वास सोडला. रात्री उशिरापर्यंत गणपतच्या मदतीनं त्यांनी झेंडू पोत्यात भरून ठेवला. रिक्षावाल्याला निरोप देऊन झाला. काटा-माप पिशवीत भरलं. गणपत अन् धनंजय हातकाट्यावर तर रामनाथनं

मोंढ्यावर फुलं विकायचं ठरवलं.

झेंडूच्या फुलापायी दोघे तहानभूक विसरले. दमलेला धनंजय फुलांजवळच झोपी गेला. पण रामनाथनं सारं आवरल्यावर, रात्री उशिरा का होईना बळंबळं धनंजयला जेऊ घातलं.

पहाटे चारचा गजर होताच दोघं उठले. दात घासत बॅटरी घेऊन जात धनंजयनं गणपतला त्याच्या घरी जाऊन उठवलं. पाच वाजता रिक्षा आली. रिक्षात पोती चढवूनही दोन उरली. ती आम्ही सायकलवर आणतो, म्हणत धनंजयनं रामनाथला रिक्षाबरोबर पाठवून दिलं. जाताना आमच्यासाठी मोक्यावरची जागा पकड सांगायलाही तो विसरला नाही. रिक्षा जाताच फुलांचं एक पोतं गणपतकडं अन् एक धनंजय घेऊन अंधारातच सायकलवरून ते शहराला जाणारा रस्ता कापू लागले. कसली भीती नाही, झोप झाली नाही तर थकवा नाही. कारण धनंजयला दिवस उजाडायच्या आत शहराला पोहोचायचं होतं. पहाटेच्या गारव्यातही सायकल दामटून-दामटून दोघं घामाघूम झाले. तोच लांबूनच शहरातील लाईट दृष्टिक्षेपात येऊ लागल्यानं दोघांनाही हायसं वाटलं.

ठीक उजाडताच दोघं शहराच्या बस स्थानकालगत पोहोचले. धनंजय रामनाथाला शोधू लागला. तोच गणपतचा आवाज आला- ''तो बघ दादा...'' रामनाथनं पकडलेल्या जागेवर पोते टाकून हातपाय ताणत धनंजयनं मोठा आळस दिला. गणपतनं पोते सोडले. धनंजयनं बारदाना अंथरला. झेंडू उभारताच आसपास उभे असलेले दोन व्यापारी धनंजयला हजार रुपयाला पोतं मागू लागले. पण धनंजय देईना. त्यांनी बाजार फेरफटका मारत एक-दोन ठिकाणी भाव विचारला, तर त्याला साठ रुपये, पन्नास रुपये किलो असल्याचं समजलं. त्यानं मांडलेल्या जागेवर येत त्या व्यापाऱ्यांना फटकारलं.

धनंजयनं चौफेर नजर फिरवली तर म्हणावी अशी झेंडूची दुकानं नव्हती. भाव पण चांगला फुटला होता. आता चांगलाच उजाडलं होतं. तोच फुलं विक्रेत्यांनी फुलावर पाणी मारण्यास, ढिगारे गिऱ्हाईकासाठी उघडे करण्यास सुरुवात केली. ज्याची प्रतीक्षा सारा बाजार करीत होता. ज्याच्या दिमतीला पहाटेपासून व्यापारी, शेतकरी आले होतो तो ग्राहक राजा आता

रिकाम्या पिशव्या घेऊन भाव विचारत फिरू लागला. तसाच एक वृद्ध धनंजय जवळ आला. फुलं पाहत भाव विचारला. धनंजय साठ रुपये किलो सांगताच त्यानं पन्नास्नं दोन किलो मागितली. बोहनीच्या पहारी नाट नको म्हणून त्यानं घ्या म्हणताच गणपतनं काटा करून फुलं त्याच्या पिशवीत टाकली. त्यानं पन्नास-पन्नासच्या दोन कडक नोटा धनंजयच्या हातावर टेकविल्या. त्या नोटा मोठ्या अभिमानानं खिशात घालत त्यानं कष्टाची पहिली कमाई केली. तोच त्याच्या दुकानापासून दोन दुकान सोडून बसेल्या एका म्हाताऱ्यानं आरोळी ठोकली- ''चला..चला.. झेंडू लावलेत.. पन्नास रुपये किलो.. पन्नास रुपये किलो..'' त्याच बोलणं ऐकून चांगलंच गिऱ्हाईक धावलं.

ते पाहून धनंजयचेही डोळे विस्फारले. त्यानं न लाजता कसलेल्या बाजारकरूप्रमाणं ''सरकारी भावात घेणार त्याला देणार'' म्हणत आरोळी ठोकली. त्याचा आवाज ऐकून त्याच्या भवतीही दोन-तीन गिऱ्हाईकं गोळा झाली. गणपतनं माप करून दिलं. आता दिवस चांगलाच वर आला होता. बायका, मुली, माणसं नटून-थटून गजरा, फुलांसाठी बाजारात आली. चिक्कार गर्दी झाली. शहराचं गिऱ्हाईक पण चोखंदळ. चार दुकानं फिरून जिथला माल आवडे त्याच दुकानदाराला कमी भावात मागत असे. धनंजयचा घसा खरडायचं काम सुरूच होतं. समोरून जाणाऱ्या चहावाल्या पोराला त्यानं दोन कट सांगितले. चहाचे दोन घोट पोटात गेल्याने पुन्हा तरतरी आल्याने पुन्हा 'सरकारी भावाचा' गजर सुरू केला. आता कोवळी उन्ह संपून चांगलंच ऊन चटकू लागलं. धनंजयचा गल्ला तीनशे रुपयांपर्यंत गेला होता. झेंडूला म्हणावा असा उठाव येईना, हे वाढत्या उन्हाबरोबर आता धनंजयच्या लक्षात येऊ लागलं. तसं त्यानं गणपतला 'आलोच' म्हणून सकाळचे दोन रोकडे व्यापारी तो शोधू लागला. दोन आळ्या सोडून ते सापडलेही. धनंजय त्यांना झेंडू घेता का म्हणताच ते हसत म्हणाले, '' फुकट पण नको रं बाबा, डोह झाला आता. दहा-वीस रुपयानं कोणी घेणार नाय तासाभरात!''

त्यांचं वाक्य कानी पडताच धनंजयचे तर हातपायचं गळाले. तसाच

अवसान गळालेल्या अवस्थेत तो गणपतजवळ आला. ''काय परिस्थित हाय रं?'' म्हणताच गणपत म्हणाला, ''गिऱ्हाईक येत रं.. वीस-तीस रुपये किलोनं मागतं.''

''मग दे की!'' धनंजय म्हणाला.

''पण गिऱ्हाईकंच फिरकंना..'' 'ते' व्यापारी भेटल्यापासून तर धनंजयनं घसा खरडणंही बंद केलं. सूर्य डोक्यावर आला, तसा भानावर आलेल्या धनंजयनं गणपतला वीस रुपये देत वडापाव खाण्यास पाठवलं. ''आणि तू?'' पैसे घेत गणपत म्हणाला.

''तू आल्यावर जातोय.'' धनंजय म्हणाला.

गणपत वडापाव खाऊन परतला तरी गिऱ्हाईक येईना. धनंजयला वाटलं, कमी भावात विकू, पण त्याला गिऱ्हाईक सापडेना. गणपत आला. येताना दादा भेटल्याचा अन् 'काय इकल ते इकून नीट या' असा त्याचा निरोप घेऊन आला.

त्याचं बोलणं ऐकताच मोंढ्यावर पण फुलाचं काही झालं नसलं म्हणून दादा आपल्याला न भेटता परस्पर गेल्याचं धनंजयच्या लक्षात आलं. दुपारचा एक वाजत आला होता. धनंजयनं मन मोठं केलं. बेंबीच्या देठापासून ओरडत पुन्हा आरोळी ठोकली, 'सरकारी भाव वीस रुपये किलो झेंडू.' एक गिऱ्हाईक आलं. बहुधा देहबोलीवरून शिक्षक असावा. त्यानं चक्क दहा रुपये किलोनं झेंडू मागितले. त्यामुळे याला काय म्हणावा, धनंजयला सुचेना. ''वीसच्या खाली देणार नाही.'' धनंजयनं ठणकावून सांगितलं. पण तोही काय हटंना. त्यानं दहा रुपये किलोची 'री' लावूनच धरली. त्यामुळं चिडलेल्या धनंजयनं त्याला 'मला इकायचे नाय, पुढं नीघ!' अशी गावठी भाषा वापरताच त्यानं पळ काढला. पण दुसऱ्याच मिनिटाला समोरच्या म्हातारीनं झेंडू दहा रुपये किलोचा भाव फोडला. सकाळपासून उभा असलेला धनंजय दहा रुपये किलोचा भाव ऐकून खालीच बसला. त्याची अवस्था पाहून गणपतच्या मनात कालवाकालव सुरू झाली. तो थेट दुकानासमोर उभा राहून येणाऱ्या जाणाऱ्यास 'झेंडू

घ्या, झेंडू घ्या' विनवू लागला. गिऱ्हाईक वळेना, वळले तरी आता दहा चे पाच रुपये किलो मागू लागले. ते ऐकून संतप्त झालेला धनंजय रागात 'त्या' गिऱ्हाईकाला म्हणाला, ''फुकट नेतो का फुकट..?'' तोच गणपतनं त्याला दापलं.

आता गणपतच 'पाच रुपये किलो झेंडू, पाच रुपये किलो झेंडू घ्या..झेंडूघ्या.' ओरडू लागला. त्यानं तासभर घसा ताणूनही गिऱ्हाईक फिरकेना. हताश धनंजय उठला. आसपासचे दृश्य पाहून त्याला तर क्षणभर चक्करच आली. कारण अनेक व्यापारी-शेतकऱ्यांनी जागेवरच झेंडूचे ढीगच्या ढीग सोडून निघून जाण्यास सुरुवात केली होती. गणपतची विनवणी मात्र सुरूच होती. त्याला थांबवत, हाताने खुणावत धनंजयनं जवळ बोलावलं. ''गणपत, काय राम ऱ्हायला नाय रं''म्हणत त्यानं झेंडूखालचा बारदाना जागेवर उभारला. तोच मागून आवाज आला, 'ऐ पोरांनो, ते फुलं आमच्या रस्त्यातून उचला. धनंजयनं आवाजाच्या दिशेनं मागं पाहिलं, तर मागचा दुकानदार त्याला दिसला. पुन्हा ती फुलं दोघांनी पोत्यावर भरली अन् रस्त्यावर नेऊन ओतली. तोच एक मोठा ट्रक भरकन् फुलं तुडवीत निघून गेला. त्याच्या जाण्यानं रगडलेल्या फुलांच्या पाकळ्या हवेत उडाल्या.. त्यांना पाहताना धनंजयला जणू आपल्या स्वप्नांचा चुराडा झाल्यासारखं वाटलं. वाहनामागं वाहनं फुलं तुडवत होती. धनंजय हताश होऊन फक्त पाहत राहिला. त्याची दुरवस्था लक्षात आल्यानं गणपतनं त्याला बळंबळं बाहेर तेथून काढलं.

खिन्न मनानं धनंजय सायकल हाकत होता. गणपतनं त्याची खूप समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण तो एक चकार शब्दही बोलला नाही. नेहमी अवघ्या काही मिनिटांत येणारं गाव त्याला कोस-मैल वाटत होतं. तो शरीरानं थकला होता अन् मनानंही. घर येताच गणपतनं त्याच्याकडचं पोतं धनंजयकडं दिलं व तो चालता झाला. सायकल न आदळता धनंजयनं पोतं काढलं. घरात आला तर रामनाथं डोक्याला हात लावून बसले होते. दोघं निःशब्द झाले. धनंजयनं खिशातील दोनशे ऐंशी रुपये

रामनाथसमोर ठेवले. त्यांनीही कोपरीतून अकरा पोत्यांचे हमाली वजा जाता एक हजार दहा रुपये त्याच पैशावर टेकविले. दोघंही काहीच बोलेनात. धनंजयनं तडक हिशेबाची वही काढली. खर्च होता एकूण साडेपाच हजार. त्यापुढं त्यानं उत्पन्नाच्या रकान्यात बाराशे नव्वद रुपये लिहिले.

तोच त्याच्यासमोर येत रामनाथ म्हणाला, ''धनू बाळा, म्या पुन्हा चुकलं रं. मला माफ कर.'' म्हणत त्यांनी धरतीवर गुडघे टेकविले. तोच त्यांना उठवून बसवत धनंजय म्हणाला, ''दादा, तुझी चूक नायरं.. म्याच तुझं दुःख समजलो नाय कधी. पर आज या 'झेंडूच्या फुला'नं तुझं दुःख काय ते कळलं रं. म्या फकस्त पैक्याचा विचार केला; तुझ्या मनाचा नाय. कष्टाची माती झाल्यावर काय बितती ते आज कळलंय. उलट दादा, तूच मला माफ कर-'' म्हणत धनंजयच्या गालावरील अश्रूचा थेंब हिशेबाच्या पानावर पडला अन् खर्चाचा आकडा त्याच्या अश्रूत भिजून पुसट झाला.



# सूर पारंब्या

टाळ्या फडकल्या..तसा पोरांनी निकिताच्या नावाने कल्ला केला. निकितावर राज्य आलं म्हणून आनंद झालेल्या रुची, पंकजने घाईघाईने वडाखाली रिंगण आखलं. तोच सूर फेकण्यावरून रॉकी व देविका वाद घालू लागले. ते पाहून ओजस्वीने सूर हातात घेताच त्यांचे भांडण मिटले. ओजस्वीने सूर फेकण्यास हात उंचावला, पण सूर फेकलाच नाही.त्यामुळे इतका वेळ राज्यं येऊन साऱ्यांनी चिडवून शांत असलेली निकिता 'नो चीटिंग मोअर' म्हणत ओरडली. त्यावर ओजस्वीने हलकेसे स्मित करीत कॉलनीतील रस्त्याच्या दिशेने सूर भिरकावला, तशा सूरपारंब्या सुरू झाल्या.

पंचवीस फुटांवर फरफटत गेलेला सूर घेऊन निकिताला वडाखाली येईपर्यंत पोरांनी अख्खा वड व्यापला. निकिताने खालून वर मान करीत कोण कोठे चढले याचा अंदाज घेतला. तिला पाहून माकडचाळे करणाऱ्या पंकजचाच पाठलाग तिने सुरू केला. तशी पंकजने दुसऱ्या पारंबीवर उडी मारली. त्याचा नाद सोडत निकिताने रुचीवर झडप घातली. पण ती तर पंकजपेक्षाही चपळ. रुची तिच्या हाती सापडेना. साऱ्या वडावर चढून निकिताने दम घेण्यासाठी खोडालगतच्या फांदीवर थबकली. तोच समोरच्या पारंबीला लटकलेल्या ओजस्वीने तिला मागे बघ म्हणून खुणावले. तिने मागे पाहिले तर तिची खोडी काढण्याच्या तयारीत असलेल्या पंकजला मागे वळेपर्यंत तिने पकडला. सूर घेण्यासाठी जागीच खाली उडी घेत निकिता सूर उचलणार तोच रुचीनेही सुरावर झडप घातली. झालं! दोघींत वाद पेटला. दोघी एकमेकींना 'खोटारडी, तू खोटारडी' म्हणून

चिडवू लागल्या. दोघींच्या भांडणाची गंमत पाहण्यासाठी पंकज, देविका यांनी खाली उड्या मारल्या. दोघी माघार घेईना म्हणून इतका वेळ वडाच्या फांदीवर भांडण मिटण्याची वाट पाहणाऱ्या ओजस्वीनेही खाली उडी मारीत सूर हातात घेतला. 'रुची-निकिता बस की' ओजस्वी म्हणाली. पण तरी दोघी ऐकेनात. तोच पंकज ओजस्वीकडे पाहत म्हणाला, ''आता या माकडानं खेळाचा मूडच खराब केला.'' त्याचं वाक्य कानी पडताच निकिताने रुचीला सोडून ती ''ए पंक्या, मी माकड काय?'' म्हणताच पंकजने वडाखालून पळ काढला. 'ए डरपोक..मुलगा असून पळतोस काय? म्हणत ती त्याच्या मागे पळाली. खेळ मोडला. बच्चे कंपनीही तिच्या मागे धावली. त्यांचं भांडण सोडविण्यासाठी नव्हे, तर एंटरटेन करण्यासाठी.

कॉलनीतील तीन क्वार्टर ओलांडून पुढे पळणारा पंकज, रॉयच्या बंगल्यासमोर एकदम थबकला. निकिता घायाळ वाघीण बनून त्याच्यावर हल्ला करणार तोच त्याने तिला तोंडाने 'शूऽऽशूऽऽ' म्हणत शांत केले. तिच्या मागे आलेली बच्चे कंपनीही सावध झाली. काय झालं? या सर्वांच्या प्रश्नांकित मुद्रेला उत्तर देत पंकज म्हणाला, ''रामू काका एकटा दिसतोय...''

''मग काय!'' ओजस्वी म्हणाली.

''अरे, पेरूवर ताव मारू!'' पंकज म्हणाला. तशी पोरं खूश झाली. पेरूचोर मोहिमेचा कॅप्टन बनलेल्या पंकजमागे सारी बच्चे कंपनी चोर पावलाने चालू लागली. पंकजवर हात साफ करण्यासाठी आसुसलेली निकिताही नाकडोळे मुरडत त्यांच्यात सहभागी झाली. बंगल्याचा वॉचमन रामूकाका गेटवरच्या स्टुलावर नसल्याचे पाहून पंकज गेटलगतच्या भिंतीजवळ गेला. तो खाली वाकून घोडा बनला. रुची त्याच्या पाठीवर चढून भिंतीवर गेली. पेरूच्या फांद्या धरू लागली. तिच्या हातात एक फांदी लागली. तिने त्या फांदीचे पेरू तोडून खाली फेकले. तोच ते गोळा करण्यासाठी पोरांनी एकच कल्ला केला. तो आवाज ऐकून आत गेलेला रामूकाका बाहेर आला.

त्याला पाहताच ओजस्वी 'रामूकाका आलाऽऽ पळाऽऽ पळाऽऽ '

म्हणेपर्यंत तो भिंतीखाली आला. तोपर्यंत बाकीची पोरं केव्हाच परागंदा झाली होती. रुचीवर रागवत तो जमिनीवरच काठी आपटू लागला. त्याला पाहून रुची घाबरली. पण ओजस्वीने ''काका, सॉरी ना!'' पुन्हा नाही तोडणार ती पेरू'' म्हणत तिला उडी मार म्हणून खुणावलं. रुचीने घाबरत उडी मारली, तशी दोघींनी धूम ठोकली. दोघी पुन्हा वडाखाली आल्या.

ओजस्वीला सुराची आठवण झाली. सूर कोठे पडला असेल.. आठवता आठवता तिच्या लक्षात आले. रॉय यांच्या बंगल्यासमोरच आपण गडबडीत सूर टाकून आलो. ओजस्वी पुन्हा सूर आणण्यासाठी रॉय यांच्या बंगल्याकडे निघाली. पण रुची येईना. ''रा...रामू काका... सोडील का?'' रुची म्हणताच ओजस्वी म्हणाली, ''मी आहे ना?'' तिच्या आधाराने रुची ओजस्वीबरोबर निघाली. पुन्हा दोघी चोरपावलाने रॉय यांच्या बंगल्याजवळ आल्या. पाहतात तर काय! सूर रामूकाकाच्या हातात. ते पाहून रुची तर केव्हाच मागे फिरली.पण ओजस्वीने तिला मागे ओढले. रामूकाकाजवळ नेलं. मिशा कुरवाळत रामूकाका त्यांच्यावर ''पुन्हा कशाला आल्या?'' म्हणून गरजला. तोच ओजस्वीने ''रामूकाका, पोरं पुन्हा पेरू चोरायला चढली'' म्हणून कोल्हेकुई केली. रामूकाकानं झटकन हातातला सूर खाली टाकला अन् काठी उचलली. तोच ओजस्वीने तो उचलला..रुचीला ओढत पळ काढला.

सूर वडाच्या खोडात ठेवून दोघी घरी परतल्या. समता कॉलनीतील महाकाय वड म्हणजे जणू काही कॉलनीची शान अन् बच्चे कंपनीची जानच. अहमदनगरमध्ये समता कॉलनी कोठे आहे, असे कोणी विचारले की, सावेडीतून पुढे गेलं की मोट्ठा वड आला की तीच समता कॉलनी, हे पत्ता सांगणाऱ्याचं वर्णन ठरलेलं. कॉलनीच्या मधोमध वीस-तीस फांद्यांनी, शेकडो पारंब्यांनी विस्तारलेला हा महाकाय वृक्ष म्हणजे कॉलनीकरांच्या सुख-दुःखाचा मूक साक्षीदारच. कॉलनीतील बायका वर्षातून एकदाच वटपौर्णिमेला वडाची पूजा करीत. पण बच्चेकंपनी मात्र दररोज सूरपारंब्या खेळण्यासाठी वडावर चढताना, पारंब्यांवर

लटकताना त्याच्या पाया पडत. 'तुझ्या अंगाखांद्यावर खेळतो बाबा, सांभाळून घे', ही त्यामागची श्रद्धा.

हातापायावर मातीचा थर, विस्कटलेले केस, धुळीने मळालेला फ्रॉक अशा अवतारात घरी आलेल्या ओजस्वीला पाहून तिच्या आईने म्हणजे देवयानीने तिच्यावर ओरडण्यापेक्षा उलट तिचं हसत स्वागत केलं. खेळण्या-बागडण्याच्या वयात अंगाला माती लागू न देता मुलं खेळाचा आनंद घेणार कशी? अंगाला माती न लागू देता मुलं खेळली तर ती मुलं कसली, हीच देवयानीची धारणा. ती तिच्या उच्च शिक्षणाने असेल किंवा विचारानं. संगणकशास्त्राची पदवी घेऊन त्याच क्षेत्रातील अतुलशी विवाहबद्ध झाल्यावरही तिने गृहिणी होणेच पसंत केले. अतुलही तिच्याच विचारधारेचा. दोघांचे सूर म्हणूनच जुळले. त्यांच्या संसाररूपी वेलीवर फुललेल्या ओजस्वी नावाच्या फुलाला ते खूपच मुक्तछंदी जीवन फुलवत होते.

नकट्या नाकाची, कुरळ्या केसांची, काटकुळी ओजस्वी तिच्या गोंडस सौंदर्यापेक्षा तिच्या 'दादा' बोलण्याने सर्वांना आवडायची. कॉलनीत ती बोलण्याच्या तर शाळेत हुशारीच्या जोरावर कॅप्टन झाली. अवघी चौथीमध्ये असलेली ओजस्वी संगणकाचे ज्ञान जणू आईच्या पोटात शिकली होती. तिची कोवळी बोटे संगणकाच्या की-बोर्डवर फिरू लागली की, नवीन पाहणारा तोंडात बोट घातल्याशिवाय राहत नसे. माता-पित्याप्रमाणेच तिचंही संगणक अभियंता होण्याचं स्वप्न. तिच्या स्वप्नपूर्तीसाठीच अतुल-देवयानीने तिच्या रूममध्ये संगणक ठेवला होता. संगणकावर गेम खेळत खेळत ती झोपी जाई. तिच्या बेडरूमच्या खिडकीतून सकाळच्या कोवळ्या उन्हात 'ते' वडाचे झाड आणखी मोहक दिसे. आपल्या शेकडो फांद्यांच्या कवेत अनेक पशु-पक्ष्यांना निवारा देणाऱ्या वडाच्या झाडावरील पक्ष्यांच्या चिवचिवाटानेच दररोज ओजस्वी उठत असे. पोटापाण्यासाठी अन्नाच्या शोधात, पिल्लांना घरट्यात केवळ वडाच्या आधारावर सोडून जाण्यासाठी पक्ष्यांची चाललेली लगबग... तो वटवृक्ष शांतीनं पाखरांना 'तुम्ही निश्चिंत जा' म्हणून देत असलेलं अबोल आश्वासन... हे दृश्य

ओजस्वीला नित्याचे. तरी ते खिडकीच्या गजावर हनुवटी टेकवून पाहिल्याशिवाय तिच्या दिवसाची सुरुवात होत नसे.

आजही ती तशीच उभी होती. तोच देवयानीने तिला उठविण्यासाठी आवाज दिला. रूमच्या बाहेर येताच अतुलने तिच्या हातावर ब्रश टेकविला. तोही तिच्या बरोबर ब्रश करू लागला. देवयानी टिफीन बनविण्यात गुंतल्याने अतुलने तिला अंघोळ घातली. तिचे केस विंचरले. भांग पाडला. गंध, पावडर केले. देवयानीपेक्षा अतुलने पाडलेला भांगच तिला खूप आवडायचा.

देवयानीने वाढलेला ब्रेकफास्ट अर्धाच खात तिने तोंडाला दुधाचा ग्लास लावला. तोच स्कूल बसचा हॉर्न ऐकून तिने बॅग पाठीवर अडकवीत 'मम्मा-पप्पा बाय' म्हणत दारातून बाहेर पाऊल ठेवले. पण काही तरी विसरल्याचं तिच्या लक्षात आलं. तिच्यामागे देवयानी उभी होती. नाश्ता पूर्ण केला नाही म्हणून तिला रागविण्याच्या मूडमध्ये असतानाही ओजस्वीच्या क्यूट हास्याने ती राग विसरली. तिला कडेवर घेत तिचा मुका घेण्याआधी तिनेच देवयानीचा घेतला. आता मम्मला मुका दिल्यावर पप्पाला ती सोडणार नव्हती. देवयानीने तिला बसपर्यंत सोडल्यावर खिडकीच्या कडेला तिच्या नेहमीच्या जागेवर बसून तिने देवयानीला 'टाटा' केला. कॉलनीतील तिचे सारेच बालसवंगडी मिशनरीच्या इंग्लिश मीडियममध्ये शिकत होते. निकिता, रुची आणि ती तर क्लासमेटच. फक्त पंकज त्यांच्यापेक्षा वरच्या तर रॉकी, देवकी खालच्या वर्गात होते.

सिग्नल, ट्रॅफिक, हॉर्नचा गोंगाट यातून पाच कि.मी.चा प्रवास करीत बस स्कूलच्या मैदानात पार्क होताच जो तो आपापल्या क्लासमध्ये गेला. ओजस्वी, निकिता, रुचीसह क्लासमध्ये बसली. तोच गोखले मॅडम आल्या. त्या मराठी शिकवत असल्याने त्यांच्या मराठी प्रेमामुळे मुलांनी इंग्लिश मीडियममध्ये असूनही त्यांच्या तासाला सुप्रभात म्हणायचं, हा नियम. मुलांनी तो पाळत त्यांना सुप्रभात म्हटलं. मॅडमने क्लास सुरू होताच आज निबंध स्पर्धा घेणार असल्याचे जाहीर करून मुलांची एकच गाळण उडवून दिली.

स्पर्धा सुरू झाली, पण काही विद्यार्थ्यांना विषय सुचेना म्हणून गोखले मॅडमने 'माझी आई', 'माझा आवडता खेळ', 'माझा देश' असे काही विषय सुचविले. तो धागा पकडत इतर विद्यार्थ्यांबरोबर ओजस्वीनेही निबंध लिहायला सुरुवात केली. पण मॅडमने सुचविलेला तिचा विषय नव्हता, तर 'माझं आवडतं झाड' यावर ती निबंध लिहू लागली. अर्थातच ते झाड तिच्या कॉलनीतील वडाचं होतं. लहान वयात त्या वडाला रोज पाहिल्याने त्याच्यावर सूरपारंब्या खेळल्याने, तिला कळत-नकळत त्या झाडाविषयी आपुलकी वाटू लागली. तीच ती निबंधातून मांडत होती.

स्पर्धा संपली. लंच ब्रेक झाला. सर्व क्लास झाले. शाळा सुटली. पुन्हा आपल्या खिडकीलगतच्या सीटवर बसून ओजस्वी स्कूलबसने घरी जाऊ लागली. खिडकीतून येणाऱ्या गार वाऱ्याने तिला डुलकी लागली. पोरांचा गोंगाट, ट्रॅफिकचा आवाजही तिची डुलकी मोडू शकला नाही. एकदा बस थांबताच अमोलच्या रडण्याच्या आवाजाने तिची डुलकी मोडली. बसच्या डोअरमध्येच अमोलचे आई-वडील त्याला घेण्यावरून भांडत होते. त्यांच्यातील ओढाताणीत बिचारा अमोल मात्र रडत होता. सुरुवातीला हे दोघे का भांडतायत, हे ओजस्वीलाही इतर मुलांप्रमाणे कळेना! पण त्यांच्या बोलण्यातील कोर्ट, घटस्फोट हे शब्द ऐकून तिला काहीशी लिंक लागली. त्या दोघांतील भांडण काही मिटेना ! रागाने तप्त अमोलच्या वडिलांनी त्याच्या आईच्या गालावर वळ उठवीत तेथून काढता पाय घेतला. मार खाऊनही अमोल मिळाला म्हणून तिने त्याला कवटाळत त्याचे अश्रू पुसले. भांडण पाहण्यासाठी पुढे आलेल्या मुलांना मागे पळवीत ड्रायव्हरने बस सुरू केली.

ओजस्वीने सीटवर डोके टेकविले. पण तिला झोप लागली नाही. पुढच्या दहा मिनिटांत बस समता कॉलनीत आली. वडाखाली बस थांबताच आपापल्या बालगोपाळांची वाट पाहत असलेल्या मातांनी त्यांना उतरवून घेतले. ओजस्वीला नेण्यासाठी देवयानी आलीच होती. घरी आल्यावर हातपाय धुऊन युनिफॉर्म काढत ओजस्वीने फ्रॉक चढविला. बॅगमधील बुक्स काढून रॅकमध्ये ठेवली. देवयानीचा आवाज

ऐकून ती किचनमध्ये आली. नित्याप्रमाणे देवयानीने तिला काय काय शिकविले ते विचारलं.

मग काय विचारता, निबंधात लिहिलेल्या वडाचं वर्णन, त्याचं रूप, त्याचा उपयोग सांगता-सांगता गुमसुम ओजस्वी रमून गेली. ते ऐकता-ऐकता बनविलेला ज्यूस देवयानीने तिच्यासमोर करताच तिचा मूड पुन्हा ऑफ झाला. तो का झाला याची जाणीव तिलाही तेव्हाच पहिल्यांदा झाली. मम्मी-पप्पाच्या भांडणात त्या अमोलला आपल्यासारखं प्रेम मिळेल का, हाच तिच्या बालमनाला पडलेला प्रश्न तिची प्रसन्नता हरवून गेला. त्याच मनःस्थितीत तिने ज्यूसचा एक घोट घेतला. पंकज, रुची, निकितासह सारी बच्चे कंपनी ओजस्वीला सूरपारंब्या खेळण्यासाठी बोलाविण्यास आली. परंतु, ओजस्वीने खेळण्यासाठी नकार दिला. 'तू नाहीस तर आम्ही खेळणार नाही,' असा पवित्रा घेत जणू काही बच्चे कंपनीने तिच्या घरात तिच्यासाठी ठिय्याच मांडला.

ओजस्वीच्या नकाराने ती उदास असल्याचे लक्षात येऊन शांत असलेल्या देवयानीला आता ती काही गंभीर विचारात असल्यासारखी वाटली. मुलांना शांत करीत देवयानीने तिला 'एनी प्रोब्लेम बेटा?' म्हणत जवळ घेतले. तिने 'नो मम्मा' म्हणत स्वतःच्या मानसिकतेत बदल केला. ती येत नाही म्हणून निराश होऊन निघालेल्या मुलांना थांबवत ती 'आय ॲम कमिंग' म्हणताच बच्चे कंपनीने एकच कल्ला केला. सारी गँग वडाखाली येताच रॉकीने सूर आणला. रिंगण आखून रुची तयार होती. टाळ्या फडकल्या. राज्य आलं ओजस्वीवर. 'टेक ईट इझी' इतरांनी म्हणत सहानुभूती दाखविण्याआधीच ती म्हणाली.

पंकजने सूर फेकला, तोच त्यामागे ओजस्वीने धाव घेत तो परत आणला. रिंगणात सूर टाकून ती झरझर खोडावरून बुंध्यावर आली. रुची, निकिता, रॉकी, पंकज हे सारे वेगवेगळ्या फांद्यांवर तिच्यापासून पाच-सहा फूट अंतरावर पारंब्या पकडून घेते. देविका मात्र इतरांपेक्षा जरा दूरच होती. ओजस्वीने तिला 'टार्गेट' केले. तीही भारी हुशार! ओजस्वीला येताना पाहताच दुसऱ्या पारंबीला पकडत हलका झोका घेत पुन्हा खोडावर गेली. पोपट झालाऽऽ पोपट झालाऽऽ म्हणत पोरं

ओजस्वीला चिडवू लागली. त्याकडे दुर्लक्ष करीत तिने तीच पारंबी पकडून आपला मोर्चा लगतच्या फांदीवरील निकिताकडे वळविला. ती आलेली पाहताच निकिताने पंकज लटकलेल्या फांदीवर वानरउडी मारली. त्यामुळे एकाच फांदीवर दोघे आल्याने आता शिकार हाती लागणार, या अविर्भावात ती त्या फांदीवरून पुढे येऊ लागली. ते पाहून निकिताने पुन्हा पहिल्या पारंबीचा आधार घेतला. पंकज मात्र आहे तेथेच जणू काही बाद होण्यासाठी थांबला. त्याची काहीतरी धूर्त खेळी असणार, हे ओजस्वीच्या ध्यानात आले. म्हणून ती अत्यंत हळूहळू त्याच्याकडे कूच करीत होती. दोघांत फक्त अवघे तीन फूट अंतर उरले. तरी पंकज हलेना. आता ओजस्वी पंकजला पकडणार, अशा आविर्भावातच सर्व जण त्यांच्याकडे पाहू लागले. ओजस्वीने त्याला पकडण्यासाठी दोन्ही हातांनी झडप घातली, तसा तो जागीच खाली बसला. त्यामुळे बेसावध ओजस्वीचा तोल गेला. ती फांदीवरून निसटली तशी खाली पडली..! उसाची मोळी कोणी जोरात खाली टाकावी तसा आवाज झाला. ओजस्वी २५ फुटांवरून खाली पडली..! वेदनेने विव्हळत 'आई गं..!' म्हणतच तिची शुद्ध हरपली. घाबरलेली बच्चे कंपनी वडावरून खाली उतरली. ''ओजू..ओजू..'' म्हणत तिला हलवीत हाका मारू लागली. पण ती निपचित पडली. कुणालाच काही सुचेना. तेवढ्यात देवयानीला सांगण्यासाठी निकिता पळाली. तशी सारी मुले तिच्या मागे निघाली, फक्त एक सोडून. ती आपल्यामुळेच पडली म्हणून घाबरलेला पंकज मात्र त्याच्याही घरी न जाता दुसरीकडे पळून गेला.

मुलं ओजस्वी पडल्याचा निरोप घेऊन गेली, तसा देवयानीने तिच्या नावाने आकांत करीत वडाकडे धाव घेतली. तो आवाज ऐकून कॉलनीतील सर्वच स्त्री-पुरुषांनी वडाखाली गर्दी केली. ओजस्वीला उचलून देवयानी 'ओजू ओजू' म्हणून तिला गदगदा हलवू लागली. तिचे मुके घेऊ लागली. पण शुद्ध हरपलेली ओजस्वी आईच्या प्रेमाला 'ओ' देईना. मग मात्र हताश झालेल्या देवयानीने जोराचा हंबरडा फोडला. तोपर्यंत सारा प्रकार लक्षात आलेल्या निकिताच्या आईने, विसपुतेबाईंनी झडे हॉस्पिटलची ॲम्ब्युलन्स बोलाविली. इतर बायकांनी

देवयानीला गराडा घातला. तिच्या मांडीवरील ओजूच्या डोक्याला, पाठीला, पायाला काही दुखापत झाली का, ते पाहू लागल्या. प्राणाहून प्यारा पोटचा गोळा असा गार पडल्यावर देवयानीची तर शुद्धीत असूनही शुद्ध हरपली होती. ओजूला काय झाले? आता काय करायचे? हा विचार करायला ती भानावर तर पाहिजे!

ॲम्ब्युलन्स आली. वडाखाली गर्दी बाजूला करीत विसपुतेबाई, नागरे काकूंनी ओजस्वीसह देवयानीला ॲम्ब्युलन्समध्ये चढविले. कोणीतरी जा त्या मायकलेकींबरोबर म्हणण्याआधीच विसपुतेकाका आत चढले. ॲम्ब्युलन्स निघाली. तोच गर्दीतून 'थांबा.. मला येऊ द्या' म्हणत पंकजचे वडील देशमुख पुढे आले. त्यांना ड्रायव्हरने पुढे बोलाविले. ते ड्रायव्हर केबिनमध्ये चढले. ॲम्ब्युलन्सने सायरन वाजवीत, डांबरी रस्त्यावरील मातीचा फुफाटा उधळीत समता कॉलनी सोडली. फुफाट्याची धूळ खाली बसली. वडाखालची गर्दी पांगली. पण बच्चे कंपनी मात्र आशाळभूत नजरेने आमची ओजस्वी कधी येणार म्हणून ॲम्ब्युलन्स गेलेल्या रस्त्याकडे टक लावून पाहत होती.

पांगलेल्या गर्दीतून घरी गेलेल्या विसपुतेकाकूंनी अतुलच्या मोबाईलवर फोन करून झालेल्या दुर्घटनेची सॉफ्ट शब्दांत कल्पना दिली. तत्काळ झडे हॉस्पिटलला जाण्यास सांगितले. ते ऐकून ए.सी.त बसलेला अतुल घामाघूम झाला. स्वतःला सावरत त्याने बॉसला न सांगताच मोटारसायकलला किक मारली. एमआयडीसीतून ट्रॅफिक जाममधून वाट काढीत अवघ्या काही मिनिटांत त्याने झडे हॉस्पिटल गाठले. रिसेप्शन काऊंटरला कातरलेल्या आवाजात त्याने 'ओजस्वी गायकवाड' म्हणताच काऊंटरवरील लेडीजने दुसऱ्या मजल्याकडे बोट दाखवत अतिदक्षता विभागात जाण्यास सांगितले. काहीसा भीत-भीत अतुल सेकंड फ्लोअरचा जिना चढून वर आला. अतिदक्षताबाहेरच उभ्या देवयानीने अतुलला पाहिले अन् तिला रडू अनावर झाले. ''अतुल, ओजूला काय झाले.. बघ ना..!'' म्हणत ती त्याच्या गळ्यात पडून रडू लागली. अतुलने तिला शांत केले. चेअरवर बसविले. ऑपरेशन थिएटरमधून बाहेर आलेल्या नर्सला त्याने 'ओजस्वी कशी

आहे,' विचारताच 'दहा मिनिटांत अतिदक्षता विभागात येईल' असे नर्सने सांगितले. नर्स गेली, पण या दोघांना दहा मिनिटे दहा तासांसारखी वाटू लागली. अतुलच्या मनात तर अनेक शंकांनी काहूर केलं होतं. रडू येत होतं, पण देवयानीसमोर त्याने त्याच्या भावनांचा बांध फुटू दिला नाही.

डॉक्टरांनी ओजस्वीला अतिदक्षता विभागात आणताच दोघांनी डॉक्टरांवर प्रश्नांचा भडिमार सुरू केला. डॉ. झडेंनी ओजस्वीला शारीरिक इजा मोठी झाली नसल्याचे सांगत ती खाली पडताना खूपच घाबरल्याने तिची शुद्ध हरपल्याचे सांगितले. पुढच्या बारा तासांत ती शुद्धीवर येईल, असा आशेचा किरण दाखवीत डॉक्टर केबिनकडे निघून गेले. अतुल, देवयानी ओजस्वीच्या बेडजवळ गेले. शांत पडलेल्या ओजस्वीच्या डोक्यावरून हात फिरवीत अतुलने तिच्या कपाळावर ओठ टेकविले. आता त्याच्याही डोळ्यांत अश्रू तरळले. ते पाहून देवयानीला हुंदका आवरेना. काचेवर नॉकचा आवाज आल्याने अतुलने मागे पाहिले. विसपुतेकाका, देशमुख अतिदक्षता विभागाबाहेर उभे होते. त्यांना पाहताच अतुल बाहेर आला. त्यांचा हात हातात घेऊन देशमुखांनी पंकजच्या वतीने माफी मागितली. त्यावर अतुललाच काय बोलावे, हे कळेना! उलट 'पंकजचा काहीच दोष नाही,' असे म्हणत त्याला सांत्वनाची गरज असताना त्याने देशमुखांचे सांत्वन केले.

पुढचे बारा तास पूर्ण होण्याआधीच ओजस्वीच्या पापण्या हलल्या. तसा अतुल-देवयानीचा चेहरा खुलला. आठ तासांतच ओजस्वी शुद्धीवर आली. समोर मम्मी-पप्पा दिसले. आजूबाजूला स्ट्रेचर, वेगवेगळ्या मशिनरी पाहून आपण हॉस्पिटलमध्ये असल्याचे तिच्या लक्षात आले. ती 'मम्मी' म्हणताच देवयानीने तिला बेडवरच मांडीवर घेत कवटाळले. अतुल दोघींनाही शांत करू लागला. तेवढ्यात डॉक्टर अतिदक्षता विभागात आले. ओजस्वीला तपासून तिला धीर देत त्यांनी सलाईन चालू केले. सलाईनची गती खूप कमी असल्याने दोन तासांत ते निम्मेही झाले नव्हते. तोच ओजस्वीने देवयानीला 'शू' करण्यासाठी खाली उतरायचं म्हणून खुणावलं. देवयानीने नर्सला बोलावून सलाईन

थांबविले. ओजस्वीला आधार देत उठविले. तिने पाय बेडच्या खाली घेतले. उभे राहण्यासाठी उठली, पण तिला उभे राहता येईना. तिला अशक्तपणामुळे उभे राहता येत नसेल,अशी शंका काढत अतुलनेही तिच्या खांद्याला धरले.तरीही तिला पायच उचलता येईना. मग मात्र घाबरलेल्या अतुलने घाईघाईने डॉक्टरांना बोलावले. डॉक्टरांनी वेगवेगळ्या मार्गाने तिला पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्न केले. पण सारे व्यर्थ ठरले. सलाईन थांबवून डॉक्टरांनी तत्काळ पुन्हा तिच्या कमरेच्या खालच्या शरीराचा 'एक्स-रे', 'सिटी स्कॅन' केले. आलेला रिपोर्ट पाहून डॉक्टरही बुचकळ्यात पडले. दोन-तीन तज्ज्ञ डॉक्टरांशी फोनवरून चर्चा केल्यावर त्यांनी अतुल, देवयानीला केबिनमध्ये बोलावले. ओजस्वी वडावरून खाली पडताना कमालीची घाबरली. त्यात पडल्यावर जास्त मार तिच्या तळपायांनाच लागलाय. त्या आघातामुळे तिच्या पायांच्या संवेदना कमी झाल्याने तिला उभे राहून चालणे शक्य होत नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ते ऐकून देवयानी घाबरली अन् डॉक्टरांरच चिडली. पण अतुलने तिला शांत केले. यावर उपाय काय? ती कधी, किती दिवसांत चालू शकते याबाबत डॉक्टरांशी शांत डोक्याने  चर्चा केली. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे तत्काळ पुण्याच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये जाण्याचा निर्णय घेतला.

ओजस्वीचा नवा जन्म ती शुद्धीवर आल्यावर झाला खरा; पण तो आनंद अतुल, देवयानीसाठी खूपच क्षणभंगूर ठरला. डॉक्टरांचे बोलणे ऐकून दोघांच्या डोळ्यांना अंधारी आली. पण तरीही न डगमगता दोघांनी ओजस्वीला पुण्याला हलविले. अंधारातही आशेचा किरण पुन्हा शोधण्यासाठी.

सह्याद्री हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची एक टीमच ओजस्वीवर उपचारासाठी खपू लागली. पाचाचे दहा दिवस झाले, पण अतुल-देवयानी ज्या आशेच्या किरणासाठी डोळे लावून बसले होते, तो काही दिसेना. बिलाचा आकडा सहा अंकी झाला. डॉक्टरांनी काही सांगण्याआधीच अतुल त्यांना 'बिलाची काळजी करू नका' म्हणून सांगत होता. पण डॉक्टर मात्र पैसे जाऊनही अतुल-देवयानीची

काळजी दूर करू शकले नाहीत.

अखेर पंचवीस दिवसांनंतर डॉक्टरांनी सांगितलेल्या टॅब्लेट्सच्या ट्रीटमेंटवर समाधान मानत ओजस्वीला घरी नेण्याचा निर्णय झाला. जिच्यासाठी सर्वांची तगमग सुरू होती, ती ओजस्वीही नियतीने ओढावलेल्या लढ्यात हसत-हसत समरस झाली. खेळण्या-बागडण्याच्या वयात व्हीलचेअरवर फिरूनही दुःखाची लकेरही तिने चेहऱ्यावर दिसू दिली नाही. इकडे ओजस्वी वडावरून पडल्यापासून वडाकडे फिरकण्यासही बच्चे कंपनीला कॉलनीकरांनी अघोषित बंदी घातल्याने पोरांच्या 'सूर पारंब्या' विना वडही पोरका झाला होता.

समता कॉलनीत ओजस्वी आली, पण व्हीलचेअरवरून. हा धक्का संपूर्ण कॉलनीपेक्षा बच्चे कंपनीला जरा जास्तच बसला. तिच्या कॉटवर ती आल्यापासून तिला भेटण्यासाठी गर्दी झाली. बच्चे कंपनीने तर तिच्या आवडीचे चॉकलेट, फ्रूट आणले. ओजस्वीने त्याचा आनंदाने स्वीकार केला. सर्व जण तिला 'तू बरी होणार आहेस' असा आधार देत होते. त्यात बच्चे कंपनीही मागे नव्हती. पंकज दिसेना म्हणून तिने निकिताला विचारणा केली, तर त्याच्या वडिलांनी त्यानं तुला पाडलं म्हणून त्याला खूप मारल्याचं सांगितलं. त्यामुळे ओजस्वीला वाईट वाटलं. वड, कॉलनी, शाळेत रमणारी ओजस्वी घरातच व्हीलचेअरवर, कॉम्प्युटरमध्ये रमू लागली. तिला आधाराची गरज असताना उलट 'मी लवकर चालू लागेन' असा तीच मम्मी-पप्पाला आधार देऊ लागली. या तिच्या इवल्याशा आधारावर जणू काही देवयानी अन् अतुल जगत होते.

सह्याद्रीची ट्रीटमेंट सुरू असूनही इतर काही वेगळा उपचार करून ओजस्वीला उभे करता येईल का, यासाठी अतुल-देवयानी नातलग, मित्रपरिवारांशी संपर्कात होते. काही मित्रांनी त्याला आयुर्वेदाचा सल्ला दिला, तर काहींनी निसर्गोपचार केंद्रात नेण्याचा. देवयानीला तर तिच्या काही शिकलेल्या मैत्रिणींनी देवलशी, बाबांचे पत्तेही घरपोच केले. पण अतुलला सांगण्याचे धाडस तिला झाले नाही. मम्मी-पप्पाच्या या घालमेलीची ओजस्वीला माहिती नव्हती असे नाही, पण सर्व काही

माहीत असूनही ती दाखवत नव्हती. वडावरील पक्ष्यांच्या किलबिलीमुळे ती सकाळी उठत होती. उभे राहता येत नसल्याने बेडवर बसूनच ती वडाच्या 'त्या' हालचाली टिपू लागली. ज्या वडावरून तिची आयुष्याची घडी विस्कटली, त्या वडाविषयीचे तिचे आकर्षण यत्किंचितही कमी झाले नव्हते! आपल्या या अवस्थेस वडच कारणीभूत, असा तिचा रोष नव्हता. उलट वडाच्या गर्द सावलीत आपल्यापेक्षा निकिता, पंकज, रॉकी ही सारी बच्चे कंपनी सूरपारंब्यांना मुकल्याचे दुःख जास्त तिला होते.

एका सकाळी ती अशीच बेडवरून पडल्या-पडल्या वडावरील पाखरांच्या लीला पाहत होती. तोच निकिता हाका मारीत तिच्या रूममध्ये आली. निकिताला इतक्या सकाळी पाहून ओजस्वीने काही विचारण्याआधीच तिने आधी माझे कॉंग्रॅट्स स्वीकारण्याचा आग्रह धरला. तो पूर्ण केल्याशिवाय ओजस्वीलाही पुढचे गोड गुपित कळू शकले नसते. तिने ते स्वीकारले. निकिताने दुसऱ्या हातातील बंद पाकीट तिच्यापुढे केले. 'हे काय?' 'खोलून बघ' ओजस्वीने पाकीट उघडले. त्यातील पत्रावरील मजकूर वाचून तिचे डोळे चमकले. काय होते ते गोड गुपित? ओजस्वीने निबंध लेखन स्पर्धेत 'वडा'वर लिहिलेल्या निबंधाला स्कूलमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते.

'मम्मी..पप्पा..मम्मी..पप्पा' म्हणत तिने व्हीलचेअरची चाके पुढे ढकलली. पण दाराच्या उंबऱ्यातून तिला पुढे जाता येईना. निकिता मागून ढकलू लागली, पण चेअर पुढे जाईना. तिचा आवाज ऐकून देवयानी रूमकडे आली. तिने दारात अडकलेली चेअर बाहेर ओढताच ओजस्वीने तिला तिचा 'पापा घे' म्हणून खुणावलं. तिच्या दोन्ही गालांचा पापा घेताच ओजस्वीने तिला निबंध स्पर्धेत पारितोषिक मिळाल्याचे सांगत लेटर दाखविले. ते वाचून मग तर देवयानीने घर डोक्यावर घेत अतुलला दाखविलं. त्यालाही आभाळाएवढा आनंद झाला. ओजस्वीचं कौतुक करता-करताच अतुल गंभीर झाला. ते देवयानीने ओळखले. तिने त्याला किचनमध्ये नेत विचारणा केली. त्याने आधी सांगण्यास टाळाटाळ केली. पण देवयानी त्याला सोडेना.

मग मात्र न राहून अतुल म्हणाला, ''आणखी महिनाभरात ते प्राईज मिळेल. ते स्वीकारायला ओजू व्हीलचेअरवर... मला कल्पना करवत नाही.'' देवयानीने त्याला शांत केले. कारण निकिता किचनकडे येतेय, हे तिच्या आवाजावरून तिने ओळखले. निकिताने आम्हा संपूर्ण ग्रुपला ओजूच्या प्राईजसाठी पार्टीची मागणी केली. 'करू या ना बेटा' म्हणताच आनंदी झालेल्या निकिताने साऱ्या बच्चे कंपनीला पार्टीचं आमंत्रण देण्यासाठी धूम ठोकली.

अतुल ऑफीसला जाण्यासाठी आवरू लागला. देवयानी किचनमध्ये गुंतली. ओजस्वी पुन्हा तिच्या रूममध्ये आली. खिडकीतून वडाकडे पाहत दोन्ही हात हनुवटीखाली टेकवीत ती त्याला 'थँक्स!' म्हणाली. कारण त्याच्या वर्णनामुळे तिला तिच्या जीवनातील पहिले प्राईज मिळाले होते. सायंकाळी सारी बच्चे कंपनी वेळेआधीच ओजस्वीच्या घरी जमली. त्यांच्याबरोबर हळूहळू कॉलनीतील आबालवृद्धही आले. फुगे फुटले! डान्स झाला! ओजस्वीवर गिफ्टचा व कौतुकांचा वर्षावही झाला. पार्टीच्या गर्दीतही ओजस्वीने पंकजला शोधले. पण तो आला नसल्याचे निकिताने सांगितले. पार्टी सुरू असतानाच अतुलच्या मोबाईलवर त्याच्या एका मित्राचा फोन आला. गाण्याच्या आवाजामुळे त्याला स्पष्ट ऐकू येईना. तो बाहेर आला. त्याच्या मित्राने ओजस्वीच्या प्रकृतीची चौकशी करून त्याला पुणतांब्याच्या आशा केंद्रात ॲक्युपंक्चर उपचारासाठी नेण्याचे सांगितले. हा उपचार कसा उपयुक्त आहे, याचे त्याने दिलेले दाखले ऐकून अतुलला पुन्हा आशेचा किरण दिसू लागला. पार्टी संपताच त्याने देवयानीला पुणतांब्याच्या उपचाराबाबत कल्पना दिली. तिलाही ते पटले. आता गरज होती ओजस्वीला मानसिकदृष्ट्या तेथे नेण्यासाठी तयार करण्याची. तेही काम देवयानीने मोठ्या हुशारीने पार पाडले.

अतुल व त्याचा मित्र पुणतांब्याला गेले. आशा केंद्रात जाऊन तेथील उपचार पद्धतीची माहिती घेतली असता, तेथे दहा दिवस राहावे लागत असल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. केंद्रात येणारे पेशंट, त्यांना पडलेला फरक हे सर्व 'आँखो देखा' पाहून अतुलने ओजस्वीला आशा

केंद्रात आणण्याचा इरादा पक्का केला. अहमदनगरला आल्यावर अतुलने ओजस्वीला नेण्यासाठी पुढच्या आठवड्यात रजा टाकली. घरी आल्यावर त्याने जे पाहिले, ते देवयानीला सांगितले. ते ऐकून तिलाही अतुलबरोबर आशेचा किरण दिसू लागला.

पुणतांब्याला जाण्यासाठी ठरलेला दिवस उजाडला. दहा दिवस राहण्यासाठी आवश्यक सामानाची बॅगसह ओजस्वीला घेऊन अतुल देवयानी पुणतांब्याच्या आशा केंद्रात दाखल झाले. डॉक्टरांच्या चेकअपनंतर तिला ॲक्युपंक्चरसाठी नेण्यात आले. तेथे बारीक सिरिंज शरीराला टोचून त्यातून बॅटरीद्वारे करंट सोडला जातो. तो प्रकार ओजस्वीला काहीसा विचित्र वाटला. कमालीची भीतीही वाटली. तिच्या चेहऱ्यावरील भीती टिपायला अतुल-देवयानीला वेळ लागला नाही. त्यांनी तिला 'घाबरू नकोस, आम्ही आहोत' म्हणत धीर दिला. नर्स आल्या. त्यांनी ओजस्वीला झोपायला लावून 'निडल' लावण्यास सुरुवात करताच ओजस्वीचा रडण्याचा मोठा भोंगा सुरू झाला. काही केल्या ती 'निडल' टोचू देईना. मग अतुलने तिला घट्ट पकडून ठेवले. नर्स 'निडल' लावून निघून गेल्या. रडून-रडून दमलेली ओजस्वी तशीच झोपी गेली.

पहिल्या दिवशी भीतीपोटी घाबरलेली ओजस्वी दुसऱ्या दिवसापासून मात्र कणखरपणे नर्सशी गप्पा मारून ॲक्युपंक्चरसाठी सहकार्य करू लागली. पाच दिवस पुणतांब्यात लोटले. कॉलनीत, शहराच्या वातावरणात राहण्याची सवय लागल्याने ओजस्वीच काय अतुल, देवयानीलाही ग्रामीण भागात त्या आशा केंद्रात करमणे कठीण झाले. पण पर्याय नव्हता. सहावा दिवस उजाडला.

अतुल-देवयानीला निम्मा गड सर केल्यासारखं वाटलं. ॲक्युपंक्चरची वेळ अकराची असल्याने दहा वाजताच त्यांनी ओजस्वीचं आवरण्यास सुरुवात केली. अतुलने ओजस्वीला उचलून कडेवर घेतले. तेवढ्यात त्याचा मोबाईल वाजला. त्याने 'हॅलो' केले. पण कुणीच बोलेना. त्याने फोन कट करून पुन्हा खिशात घातला. तसाच तो ॲक्युपंक्चर हॉलकडे चालू लागला. ओजस्वीच्या बेडवर तिला झोपविले. तिला झोपविण्यास वाकला तसा

त्याच्या वरच्या खिशातील मोबाईल तिच्या छातीवर पडला. तो त्याने उचलण्याआधीच 'पप्पा, मी गेम खेळते'म्हणत तिनेच घेतला. नर्स येण्यास १५ मिनिटांचा अवधी होता. त्याला खिडकीतून पेपरवाला मुलगा दिसला. ओजस्वीला 'मी आलोच बेटा' म्हणत तो पेपर आणण्यासाठी गेला. तो जाताच त्याच्या मोबाईलवर कॉल आला. गेम खेळणाऱ्या ओजस्वीने तो रिसिव्ह केला. ती 'हॅलो...हॅलो...' करीत होती, पण कोणीच बोलेना. म्हणून ती फोन कट करणार तोच 'हॅलो, मी पंकज बोलतोय' हे शब्द तिच्या कानी पडले. अचानक पंकजचा फोन कसा आला म्हणून तिने त्याला विचारणा केली. तसेच 'तू वेड्या मला भेटायला का आला नाहीस?' म्हणून रागावली. पण तिच्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे देण्याचे टाळत पंकजने तिला आपला वड कॉलनीतले लोक तासाभरात तोडणार असल्याचे सांगितले. ते ऐकून चिमुकल्या ओजस्वीच्या काळजाचा ठोकाच चुकला. पण का, म्हणण्याआधीच त्याने फोन ठेवला.

वड तोडणार? कोण तोडणार? पण का? कशासाठी? असंख्य प्रश्नांनी तिच्या डोक्यात काहूर केलं. तिने खिडकीबाहेर उभ्या अतुलला 'पप्पा' म्हणत हाक मारली. पेपर वाचण्यात दंग अतुल पेपरची घडी घालीत आत आला. ओजस्वीच्या चेहऱ्यावरील गांभीर्याचे भाव त्याच्या लक्षात येण्याआधीच ओजस्वीने त्याला नगरला चला, मला घरी जायचं, असा आग्रह धरला. ते ऐकून क्षणभर अतुल गांगरुन गेला. ''पण का? तुला अजून बरं वाटत नाही. आपल्याला थांबावं लागेल'' म्हणत तो तिची समजून घालत असतानाच देवयानी आली. अतुलने ओजस्वीचा हट्ट तिला सांगितला. ते ऐकून देवयानीही अचंबित झाली. पण क्षणात स्वतःला सावरत तिने ओजस्वीची समजूत काढण्याचा प्रयत्न सुरू केला. पण सारे व्यर्थ! नर्स ॲक्युपंक्चरसाठी आल्या. ते पाहून तर ओजस्वीने हातपाय आपटायला, ओरडायला सुरुवात केली. तिच्या कॉटभोवती गर्दी गोळा झाली. देवयानीने बळजबरीने तिला झोपविण्याचा प्रयत्न केला. त्या झटापटीत कॉटवर तिचे डोके आदळले. वेदनेने ओजस्वी मोठ्याने ओरडली. तो आवाज ऐकून डॉक्टर आले. त्यांनी तिला नेण्यास सांगितले. तिचे हाल पाहून अतुलने तिला नगरला

नेण्याचा निर्णय घेतला. देवयानीने घाईघाईने बॅगा भरल्या. जायला वाहन भेटेना. मग आशा केंद्राच्या ॲम्ब्युलन्सने तिघे नगरकडे निघाले. ओजस्वीच्या अशा वागण्याने अतुल-देवयानी मोठ्या चिंतेच्या खाईत लोटले जात होते, तर ओजस्वी मात्र वड वाचविण्यासाठी अहमदनगर येण्याची वाट पाहत होती.

दीड तासात ते अहमदनगरमध्ये पोहोचले. समता कॉलनीत ॲम्ब्युलन्स येताच वडाखाली त्यांना मोठी गर्दी दिसली. ॲम्ब्युलन्स त्यांच्या क्वार्टरपुढे थांबताच त्यातील काही गर्दी त्यांच्याकडे आली. ती गर्दी दुसरी तिसरी कोणी नव्हती तर बच्चे कंपनीच होती. ओजस्वीला पाहताच त्यांनी वड तोडण्यासाठी महापालिकेचे लोक आलेत, आपला वड तोडणार असे सांगितले. विसपुतेकाकू, इतर मंडळी दहा दिवस आधीच 'तुम्ही का आले' म्हणून अतुलला विचारणा करू लागल्या. त्यांच्या प्रश्नाचं उत्तर देण्याआधीच ओजस्वीने त्यांच्याकडे वडाखाली मला घेऊन चला, म्हणून आग्रह धरला. न नेल्यास ही धिंगाणा करणार; त्यापेक्षा सामान आत नेणाऱ्या देवयानीला बोलावून तिला व्हीलचेअरवर बसविले.

आपल्या कॅप्टनवर सार्थ विश्वास दाखवत बच्चे कंपनी तिच्या व्हील- चेअरमागे निघाली. ती वडाखाली येताच गर्दीतील कुजबूज वाढली. ती शांत होण्याआधीच ओजस्वीच धीटपणाने म्हणाली, ''कोण तोडायला निघालाय वड आमचा?'' गर्दीतून पुढे येत देशमुखकाकांनी ''तू पडलीस तशी इतर पोरं पडून जखमी होतील, त्यापेक्षा वड न ठेवलेलाच बरा,'' म्हणून तिलाच सुनावले. ''मी चुकून पडले, त्याची शिक्षा साऱ्या मुलांना कशाला? आम्ही वड तोडू देणार नाही.'' हा तिचा पवित्रा पाहून देविकाचे वडील चौधरी तिच्याजवळ येत तिला म्हणाले, ''उगाच इतरांच्या आयुष्याच्या वाटोळ्यास प्रोत्साहन देऊ नकोस! अतुल, समजाव तुझ्या पोरीला.''

आता वातावरण चांगलेच तापले. बघ्यांच्या गर्दीतील इतरही अनेक तोंडे बोलू लागली. ते सर्व ऐकूनही हताश न होता संपूर्ण कॉलनी विरूद्ध ओजस्वी असा लढा उभा ठाकला. ओजस्वीची विनवणी सुरू

असतानाच वड तोडणारे कामगार आले. त्यांनी वडाच्या मोठ्या फांद्यांना दोर बांधण्यास सुरुवात केली. खोड कापण्यासाठी त्यांनी सुरू केलेल्या मशिनचा आवाज ऐकून ओजस्वी पुरती हताश झाली. व्हीलचेअरवर हातपाय आपटत इतका वेळ बघ्यांत सामील अतुलकडे पाहत 'पप्पा.. प्लीज सांगा या लोकांना' म्हणत विनवणी करू लागली. तिचे ते केविलवाणे बोलणे ऐकून अतुलही पाझरला. त्यानही देशमुखांना विनंती केली. पण त्यांनी धुडकावत उलट 'आम्ही परवानगी आणल्याच' म्हणत अतुलसमोर महापालिकेचे पत्र टाकले. ते पाहून अतुलच्याही तोंडातून शब्द फुटेना!

खोड कापण्याचं मशिन त्या कामगारांनी वडाच्या मागच्या बाजूला नेलं. ते पाहून विनवणी करणाऱ्या ओजस्वीने एकच आक्रोश करण्यास सुरुवात केली. निःशब्द झालेल्या त्या वातावरणात तिचा आक्रोश पसरला. त्या कामगारांनी दोर घट्ट ओढले. दोघांनी खोड कापण्यासाठी मशिन उचललं. तसे ओजस्वीच्या हृदयाचे ठोके वाढले. मशिनचे पाते वडाच्या खोडावर घासली तशी त्याच्या सालीचा बारीक भुगा हवेत उडाला.

ते पाहून भेदरलेल्या ओजस्वीने पाऊल व्हीलचेअरच्या खाली टेकविले. सारी ताकद एकवटत उठण्याचा प्रयत्न केला. डोळ्याची पापणी झाकून उघडण्याच्या अवधीत ओजस्वी दोन्ही पायांवर उभी राहिली. ते पाहून गर्दीतील सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. त्या धक्क्यातून सावरण्याच्या आतच ओजस्वीने समोर पंधरा फुटांवर वड कापत असलेल्या लोकांपर्यंत चालत जाऊन त्यांना मागे ओढले. तसे ते थांबले. देवयानी -अतुलला तर त्यांनी जे पाहिले, ते स्वप्नच वाटले! वड तोडणारे कामगारही अचंबित झाले. तोच बच्चे कंपनीसह इतर कॉलनीतील गर्दी ओजस्वीभोवती गोळा झाली. त्या गर्दीत पंकजही होता. त्याने व निकिताने ओजस्वीला उचलून घेतले. 'हिप हिप हुर्ये!' म्हणत पोरं नाचू लागली. ते दृश्य पाहून व इतर अनेकजण चमत्कार झाला, 'ओजू चालू लागली' म्हणू लागल्याने अतुल-देवयानी भानावर आले.

गर्दीच्या गोंगाटात अतुलला मोबाईल वाजल्याचा आवाज आला. त्याने बाजूला जात मोबाईल घेतला तर तिकडून बोलणारी व्यक्ती

म्हणाली, ''अभिनंदन अतुलजी! तुमची मुलगी चालू लागली!'' कोण कोण बोलतं म्हणण्याआधीच तो आवाज डॉ. झडेंचा असल्याचे त्याने ओळखले. ''डॉक्टर, खरंच हो चमत्कार झालाय!'' त्याने सांगताच डॉक्टर म्हणाले, ''हा कसला चमत्कार नाही, ही तर माझ्या आणि कॉलनीकरांच्या प्लॅनची सरशी आहे.''

''म्हणजे मी समजलो नाही?'' अतुलनं बुचकळ्यात पडून विचारलं. त्यावर डॉक्टरांनी त्याला वैद्यकीय क्षेत्रातील ही उपचार पद्धती सांगितली व ती राबविण्यासाठी तुमच्या कॉलनीतील सर्व लोकांनी विशेषतः तुमची मुलगी ज्याच्या मुलामुळे पडली, त्या देशमुखांचे विशेष सहकार्य मिळाल्यानेच हे शक्य झाल्याचे सांगितले.

''डॉक्टर, तुमचे उपकार कसे फेडू? थँक्स डॉक्टर!'' अतुलच्या तोंडून शब्द उमटले. ''अहो, मला कशाला म्हणता? देशमुखांनाच म्हणा ना थँक्यू व्हेरी मच!'' म्हणत डॉक्टरांनी फोन ठेवला. इतका वेळ ज्या कॉलनीकरांकडे अतुल शत्रूच्या नजरेने पाहत होता, त्यांच्या नजरेतील ओजस्वीविषयीचा ममतेचा भाव त्याला आता दिसू लागला. अतुल-देवयानी त्या गर्दीत देशमुखांचा शोध घेऊ लागली, तर ओजस्वी अन् बच्चे कंपनी सूर शोधू लागली.. कशासाठी?.. 'सूर पारंब्या' खेळण्यासाठी..!



# अग्नीपरीक्षा

''तोडीला गेला तर माहा त्वांड पाव्ह नगं!'' धोंडोबाचं बोलणं ऐकूनही त्याकडं दुर्लक्ष करत पत्नी परिगाच्या मदतीने कचरू सामानाची आवराआवर करू लागला. ''चुलत्याला बोलायला काय जातंय! म्हणं तोडीला जावू नगं! बारा महिनं खायाचं काय?'' तो पुटपुटला. वाद नको म्हणून परिगानं त्याला दापलं. कचरू काही ऐकेना. हे पाहून धोंडोबाचा पारा आणखी चढला. त्यानं आसपासचे चुलते-काके गोळा केले. कचरू जाऊ नये म्हणून त्यांना गळ घालण्यास सांगितले. पण कचरूचा तोडीला जाण्याचा निर्धार पक्का होता, हे नातलगांनी ओळखले. त्यांनी उलट धोंडोबाला समज दिल्याने तो रागारागाने मारूतीच्या मंदिराकडे निघून गेला. नातलग पांगले. कचरूने सामानाचे बाचके अंगणात आणून ठेवले. काय विसरले, हे पाहण्यासाठी पुन्हा घरात गेला. सामान तर सर्व घेतले; मग राहिले काय? त्यानं परिगाला आवाज दिला. ''आरं, परिगा, काय बी राहायला नगं.'' कचरू म्हणाला.

''अवं, मेन गोष्ट इसरला की!'' परिगा म्हणाली.

''आरं, तेच तर विचारतोय म्या!'' कचरू तिच्यावर खेकसत म्हणाला

''अवं अरुणाचा तपास कुठंय?'' ती म्हणाली.

तसं काय विसरलं, हे कचरूच्या लक्षात आलं. तसा तो पाटलाच्या वाड्याकडे निघाला. ज्याच्यासाठी सर्व चाललंय, तो त्याचा एकुलता एक मुलगा अरुण वाड्यासमोर विटी-दांडू खेळण्यात रमला होता. कचरू येताच त्यांचा डाव मोडला. अरुण काही येईना. कचरूने त्याला

कवळी मारून खांद्यावर उचलून घेतले. अरुण पाहिजे ते मिळाल्याने खूष झाला. बापाच्या खांद्यावर बसून मिरवायला त्याला खूप आवडायचे. कचरूच्या खांद्यावरून परिगानं त्याला उचलून घेत हातपाय धुवायला नेले. मुकादम ट्रक घेऊन आला. सामानाची बाचकी कचरूने ट्रकमध्ये टाकली. परिगा, अरुणला ड्रायव्हरच्या केबिनमध्ये चढविले. ट्रक थोडा पुढे घेत मुकादमाने आबाच्या उखांड्यालगत थांबविली. रामा, किसना व कचरूला बैल आणण्यासाठी आवाज दिला. तिघेही ज्याचे-त्याचे बैल घेऊन उखांड्यालगत आले. बिचकणाऱ्या बैलांना बळजबरीने ट्रकमध्ये चढवून मुकादमाने फाळके वर केले. रामा, किसन बैलांबरोबर मागेच चढले. धुळीने भरलेले हात झटकत कचरू ड्रायव्हरच्या केबिनमध्ये चढला. पांदीच्या रस्त्याने ट्रक गावातील मारुती मंदिराजवळ आला.

गावाच्या रिवाजाप्रमाणे तोडीला जाणाऱ्या गावकऱ्यांना वाटं लावण्यासाठी सारा गाव मंदिरासमोर जमला होता. मुकादम खाली उतरला. त्या पाठोपाठ कचरूही. सुवासिनीने ट्रकची पूजा केली. गावच्या पाटलाने श्रीफळ वाढविला. कचरूची नजर मात्र गर्दीत धोंडोबाला शोधत होती. तो काही दिसेना. ड्रायव्हरने ट्रक चालू केला. गर्दीकडे पाहतच कचरू केबिनमध्ये चढला. ट्रकने गाव सोडले. कचरू बाहेर डोके काढून धोंडोबाला तरीही शोधतच होता. गर्दी दिसेनाशी व्हायला लागली तोच त्याला मारुतीच्या मंदिराच्या ओट्यासमोर धोंडोबा बसलेला दिसला. कचरूने त्याला आणखी बाहेर डोके काढत हात केला. धोंडोबाने मात्र कुठलाही प्रतिसाद दिला नाही. गाडीने एक टर्न मारला, तसा धोंडोबा कचरूच्या नजरेआड गेला.

केबिनमध्ये पाय हलवायलाही जागा नव्हती. गाव सोडल्याने इतर आयाबायांचे चेहरे काळवंडले होते. त्यात कचरूचा जरा जास्तच. त्याच्या वडिलांच्या निधनानंतर चुलत्यानेच त्याचा सांभाळ केला होता. आज तो चुलत्याची मर्जी मोडून तोडीला चालला होता. परिगाने त्याची अवस्था ओळखली होती. तिची व त्याची नजरेला नजर होताच तिने त्याला डोळ्याने खुणावत आधार दिला. आता ट्रक हायवेला लागला

होता.पुढच्या तीन तासात ट्रक अहमदनगरमध्ये आला. वाहनांच्या व माणसांच्या गर्दीतून वाट काढत नगरबाहेर येताच एका साध्या हॉटेलवर ट्रक थांबविला.

रामा, किसना, त्यांच्या बायका-पोरं खाली उतरली. परिगा मात्र अरुणला घेऊन ट्रकमध्येच बसून राहिली. कचरूने हॉटेलमधून बाट्ली भरून पाणी आणले. परिगाच्या मांडीवर झोपलेल्या अरुणला उठवत त्याने भाकरीचे पेंडके सोडले. पहिला घास अरुणला भरविला. दुसरा घास तो खाणार तोच मुकादमाने आवाज दिला-

''कचरू, खाली ये की रं!''

''आमी येथंच खातोया, तुम्ही खावा.'' भाकर चावत कचरू म्हणाला.

''आरं, पैकं न्हाय तर मी देतो!'' मुकादम म्हणाला.

''नगं नगं, तुम्ही जावा'' कचरू म्हणाला.

मुकादम आग्रह का करतो, हे कचरूला माहीत होते. स्वार्थासाठी उगाच त्याचे उपकार करून घेण्यापेक्षा त्याने व परिगाने चटणी-भाकरीच गोड मानून खाल्ली. गाडी पुढच्या प्रवासाला निघाली. केबिनमध्ये येणाऱ्या गार वाऱ्याने व त्यात पोटात दोन घास गेल्याने केबिनमधील बहुतेकांना झोपेची तंद्री चढली.

कचरूला मात्र धोंडोबाची आठवण सतावू लागली. वडिलोपार्जित जमीन कस अन् इथेच राहा, हे धोंडोबाचे म्हणणे कचरूला पटत नव्हते. गाव सोडून तोडीला गेल्याने चार पैसे गाठीशी लागतील. भलं पुढचे सहा महिने गावात काम नाही मिळालं, शेतात काही पिकलं बी नाही तरी तोडीच्या पैशातून दोन वेळचं खायला तर मिळेल; हा त्याचा तोडीला जाण्यामागचा मुख्य उद्देश होता. धोंडोबा आला असता तर त्याची काळजी लागली नसती. ड्रायव्हरने जोरात ब्रेक दाबताच झोपलेला मुकादम कचरूच्या अंगावर आल्याने कचरूचे विचारचक्र खंडित झाले.

ड्रायव्हरने सर्वांना उठविले. गाडी कारखान्याच्या जनरल ऑफिसलगत आली होती. कचरू, मुकादम खाली उतरले.

ड्रायव्हरपाठोपाठ जनरल ऑफिसमध्ये गेले. तेथील साहेबांनी त्यांना कारखान्याच्या पाठीमागे मोकळ्या जागेत नेण्यास सांगितले.

गाडी कारखान्याच्या अधिकाऱ्याने सांगितलेल्या जागेत आली. रामा-किसनाने पाठीमागील सामान ज्याचे-त्याचे खाली उतरवून दिले. आया-बाया पोरं सांभाळीत सामान ठेवू लागल्या. परिगानेही सामानाची दोन बाचकी मोकळ्या पटांगणात टेकविली. त्यावर अरुणला बसवून कचरूने काढून दिलेल्या शेवऱ्या आणल्या. बैलं खाली घेण्यासाठी ट्रक नजीकच्या टेकडीलगत गेला. कचरूने बैलांना खाली घेत बिऱ्हाडाजवळ आणले. शेवरीच्या खुट्ट्या करून ठोकल्या. परिगाने शेवऱ्या उभ्या करीत कोपीचा साचा तयार केला. सूर्य समोरच्या डोंगराला टेकायला लागला होता. मुकादमाला आवाज देत तिने 'पाण्याचं काय?' विचारले. त्यावर मुकादमाने पलीकडच्या एका बागायतदाराच्या विहिरीकडे बोट दाखवले. इतर बायकांबरोबर काटवणातून वाट काढीत तिने दोन हांडे पाणी आणले. कचरूने तीन दगडं मांडली. बाचक्यातून किराण्याची पिशवी बाहेर काढत परिगाने शेवऱ्या मोडून चूल पेटविली. तिच्या पाठोपाठ इतर बायकांनीही चुली पेटविल्या.

कोपीला लावण्यासाठी चटई आणण्यासाठी गेलेला मुकादम झावळ-वावळ पडण्याच्या वेळी आला. चटई आज मिळणार नाही, उद्या मिळेल, असे सांगून तो पसार झाला. ते ऐकून कचरूने बाचक्याचा बारदाना कोपीच्या सांगाड्यावर बांधला. बैलांना कडब्याची एक पेंढी सोडून टाकली. अंधार चांगलाच पडला होता. चिमणीच्या उजेडात परिगाने भाजीला फोडणी दिली. अरुणला मांडीवर घेऊन कचरू चुलीलगत बसला. तेवढ्यात रामूच्या बायकोच्या ओरडण्याचा आवाज आला. सगळे आवाजाच्या दिशेने पळाले. काय झाले, हे विचारायच्या आत दुसरा दगड आला. मग मात्र अंधारात कोणीतरी कोप्यांवर दगडफेक करतंय, हे सर्वांच्याच लक्षात आलं. एकच पळापळ सुरू झाली. जो तो लपायला आसरा पाहू लागला. कचरूने परिगा व अरुणला कच्च्या उभ्या केलेल्या कोपीत लपविले. दगडांचा मारा थांबला. रामा,

किसना सारे बाहेर आले.

कोण दगडफेक करतोय याबाबत त्यांची चर्चा सुरू असतानाच एक मोटारसायकल कोप्यांच्या दिशेने येताना दिसली. काही सेकंदांत टोळक्यालगत येऊन थांबली. तिच्या लख्ख प्रकाशाने साऱ्यांचे डोळे दिपले. मोटारसायकलवरून उतरलेल्या दोघा इसमांनी त्यांना शिवीगाळ सुरू केली. ते ऐकून पोरांना घेऊन आया-बाया कोपीत लपल्या. त्यांची शिवीगाळ थांबताच कचरूने आम्हा गरिबाचं काय चुकलं मालक, म्हणून विचारले.

ते ऐकून दोघांतील एकजण कचरूची गचंडी पकडत म्हणाला, ''कोणाला विचारून कोप्या उभारल्या? तुमच्या बापाची जागा आहे का? त्याचे बोलणे सुरू असतानाच कचरूला सोडविण्यासाठी मध्ये आलेल्या परिगाला दुसऱ्या इसमानं हिसका देऊन लांब लोटले. तशी ती चुलीलगत जाऊन पडली. तिच्या धक्क्याने चुलीवरील भाजीचे पातेले कलंडले. ते पाहून अरुण गयावया करू लागला. रामा, किसना पुढे येत त्या इसमांना म्हणाले, ''रात्रभर राहू द्या , मालक सकाळी दिस उजाडताच जाऊ.''

''नाही गेले तर तंगडं जागेवर ठेवणार नाही,'' असा दम देऊन ते दोन इसम मोटारसायकलवरून आले त्या दिशेने गेले.

ते जाताच कचरूने परिगाला उठवत सांडलेल्या कालवणाचे पातेले सरळ केले. झालेल्या प्रकाराने सारेच तोडीवाले घाबरले. मुकादमाच्या कानावर घालण्यासाठी रामा, किसना कारखान्याच्या गेटकडे निघाले. त्यांना थांबवत कचरूही निघाला. निघताना भाकरी बरोबर खायला आणतो, त्याने परिगाला सांगितले. तिघे कारखान्याच्या गेटवर पायी गेले. वॉचमनला झालेल्या प्रकाराची माहिती दिली. त्याने पेताड गुंड असतील, ते काही करणार नाहीत, म्हणून सांगितले. अर्धा तास गेटवर वाट पाहूनही मुकादम काही दिसेना ! मग मात्र वैतागलेल्या कचरूने 'इथं हातभट्टी अड्डा कुठंय? तो मुकादम तेथच ढोसायला गेला असंल,' असा अंदाज व्यक्त केला. वॉचमनने समोरच्या गल्लीतून पाठीमागे गेल्यावर हातभट्टी असल्याचे सांगताच त्या दिशेने तिघे निघाले.

अंधारात खड्डे, गटारी तुडवीत हातभट्टीवर पोहोचले. कचरूचा अंदाज खरा ठरला. मुकादम भुईवर बसून पुडीतील फुटाणे सोडून तांब्याने सरमडी पीत होता. या तिघांना पाहताच त्यांनाही पिण्यासाठी आग्रह करू लागला. सुरुवातीला तिघांनी नको-नको म्हणत झालेला प्रकार मुकादमाच्या कानावर घातला. ते ऐकून मुकादम दारूच्या नशेत काय बोलत होता, हे त्याचे त्यालाच कळत नव्हते. ते ऐकून कचरू उठला. पण रामा व किसनाने तेथेच मुकादमाच्या वाढत्या आग्रहाने सरमडीचा तांब्या तोंडाला लावला. ते पाहून कचरू तडक निघाला. पेठेत आला. दुकाने सामसूम झाली होती. एका हॉटेलात त्याने भजे विचारले. मालकाने वडा शिल्लक असल्याचे सांगताच त्याने तीन वडे बांधून घेतले.

त्याची वाट पाहत बसलेल्या परिगाच्या मांडीवर अरुण झोपी गेला होता. कचरू येताच तिने त्याला उठविले. झोप मोडल्याने तो रडू लागला. परंतु, कचरूने त्याला जागे करीत वड्याबरोबर भाकरी खाऊ घातली. परिगाने व त्यानेही खाल्ली. झोपण्यासाठी परिगाने गोधडी अंथरली. झोपणार तोच रामाची बायको माहा नवरा कुठंय विचारायला आली. कचरूने तो मुकादमाबरोबर 'तीर्थ' घेत बसल्याचे सांगताच ती त्याला शिव्या देत निघून गेली. ती जाताच तिघेही झोपले.

तासाभराने रामा व किसना आले. रागाने लाल झालेल्या रामाच्या बायकोने शिव्यांच्या गजरात त्याचे स्वागत केले. दारूच्या नशेत रामाने उलट तिलाच शेवरीखाली झोडपून काढले. तिच्या विव्हळण्याने कचरू, परिगाची झोप मोडली. कचरूला वाटले, मध्ये पडावं; पण पेताडाचं काय खरं, या विचाराने तो तसाच पडून राहिला. रामाचं मारणं काही थांबेना. शेवटी परिगाला रहावलं नाही. तिने कचरूला पाठवलंच. कचरूला पाहताच रामा त्याच्या बायकोला सोडून कचरूच्या गळ्यात पडून रडू लागला. कचरूने त्याला त्याच्या कोपीलगत नेत झोपविले. पुन्हा कोपीत येऊन झोपला. पण त्याला झोप लागेना. रात्री झालेली दगडफेक, दमबाजीचा प्रकार दररोज होऊ लागला तर काय करायचं? शेवटी तोड सोडून जायची वेळ आली तर

चुलत्याचे शब्द खरे होणार. त्याची काळजी वाढली. त्या काळजीत दिवस कधी उजाडला, हे कळलेच नाही.

सकाळी प्रातर्विधी आवरून चहा न घेता तसाच तो कारखान्याच्या जनरल ऑफिसला गेला. वॉचमनला सांगितले. त्याने रात्री ज्या साहेबानं कारखान्यामागे जायला सांगितले होते, त्या साहेबाचीच केबिन दाखविली. तासाभराने साहेब येतील म्हणून सांगितले. मागे जाण्यापेक्षा तासभर कचरू दारालगत पायरीजवळ बसला. बरोबर तासाभराने साहेब आले. कचरूने न घाबरता त्यांच्या केबिनमध्ये जात घडलेला प्रकार सांगितला. ते ऐकून साहेबाने बेल मारून हाताखालच्या कर्मचाऱ्यांना बोलावून या तोडीवाल्यांचा अड्डा चांगल्या ठिकाणी हलविण्याचे सांगितले. साहेबाला धन्यवाद देत कचरू कोप्या उभारलेल्या ठिकाणावर आला.

परिगाला त्याने पुन्हा सामानाची आवराआवर करण्यास सांगितले. ते पाहून इतर बायकांनीही आवराआवर केली. सूर्य डोक्यावर आला, तेव्हा कुठं मुकादम आला. ''म्या तुमची दुसरीकडे यवस्था करतोय'', मुकादम म्हणाला. आधीच त्यांनी आवरलेलं आहे, हे मुकादमाच्या लक्षात आलं, पण त्याला काही लिंक लागेना. मग रामा व किसनाने कचरू जनरल ऑफिसला सकाळी जाऊन आल्याचे सांगितले. त्यावर कचरूकडे जात, ''तू गेलाय ते बरं झालं. पर तोह्या आधी मी साहेबांकडं गेलो होतो'' अशी पॉलिसी त्याने मारली.

दुपारी दोन वाजता ज्या ट्रकने त्यांना आणून सोडले, तो ट्रक पुन्हा नेण्यासाठी आला. सारं सामान, उभारलेल्या कोप्या मोडून पोरं, आया-बाया ट्रकमध्ये चढल्या. ट्रक टेकडीलगत नेत पुन्हा बैलं ट्रकमध्ये चढविले. कारखान्याच्या वाहनतळासमोरच्या मोकळ्या मैदानातून ट्रक पडीक वावरात आला. पुन्हा कालचाच कित्ता गिरवत तोडीवाल्यांनी सामान, पोरंबाळं, बैलं उतरवून कोप्या उभारल्या. दिवस मावळतीला चुली पेटल्या. स्वयंपाक झाला. दिवसभर भाकर न मिळाल्याने भुकेलेला अरुण, कचरू भाकरीवर तुटून पडले. अंधार पडताच तीर्थाला जाता-जाता मुकादम निरोप देऊन गेला, 'उद्या सकाळी वाहन तळावर गाड्या

देतो.' ते ऐकून हातावर पाणी ओतून कचरूने परिगाला लवकर आवरायला सांगून गोधडी अंथरली. तो अन् अरुण पडला. परिगानेही भांडेकुंडे पटपट आवरले. तिलाही ओढ लागली होती, सकाळी लवकर उठण्याबरोबर कचरूच्या गोधडीतील उबेची.

पहाटे सारी टोळी लवकर उठली. कारखान्याच्या लिफ्टच्या बाऱ्यावर अंघोळ करीत चहाचे दोन घोट घेऊन तोडीवाले कारखान्याच्या वाहनतळावर आले. मुकादमाने त्यांना वाहनतळाच्या ऑफिसमध्ये नेत त्यांना नावापुढे गाडी नंबर लिहून त्यांचे अंगठे घेतले. कचरूला ५०१ नंबरची गाडी मिळाली. त्यामुळे कचरूला आनंद झाला. दुपारीच त्याने बैलं वाहनतळात आणीत गाडीला जुंपवले. ज्या कामासाठी कोसो मैलांवरून पोटाची खळगी भरण्यासाठी कचरू आला होता, ते काम उद्या पहाटपासून सुरू होणार असल्याने कचरूने आदल्या दिवशी सायंकाळीच बैलं धुऊन जोगविली. कोयत्याला धार लावून दोर, धटधुरी गाडीत टाकून ठेवले.

पहाटे चारलाच अड्ड्यातून चुलींचा धूर बाहेर येऊ लागला. पोरांची रडारड, आयाबायांची भाकरी थापण्याची धावपळ, गड्यांची अंघोळीसाठी पळापळ सुरू झाली. भाकरीचं पेंडकं बांधून परीगानं गाडीला बैल जुंपले. अरुणला गाडीत बसविले. डोक्याचे केस पुसत लिफ्टवरून अंघोळ करून आलेल्या कचरूने परिगाचं आवरलेलं बघताच घाई-घाईने कपडे अंगावर चढविले. एका टांगेत तो गाडीत चढला. रामा, किसना इतर तोडीवाल्यांना त्याने 'आरं, आवरलं का?' म्हणत आवाज दिला. बाकीच्यांची आवराआवर होईपर्यंत तो थांबला. ऊस तोडीसाठी अड्ड्यातून एका लाईनीत गाड्या बाहेर पडल्या. अर्थात पहिली गाडी होती ती कचरूचीच. दिवस उगवतीला ते ऊस तोडणीसाठी थळावर पोहोचले.

बोचरी थंडी झटकून कचरूसह साऱ्यांनी 'हर-हर महादेव' म्हणत उसाचे पाचट पेटवून विझविले. पुढच्या क्षणाला सूर्य नारायणाच्या पहिल्या किरणाबरोबर रानातील शांतता भंगली, ती कोयत्यांच्या आवाजाने. सपासप कोयते चालू लागले. पुरुष ऊसतोड करू लागले.

बाया तोडलेल्या उसाच्या मोळ्या बांधू लागल्या. कवळी उन्हं कडक होईपर्यंत पोरं गाडीतच गोधडीत पडून होती. तोड कारखान्यालगत असल्याने एका दिवसाला दोन खेपा होणं शक्य होतं. तसा चंग पहिला ऊस तोडला तेव्हाच कचरूने बांधला होता.

दुपारी एक वाजता पहिली गाडी त्याने भरली. बैल जुपवून चाबूक भिरकावला. ती खाली करून येईपर्यंत सूर्य मावळतीला आला होता. रामाच्या बायकोच्या मदतीने परिगाने तोडलेला ऊस कचरू गाडी खाली करून येताच दोघांनी लगबगीने भरला. परिगाने दोर बांधला. कचरूने तो आवळला. उसाचे वाढे वरती टाकून अरुणला वरती ठेवून ते दोघे चढले. गाडी दटविण्यासाठी कचरूने कासरा सैल सोडला. बोबड्या आवाजात अरुण गाडी दटविण्याचा हट्ट धरू लागला. परिगाने त्याला विरोध केला.  पण कचरूने त्याचा हट्ट पुरविला. त्याला पुढे घेत कासरा त्याच्या हातात दिला. चाबूकही तो मागू लागला. पण चाबूक पेलवण्याची ताकद त्याच्या मनगटात नव्हती. कचरू बैलाला 'हैक-हैक', म्हणताच चिमुक्या अरुणने बोबड्या आवाजात 'हाक-हाक' म्हणत बैल दटविण्यास सुरुवात केली. ते पाहून परिगाने कौतुकाने बोटे मोडत त्याची दृष्ट काढली. दुसरी गाडी खाली झाली. एका दिवसात कचरूने दोन गाड्या तोडून आणल्या. इतरांची मात्र एक किंवा दीडच गाडी झाली. बांधलेला चंग पूर्ण केल्याचे समाधान नवऱ्याच्या चेहऱ्यावर पाहून परिगाही सुखावली.

नित्याने ऊसतोडीच्या कामात दोघेही आता चांगलेच रुळले होते. अड्ड्यात सर्वाधिक गाड्या भरण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर होता. कचरूचे कष्ट पाहून मुकादमही खूष होता. आठ दिवसांच्या तोडीनंतर रविवारी दुपारी खेप खाली करायला तो कारखान्यावर गेला. कचरूच्या हातात मुकादमाने तीन हजारांचे कोरे करकरीत बंडल ठेवले. कष्टाची कमाई हातात पडताच कचरूचा चेहरा चमकला. हजार रुपये घेऊन उरलेले त्याने मुकादमाकडेच जमा म्हणून ठेवले.

थळावर जात परिगाला पैसे दाखवताच तीही चमकली. त्या दिवशी दोघांनी लवकरच आवरले. गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी भरविण्याचे

ठरवून लवकर अड्ड्याकडे निघाले. अंधार पडू लागला होता. कारखान्याच्या कार्यस्थळावर म्हसोबाजवळ गाडी येताच परिगाने सवयीप्रमाणे गाडीतील एक वाढा मंदिरासमोर टाकला. म्हसोबाला हात जोडत काहीतरी पुटपुटली. ते काहीसे गाडी दटवणाऱ्या कचरूने ऐकले.

तो तिला म्हणाला, ''काय मागतलं त्वा म्हसोबारायाला?''

''मागितल्यालं सांगत्यात थोडं?'' परीगा म्हणाली.

''मपल्या अरुणसारखा दुसरा मागतेय का गं?'' कचरू म्हणाला.

''इश्शऽऽ इश्श..!. तुमचं आपलं कायबी'' म्हणत परिगा लाजली.

अंधुक अंधारातही तिचा लाजलेला चेहरा कचरूने अचूक टिपला. गाडी अड्ड्यावर जाताच तिने शेंदूर, खडीसाखर, नारळ घेऊन कचरूला म्हसोबाला तो फोडण्यासाठी पाठविले. नारळाचा प्रसाद तो अड्ड्यावर वाटत असतानाच मुकादम चटई घेऊन आला. कचरूलाही चटई दिली. कचरूने प्रसाद देण्यासाठी हात पुढे केला खरा, पण मुकादमाने तीर्थ घेतल्याचा वास आल्याने त्याने तसाच तो मागे घेतला. चटई कोपीवर चढ्वत पुन्हा त्याने वाढे लावले. थंडी चांगलीच कडाडली होती. पण आज चटईमुळे त्यांना ती कमी प्रमाणात जाणवणार होती. पहिली कमाई हातात पडल्याने कष्टाचे चीज झाल्याने कचरूची काळजी काहीशी मिटली. चुलत्याच्या विरहित येऊनही चार पैसे कमाविण्याच्या समाधानातच त्याचा डोळा लागला.

पहाटे पुन्हा नव्या जोमाने लवकर उठून तो तोडीला निघाला. दिवस उजाडण्याआधीच कोयत्यांचा आवाज सुरू झाला. थंडी जास्त असल्याने अरुणला त्यांनी गाडीतच गोधडीच्या उबेत झोपवून ठेवले. ऊन वर आल्यावर झोपेतून उठलेला अरुण इतर पोरांबरोबर खेळू लागला. खेळता-खेळता पोरं पलीकडच्या बांधावरील बोरीखाली गेले. त्यातील काहींना बोरे खाण्याचा मोह आवरेना. पोरांनी दगडं गोळा करून बोरीला मारण्यास सुरुवात केली. दगडं खाऊन बोरीने पोरांना बोरं दिली.पडलेली बोरं गोळा करण्यासाठी पोरांची झुंबड उडाली. बोरं वेचून झाल्यावर पुन्हा एकाने बोरीला दगूड मारला, पण तो बोरीला न

लागता बोरीवर बसलेल्या आग्या मोहळाच्या पोळाला लागला. मोहोळ उठल्याचे पोरांच्या लक्षात येताच पोरं सैरावैरा पळाली. चिमुकल्या अरुणला काय झाले याचा अंदाज येईना. तोही त्यांच्याबरोबर पळू लागला. पण पळताना एक बोरीचा काटा त्याच्या पायात घुसला. वेदनेने विव्हळत तो जागेवर खाली बसला. पाठोपाठ आलेल्या माशांनी त्यालाच लक्ष्य केले. माशा तडातडा त्याला चावू लागल्या.

तोपर्यंत थळापर्यंत पोहोचलेल्या पोरांनी मोहोळ उठल्याचे सांगितले. ते ऐकून कोयत्यांचा आवाज थंडावला. वातावरण शांत झाल्याने अरुणच्या विव्हळण्याचा आवाज ऐकताच कचरूने त्या दिशेने धाव घेतली. पाहतो तर माशांनी अरुणला वेढलेले. जवळच्या लिंबाच्या झाडाच्या डहाळ्या तोडून त्याने माशांवर हल्ला चढविला. त्यामुळे माशा थोड्या बाजूला पांगल्या. अरुणला उचलून तो थळाकडे पळाला. तरी माशांनी त्याचा पिच्छा सोडला नव्हता. माशा चावल्याने सुजलेल्या अरुणला गाडीत टाकत त्याने बैलं गाडीला जुंपले. पोटच्या गोळ्याची ही दैनावस्था पाहून परिगा बधीर झाली. तिच्यावर ओरडत कचरूने गाडी दटविण्यास सुरुवात केली. चापकाचे फटके बसू लागले तसे बैलं पळू लागले. थळापासून कारखाना ४ कि.मी. अंतरावर होता. अरुणाला तर उपचाराची तत्काळ गरज होती. रस्त्याने पाठीमागून येणाऱ्या गाड्यांना परिगा, कचरू हात करू लागले. दोन गाड्या आल्या, पण थांबल्या नाहीत. त्या पाठोपाठ आलेल्या कारखान्याच्या स्कूल बसच्या ड्रायव्हरने गाडी थांबविली. कचरूने गाडीतून खाली उतरत ड्रायव्हरला मधमाशांचा अपघात सांगत अरुणसह परिगाला बसमध्ये बसवून दिले. स्कूल बस चालकाने कारखान्याच्या अलीकडं असणाऱ्या शासकीय रुग्णालयासमोर बस थांबविली. परिगाला उतरून दिले.

बसमधून उतरताच परिगा अरुणला कडेवर घेऊन पळतच दवाखान्यात गेली. डॉक्टरचा पत्ता नव्हता. तेथे असलेल्या कम्पाऊंडरकडे ती अरुणवर उपचारासाठी विनवणी करू लागली. परंतु, पैशाच्या लालची असलेल्या कंम्पाऊंडरने तिच्याकडे पैशाची

मागणी केली. ''माहा मालक मागं हाय, त्यो आला की लगीच देते.'' ती केविलवाण्या स्वरात म्हणाली. ''पैशाशिवाय हात लावणार नाही'' म्हणत त्या कम्पाऊंडरने तिला दवाखान्याबाहेर काढले. माशा चावल्याने अंग सुजलेल्या अरुणची शुद्ध हरपली होती. तो मान टाकू लागला. ते पाहून परिगा आणखी घाबरली. दवाखान्याबाहेरील चहाच्या टपरीवर तिने दुसऱ्या दवाखान्याबाबत विचारणा केली. टपरीवाल्यांनी तिला कारखान्याच्या रुग्णालयाचा पत्ता दिला. तिने पळतच तो पत्ता विचारत विचारत कारखान्याचे हॉस्पिटल शोधले.

तेथेही वेळेचं दुर्दैव आडवं आलं. कारखान्याच्या वॉचमनने अकरा वाजता डॉक्टर येतील, बाहेर थांबा, म्हणून सुनावले. ती डॉक्टरला बोलावून आणण्यासाठी त्याच्या हातापाया पडू लागली. परंतु, वॉचमनने तिला मदत केली नाही. ती रडत दवाखान्याच्या गेटवर बसली. तिच्या पाठोपाठ शासकीय रुग्णालयातून ती कारखान्याच्या रुग्णालयात आल्याचे त्या चहाच्या टपरीवाल्याने कचरूला सांगितले. बैलं दामटीत तो कारखान्याच्या रुग्णालयात आला. तिला गेटवरच बसलेलं पाहून तिच्यावरच भडकला. तिने घडलेला प्रकार सांगताच त्याने तरातरा जाऊन पुडी मळण्यात दंग असलेल्या वॉचमनला गचांडले. त्याचा रुद्रावतार पाहून त्या वॉचमनने डॉक्टरांना तत्काळ बोलविले. डॉक्टरांनी अरुणला तपासून त्याला पुढच्या उपचारासाठी ॲडमिट करून घेतले.

तीन दिवसांत सलाईन, गोळ्या, इंजेक्शन देऊन अरुणची सूज कमी करण्यात डॉक्टर यशस्वी झाले. पाचव्या दिवशी अरुण बोलू लागला, माणसं ओळखू लागला. कारखान्याचे रुग्णालय असल्याने उपचाराचा खर्च वाचला. औषधापोटी बाराशे रुपयांचे बिल भरल्यावर डॉक्टरांनी अरुणला सोडले. कचरूच्या दृष्टीने बाराशे रुपये लाखाएवढे असले तरी पोराच्या जीवापेक्षा त्याचे त्याला काहीच वाटले नाही.अरुणला अड्ड्यात आणल्यावर दुसऱ्या दिवसापासून त्याचे तोडीचे काम सुरू झाले. अरुणला बरे वाटेपर्यंत परिगा त्याला घेऊन कोपीवरच थांबली. अरुण पूर्णतः नॉर्मल झाला तेव्हा कोठे दोघांच्या

जीवात जीव आला.

आता परिगालाही तोडीला येणे शक्य होणार होते. पहाटे उठलेल्या कचरूला तिने भाकरी दिल्या. तिच्या भांड्याच्या आवाजाने अरुणही उठला. भाकरीचं पेंडकं गाडीत चढलेल्या कचरूकडे देत 'तुम्मी व्हा म्होरं, दाने संपल्याती. म्या दळण करून अरुणाला घेऊन येते,' ती म्हणाली. ते ऐकून कासरा सोडत कचरू निघाला. तोच अरुण गाडीमागे पळाला. त्याच्या पाठोपाठ जात परिगाने त्याला कडेवर घेतले. पण तो काही ऐकेना. पहाटेच्या किर्र शांततेत त्याच्या रडण्याच्या आवाजाने अड्डा सोडून पुढं आलेली गाडी कचरूने थांबविली. परिगाला आवाज देत 'म्या सांभाळतो त्यासनी' म्हणत त्याला गाडीत घेतले.

बापलेक तोडीला निघून जाताच कोंबडं आरवलं. दिवस उजाडायला दीड तास होता. तो अंदाज बांधून स्वयंपाकाची भांडी गोळा करून ठेवत परिगा थंडीमुळे पुन्हा गोधडीत शिरली. गोधडीच्या उबेने तिला डुलकी लागली. चूल विझविली तरी चुलीतून मंद धूर निघतच होता. वाऱ्याची एक झुळूक आली. पाचरटाबरोबर चुलीतील निखारा उडाला. तीच वाऱ्याची एक झुळूक कचरू-परीगाचा संसार उद्ध्वस्त करणार होती.

उधळलेल्या निखाऱ्याच्या ठिणग्या पाचटावर पडल्या. पाचट पेटले. आगीचा एकच भडका उडाला. परिगाला जाग येईपर्यंत आगीच्या परिगाने तिला घेरले. ज्वालांची झळ बसताच तिची झोप मोडली. आगीतून बाहेर पडण्यासाठी ती मार्ग शोधू लागली. पण तोपर्यंत आगीने रौद्र रूप धारण केले होते. तिचा आक्रोश ऐकून अड्ड्यातील लोकांनी पळत जाऊन कारखान्याच्या गेटवर कोपी पेटल्याचे सांगितले. पुढच्या पंधरा मिनिटांतच कारखान्याचा अग्निबंब अड्ड्यावर आला. पण तोपर्यंत कोपीतील सामानाचा कोळसा झाला होता. वाचविण्यासाठी आक्रोश करणाऱ्या परिगाचाही कोळसा झाला. ती निपचित पडली होती. अग्निबंबाने आग आटोक्यात आणून इतर कोप्या वाचविल्या, पण तो परिगाला व कचरूच्या संसाराला वाचवू शकला नाही.

दिवस उजाडेपर्यंत अड्ड्यावरील लोकांनी तोड सुरू असलेल्या

थळावर जात कचरूला कोपी पेटल्याचे सांगितले. कोयता टाकून कचरू पळाला. पण अंतर जास्त असल्याने बैलगाडी जाणार कधी? त्याची अडचण पाहून ऊस मालकाने मोटारसायकल काढली. अरुणला घेऊन कचरू अड्ड्यावर पोहोचला. तो गाडीवरून उतरला. गर्दीला बाजूला करीत कोपीजवळ गेला. कोपी होती कुठं? आगीत संसाराचा झालेला कोळसा आणि त्यातच कोळसा होऊन पडलेल्या परिगाचा मृतदेह पाहून त्याला भोवळ आली.

त्याला उचलून लोकांनी बाजूला घेतले. पोलीस गाडीच्या भोंग्याने तो जरा शुद्धीत आला. पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा केला. परिगाचा काळाठिक्कर मृतदेह रुग्णवाहिकेत घातला. ते पाहून कचरूने एकच आक्रोश केला. बापाला हाय मोकलून रडताना पाहून काय झाले ते अरुणला कळेना. आई पण दिसेना.मग मात्र तोही रडू लागला. बापलेकांच्या आक्रोशाने गर्दीही हेलावली.

स्मशानभूमीत परिगाच्या चितेला अग्निडाग दिल्यावर तिच्या जळत्या चितेच्या ज्वाला पाहून कचरूला तिचे स्वप्न, तिच्या आकांक्षा व दोघांच्या संसाराचीच चिता जळताना दिसत होती. अंत्यविधी उरकल्यावर सायंकाळी कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी मुकादमाला सांगून कचरूला कारखान्याच्या कॅन्टीनमध्ये जेवू घालण्यासाठी नेले. कचरू काही येईना. 'तू नको खाऊस, पोरासाठी तर चल,' असे कारखान्याचे कर्मचारी म्हणताच अरुणला घेऊन तो कारखान्याच्या कॅन्टीनमध्ये आला. अरुणला खाऊ घातले, पण तो काही अन्नाला शिवला नाही. रात्र कॅन्टीनमधल्या वेटरच्या रुममध्ये काढली.

सकाळी कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी त्याला ब्लँकेट्स, स्वयंपाकाची भांडी दिली. कोपीसाठी चटई, बल्ल्या दिल्या. पहिल्या कोपीपासून थोडं बाजूला रामा व किसनाने त्याला कोपी उभारून दिली. त्याच्या बैलांना चारा टाकला. दिवसभर तो अड्ड्यालगतच्या झाडाखाली बसून होता. परिगाच्या भावाला कुणी निरोप पाठवला कोण जाणे, तिचा पेताड भाऊ दुसऱ्या दिवशी सायंकाळी अड्ड्यावर आला. दारूच्या नशेत कचरूनेच परिगाला मारल्याचा आरोप केला. त्याच्या

सर्व खानदानाचा उद्धार करीत झोकांड्या खात आला तसा गेला.

कचरू परिगाच्या जाण्याने एवढा खचला होता की सत्य सांगण्यासाठी त्याच्या शरीरात त्राणही उरले नव्हते. दोन दिवस, एक रात्र उपाशी राहून त्याच्या पोटात आग पडली. रात्री त्याला जेवायला बोलवायला आलेल्या रामा व किसनाच्या आग्रहाला मान देत तो त्यांच्या कोपीत जेवायला गेला. पहिला घास तोंडात टाकण्यासाठी तोंड उघडले खरे, पण परिगाच्या आठवणीने त्याला रडू कोसळले. रामा, किसनाने शांत करीत त्याला जेवू घातले. अरुणला घेऊन तो दुसऱ्या कोपीत जाऊन पडला. अरुण झोपी गेला. कचरू तसाच मांडीत मुंडकं घालून बसला होता. मध्यरात्रीपर्यंत त्याने विचार केला. चिमणीच्या उजेडात झोपलेल्या अरुणच्या चेहऱ्यावर हात फिरून त्याला गोंजारत त्याने डोळे पुसले. उद्यापासून पोरासाठी लढायचं ठरवून तो झोपला.

पहाटे सर्वांच्या आधी लिफ्टवर त्याला अंघोळीला आलेले पाहून बाकीचे ऊसतोड कामगार आश्चर्यचकित झाले. कुणाशी काही न बोलता अंघोळ करीत बैल त्याने गाडीला जुंपले. झोपलेल्या अरुणला तसाच गोधडीसह गाडीत टाकून तो तोडीला निघाला.

परिगा गेल्याचं दुःख झटकून तो कामाला लागला. त्याच्या या कृत्यामुळे अड्ड्यावर उलटसुलट चर्चा सुरू झाली. ही चर्चा कचरूच्याही कानावर आली. पण त्याने जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केले. पहिले काही दिवस रामा, किसनाने जेवू घातले. दररोज त्यांच्याकडे जेवायला जाणे त्याला पटेना.

एक दिवस सकाळीच त्याने चूल मांडून भाकरी करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. दुसऱ्या दिवशी मात्र त्यात थोडीशी प्रगती झाली. लहानगा अरुणही बापाच्या स्वयंपाकात लुटपूट करू लागला. आठ दिवसांत त्याला बऱ्यापैकी स्वयंपाक येऊ लागला. बापानं केलेल्या भाकरी जळक्या असो किंवा कच्च्या, त्या अरुण काकू न करता खाऊ लागला. त्याला हाताने स्वयंपाक करताना पाहून अनेकांचे पोट दुखले. काहींनी तर उघड-उघड त्याला टोचून बोलत दुसरे लग्न

करण्याचा सल्ला दिला. कचरूने एका कानाने ऐकले आणि दुसऱ्या कानाने सोडून दिले. परिगा शरीराने गेली असली तरी मनानं मात्र ती त्याच्याबरोबरच होती. तिच्या आठवणी त्याला पुढे जगण्यासाठी पुरेशा होत्या. अरुणला परक्या आईची माया मिळावी, हे त्याला मान्य नव्हते.

ऊस तोडणी, स्वयंपाक, अरुणचे संगोपन हा कचरूचा एक कलमी कार्यक्रम सुरू होता. एक दिवस सायंकाळी मुकादम अड्ड्यावर आला. उद्यापासून कारखान्यावर साखरशाळा सुरू होणार असल्याचे सांगितले. ते ऐकून बहुतेकांनी नाके मुरडली. मग पोरं त्या शाळेत घालणं लांबच राहिलं. मुकादमाचे बोलणे ऐकून मात्र कचरूच्या डोक्यात ट्यूब पेटली. अरुणला शाळेत घालण्याचा विचार त्याच्या मनात घोळू लागला. जाता-जाता कचरूला बाजूला घेत मुकादम म्हणाला,

''उद्या जळितापोटी चेक मिळणार हाय... तू जनरल हाफिसला ये सकाळी..''

कचरूने त्याचे बोलणे ऐकून फक्त मान डोलावली. दुसऱ्या दिवशी सकाळीच थळावरून एका कामगाराची सायकल घेऊन कारखान्याच्या जनरल ऑफिसला आला. मुकादम त्याची वाट पाहतच होता. कचरूला पाहताच जवळ येत तो म्हणाला, ''कचरुबा, माह्या पाठपुराव्यानं त्वाहा चेक निघालाय.''

''बरं, मग?'' कचरू म्हणाला

''अरं वेड्या, मपला वाटा दे अन् घे की चेक!'' मिश्किल हसत मुकादम म्हणाला.

त्याचं बोलणं ऐकून मुकादमाचा स्वार्थीपणा कचरूच्या लक्षात आला. कचरूही नकार न देता ओस्वाल साहेबांच्या केबिनमध्ये आला. साहेबानं कचरूच्या सह्या घेऊन हातावर पन्नास हजारांचा चेक टेकविला. चेक हातात पडताच मुकादमाकडे बोट करत त्याचे 'वाटा' प्रकरण त्याने थेट साहेबालाच सांगितले. साहेबाने मुकादमावर तोंडसुख घेत त्याला केबिनबाहेर हाकलले.

''पुन्हा अडचण आली तर मला सांग.'' असे ओस्वालसाहेब कचरूला म्हणाले. त्यावर कचरूने मदतीचे पैसे, अरुणच्या

शाळेविषयीचे विचार ओस्वालसाहेबाला सांगताच त्यांनी ‘कारखान्याच्या बँकेत तुझ्या नावाने खाते उघडून देतो, दुपारी पोराला शाळेत घेऊन जा. तिथल्या शिक्षकांना मी सांगतो,’ असे सांगितले. ओस्वालसाहेबांनी कचरूच्या बहुतांश अडचणी सोडविल्या. कारखान्याच्या मदतीपोटी मिळालेले पैसे अरुणच्या नावाने त्याने दामदुपटीसाठी टाकून दिले.

अरुणचे पाटी-पेन्सील, दप्तर घेऊन पहिले दोन दिवस स्वतः त्याला शाळेला जावे लागले. पण इतर पोरांपेक्षा अरुण दोन दिवसांतच शाळेत रमला. तिसऱ्या दिवशी एकटाच शाळेत गेला. त्यामुळे कचरूची काळजी मिटली. पहाटेपासून सायंकाळपर्यंत तोड, सायंकाळी स्वयंपाक, भांडी, जेवण हे सर्व आवरून धरतीवर पडल्या-पडल्या तो झोपी जाई. पहाटे कचरू उठला की त्याच्या बरोबर अरुणही उठे. कचरूने आणून दिलेल्या अंकलिपीचे आकडे हुबेहूब तो काढून कचरूला दाखवू लागला. त्याच्या हुशारीचे कचरूला मोठे कौतुक वाटू लागले.

कारखान्याचा गळीत हंगाम संपला. कचरूने ऊस तोडणीतून वीस हजार रुपये कमाविले. आता परिगा असती तर मोठ्या रुबाबात गावाकडं गेलो असतो. पण ती नाही तर जाऊन करणार काय? पण इथंही राहायचे व कामाचे वांधे. दुहेरी पेचात कचरू सापडला.

अड्डा मोडायच्या आदल्या दिवशी सकाळीच ओस्वाल साहेबांच्या केबिनला गेला. मनातील द्विधा अवस्थासाहेबाला सांगितली. ‘‘तुला काम देतो, राहायची सोय करतो, पण पोराला शिकव’’ असे ओस्वालसाहेब म्हणाले. पुन्हा ओस्वालसाहेबांनी त्याच्या समस्या सोडविल्याने तो थोडाच त्यांच्या शब्दापुढे जाणार होता? मुळात अरुणची शाळेची ओढ पाहून त्याला अरुणला शाळेतून काढावेसे वाटेना! साखर शाळा बंद झाली.

ओस्वालसाहेबांच्या मदतीने कचरूने अरुणला जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत घातले. तयार साखर ट्रकमध्ये भरून देण्यासाठी कारखाना बंद झाला तरी हमाली काम सुरू होते. ओस्वालसाहेबांनी

त्याला हमालांच्या टोळीत भरती केले. हमाल राहात होते त्या चटई चाळीतील एक चटईची खोलीही त्याला मिळाली. ओस्वालसाहेबांच्या कृपेने कारखाना बंद झाला तरी काम मिळाले, राहायला जागा मिळाली. कचरू समाधानी होता. दिवसभर राब-राब राबायचा, सायंकाळी हमालीचे कपडे काढून चिमुकल्या अरुणसाठी आईची भूमिका वटवायचा. कुठल्याही दुःखावर वेळ खूप मोठे औषध असल्याचे म्हणतात, तेच कचरूच्या बाबतीत खरे झाले. जसजसे दिवस पुढे सरकले तसे परिगाच्या दुःखातून तो सावरू लागला. पण रात्री धरतीला डोके टेकवल्यावर तिची आठवण आल्याशिवाय राहत नव्हती.

भर उन्हाळ्यात शाळा संपताच अरुणच्या पहिल्या इयत्तेचा निकाल आला. निकाल घेऊन अरुणच कारखान्याच्या गेटवर आला. वॉचमनने त्याला आत सोडले नाही. तो तेथेच नारळाच्या झाडाच्या सावलीला बसून राहिला. दुपारच्या सुट्टीत कचरू इतर हमालांबरोबर चहा प्यायला बाहेर आला. बापाला पाहताच अरुण त्याला जाऊन बिलगला. कचरूने त्याला उचलून घेताच त्याने प्रगतीपुस्तक दाखविले. अडाणी कचरूला ते पाहून काही कळेना. उलट त्याने पास झाला का, विचारले. बोबड्या आवाजात अरुण म्हणाला, ''आप्पा, फक्त पाश नाय, पहिला नंबर आलाय!''

कचरूने त्याचे मुके घेत खिशातून खाऊसाठी पाच रुपयांचा ठोकळा त्याच्या हातावर टेकवला. इतर हमालांना कचरूने अरुणचा नंबर आल्याचे सांगताच सर्वांनी त्याचे कौतुक केले. त्या खुशीत हमालांचे चहाचे बिलही कचरूने देऊन टाकले. अरुणने ज्या विश्वासाने कचरूला 'पहिला' आल्याचे सांगितले, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील तो आत्मविश्वासाचा भाव कचरूने पहिल्यांदाच पाहिला. पोर आपलं नाव काढणार याची जाणीव त्याला पहिल्यांदा झाली. अरुणनेही ती खरी केली.

पहिलीला पहिला क्रमांक मिळविलेल्या अरुणने परत मागे वळून पाहिलंच नाही. चौथीपर्यंत पहिला क्रमांक मिळवीत शासनाची शिष्यवृत्तीही त्याने मिळविली. परंतु, कचरू एवढ्या लहान वयात

त्याला बाहेर शिक्षणासाठी ठेवायला तयार नव्हता. कारखान्यावरील 'रयत'च्या शाळेत कचरूने त्याला टाकले. सुरेख हस्ताक्षर, अभ्यासातील चुणूक त्यामुळे अरुण तेथील शिक्षकांच्या गळ्यातील ताईत बनला. त्याची चुणूक ओळखून शाळेतील शिक्षकांनी त्याला निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा अनेक स्पर्धांमध्ये भाग घ्यायला लावले. तेथेही शिक्षकांच्या विश्वासाला तो पात्र ठरला. पाच वर्षांत बँकेत त्याच्या नावावरील पन्नास हजारांचे एक लाख रुपये झाले होते. कचरूने ओस्वालसाहेबांची गाठ घेऊन अरुणच्या प्रगतीचा आलेख त्यांना सांगितला. दामदुप्पट झालेले पैसे पुन्हा दामदुप्पट होण्यासाठी टाकून दिले.

इकडे अडाणी कचरूसाठी स्पर्धा, बक्षिसे, पारितोषिके हे सर्व नवीन होते. फक्त आपल्या पोराचं नाव होतंय, ते काहीतरी शिकतंय याचाच त्याला मनस्वी आनंद होत होता. गळीत हंगाम सुरू झाला का ऊसतोड करायची, हंगाम संपला की हमाली. आराम त्याला माहीत नव्हता. हाच त्याचा गुण अरुणमध्येही होता. शाळेला सुट्ट्या लागल्यावर इतर मुलं ट्यूशनला जात, मामाच्या गावाला जात. अरुण मात्र कारखान्याच्या लायब्ररीत बसून दिवस दिवस दैनिके, पुस्तके चाळत असे. सायंकाळी त्याला थोडा जरी उशीर झाला तरी कचरूची काळजी वाढत असे. पण उशीर झाला म्हणून तो त्याच्यावर रागावला नाही. कारण स्वतःच्या पोरावर त्याचा पूर्ण विश्वास होता. अरुण वाह्यात कोठे बसणार नाही, हे त्याला माहीत होते.

बघता-बघता अरुण दहावीला गेला. अरुणची हुशारी पाहून त्याच्या वर्गशिक्षकाने कचरूला शाळेत बोलावून हे त्याच्यासाठी किती महत्त्वाचे वर्ष आहे, हे त्याला समजावून सांगितले. कचरूला याआधी त्याच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याची वेळ आली नव्हती. अरुण स्वतःच अभ्यास करीत असे. शिक्षकांनी दहावीच्या वर्षाचे महत्त्व कचरूला पटवून दिल्यावर त्याने रात्री लाईट गेल्यावर चिमणीत अभ्यास करणाऱ्या अरुणला पाहून दुसऱ्याच दिवशी बॅटरी आणून दिली. आपल्यासाठी व आपल्या शिक्षणासाठी आयुष्य खपविणाऱ्या कचरूची अरुण

दहावीला गेल्यावर वाढलेली तळमळ पाहून तो आणखी जोमाने अभ्यास करू लागला. इतर मुले बंगल्यात राहूनही, सर्व सुखसोई असतानाही गुणांच्या तक्त्यात मागे पडत असत. अरुण मात्र दहा बाय दहाच्या चटईच्या खोलीत रात्रंदिवस अभ्यास करू लागला.

अरुणची दहावीची परीक्षा आठवड्यावर आली. फेब्रुवारीतही जानेवारीची कडाक्याची थंडी राहिल्याने गारवा झोंबून तोडीला जाणारा कचरू आजारी पडला. पण, आपल्या आजारपणामुळे पोराचे अभ्यासातील लक्ष विचलित होईल म्हणून त्याने अरुणला आजारी असूनही साधी कुणकुणही लागू दिली नाही. थंडीताप असून त्याने परीक्षेच्या काळात त्याला स्वयंपाक, जेवणखाण इतर सर्व वेळेत आवरून दिले. परीक्षा संपली. अपेक्षेप्रमाणे अरुणला सर्व पेपर सोपे गेले. दोघेही निकालाची वाट पाहू लागले.

मार्च महिन्याच्या शेवटी कारखान्याचा गळीत हंगाम संपला. गळीत समारोप समारंभासाठी कारखान्याने कलेक्टरांना बोलाविले. कचरू सकाळीच तोडीला गेला होता. सुट्टी असल्याने अरुण मोकळाच होता. कलेक्टर येणार म्हणून कारखान्याच्या गेटसमोर मोठा मंडप टाकला होता. कारखान्यावरील इतर टवाळ पोरांबरोबर कुतूहल म्हणून त्या मंडपात जाऊन उभा राहिला. लाऊड स्पीकरवर सनईचा आवाज सुरू होता. अधिकारी, कर्मचारी सर्वांची एकच धावपळ सुरू होती. ते पाहून अरुणला थोडे आश्चर्य वाटले. एका माणसाची एवढी ठेप? तो मंडपातच रेंगाळला. तासाभरात लाल दिव्याच्या कारमध्ये पोलिस बंदोबस्तात कलेक्टर कार्यक्रमस्थळावर आले. गाळपाची समाप्ती झाली, सत्कार झाले, भाषणे झाली. कार्यक्रम संपला. कलेक्टरचा तो साहेबी रुबाब पाहून प्रभावित झालेला अरुणही घरी आला. कचरू तोडीवरून आला होता.

त्याने कचरुला विचारले, ''अप्पा, मी काय व्हावं तुला वाटतं?''

त्याचा प्रश्न ऐकून कचरू बुचकळ्यात पडला. हसत म्हणाला, ''कायबी कर.. पर मोट्टा व्हय बाबा...''

त्याचं उत्तर ऐकून अरुणने मनोमन ठरवले, आपण कलेक्टर व्हायचं.

कारण कलेक्टरची ती लाल दिव्याची गाडी, त्याचा साहेबी रुबाब पाहून अरुण प्रभावित झाला होता. कलेक्टर व्हायचं; पण कसं? शिक्षण काय? विचारायचं कोणाला? अरुणला मोठे कोडे पडले होते. कारखान्याच्या लायब्ररीत दैनिके चाळता-चाळता कलेक्टरविषयी कुठलीही बातमी दिसली की तो आवर्जून वाचायचा. पण तरीही योग्य मार्ग सापडेना.

जून उजाडला. इतर मुलांप्रमाणे अरुणलाही निकालाचे वेध लागले होते. निकालाची तारीख जाहीर झाली. सकाळीच मुलांनी देवदर्शने सुरू केली. अरुण मात्र देवळात गेला नाही. दुपारी तीन वाजता निकाल जाहीर झाला. आत्मविश्वास प्रचंड होता. पण शेवटी बोर्ड, दहावीच्या परीक्षेभोवतीचे वलय यामुळे निकाल हातात पडेपर्यंत अरुणलाही काळजी होतीच. त्याला शाळेच्या आवारात पाहताच मित्रांनी शाळेतच नव्हे तर बोर्डात आला म्हणून उचलून घेतले. अरुणचा विश्वास बसेना. निकाल स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्यावर सत्काराच्या हारतुऱ्यात न रमता तो पळतच कारखान्यात गेला. गेटवरच्या वॉचमनने पुन्हा त्याला अडवले. ''पेढे दे, मग आत सोडतो!'' अप्पाला निकाल दाखवल्यावर नक्की देतो, असे आश्वासन देऊन तो आत साखर गोडावूनला आला. त्याला पाहताच कचरूने पोते टाकून निकाल विचारण्याआधीच अरुणने त्याला शाळेत नव्हे तर बोर्डात आल्याचे सांगितले. ते ऐकून कचरूचा गोंधळ झाला. त्याला वाटले, शाळेतला पहिला नंबर गेला. मग इतर हमालांनी त्याला शाळेपेक्षा बोर्ड मोठे सांगताच त्याने अरुणला उचलून घेतले.

शाळेतील शिक्षकांनी त्याला भविष्यात तुला काय व्हायचे त्या पद्धतीने 'आर्ट्‌स घ्यायचे की सायन्स, हे ठरव,' म्हणून सांगितले. अरुणने त्याच्या मनातील सुप्त भावना त्यांच्यापुढे मांडली. बोर्डात आलेला विद्यार्थी कलेक्टर होणारच, हा विश्वास शिक्षकांना होताच! त्यातील मुसमाडे नावाच्या शिक्षकाने अरुणच्या डोळ्यांतील कलेक्टर होण्याचा निर्धार हेरला. त्याला त्याने योग्य मार्गदर्शन करीत सायन्स घेण्यास सांगितले. स्पर्धा परीक्षा ही संकल्पना अरुणने पहिल्यांदा

मुसमाडे सरांच्या तोंडून ऐकली.

अरुण दहावी झाला, त्याच शाळेत कनिष्ठ महाविद्यालय होते. तेथेच त्याने अकरावी सायन्सला प्रवेश घेतला. तोपर्यंत त्याचे कलेक्टर व्हायचे स्वप्न कचरूपर्यंत येऊन पोहोचले होते. एक दिवस सकाळीच कचरू अरुणला ओस्वालसाहेबांकडून घेऊन गेला. अरुणने त्याचा निर्धार ओस्वालसाहेबांना सांगताच ऐकून तेही थक्क झाले. त्यांनी पुण्यातल्या त्यांच्या एका मित्राशी बोलून स्पर्धा परीक्षेची पुस्तके, पद्धत याबाबत माहिती मिळविण्याचे आश्वासन दिले. ओस्वाल साहेबांच्या रूपाने अरुणला स्वप्नपूर्तीचा पहिला किरण दिसू लागला.

विद्यालयातील विद्यार्थी आता महाविद्यालयात आले होते. अरुणचे महाविद्यालयीन जीवन सुरू झाले. कळत-नकळत तारुण्याची पहिली चाहूल याच वयात लागते. हाफ पँट घालणारी मुलं फुल पँट, रंगीबेरंगी कपडे घालून येऊ लागली. कचरूनेही अरुणला एक ड्रेस घेतला. तोच दोन दिवसांनी धुऊन अरुण पुन्हा घालत असे. पण त्याने कधी तक्रार केली नाही. विविध स्पर्धांत सहभागी होण्याचा त्याचा सपाटा सुरूच होता. कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये त्याने सादर केलेल्या एकपात्री अभिनयालाही पारितोषिक मिळाले. अकरावीची वार्षिक परीक्षा झाली. सुट्टीत पुन्हा मोकळ्या वेळेत काय करायचे? अरुणपुढे प्रश्न उभा राहिला. इतर मुलांप्रमाणे ट्यूशन लावण्याची त्याची ऐपत नव्हती.

असाच एक दिवस कारखान्याच्या लायब्ररीत जात असताना त्याला ओस्वालसाहेब भेटले. ''पुढच्या आठवड्यात माझा मित्र स्पर्धा परीक्षेची पुस्तके पाठवणार आहे, आल्यावर तुला सांगतो'' ते म्हणाले. अरुणसाठी ही गुड न्यूज होती. तो पुस्तके येण्याची वाट पाहू लागला. ओस्वालसाहेबांनी म्हटल्याप्रमाणे पुस्तके आली. अरुणने झपाटून ती वाचून काढली. त्यातील सरावासाठी दिलेल्या प्रश्नपत्रिका सोडविल्या. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करता-करताच सुट्टी संपली. पुढे आली बारावी. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातलं सर्वांत महत्त्वाचं वर्ष. अरुणने स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाबरोबरच बारावीच्या अभ्यासाकडेही लक्ष पुरविले. दोन्हींचा अभ्यास तो समतोलपणे करू लागला. कचरूला

स्पर्धा परीक्षा वगैरे  समजण्याच्या पलीकडे होते. पण आपला मुलगा बारावीच्या अभ्यासाबरोबर काहीतरी आणखी करतोय म्हणून त्याने कामापेक्षा अरुणच्या बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष पुरविले.

कॉलेजला असूनही अभ्यासात दंग झालेला अरुण कॉलेज लाईफ विसरला. बारावीच्या अभ्यासाचा कंटाळा आला की स्पर्धा परीक्षांचा अभ्यास आणि त्याचा कंटाळा आला की जे तो शिकला, ते कचरूला सांगण्याचा अयशस्वी प्रयत्न करी. कारण त्याने कितीही सोप्या भाषेत सांगितले तरी न समजूनही कचरू केवळ घुम्या बैलासारखा मान डोलवायचा. मात्र, अरुणच्या निर्धाराला कचरूची साथ मिळाल्याने त्याचा अभ्यासाचा स्टॅमिना चांगलाच वाढला. वृत्तपत्र वाचतानाही स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त घडामोडी तो त्या अँगलने वाचू लागला. सायन्सचे प्रॅक्टिकल झाले. परीक्षा सुरू झाली. अरुणने शांत डोक्याने पेपर लिहिले. इतर पालक मुलांना परीक्षेसाठी घेऊन जात. ते पाहून कचरूला अरुणला न्यावेसे वाटले. पण, पोट त्याला परवानगी देत नव्हते. काम बुडविले तर खायचे काय? त्याने भावनांना आवर घातला. परीक्षा संपली. अरुणला मोकळे मोकळे वाटू लागले. थोडा आनंदही झाला. कारण आता त्याला निकाल येईपर्यंत फक्त आणि फक्त स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करता येणार होता. तो करता-करता पुस्तकातील काही मार्गदर्शक  लेख त्याच्या वाचनात आले. वाचनातून त्याला 'बारावीनंतर पुढे काय?' याचे उत्तरही मिळाले. आता तो फक्त निकालाची वाट पाहू लागला.

जूनच्या पहिल्या आठवड्यातच निकाल लागला. अरुणला अपेक्षेपेक्षा जास्त गुण मिळाले. दहावीनंतर बारावीलाही तो शाळा आणि बोर्डात आला. आधी दहावीच्या यशाची चव चाखली असल्याने अरुणला पहिले येऊनही विशेष काही वाटले नाही. पण कचरूचा आनंद मात्र ओसंडून वाहत होता. तो साऱ्या हमालांना पेढे वाटत फिरला.ऊसतोड कामगाराच्या पोराने चटईच्या खोलीत अभ्यास करून मिळविलेले यश पाहून कारखान्याच्या अध्यक्षांनी कारखान्यावर बोलावून अरुणचे कौतुक केले.

बी.एस्सी. ॲग्रीला प्रवेश घेण्याचा अरुणचा निर्धार पक्का होता. कचरूचा नकार असण्याचे कारण नव्हते. पण, पोर पुढच्या शिक्षणासाठी त्याला सोडून जाणार म्हणून त्याला करमेना! त्याचा सुकलेला चेहरा पाहून अरुणचाही पाय निघेना! पण शेवटी कचरूनेच मोठे मन करीत अरुणला परत पाठविले.

पुण्याच्या कृषी महाविद्यालयात अरुणने प्रवेश घेतला. तो बी.एस्सी.ॲग्री होण्यासाठी नव्हे, तर कलेक्टर होण्यासाठीच. कारण बी.एस्सी. ॲग्री कलेक्टर होण्याची पहिली पायरी आहे, हे अरुणने स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकात वाचले होते. इकडे कचरूने दाम दुपटीला टाकलेले पैसे काढून त्याच्या शिक्षणाचा, होस्टेलला राहण्याचा खर्च भागविला.

विद्येचे माहेरघर पुण्यात ॲग्रीचे धडे गिरविण्याबरोबर अरुणने वेगवेगळ्या ग्रंथालयांत फिरून, व्याख्याने ऐकून स्पर्धा परीक्षांविषयी आणखी माहिती मिळविली. कलेक्टर होण्यासाठी यूपीएस्सीची परीक्षा द्यावी लागणार असल्याचे त्याला समजले. नवीन पुस्तके घेणे गरजेचे होते. ओस्वालसाहेबांना फोन करून कचरूपाशी निरोप पाठवला. त्याचा निरोप ओस्वालसाहेबांनी कचरूला सांगितला. ते ऐकून कचरू थोडा चिंताग्रस्त झाला. पहिल्या वर्षाची फी भरली तरी अजून दोन वर्षची फी, राहण्याचा, खाण्याचा खर्च, शिल्लक सव्वा लाख रुपयांतून भागेल का? त्यात आता पुस्तकाचा खर्च.. ते पैसे तसेच ठेवून त्याने हमालीपोटी कारखान्याकडून पाच हजारांची उचल घेतली. अरुणला पुस्तकांसाठी पैसे पाठविले.

अरुणचा यूपीएस्सीचा अभ्यास सुरू झाला. घेतलेली उचल फेडण्यासाठी कचरू रात्रीही हमाली करू लागला. २४ तास कष्ट केल्याने त्याचे शरीर आता साथ देईना. शरीराच्या तक्रारी वाढल्या. पण कचरूने रेटून नेले. अरुणला त्याच्या पायावर उभे करेपर्यंत कचरू थकला तरी लढणार होता. परिगा गेल्यावर अरुणविषयी त्याने पाहिलेले स्वप्न पूर्ण होण्याच्या मार्गावर असताना आता आपण मागे राहून चालणार नाही. वय वाढूनही कचरूचे कष्ट उपसण्याचे काम सुरूच

होते.

अरुणचे ॲग्रीचे पहिले वर्ष संपले. त्याला एक पायरी सर केल्यासारखे वाटले. दुसऱ्या वर्षाला त्याने प्रवेश घेतला. 'लक्ष्य' त्याला दृष्टिक्षेपात दिसू लागले. तिसऱ्या वर्षीच यूपीएस्सीचा फॉर्म भरता येत असल्याचे त्याला माहीत झाले. इतर विद्यार्थी परीक्षा लवकर येऊ नये म्हणून वाटच पाहत असत. पण अरुणला मात्र कधी एकदा दुसरे वर्ष पूर्ण करतो, असे झाले होते. दुसरे वर्षही संपले. अरुणने नियोजनबद्ध अभ्यास सुरू केला. यूपीएस्सीचे खासगी क्लास करणे शक्य नव्हते. त्याने या विषयीच्या तज्ज्ञ प्राध्यापकांचे पत्ते शोधले. याआधी यूपीएस्सी सुटलेल्या विद्यार्थ्यांचे पत्ते मिळविले. काहींना प्रत्यक्ष भेटला. काहींशी फोनवरून, पत्राद्वारे संपर्क साधला. शोधणाऱ्याला वाट सापडते. धडपड्या अरुणने वाट शोधली. ॲग्रीच्या अभ्यासाबरोबर यूपीएस्सीचाही अभ्यास अंतिम टप्प्यात आला.

डिसेंबरमध्ये यूपीएस्सीचे फॉर्म सुटले. अरुणने फॉर्म भरला. ॲग्रीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेआधी महिनाभर मार्चमध्ये यूपीएस्सीची परीक्षा झाली. अरुण आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरा गेला. ती परीक्षा संपताच ॲग्रीच्या अंतिम वर्षाचे पेपर दिले. दोन वर्षांपासून अभ्यासामुळे तो कचरूकडे गेलाच नव्हता. पेपर संपताच बॅग भरून तो कचरूकडे आला. त्याला पाहून कचरूने कामावर जाण्याचा बेत रद्द करीत परीक्षा, निकालाबाबत त्याला विचारले. अरुणने त्याला अभ्यास करून पेपर दिले, होईल ते होईल सांगताच कचरू म्हणाला, ''आरं, व्हईल काय होणारचं हाय. मपला खातरी हाय, तू काय ते कलुक्टर होशीलच!''

कचरूचे बोलणे खरे व्हावे, असे अरुणला मनोमन वाटले. कचरूची हमाली सुरू होती. घेतलेली उचल फेडण्यासाठी रात्रपाळी सुरू असताना साखरेची चोरी करणाऱ्या हमालातील दोघा चोरट्यांना पकडून त्याने वॉचमनच्या हवाली केले. त्याची इमानदारी पाहून कारखान्याच्या अध्यक्षांनी बक्षीस म्हणून त्याची मुकादमपदी बढती केली.

अरुणने सुट्टी कचरूकडे घालविली. यूपीएस्सीच्या निकालाची

तारीख डिक्लेअर होताच पुणे गाठले. अरुण जसा लहानाचा मोठा झाला तसा पहिल्यांदा त्याच्यावर निकाल आणायला जाताना दडपण होते. एक निकाल त्याची स्वप्नपूर्ती करणार होता आणि एक निकाल स्वप्नांची रांगोळी. निकालाची लिस्ट पाहिली. तीही खालून वर पाहता पाहता निम्म्यापर्यंत आला. त्याचे नाव दिसेना! मग मात्र घाम फुटला. तरीही आत्मविश्वास कायम ठेवत पुढे यादी पाहू लागला. हृदयाच्या ठोक्यांचा वेग वाढला होता. पहिल्या दहांमधील पाचव्या नावावर त्याची नजर स्थिरावली. विश्वास बसेना म्हणून त्याने पुन्हा पाहिले. नाव त्याचेच होते. देशात तो पाचवा आला होता. इतर लिस्ट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याने ओरडून सांगितले. तेथूनच एसटीडीवरून ओस्वालसाहेबांना फोन केला, ''तुमचा मुलगा कलेक्टर झाला, आप्पाला सांगा!'' म्हणत त्याने फोन ठेवला.

ओस्वालसाहेबांनी तत्काळ माणसं पाठवून कचरूला आहे तेथून घेऊन येण्यास सांगितले. माणसे गेली. कारखान्यातून कचरूला घेऊन आली. कचरूला काही कळेना!

केबिनमध्ये येताच ओस्वालसाहेबांनी सांगितले, ''अरे कचरू तुझा अरुण कलेक्टर झाला!''

ते ऐकूण कचरू ओस्वालसाहेबांना म्हणाला, ''सायब, माह्या गरिबाची का चेष्टा करताय?''

''अरे, चेष्टा कसली! अरे वेड्या, खरंच अरुण कलेक्टर झाला. आजच निकाल आला. त्याचा फोन आला होता.'' ओस्वालसाहेब म्हणाले.

''आरं देवा, पावला की रं मला! माहा अरुण कलुक्टर झाला..कलुक्टर झाला...''

कचरू साऱ्या ऑफिसमध्ये सांगत सुटला. त्या दिवशी दिवसभर संपूर्ण कारखान्यावर फक्त कचरू आणि त्याच्या अरुणचीच चर्चा होती. कचरू आनंदाने नाचत चटई चाळीच्या खोलीत पोहोचला.

जुन्या सामानाच्या पेटीतून त्याने परिगाची आठवण म्हणून जपून ठेवलेला तिचा फोटो बाहेर काढला. फोटोकडे पाहत म्हणाला, ''परिगा

त्वाहा अरुण कलुक्टर झाला. तू असती तर..'' फोटोवरून हात फिरवत त्याच्या डोळ्यांत पाणी आले.

निकालानंतर दोन दिवसांनी अरुण आला. तो येताच कारखान्याच्या अध्यक्षांनी त्याचा जंगी सत्कार केला. जिथं आयुष्यभर जोडे उचलण्याचे काम करावे लागले, तेथे पोराबरोबर कचरूचाही सत्कार झाला. कचरूला गहिवरून आले. जो तो कचरूला म्हणत होता, पोरानं नाव काढलं.

पुढचे कागदपत्रं पूर्ण करण्यासाठी अरुण ताबडतोब पुण्यात आला. प्रशिक्षणासाठी दिल्ली सेंटर मिळाले. बीएस्सी ॲग्रीच्या निकालाशिवाय जाता येत नव्हते. महिनाभराने ॲग्रीचा निकाल आला. तो सबमिट करून कलेक्टरच्या प्रशिक्षणासाठी अरुण दिल्लीला गेला. दिल्लीला चालल्याचे फक्त फोनवरून कचरूला सांगितले. कचरूचा जीव भांड्यात पडला. त्याच्या खानदानाने दिल्ली ऐकली होती, पाहिली नव्हती. एवढ्या लांब पोर गेलं म्हटल्यावर कचरुला अन्न, पाणी गोड लागेना. ओस्वालसाहेबांनी कचरूला धीर दिला. त्यामुळे तो काहिसा सावरला.

ज्या दहा बाय दहाच्या चटईच्या खोलीत बसून अरुणने कलेक्टर होण्याची स्वप्नपूर्ती केली होती, त्या खोलीत आता फक्त त्याच्या आठवणी उरल्या होत्या. त्या आठवूनच कचरू जगत होता. मुकादम झाल्यापासून त्याचं कामही कमी झालं होतं. ऊसतोड मजुरांकडून तोडणी करून घेण्यासाठी तो थळावर गेला की 'कलुक्टरचा बाप आला' असा नवा मान त्याला मिळत असे. ते ऐकूण कळतनकळत त्याचीही छाती फुगू लागली.

अशीच एक दिवस तोड सुरू असताना सरकारी गाड्यांचा ताफा थळावर येऊन थांबला. त्यातील लाल दिव्याच्या गाडीतून सुटाबुटातील एका माणसाने कचरू पानगव्हाणे कोण? विचारताच कचरू पुढे आला. त्या सुटाबुटातील माणसाने त्याला नमस्कार करीत तुम्हाला नेण्यासाठी मला कलेक्टरसाहेबांनी पाठविले, तुम्ही चला, असे म्हटले. कचरूच्या आनंदाला पारावार उरला नाही. कचरू त्या लाल दिव्याच्या गाडीत

बसला. कोयते थांबवून कलेक्टरच्या बापाचा रुबाब पाहून अचंबित झालेल्या ऊसतोड कामगारांना 'येतो रे' म्हणत ओस्वालसाहेबांची भेट घेऊन कचरु निघाला.

आठ-नऊ तासांचा प्रवास करून गाड्यांचा ताफा कचरुला धुळ्याला घेऊन आला. एका आलिशान बंगल्यासमोर गाड्या थांबल्या. कचरूची पंचाईत झाली. कारचं दार उघडायचं कसं, माहिती कुणाला? तो तसाच बसून राहिला. पुढे बसलेल्या त्या सुटाबुटातील माणसाने खाली उतरत घाईघाईने दार उघडले. कचरूला घेऊन ते बंगल्यात आले. बंगल्यातील नोकरांनी काचेच्या ग्लासात पाणी आणून दिले. बंगल्यातील अनोळखी चेहरे कचरूला सोफ्यावर बसण्यासाठी आग्रह करू लागले. पण कचरू काही पाणी पिईना आणि सोफ्यावरही बसेना. आपण एखाद्या राजवाड्यात आलो की काय, त्याला वाटले. बंगल्यातील भव्यता पाहून त्याचे डोळे दिपले. त्या लोकांचा आग्रह काही थांबेना. मग कचरूने खालीच बस्तान मांडले. ते पाहून गडबडलेल्या त्या लोकांनी त्याला उठवत बळजबरीने सोफ्यावर बसविले. कचरूला कपात चहा आणून दिला. कचरूने चहाचा कप उचलला. ट्रेमध्ये बिस्किटे होती, पण बशी नव्हती. कचरूने तसाच चहाचा कप तोंडाला लावला. पहिला घोट नरडीच्या खालीही गेला नाही तोच त्याने कप बाजूला केला. चहा खूपच गरम होता. जवळ उभ्या असलेल्या माणसाला त्याने धिटाईने बशी मागितली. बशी येताच एका झटक्यात त्याने चहा प्यायला.

दिवस मावळला. आणखी एक कार बंगल्यापुढे येऊन थांबली. बंगल्यातील ती माणसं चिडीचीप झाली. त्यातील एकाने पळत जाऊन कारचा दरवाजा उघडला. कारमधील एक सुटाबुटातील माणूस बंगल्यात येऊ लागला. सोफ्यावरून बसल्या-बसल्या खिडकीतून कचरू पाहत होता. तो माणूस जसजसा जवळ आला तसा कचरू उठला. ''आरं माणूस कसला, हा तर माहा अरुण हाय!'' उठलेल्या करुचला बसवत अरुणने ''कधी आलात?आता कारखान्यावर जायचे नाही. इथेच राहायचे.'' सांगितले. त्याकडे दुर्लक्ष करीत

अरुणला जवळ बोलवत कचरू म्हणाला, ''ह्यो बंगला कुणाचा?'' अरुण म्हणाला, ''आपलाच!''

''यवढी माणसं कशापाई? त्वाहा पगार यास्नी सांभळता सांभाळताच संपन!'' कचरू म्हणाला. त्याचं बोलणं ऐकून अरुणला हसू आवरेना, मग त्याने स्वतःच्या पगाराचा आकडा सांगून ही माणसं सरकारनंच माझ्यासाठी नेमल्याचे सांगितले. मग कुठं कलेक्टरचा साहेबी थाट कचरूला कळला.

सकाळीच अरुण ऑफिसला जात असे, तो थेट सायंकाळी परत येई. तो बंगला दिवसभर कचरूला खायला उठायचा. अरुण गेल्यापासून कचरू तो येण्याची वाट पाहत दिवस घालविण्याचा प्रयत्न करी. वेळ काही जात नसे. तो वैतागला. ''मला कारखान्यावर नेऊन घाल.'' त्याने अरुणकडे हट्ट धरला. अरुणने समजूत घालूनही तो ऐकेना. शेवटी उद्या सकाळी नेऊन सोडतो म्हटल्यावर कचरू झोपला.

सकाळीच कारखान्यावर जायचं म्हणून कचरू लवकर उठला. सर्व आवरून निघण्याची वाट पाहू लागला. अरुण आला. त्याच्याबरोबर कुणीतरी अनोळखी मुलगी बंगल्यात आली. कचरू समोर येताच अरुणने खुणावल्यावर ती मुलगी कचरुच्या पाया पडली. कचरूला काही समजेना. अरुणने 'ही रश्मी' अशी तिची ओळख सांगून माझ्याबरोबर ट्रेनिंगला असल्याचे सांगितले. कचरूने तिच्या पाठीवरून हात फिरवत तिला न्याहाळले. मुलगी नक्षत्रासारखी छान होती. पुढे कचरू काही विचारण्याआधीच अरुणने खाली पहात 'ती मला आवडली असून तिच्या कुटुंबाची माहिती देत आम्हाला लग्न करायला परवानगी द्या' असे विचारले. त्यावर कचरुने दोघांना जवळ बोलवत खाली वाका म्हणताच घाईघाईने दोघांनी कचरुच्या पायाला स्पर्श करून कचरूने परवानगी दिल्याचे ओळखले. दुपारी अरुणने त्याच्या ड्रायव्हरला पाठवत कचरूला कारखान्यावर नेऊन सोडले.

कारखान्यावर येताच कचरूने अरुणचा बंगला, नोकर-चाकर व त्याला नक्षत्रासारखी भासलेली रश्मी सारं-सारं ओस्वालसाहेबांना, ऊसतोड कामगारांना सांगितले. ते ऐकून अनेकांनी तोंडात बोटं घातली.

नोकरीबरोबर छोकरीही अरुणनेच शोधल्याने कचरूची त्याच्या लग्नाविषयीची काळजी मिटली होती. पुन्हा तो मुकादमाचं काम करू लागला. त्याला येऊन १५ दिवस झाले नाही तोच अरुणचे परत बोलावणे आले. त्याला काही कळेना. सर्व काही ठीकठाक तर असेल ना? अरुणला भेटेपर्यंत त्याची काळजी वाढली. धुळ्यात पोहोचल्यावर अरुणला सुखरूप पाहून त्याला शांतता लाभली.अरुणने त्याला रजिस्टर लग्न करणार असल्याचे सांगितले. आपला मुलगा एवढा मोठा जिल्हाधिकारी; तो चुकीचं काय करणार? कचरुने त्याला परवानगी देऊन टाकली. पण ओस्वालसाहेब व कारखान्याच्या अध्यक्षाला बोलविण्याचे त्याच्याकडून वदवून घेतले.

ठरलेल्या तारखेचे निमंत्रण अरुणने फोनवरूनच ओस्वालसाहेब व कारखान्याच्या अध्यक्षांना दिले. नोंदणी पद्धतीने रश्मीच्या घरचे पाच-सहा लोक अरुणकडून कचरूसह कारखान्यावरील मंडळी अशा पंधरा-सोळा लोकांच्या उपस्थितीत दोघांचा विवाह संपन्न झाला. लग्नानंतर देव- देवतांचे दर्शन झाले. जोडी हनीमूनला गोव्याला गेली.

नव्याची नवलाई संपली. दोघांची गृहस्थी सुरू झाली. कचरूने पुन्हा कारखान्यावर जाण्याचा विषय काढला. अरुण काही जाऊ देईना. कचरूचा नाइलाज झाला. एवढ्या मोठ्या बंगल्यात अरुण ऑफिसला गेल्यावर कचरू आणि रश्मी एकटीच रहात असल्याने रश्मीने तिच्या आत्याला बोलाविले. तिची आत्या बंगल्यात येईपर्यंत ती कचरूशी व्यवस्थित वागत होती. पण आत्याने तिला कानमंत्र दिल्यावर कचरूशी तिची वागणूक बदलली. कचरूने मात्र त्याकडे दुर्लक्ष केले. हेळसांड, टोचून बोलणे त्याला नित्याचे झाले. पण कचरूने एक चकार शब्दही काढला नाही. मग मात्र रश्मीच्या आत्याने व तिने कचरूला बंगल्याबाहेर काढण्यासाठी स्वतःची मर्यादा ओलांडली.

एकदा अरुण प्रशिक्षणासाठी मुंबईला गेला असताना दोघींनी घरातील दागिने कचरूच्या खोलीत ठेवून दागिने चोरी झाल्याचा बनाव केला. पोलिसांत तक्रार दिली. कधी नव्हे ते पोलीस वेळेत हजर झाले. कलेक्टरच्या घरी चोरी म्हटल्यावर वेळेत यावेच लागणार ना!

पोलिसांनी कोणावर संशय विचारत बंगल्यातील नोकरांसह कचरूचीही रूम चेक केली. कचरुच्या रूममध्ये चोरीला गेलेले दागिने सापडले. ते पाहून कचरूचा थरकापच उडाला. पोलिसांनी दरडावून त्याला विचारताच तो गयावया करू लागला. रश्मीकडे पाहत 'तू तरी ह्यास्नी सांग' म्हणून विनवू लागला. शिकार जाळ्यात अडकल्यावर कुठं शिकारी सोडत असतो का? रश्मी तडक बंगल्यात निघून गेली. पोलिसांनी कचरूला पोलीस ठाण्यात नेत लॉकअपमध्ये टाकले. रश्मीची व तिच्या आत्याची सारी खेळी कचरूच्या लक्षात आली. कचरूने लॉकअपमध्ये रात्र जागून काढली. त्याच्या २५ वर्षांच्या तपश्चर्येचे फळ 'लॉक-अप?' कचरू गंभीर झाला.

सकाळी मुंबईवरून परतलेल्या अरुणला मीठमिरची लावून चोरीचा बनाव रश्मी व तिच्या आत्याने सांगितला. बापावर चोरीचा आळ..? अरुणची तळपायाची आग मस्तकाला गेली. बेसावध उभ्या रश्मीच्या त्याने कानाखाली वाजविली. तो तडक पोलीस ठाण्यात पोहोचला. कलेक्टर आलेले पाहून पोलिसांची एकच धावपळ उडाली. ज्या इन्स्पेक्टरने कचरूला आत टाकले, त्याच्यावर यथेच्छ तोंडसुख घेत त्याने कचरूला बाहेर काढले. निर्विकार भावाने त्याच्याकडे पाहत बाहेर आलेला कचरू तडक पोलीस स्टेशनमधून रस्त्याला लागला. अरुणने त्याच्यामागे पळत त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु, कचरू थांबला नाही. अरुणने त्याचा रस्ता अडविला.

मग कचरूला रहावेना. तो म्हणाला, ''त्वाही बायको मला तुरुंगात घालायला अन् तू बाहेर काढायला.. मपला नाय जमणार हा खेळ..तू अन् त्वाही बायको सुखानं रहा. माहा कारखानाच बरा!'' म्हणत त्याने रस्त्याने चाललेली काळी-पिवळी जीप थांबविली. जीपमध्ये बसून तो निघून गेला.

त्याला 'थांब' म्हणायला अरुणकडे शब्द नव्हते. पुन्हा कारखान्यावर आलेल्या कचरूने साखर शाळेच्या शिक्षकांची भेट घेत निराधार पोरांना मुकादमीतून मिळणारा पैसा मदत म्हणून देण्यास सुरुवात केली.

नियतीने अर्ध्यावरच संसार मोडूनही घेतलेल्या अग्निपरीक्षेत तो पास झाला खरा, पण स्वार्थी समाजाने घेतलेल्या अग्निपरीक्षेत मात्र तो नापास झाला होता.



# तू तिथं मी

रेल्वेचा भोंगा वाजला तशी आरती डब्यात शिरली. प्रचंड गर्दीतून वाट काढीत पहिल्या बोगीत आली. पाय हलवण्यासाठी नीट जागा नसल्याने तशी उभी राहिली. गाडीने दौंड जंक्शन सोडले. डब्यातल्या कोंदट वातावरणात तिच्या कपाळावरून गालावर घामाचा ओघळ आला होता. खिडकीतून झेपावणाऱ्या गार वाऱ्यामुळे तो आपोआप सुकू लागला. दौंड-पुणे हा दीड तासाचा प्रवास आता उभ्यानेच करण्याची मानसिकता तयार करून ती १५ मिनिटांपासून प्रवास करीत होती. पण डब्यात पाय हलविण्यासही जागा नव्हती. त्यात पाठीवरच्या बॅगेने तिला कळ लागली. मग मात्र इतक्या वेळ ताठ उभी असलेली आरती जरा वाकली.

तिने बोगीत नजर फिरविली. टेकण्याइतकीही जागा दृष्टिक्षेपात येईना. समोरच्या बाकावर खिडकीच्या कडेला एक मुलगा बॅगवर डोके टेकवून झोपला होता. तिथे तिला जागा मिळण्याची संभावना होती. पण त्या मुलाला उठविणार कोण? या विचारात असतानाच शेजारी बसलेल्या लहान मुलाच्या रडण्याने 'त्या' मुलाची झोप मोडली. ते पाहून आरतीला जरा हायसे वाटले. त्या मुलाने बॅगवरील मान सरळ करीत जोराची जांभई देण्यासाठी उघडलेले तोंड बंद करतानाच त्याला समोर आरती दिसली. त्याने डब्यावर नजर फिरविली. स्वतःची बॅग बाकाखाली घातली. तोच गर्दीतून कोणी टेकण्याआधी पाठीवरची बॅग पुढे घेत आरती दाटीत बसली. उभे राहून ताटकळण्यापेक्षा त्या दाटीतही बरे वाटले. ज्या मुलाने बॅग बाजूला करीत दाटीत जागा दिली, त्याला 'थँक्स!' म्हणावसं तिला वाटलं, पण म्हणणार कसं? बसताना

इंटरव्ह्यू तर गेलाच गेला; पण बी.ए.पर्यंतची सर्व ओरिजनल सर्टिफिकेट्स हरवली. त्यामुळे निराश मनाने व धीम्या पावलांनी ती स्टेशनकडे निघाली. आता घरी गेल्यावर पप्पा, पूजाला काय सांगणार यापेक्षा सत्यजितला फेस करणं तिच्यासाठी मोठी तारेवरची कसरत ठरणार होती. कारण चुलत भाऊ असूनही घरात त्याचा खूप दरारा. तो आरतीला सख्ख्या बहिणीप्रमाणे जपायचा. तिच्या चांगल्या कामाचं कौतुक करण्याबरोबर चुकल्यास तो किती गाल रंगवतो याची प्रचिती तिने अनेकदा घेतली होती. आताही घरी गेल्यावर तेच होणार, या विचाराने ती धास्तावली.

आरती स्टेशनवर आली. घड्याळाचा काटा साडेतीनवर आला होता. चारच्या पुणे-मनमाडची वाट पाहत ती फलाटावरील बाकड्यावर टेकली. कोठे पडली असेल बरं फाईल? आपल्या का व कसं लक्षात आलं नाही? तुझं एक काम धड नाही! आता मरा..कोण देणार.. कशी मिळवणार ही सारी सर्टिफिकेट्स पुन्हा सांग ना? ती तिलाच दूषणे देत होती.

तिचं प्रश्नचक्र सुरू होतं. पावणेचारला गाडी येण्याची अनाऊन्समेंट झाली. खिन्न झालेली आरती भानावर आली. त्याच अवस्थेत गाडीत बसली. दोन-तीन क्रॉसिंगमध्ये अडकून पडल्याने दिवस मावळतीला गाडी दौंडमध्ये आली. डब्यातून उतरताच विस्कटलेल्या केसांवर हात फिरवत आरतीने रेल्वे कॉलनीची वाट धरली. तिला अंगणात गाठत तिच्या मागोमाग आलेल्या पूजाने तिच्यावर एवढा प्रश्नांचा पाऊस पाडला की, त्यात न्हाऊन निघालेल्या आरतीची अवस्था आणखी गंभीर झाली. कारण तिच्या एकाही प्रश्नाचं उत्तर तिच्याजवळ नव्हतं.

पूजा फ्रेश झाली. घर आवरलं. दोघींसाठी चहा ठेवला. चहाचा कप आरतीसमोर करताच तो घेत आरती म्हणाली,'' पूजा, अगं इंटरव्ह्यू..?'' तिचे पुढे बोलण्याचे धाडस होईना. तोच पूजा म्हणाली, ''कागदपत्रं हरवल्याने झालाच नाही!'' हे तिचे वाक्य कानी पडताच आरतीची पुरतीच भंबेरी उडाली. हिला कसं कळलं, हा तिच्या चेहऱ्यावरील भाव ओळखून 'सांगते बाई' म्हणून पूजाने जे सांगितले

माझा नंबर लागलाच नाही, असे सांगितले. त्यावर सत्यजित काही पुढे विचारणार तेवढ्यात पप्पा आले. आरतीने अंगणापर्यंत आलेल्या दामोदरच्या हातातील पिशव्या पुढे जात काढून घेतल्या. पूजाने त्यांना पाणी दिले. आता पुन्हा पप्पा इंटरव्ह्यूविषयी विचारतील व आपण सत्यजितच्या कचाट्यात सापडू, या विचारात आरती पिशव्यातील डबा, भाजीपाला बाहेर काढू लागली.

सत्यजित, दामोदरचे बोलणे सुरू होताच तिने कान टवकारले. पण त्यांची चर्चा रेल्वे कामगार युनियनच्या बैठकीवर सुरू होती, हे ऐकून तिला जरासा दिलासा मिळाला. कामगारांच्या मागण्या, परप्रांतीय कामगारांनी केलेले गटतट, रेल्वेची भूमिका अशा मीटिंगमध्ये झालेल्या विषयांचा सविस्तर इतिवृत्तांत सत्यजितने दामोदरला ऐकवला. चांगल्या कामामध्ये येणाऱ्या कामगारांना शिव्यांची लाखोलीही मधून-मधून तो वाहत होता. त्यांची चर्चा तासभर रंगली. तोपर्यंत आरती व पूजाचा स्वयंपाक झाला होता. ते सांगण्यासाठी पूजा पुढच्या खोलीत आली. तिला पाहताच तिने सांगण्याआधी सत्यजितने 'झाला का स्वयंपाक?' म्हणत चपला पायांत घातल्या. घर सोडून तो बाहेर जेवत नाही. म्हणून तिघांपैकी कोणीही त्याला आग्रह केला नाही. 'येतो' म्हणत त्याने पायऱ्या उतरल्या खऱ्या, पण पुढे जाण्याऐवजी मागे फिरला. दारात उभ्या दामोदरला आरतीच्या इंटरव्ह्यूबाबत सांगत शहराच्या वातावरणात कशाला दगदग करण्यासाठी पाठवता; काम नाही मिळालं तरी चालेल, असा सल्ला देऊन तो गेला.

तो जाताच आरतीला हायसे वाटले. दोघींनी ताटं केली. जेवता-जेवता सत्यजितला सांगितलेला बनावट इंटरव्ह्यू आरतीने पप्पांच्याही गळी उतरविला. अर्थात पूजानेही यासाठी तिच्या 'हो'मध्ये 'खो' घातला नाही. म्हणूनच ते शक्य झाले. आरतीने सांगितलेला प्रकार ऐकून दामोदरने तू नोकरी केली पाहिजेस, असा नवस नाही. ''मिळाली तर ठीक नाही मिळाली तरी ठीक, मी आहे!'' असा विश्वास तिला दिला.

पूजाने अंथरुणे केली. तिघे झोपले. पूजा, दामोदरचा केव्हाच डोळा

माझ्याने नावाने आलंय का टपाल? तिने पोस्टमनला विचारले. पोस्टमनने उत्तर देण्यापेक्षा टपालच तिच्या हातावर टेकवले. ते तिच्याच नावाचे असल्याचे पाहून तिच्या जीवात जीव आला. पोस्टमनने दिलेले पाकीट टराटरा तिने फाडले. आत तिची सर्व सर्टिफिकेट अगदी सुखरूप होती. त्याबरोबर एक छोटासा कागद होता. तो तिने उलगडला. त्यावरच्या तीन ओळी होत्या-

***जे कठीण आहे ते सोपे करावे***
***जे सोपे आहे ते सहज करावे***
***जे सहज आहे ते सुंदर करावे***
***-धवल पटेल***

ते वाचून ती चमकली. त्या मुलाचा चेहरा आठवण्याचा प्रयत्न करू लागली. पण तेव्हाच तिने त्याला फारसे नीट पाहिले नसल्याने तिला त्याचा चेहराही आठवेना! सर्टिफिकेटबरोबर त्याने पाठवलेल्या त्या तीन ओळींमुळे तिच्या मनात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांची तिला उत्तरे मिळाली होती. आजपर्यंत तिने रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त माणुसकीचे नाते असते, त्याला प्रामाणिकपणाचा गंधही असतो, हे अनुभवलेलेच नव्हते. धवलने मात्र माणुसकीच्या नात्याने तिच्यासाठी घेतलेले कष्ट तिला लाख मोलाचे वाटले. फाडलेल्या पाकिटावर घाई-घाई ती त्याचा पत्ता शोधू लागली. पत्ता सापडला. थेट सुरतमधून त्याने ते टपाल पाठविले होते.

क्षणाचाही विलंब न लावता आरतीने पेन व कागद उचलला. सर्टिफिकेट तिला परत पाठविल्याबद्दल तिने आभार मानणारे पत्र लिहून पाकिटात घातले. दळण दळायला जाताना टपाल पेटीत फेकून दिले. तिला टपाल मिळायला पाच दिवस लागले. आता हे पत्र मिळायलाही त्याला पाच दिवस लागतील. हा हिशेब करून पत्र कधी पोहोचते याचा अंदाज तिने बांधला. त्या दिवशी खऱ्या अर्थाने आपण त्याच्या ऋणातून काहीसे मुक्त होऊ, असे तिला वाटले.

तिने अंदाज बांधलेला दिवस उगवला. तिचा चेहरा आज जरा खुलला होता. दिवसभर घरातलं आवरून तिने खोलीसमोरच्या छोट्या

येत नाही. पूजा म्हणत होती, तेव्हा केला असता तर तिनं शिकवलं असतं, असं आरतीला वाटलं. तिच्या डोक्यात ई-मेलचं खूळं चांगलंच घोळू लागलं.

एकाएकी तिला आठवण झाली. आपण एस.वाय.बी.ए.ला असताना कंपलसरी इंग्रजीच्या विषयात ई-मेल कसा करायचा, हा चॅप्टर होता. ती वही शोधण्यासाठी तिने जुने कपाट उचकले. पण ती वही काही सापडली नाही. ती हताश झाली. तिची अस्वस्थता सायंकाळी घरी आलेल्या पूजाने टिपली. त्या दिवशी आरतीनेही ठरविले होते, आज तिला ई-मेल विषयी विचारूच. हातपाय धुऊन फ्रेश झालेल्या पूजाला आवाज देत तिने तिच्या मनातील घालमेलीला वाट मोकळी करून दिली. त्यावर पूजा आता चिडणार, असे तिला वाटले. पूजानेही तसे दाखविले. पुढच्याच क्षणाला उद्या दुपारी सायबर कॅफेत गर्दी कमी असताना ये. सत्यजितने विचारले तर नोकरीविषयी वेबसाईट पाहायला गेले म्हणून सांग, असे सांगून सत्यजितविषयीची काळजी मिटविली.

दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजता आरती सायबर कॅफेत गेली. तिच्या चेहऱ्यावरचा तणाव पाहून पूजाने तिला धीर देत 'मी आहे, कुणी काही म्हणणार नाही' असे सांगितले. पर्समधील धवलचा ई-मेल आयडी घेऊन ती नेटवर बसली. बाजूला आरतीला बसविले. आरतीच्या नावाने अकाऊंट ओपन केले. अकौंटचे नाव काढताच त्यासाठी पैसे लागतील का, या आरतीच्या प्रश्नाने पूजा जोरात हसू लागली. आरतीला काही कळेना. मग तिने आरतीला नेटचा वापर, वेबसाईट, ई-मेल आदीविषयी पाठ पढविला. जीवनात पहिल्यांदाच कॉम्प्युटरवर बसणाऱ्या आरतीच्या तो काहीसा डोक्यावरून गेला. पण कुतूहलापोटी तिने ते सर्व लक्षपूर्वक ऐकले, पाहिले. पूजाने तिला काय ई-मेल पाठवायचा म्हणून विचारले. काय पाठवायचे याचे उत्तर तिच्याकडे  नव्हते. एवढ्यात दोन मुलं नेटवर सर्फिंग करण्यासाठी आली. पूजाने तिला पेज ओपन करून तुला जे टाईप करायचे ते या की-बोर्डच्या आधाराने कर, असे सांगून ती त्या मुलांकडे गेली. काय

नेटवर जॉब डॉट कॉमला एक ॲड असल्याचे सांगत आरतीला सांगण्यासाठी आले, असे सांगितले. तिने केलेला बनाव आरतीच्या लक्षात आला. तिनेही ती ॲड मला लगेच पाहायची म्हणत तिची 'री' ओढली. दोघींच्या बहुमतामुळे दामोदरने आरतीला पूजाबरोबर पाठविले. दोघी सायबर कॅफेवर आल्या. आधीच्या मुलाकडून पूजाने हिशेब घेतला. गर्दी तशी कालच्यापेक्षा जास्तच होती. तरीही पूजाने आरतीला एक पी.सी. दिला. नेट जोडून दिले. आरतीने थोडीफार प्रगती दाखवत तिचे अकाऊंट ओपन केले. पूजाने तिला 'इनबॉक्स क्लिक' करण्यास सांगतले. इनबॉक्स ओपन होताच पहिला मेल धवलचा होता. पूजाने आरतीला त्यावर क्लिक करण्यास सांगितले. धवलनेही आरतीच्या मैत्रीच्या एसएमएसला त्याच शैलीत उत्तर पाठविले होते.

***हजारो मैलांचा प्रवास करून***
***येणाऱ्या लाटांची किनाऱ्याशी भेट असते***
***काही क्षणांची तितकीच मैत्री कर माझ्याशी***
***मात्र, ओढ असू दे हजारो मैलांची***

हे वाचून आरती थक्कच झाली. कारण तिने दिलेल्या मैत्रीच्या हाकेला धवलने दिलेले उत्तर खूपच समर्पक होते. सायबर कॅफेतून आरती घरी आली. त्याने पाठविलेले उत्तर ती मनातच राहून राहून आठवू लागली. धवल एक चांगला मित्र होऊ शकतो याची प्रचिती तिला त्याच्या उत्तरातून मिळाली.

पुढे ती दिवसाआड धवलला 'ई-मेल' करू लागली. तोही न चुकता मेल पाठवू लागला. आरतीने स्वतःहून त्याला काही विचारण्याआधीच त्याने मेलमध्ये मूळचा तो महाराष्ट्रीयनच असून घरच्यांबरोबर भांडणे झाल्याने सुरतमधील एका बँकेत जॉब करीत असल्याचे सांगितले. आरतीनेही स्वतःचं शिक्षण, दीनचर्या मेलमधून पाठविली. एकमेकांच्या आवडीनिवडी कळल्या. काही अंशी स्वभाव कळू लागले. दोघंही चांगले मित्र झाले. सराईत मेल सर्फिंग करणाऱ्याला लाजवेल अशा स्पीडने आरती नेट सर्फिंग करू लागली.जे ई-मेल शिकण्याआधी

हाताने आरतीने रिसिव्ह केला.

तिकडून धवल म्हणाला, ''हॅलो, पूजा.. आरती कुठंय?'' त्याचे बोलणे ऐकून आरती म्हणाली, ''मी आरतीच बोलते''. धवलने तिच्या तब्येची विचारपूस केली. तिने मेल न केल्याने त्याची झालेली दुरवस्था, निर्माण झालेली ओढ सांगता-सांगता मी तुझ्याशिवाय राहूच शकत नाही, हे त्याचे वाक्य कानी पडताच आरतीच्या काळजाचा ठोका चुकला. काय बोलावे ते तिला सुचेना. ती 'अरे पण...' म्हणेपर्यंत तिला मध्येच थांबवत धवलने तिला प्रपोज केले. आरतीचा बांध फुटला. ''प्लीज, तू मैत्रीचा गैरअर्थ काढू नकोस, हे शक्य नाही.'' तिने त्याला सुनावले. तो काही ऐकेना. आरतीने त्याची समजूत काढीत उद्या तुला याविषयी सविस्तर मेल करते सांगत फोन कट केला.

फोन पूजाच्या हातावर टेकवत ती कॉटवर बसली. तिची अस्वस्थता पाहून पूजा तिला 'सॉरी' म्हणू लागली. ''माझ्यामुळंच झालं सगळं!'' पूजा म्हणाली.आरतीने उलट तिला जवळ घेत तुझी काही चूक नाही, असे सांगितले.

त्या दिवशी रात्रभर आरतीला झोप लागली नाही. धवलला कसे समजवावे हा तिच्यापुढे मोठा प्रश्न होता. तिने रात्रभर विचार केला. सकाळी सर्व कामे आटोपली. पूजाच्या कॉलेजबाहेर जाऊन तिची वाट पाहू लागली. कॉलेज सुटले, पूजा आली. पूजाच्या ड्युटीआधीच पूजा तिला सायबर कॅफेवर घेऊन गेली. आरतीने तिचे अकाऊंट ओपन केले. तब्बल दोन पेज मॅटर टाईप करून धवलला समजविण्यासाठी मेल पाठविला. इनबॉक्समध्ये येत ती इतर कंपन्यांचे मेल चेक करू लागली.

तोच पूजाचा मोबाईल खणखणला. मेल चेक करता करता आरतीने कान टवकारले. पण पूजाने फक्त 'हो... हो' म्हणत फोन ठेवल्याने तिला काहीच लिंक लागली नाही. फोन कुणाचा, विचारण्यासाठी ती नेट डिस्कनेट करणार तेवढ्यात पूजाने तिच्याजवळ येत ''धवल तुझ्या मेलचे उत्तर लगेच पाठवतोय, जाऊ नकोस'' तिने सांगितले. त्याचे उत्तर वाचण्यासाठी ५ मिनिटांत आरतीने दहा वेळा इनबॉक्स

सूर्य डोक्यावर आला होता. तरीही धवल येण्यास अख्खा एक तास बाकी होता. तो आल्यावर भेटणार कुठं? म्हणून ती कोणत्या फलाटावर गर्दी कमी आहे हे शोधू लागली. पण, असा फलाट पुणे स्टेशनवर नव्हताच. ती तशीच चालत पुढे गेली. स्टेशनच्या एका टोकावर पार्सल ऑफिससमोर थबकली. कारण फलाटावरील तोच स्पॉट कमी वर्दळीचा होता. काही हमाल पार्सल पॅक करीत होते. कामात व्यग्र असल्याने त्यांनी तिच्याकडे पाहिले नाही. आरतीला मनोमन बरे वाटले. कारण तिला कोणी पाहू नये, हीच तिची इच्छा होती. पार्सल ऑफिसच्या बाजूला एका रिकाम्या चेंबरमध्ये ती बसली. तेथे प्रवाशांचा गोंगाट नसला तरी रेल्वेच्या बोग्यांनी तिला कानठळ्या बसू लागल्या, पण तेथून उठावंस तिला वाटेना! कारण धवलला भेटण्यासाठी हीच जागा योग्य असल्याचे तिच्या लक्षात आले होते.

फलाटावरील घड्याळाचा काटा पाऊणवर गेला. आरती त्या बेंचवरून उठली. पुन्हा वेटिंगरूमच्या अलीकडे असलेल्या एस.टी.डी.बुथजवळ आली. पर्समधून चिट्ठी बाहेर काढीत तिने धवलला फोन लावला. त्याने १० मिनिटांत गाडी पुणे स्टेशनवर येतेय. तू कोठे आहेस, म्हणून विचारले. आरतीने त्याला एक नंबर प्लॅटफार्मवर कोपऱ्यातील पार्सल ऑफिससमोर येण्यास सांगितले. तिने घाईघाईने फोनचे बिल विचारून पैसे एसटीडीवाल्याच्या हातावर टेकविले. पुन्हा आल्या त्या गतीपेक्षा जोरात ती पार्सल ऑफिससमोर आली. तिला काळजी होती ती आपण मनोमन आरक्षित केलेल्या बेंचवर कोणी बसते काय; पण तसे काही झाले नाही. श्वासांची वाढलेली गती नियंत्रित करीत ती पुन्हा त्या बेंचवर बसली.

धवलने सांगितलेली दहा मिनिटे पूर्ण झाली.समोरून येणाऱ्या प्रत्येक माणसात तो कुठे दिसतो की काय, तिची नजर शोधू लागली.तिचा शोध काही संपेना. धवल काही येईना. दहा मिनिटांची वीस मिनिटे झाली. आता मात्र आरतीची अस्वस्थता वाढू लागली. तेवढ्यात तिला मागून आवाज आला, तो जरा तिला ओळखीचा वाटला म्हणून तिने मागे पाहिले. पाहते तर काय, तिची नजर गर्दीत शेकडो फुटांवर ज्याला

वर्षांपासून केवळ पूजा व पप्पांच्या आधारानेच घरालाच जग मानून जगते. धवल, विधवांचे विवाह होतात रे; पण एच.आय.व्ही. बाधित विधवांचे नाही, हे सांगताना आरतीचा कंठ दाटून आला. तिला पुढे बोलवेना!

आरतीची करुण कथा संपली. वातावरण पुन्हा निःशब्द झाले. पुन्हा धवलनेच कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. ''जो प्रश्न मी तुला विचारणार होतो, तोच तू मला विचारलास, योगायोगच हा..! आता माझं ऐक'' म्हणत धवल बोलू लागला...

मी धवल पटेल. सुरतमधील बँकेत नोकरीला. आपल्या मैत्रीनंतर हीच माझी ओळख तुझ्यासाठी तरी. माझ्या या चेहऱ्यामागेही अजून सत्य लपविणारा एक चेहरा आहे, तो कदाचित तुला माहीत नाही. मी सांगितला तरी तू विश्वास ठेवणार नाही असाच आहे तो.

त्याचे बोलणे ऐकून आरतीच्या चेहऱ्यावरील वाढलेला तणाव आणखी वाढण्याच्या आत धवल म्हणाला, मीही एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह आहे. तारुण्यात मित्रांबरोबर केलेल्या एका चुकीने आयुष्याची राखरांगोळी केली. घरी समजताच घरच्यांनी मला घरातून हाकलले. जन्म महाराष्ट्रातच झाल्याने गुजरातविषयी मातृभूमी असूनही फारशी माहिति नव्हती. जगण्यासाठी उपचार गरजेचा होता. माझ्या गरजेला सुरतच्या एका मित्राने साथ दिली, म्हणून सुरतला गेलो. बँकेत काम करून मिळणाऱ्या पैशांवर जगतो आहे. त्या दिवशी मित्राला भेटून नाशिकवरून सुरतला परतताना तू रेल्वेत भेटलीस. ती भेट आयुष्य बदलविणारी ठरली. तुला प्रपोज करून मला तू शरीराने नको, तुझं प्रेम हवं होतं. पण योगायोग बघ...''

त्याचं बोलणं ऐकून तो आधी म्हणाला त्याप्रमाणे आरतीचा विश्वास बसेना. पण त्याच्या चेहऱ्यामागील तो चेहरा मात्र तिला सत्याची प्रचिती देत होता. त्याचे कथन ऐकून आरतीला दुःखही वाटले अन् आनंदही. कारण तिने भोगलेले भोग धवलनेही भोगले होते. फरक एवढाच होता, तिच्या नशिबी ते दुःख दुसऱ्याच्या चुकीमुळे तर धवलच्या नशिबी स्वतःच्या चुकीमुळे आले. पण समदुःखी माणूस भेटल्यावर दोघं

वाढला. विचाराच्या कक्षा रुंदावल्या. खरोखर आरती धवलच्या प्रेमात पडली. समाजाची सारी बंधने झुगारून प्रेमाचा होकार धवलला कळविण्यासाठी ती सायबर कॅफेत पोहोचली. लिहावं काय सुचेना. दोघांच्या भेटीचा भूतकाळ आठवला. कळत नकळत तिची बोटे की-बोर्डवरून फिरू लागली.

***सहज भेटलो आपण एका वळणावरती***
***सहज जुळली आपली नाती***
***कधी न तुटायची अशीच बहरत राहो***
***प्रेमकहाणी आपल्या मिलनाची***

तिने मेल सेंड केला. पूजाला त्याच्या मोबाईलवर फोन करून मेल पाहून त्याला उत्तर कळविण्यास सांगितले. कामातून फुरसत काढत मेल पाहून अर्ध्या तासाने धवलने उत्तर सेंड केले.

***लाटेचे असते एकच लक्ष्य***
***काही करून किनाऱ्याला गाठायचं***
***किनाऱ्यालाही नसते का वाटत कधी लाटेकडे धावावं?***
***कदाचित वाटत असूनही त्याला ते शक्य नसावं***
***पण आता शक्य आहे तुझ्यामुळे..***

आरतीने त्याचे उत्तर वाचले. उजाड वाळवंटात दररोज वाहणाऱ्या वाऱ्यांबरोबर ढगही यावेत. त्यांनी पाण्याच्या एका थेंबासाठी अतूर त्या वाळवंटातील रेतीत धो धो पाऊस कोसाळावा अन् त्या पावसात वाळवंटातील निवडुंग चिंब चिंब भिजावे, तशी आरती धवलच्या प्रेमरुपी पावसात चिंब भिजली. ती एक विधवा आहे, हे ती केव्हाच विसरली. नवतारुण्यातील मुलीच्या प्रेमाप्रमाणे तिचे व धवलचे प्रेम फुलू लागले. वैधव्य व एच.आय.व्ही. मुळे जीवनाचे गाणे विसरलेली आरती धवलमुळे ते सुरात गाऊ लागली. तिच्या चेहऱ्यावर कैक वर्षानंतर आलेली आनंदाची झळाळी पाहून दामोदर मनोमन सुखावला. पण हा बदल कशाचा हे विचारण्याचे धाडस मात्र त्याने मुलीला केले नाही. कदाचित आपण विचारल्याने तिच्या चेहऱ्यावरील ती झळाळी जाईल याचीच त्याला भीती होती.

प्रयत्न केला. पण ती काही ऐकेना. शेवटी तिला मागच्या रुममध्ये त्यांनी कोंडले. रात्रभर तिच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते. धवलचे काय झाले असेल या विचारानं तिचे डोके सुन्न झाले. रात्री न जेवलेल्या आरतीला सकाळी पूजाने जेऊ घालण्याचा प्रयत्न केला. पण ती जेवेना, गोळ्या खाईना! शेवटी दुपारी दामोदरने तिला स्वतःची शपथ दिल्याने तिने रडत-रडत दोन घास खाल्ले. धवल भेटल्यामुळे बदललेली आरती पुन्हा तिच्या पहिल्याच बेरंग आयुष्यात हरवली. धवलचा विरह तिला बेचैन करू लागला. तिने बोलणे सोडले. गोळ्या चालू असूनही तिची प्रकृती खालावली. मग मात्र दामोदर घाबरला. त्याने तिला एच.आय.व्ही.ची ट्रिटमेंट सुरू असलेल्या पुण्याच्या डॉक्टरांकडे नेले. डॉक्टरांनी तिची खालावलेली प्रकृती पाहून तिला ॲडमिट करून घेतले. वेगवेगळ्या पद्धतीने तिच्यावर उपचार सुरू केले. पण उपचारास तिचे शरीर साथ देईना! तिच्या बोलण्यावरून तिच्यावर मानसिक आघात झाल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले. याबाबत विश्वासात घेऊन त्यांनी दामोदरला विचारणा केली असता दामोदरने झालेला प्रकार डॉक्टरांना सांगितला. डॉक्टरांना आरतीचा खरा आजार समजला. त्यांनी तात्काळ धवलला शोधण्यास सांगितले. दामोदरने यात सत्यजीतचा अडसर सांगताच डॉक्टरांनी सत्यजीतला बोलावले. आरतीची दुरवस्था दाखवली. ती पाहून सत्यजीतच्या काळजालाही पाझर फुटला. बहिणीला वाचविण्यासाठी त्याने डॉक्टरांचा सल्ला मानला. पूजाकडून धवलचा मोबाईल घेतला. परंतु, तो स्वीच ऑफ होता. अखेर त्याला शोधण्यासाठी तिच्याकडून सुरतचा पत्ता घेतला. पूजाला आरतीजवळ ठेवून दामोदर व सत्यजीत धवलला शोधण्यासाठी सुरतला जाण्यास निघाले.

रात्रभर रेल्वेने प्रवास करून सकाळी सुरतमध्ये उतरले. सत्यजीतच्या बँकेचा पत्ता होता. पण गुजराथी बोलता येईना म्हणून रिक्षावाल्याला पत्ता समजेना. पण हे लोक मराठी बोलत असल्याचे पाहून त्याने तेथील एका मराठी व्यावसायिकाकडे त्यांना नेऊन तो पत्ता समजावून घेतला. त्या पत्त्यावर त्यांना सोडले. भाड्याचे पैसे

करून त्यांनी धवलला पुण्यात आणले. आरती तिच्या रूममध्ये बेडवरच पडलेली होती. नर्स आल्याने ती उठून बसली. नर्सने तिच्या पलीकडच्या कॉटवरील गादीचे बेडसीट बदलले. ते पाहून आरतीने तिला 'कोण पेशंट येतंय' म्हणून विचारणा केली. पण ती नर्स काही बोलता निघून गेली. डॉक्टरांनी धवलचा चेकअप करून त्याला आरतीच्या रूममध्ये शिफ्ट करण्यास सांगितले. खिडकीतून बाहेरच्या ट्रॅफीककडे पाहणाऱ्या आरतीला पाहून स्ट्रेचरवरूनच धवलने तिला आवाज दिला. तो ऐकून आरती चमकली. तिने मागे पाहले. स्ट्रेचरवर धवलला पाहून तिने हाताचे सलाईन काढून फेकले. त्याच्या गळ्यात पडून ती रडू लागली. डॉक्टरांनी दोघांना 'आता काळजी करू नका, तुम्ही बरे झाले की सत्यजीतने नाही लावले तरी मी तुमचे लग्न लावून देईल. लवकर बरे व्हाल!'' असा विश्वास दिला. दामोदर, सत्यजीतने धवलला बेडवर झोपविले. धवल आलेला पाहून पूजाही सुखावली. पूजा व दामोदर जेवणाचा डब्बा आणण्यासाठी बाहेर गेले. सत्यजीत डॉक्टरांच्या केबिनमध्ये गेला. नर्सने धवलच्या अंगावरील कपड्यातील मोबाईल व त्याला लावण्यासाठी सलाईन घेऊन आली. मोबाईल त्याच्या हातावर टेकवत तिने त्याला सलाईन लावले. नर्स निघून जाताच धवलने बंद मोबाईलचा स्वीच ऑन केला. मेसेजध्ये जाऊन एसएमएस टाईप करू लागला. पूजाचा मोबाईल त्याने आरतीच्या उषालगत पाहिला होता. त्यावर तो त्याने सेंड केला. एसएमएसची ट्यून वाजताच आरतीने मोबाईल हातात घेत एसएमएस ओपन केला.

***दुसऱ्यांना सावली देणाऱ्या माणसांच्या आयुष्यात***
***नेहमीच ऊन असतं***
***जीवन म्हणजे दुसरे, तिसरे काय हो***
***ऊन-सावल्यांचा खेळच तो***
***फरक एवढाच काही सावलीत ऊन शोधतात***
***तर काही उन्हात सावली***
***जस तू आणि मी...***

तो वाचून आरतीने त्याच्याकडे पहात तोच एसएमएस फक्त एक

# बॉटम लाईन

'हाऊ डर्टी...! निलेश शहाण्या कुठला घाणेरड्या जागेत घेऊन आलास' नाकाला रुमाल लावत अमित म्हणाला.

'ये तो ट्रेलर था.. पिक्चर अभी बाकी है' निलेश खड्ड्यातून बाईक बाहेर काढत म्हणाला. ऐ फिल्मी हिरो गाडी रूका, मेरेको नही आना। तुझा लाल बत्तीचा ट्रेलर बघितला. पिक्चर तू एकटाच बघ रे बाबा, अमित म्हणाला. अमित चीडल्याचे लक्षात येताच निलेश म्हणाला, 'सॉरी यार सहज चेष्टा केली रे. हे बघ, कार्यक्रम स्थळापर्यंत आलो आपण' निलेशने वेड्या बाभळीखाली गाडी थांबविली. त्याच्या आधी काही गाड्या तेथेच पार्क केल्या होत्या. अमितने गाडीवरून उतरून चौफेर नजर फिरविली. पाच-सहा रिकाम्या खोल्या. एक चहाची टपरी, उघडीच फिरणारी लहान मुले. त्या खोल्यांपुढं बसलेल्या काही वृद्ध पण शरीराने अवाढव्य वाढलेल्या महिला. कमालीची अस्वच्छता, त्यातून निर्माण झालेली दुर्गंधी त्याला जाणवली. गाडी लॉक करून निलेश त्याला म्हणाला, कार्यक्रम तिकडे नाही या समोरच्या इमारतीत आहे. दोघेही हॉलसारख्या दिसणाऱ्या इमारतीत गेले. इतक्या वेळ अमितची नजर जी गोष्ट पाहण्यासाठी भिरभिरत होती त्या वेश्या हॉलमध्ये बसल्या होत्या.

कार्यक्रम सुरू झाला होता. लाल साड्या व लाल ब्लाऊज घालून बसलेल्या वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांनी हॉल गच्च भरलेला होता. व्यासपीठापर्यंत जाण्यासाठीही रस्ता नव्हता. कार्यक्रमाचे संयोजक काळे मामांनी पत्रकार आल्याचे पाहताच बसलेल्या वेश्यांतून वाट काढीत त्यांना व्यासपीठापर्यंत आणले. व्यासपीठाच्या कडेला दोघांना

लिहिण्यात दंग अमितला त्याने हाताच्या कोपऱ्याने ढुसणी देत समोरच्या मॉबमधील त्या तरुणीकडे पाहण्यास खुणविले. अमित काही पाहिना. मग निलेशने बुटाने त्याचा पाय दाबला. पायाचे वजन पडताच अमितने हिंमत नसताना चोरून मॉबमधील त्या तरुणीकडे पाहिले.

कार्यक्रम संपला! संयोजक काळे मामा पाहुण्यांबरोबर निलेश व अमितलाही जेवणासाठी आग्रह करू लागले. निलेशने अमितला विचारले. अमितने गाडी काढ म्हणत नकार दिला. पत्रकार चालल्याचे बघताच काळे मामांनी पुन्हा त्यांना आवाज दिला. जाता जाता काही वेश्यांचे इंटरव्ह्यू घ्यायचे का म्हणून विचारले. निलेशच्या मनात होते, पण अमितच्या कपाळावरील उमटलेली अढी पाहून वेळेचे कारण सांगत त्याने कार्यक्रमातून काढता पाय घेतला. येताना जसा अमितने नाकाला रुमाल लावला होता, तसाच ठेवत तो गाडीवर बसला. निलेशची प्रेस येईपर्यंत दोघेही एकमेकांशी बोलेना! निलेशचे ऑफीस आले. गाडी पार्क करीत त्याने अमितकडे पाहिले. त्याच्या कपाळावरील अढ्या कमी झाल्या नव्हत्या. निलेशने त्याला 'तुला कार्यक्रम आवडला नसला तरी त्या मॉबमधील तरुणी आवडली असेल ना' म्हणून विचारले. त्यावर निल्या, तू एक नंबरचा मूर्ख आहेस. कुठले कार्यक्रम करावे समजते का? नॉन्सेन्स, अमित म्हणाला. ये यार तुला नसली बातमी करायची तर नको करू? पण चिडू नकोस म्हणत निलेश ऑफीसमध्ये गेला.

निलेश व अमित आधी चांगले मित्र, मग पत्रकार. दोघेही ग्रामीण भागातील. सर्वसामान्य कुटुंबातले. पत्रकारितेची सुरुवात दोघांनीही सोलापुरात बरोबरच केली. निलेश मान्यवर दैनिकात तर अमित राज्यस्तरावरच्या मासिकासाठी काम करीत होता. दोघांचे विचार जुळले. दोघेही एकमेकांचे जीवलग मित्र बनले. बॅचलर असल्याने रहायला एकाच रुमवर. तारुण्याचा जोश असूनही होश जागेवर ठेवत सोलापूरच्या पत्रकारांत दोघांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली होती. निलेशने फोनवरून क्राईमचा राऊंड घेतला. शहरातून आलेल्या पत्रकावरून बातम्या बनविल्या. ऑफीसमधील 'डे'ची शीफ्ट

वाढणाऱ्या लेडीजने आवाज वाढवून आम्हाला मागा, उगाच कशातही हात घालू नका म्हणून सुनावताच दोघांनीही खाली मान घालून जेवण घेतले. जेवता जेवता का कोण जाणे, अमितला निलेशने दाखविलेल्या त्या तरुणीची आठवण झाली. निलेशने दुपारी विचारलेल्या प्रश्नाला त्याने रात्री पिल्यावर उत्तर दिले. खरोखर ती तरुणी सुंदर असल्याचे तो म्हणाला. जेवण आटोपून दोघे रूमवर आले. येतानाच निलेशने त्याला लालबत्ती भागातील कार्यक्रमाची बातमी केल्याचे सांगितले. रूममध्ये बेडवर पडताच पुन्हा अमित सुरू झाला. ''समाजाने वाळीत टाकलेल्या स्त्रिया कुठं बातमीचा विषय असतो का?'' त्याच्या तत्वज्ञानाचा पाठ तो निलेशला शिकवू लागला. निलेशने त्यालाच 'तू संवेदनशून्य समाजाचा प्रतिनिधी' असल्याची उपमा देत डोळे झाकले.

एप्रिलचा महिना असल्याने सकाळी दहा वाजताच ऊन चांगले कडाडले. स्लॅबच्या खोलीत अजूनही झोपेत असलेल्या निलेशला चांगले गरम झाले. घामाने डबडबल्याने त्याला जाग आली. घड्याळाकडे पहात त्याने घाईघाईने आंघोळ आटोपली. कपडे अंगावर चढवित अमितला उठविण्याचा प्रयत्न केला. तो काही उठेना. त्याच्या पार्श्वभागावर लाथ मारीत त्याने बूट घातले. प्रेसवर जाऊन शेड्यूल्ड घेतले. दिवसभरात तीन पत्रकार परिषद होत्या. त्यातील पहिली पत्रकार परिषद अटेंड करण्यासाठी तो निघाला. ते पाहून ऑफिसमधील शिपायाने तुम्ही लिहिलेली बॉटमलाईन वाचकांना आवडल्याचे सांगून कार्यालयात फोन आलेल्या वाचकाचे नाव दाखविले. निलेशने त्या नावावर नजर मारली. शिपायाला थँक्स म्हणत तो ऑफीसबाहेर पडला. पहिली पत्रकार परिषद वाडियापार्कला होती. त्याच्या आधी बहुतांशी पत्रकार हजर होते. त्याला पाहताच त्यातील एकाने 'प्रबोधनवादी पत्रकार' असल्याचा टॉन्ट मारला. दुसऱ्याने लगेच बॅचलर वयात याच बातमीदारीकडे ओढ असल्याचे सांगत निलेशची उडविली. निलेशने मात्र त्यांच्या कॉमेंट्सकडे लक्ष दिले नाही. कारण त्याच्या कामाची खरी पावती वाचकांनी त्याला दिली होती. त्यामुळे आपल्या बातमीची आपलेच जातभाई खिल्ली उडवीत असतानाही त्याने

अमितही पळाले. एक महिला एका पुरुषाशी भांडत होती. बघ्यांनी त्यांच्याभोवती वर्तुळाकार गर्दी केली होती. गर्दीत घुसून टाचा उंच करून भांडण पाहण्याचा दोघे प्रयत्न करू लागले, पण काही दिसेना. त्या महिलेने त्या पुरुषाला शिव्या देत गचंडण्यास सुरुवात केली. मग मात्र निलेशला रहावेना! भांडणारे दोघे कोण हे पाहण्यासाठी गर्दीतून अंग चोरून तो मध्ये घुसला. समोरची लेडीज पाहून त्याची चढलेली उतरली. ती लेडीज दुसरी तिसरी कोणी नव्हती तर निलेशने कार्यक्रमात पाहिलेली पंजाबी ड्रेसवरील तरुणी होती. धंदा करती हूँ तो कुछ भी करने को बोलेगा क्या? तिचे बोलणे ऐकून निलेशला भांडणाचे कारण समजले. ती ज्या माणसाशी भांडत होती तो नशेत होता. गर्दी फक्त बघ्याची भूमिका पार पाडीत होती. गर्दीतून दोन-तीन तरुण दमदाटी करीत पुढे आले. त्यांनी थेट त्या तरुणीला शिवीगाळ करीत मारहाण करण्यास सुरुवात केली. मग निलेशने त्या तरुणीला बाजूला घेतले. त्या तरुणांना शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यांनीच उलट निलेशलाच ''ही रांड तुझी कोण?'' विचारत त्याला मारण्यासाठी हात उचलला. निलेशला एकटा तिघांचा मुकाबला करताना पाहून अमितही मध्ये पडला. दोघे तिघांना भारी पडले. त्या गिऱ्हाईकासह चौघांना दोघांनी हाताखालून काढले. त्यांची हाणामारी सुरू असताना एक जाड महिला पोलिसांना घेऊन आली. पोलिस येताच त्या चौघांनी पळ काढला. पोलिसांनी निलेश व अमितला पाहताच 'साहेब तुम्ही...?' एक पोलिस म्हणाला. हाताची बाही सरळ करीत निलेश म्हणाला,''अहो तुमचे काम आम्हाला करायची वेळ आली. पकडा त्या भामट्यांना.'' चौघे पळाले त्या दिशेने पोलिस गेले. निलेश व अमित जाण्यास निघाले. त्यांनी केलेली धुलाई पाहून गर्दी आपोआप बाजूला सरकू लागली. त्यांना जाताना पाहून त्या तरुणीशी बोलण्यात दंग पोलिसांना घेऊन आलेल्या महिलेने त्यांना थांबविले. आमच्या छोकरीची जान वाचविली म्हणून त्यांना धन्यवाद दिले. जाता जाता निलेशने मागे वळून पाहिले. ती तरुणी विस्कटलेल्या केसांनी एक टक् त्याच्याकडे पहात होती. अमितने त्याला ओढले. दोघे मेसवर

म्हणाला.

''काय...?'' निलेश म्हणाला.

''अरे..हरामखोर.. चांगला मित्र गुड फ्रेंड मी...'' म्हणत त्याने हाताची दाही बोटे स्वतःकडे वळविली.

त्याचे मित्रप्रेम पाहून निलेश म्हणाला, ''अफकोर्स यार, यू आर माय बेस्ट फ्रेंड.''

ते ऐकून अमित आणखी चिडला. ''बेस्ट फ्रेंड म्हणतो, मग त्या रांडावर मरतो हे माझ्यापासून लपवलच का?'' म्हणत अमितने टेबल वाजविला.

''धीस ईज रॉंग, तुझ्यापासून लपवायचा प्रश्न येतोच कुठे? तू समजतोस तसं काही नाही. अरे इतकी चांगली तरुणी देहविक्री करते ही कल्पना तिच्याकडे पाहून कुणी करील का?'' निलेशने स्पष्टीकरण दिले. पण त्याने अमितचे समाधान झाले नाही. शेवटचा पेग रिचविल्यावर वेटरला हाक मारून त्याने बिल बोलविले. नशेची धुंदी त्याला चांगलीच चढली होती. ''तू आणि तुझी ती रांड गोंधळ घाला. ती का धंदा करते याचा शोध तूच घे'' अमित म्हणाला. वेटरने आणून दिलेले बिल निलेशने पेड केले. अमित बोलला त्यात तथ्य होतं. 'खरंच ती तरुणी धंदा का करीत असेल'. अमितचा प्रश्न त्याने चांगलाच मनावर घेतला. दोघेही हॉटेलच्या बाहेर आले. बाईकवरून रूमवर पोहोचले. रूमवर येईपर्यंत अमितचा प्रश्न त्याच्या डोक्यात घर करू लागला. पण दारूची धुंदी मेंदूपर्यंत जाऊन पोहोचली होती. बेडवर पडताच तो झोपी गेला.

सकाळी सर्व आटोपून तो प्रेसवर आला. रात्री पिल्यावर अमितने केलेले चाळे, बडबड तो विसरला. फक्त त्याने केलेला शेवटचा प्रश्न मात्र तो विसरला नव्हता. 'इतकी सौंदर्यवान मुलगी या व्यवसायात आलीच कशी?' परिस्थिती, अडचण, अत्याचार याचे बळी ठरलेल्या मुली देहविक्रीच्या व्यवसायात येतात हे त्याने चित्रपटात पाहिले होते. त्या मुलीविषयी असेच काहीतरी घडले असावे. पण नक्की काय? हे शोधण्यासाठी त्याच्यातील पत्रकार जागृत झाला. तिचे नावही त्याला

वैतागला. आता पंटरने त्याला सब्र करो म्हणत पुन्हा फोन ट्राय केला. दहाव्या ट्रायला तिने फोन उचलला. बिझी असल्याचे सांगत अर्ध्या तासाने पुन्हा फोन करायला सांगितला. मग मात्र निलेश आणखी वैतागला. सकाळपासून तिला शोधतोय. ती सापडूनही आता भेटेना. अरे मंत्री आम्हा पत्रकारांना लगेच भेट देतात आणि ही... पंटरने त्याची चिडचीड पाहून 'माल भारी है ना, इसलिए सब्र करना पडता है बॉस।' म्हणत त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. दिवस गेला म्हणून निलेश वैतागला होता. पण पंटरला त्याच्याविषयी वेगळाच गैरसमज झाला होता. अर्ध्या तासाने त्याने पुन्हा तिला फोन लावला. तिच्याबरोबर आलेला कस्टमर गेला होता. तिने रूम नं. १०२ मध्ये कस्टमर पाठविण्यास त्याला सांगितले. पंटरने निलेशला रूम नं.१०२ मध्ये ती वाट पहात असल्याचे सांगितले. ते ऐकून निलेश गडबडलाच. त्याने पंटरला तिला मला ओपन स्पेसला भेटायचे सांगितले. मग तर पंटरच्या चेहऱ्यावरचा रंगच उडाला. 'अजिब आदमी है। क्या पब्लिकमें कार्यक्रम करोगे?' पंटर निलेशला म्हणाला. निलेश त्याचे वाक्य ऐकून कमालीचा चिडला. त्याच्यावर खवळत त्याने पुन्हा पंटरला फोन लावून तिला ब्रेकफास्ट रूमला बोलवायला सांगितले. आता काय चालले आहे हे पंटरच्याही डोक्यावरून गेले. त्याने तिला फोन केला. तिने निलेशची ऑफर झुगारून लावली. मग मात्र रूममध्ये जाण्याशिवाय निलेशला पर्याय नव्हता. तो घाबरत घाबरत रूममध्ये गेला.

तो आत येताच त्या तरुणीने रूम आतून लॉक केली. निलेशच्या हृदयाचे ठोके वाढले होते. तो एका चेअरवर टेकला. त्याच्या चेहऱ्याचा रंग उडालेला पाहून ती तरुणी म्हणाली, 'ऊस दिन मेरी जान बचाने के बाद तुम जिस नजरसे मुझे देख रहे थे तबीच मेरे को लगा था तुम मेरे पास आओगे। चलो शुरू करते है।' म्हणत तिने अंगावरील कपडे काढण्यास सुरुवात केली. ते पाहून निलेशने तिला 'कपडे काढू नका' म्हणत मला फक्त तुमच्याशी बोलायचे आहे, सांगितले. त्यावर ती तरुणी लगेच जाण्यास निघाली. निलेशने तिला आडवत मी काही केले नाही तरी तुमचा चार्ज देतो, असे सांगताच ती थांबली.

वाईली काढले. मग तर रोहितला रानच मोकळे मिळाले. दारू आणि जुगारापाई त्याने दुकान विकले. एकदा तर दारूच्या नशेत जुगार खेळताना मलाच दावणीला लावले. दुर्दैवाचे फासे घट्ट झाले. तो हरला. त्याच्या मित्रांनी घरी येत मला जबरदस्तीने त्याच्या डोळ्यादेखत ओढत नेले. क्लबवर नेत त्या चौघांनी माझ्यावर अत्याचार केला. रोहितच्या कुकर्माला मी बळी पडले. स्वतःची हवस पूर्ण झाल्याने त्या नराधमांनी मला फूटपाथवर आणून फेकले. पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिसांनी मला रुग्णालयात दाखल केले. माझी शुद्ध हरपली होती. सकाळी मी शुद्धीत आले. माझ्याबरोबर घडलेला प्रकार दवाखान्यात आलेल्या आई-वडील, रोहितला सांगितला. त्याने ते माझे मित्र नव्हते म्हणत माझ्या चारित्र्यावर संशय व्यक्त केला. नशिबाचे फासे आता उलटे पडले होते. रोहितबरोबर माझे आई-वडीलही मला त्याच अवस्थेत दवाखान्यात सोडून गेले. जगण्यात अर्थ नव्हता. सायंकाळ व्हायला आली होती. माझ्या आयुष्यात मात्र कायमची रात्र झाली होती. अब्रू गेल्यावर जगण्यात काय अर्थ? निराशेच्या गर्तेत मी पुरती बुडाले. सलाईन तोडून हॉस्पिटलमधून पळाले. समोर रेल्वे ट्रॅक दिसला. रेल्वेखाली जीव द्यावासा वाटला. ट्रॅकपर्यंत पोहोचले. परंतु, शरीरातील रक्तस्त्राव झाल्याने चक्कर येऊन ट्रॅकलगतच पडले. शुद्धीवर आले तेव्हा चंपाबाईच्या कोठ्यावर होते. मी सांगण्याआधी माझं दुर्दैवं तिनेच सांगितलं. जगण्याची नवी आशा दाखविली. पण तिच्या स्वार्थासाठी तिने मला या व्यवसायात लोटले. देह विक्रीतून चार पैसे मिळाले तरी व्यसनी रोहितला मलाच पोसावे लागते. शेवटी त्याच्यावरील प्रेमाखातर...

अखंड सुरू असलेली तिची कहाणी रोहितपासून सुरू होत शेवटी रोहितपर्यंत येऊनच संपली. सायंकाळ झाली होती. रूममध्ये पुरता अंधार पसरला होता. तिची वेश्या होण्याची कहाणी ऐकून निलेश सुन्न झाला. ती थांबल्याने तो भानावर आला. त्याने स्वीच ऑन करीत बल्ब लावला. तिच्या डोळ्याच्या काठांपर्यंत आलेले पाणी बल्बच्या प्रकाशात चमकले. निलेशने तिची माफी मागत तुम्हाला दुखावण्याचा

तरी निलेश नर्व्हस झाला नाही. पहिल्यापेक्षा जास्त जोर लावून त्याने तिचा पिच्छा पुरविण्यास सुरुवात केली. ती धंद्यासाठी बाहेर पडली की हा तिचा पिच्छा करून तिचे मन वळविण्याचा प्रयत्न करू लागला. हा प्रकार तिचा पती पेताड रोहितला समजला. त्याने कोठ्यावरील भाई लोकांना सांगितले. निलेश प्रेसवरून रात्री उशिरा घरी येत असताना सुनसान रस्त्यावर कोट्यावरील भाई व त्याच्या पंटरने निलेशला मारहाण केली. एका कारचा लाईट चमकताच मारेकऱ्यांनी पळ काढला. मारहाणीने विव्हळत पडलेल्या निलेशला त्या कारमधील गृहस्थाने दवाखान्यात दाखल केले. डॉक्टरांनी घरच्यांबद्दल विचारताच निलेशने अमितचे नाव घेतले. हॉस्पिटलमधून फोन येताच अमित धावपळ करीत पोहोचला. डॉक्टरांनी निलेशला अतिदक्षता विभागात ठेवले होते. आपली अशी दुरावस्था पाहून तो आपल्यावर चिडणार असे निलेशला वाटले. परंतु, जखमी अवस्थेत निलेशला पाहून अमित चिडला नाही. उलट रात्रभर त्याच्याजवळ बसून राहिला. आठ दिवस त्याचे जेवण, औषधे, कपडे इतर बारीकसारीक साऱ्या गोष्टी अमितने पार पाडल्या. डिस्चार्ज मिळताच ऑटो करून दोघे रूमवर आले. निलेशच्या सामानाची बॅग टेकवत अमितने त्याच्या कपड्यांची बॅग भरली. ते पाहून निलेशने त्याला विचारले. त्यावर अमित शांतपणे म्हणाला, ''निलेश, विचार व आचारावर आपली मैत्री जुळली होती. परंतु, आता मी ज्या निलेशशी मैत्री केली तो तुझ्यातला निलेश केव्हाच संपला. मी सांगूनही तू त्या पायलचा नाद सोडला नाही. तुला असेल करिअर बरबाद करायचे, मला ते शक्य नाही. तुझी वाट वेगळी माझी वाट वेगळी. आता आपण एकत्र राहणे शक्य नाही'' म्हणत त्याने रूम सोडली.

सोलापुरात पहिल्या दिवसापासून अमित त्याला भेटला होता. दोघांचे सूर इतके जुळले होते की, सहजासहजी तुटणे अशक्य. पण पायलविषयी निलेशला निर्माण झालेल्या 'सहानुभूती'ला अमित 'आकर्षण' समजला. म्हणूनच त्याच्याविषयी निर्माण झालेल्या गैरसमजातून त्याला सोडून दुसरीकडे राहू लागला. कार्यक्रम, पत्रकार

आठवण झाली. निलेशमधील देव माणूस जवळून पाहिला होता. तो तुला नक्की मदत करेल, असे एक मन तिला सांगत होते. सर्व पर्याय संपल्याने तिने ज्या पंटरमुळे निलेशची आणि तिची ओळख झाली त्याच्याकडून निलेशचा मोबाईल नंबर मिळविला. हॉस्पिटलमध्ये कॉईनबॉक्सवरून त्याला फोन केला. रोहितच्या ऑपरेशनबद्दल सांगितले. पायलची अडचण ओळखून निलेश प्रेसमधील हातातील काम सोडून हॉस्पिटलमध्ये आला. तिने त्याला रोहितची दुरवस्था व ऑपरेशनच्या खर्चाचा आकडा सांगताना तिला रडू आवरेना. निलेशने तिला शांत करीत पुन्हा प्रेसला गेला. फोन डायरी घाईघाई बाहेर काढीत स्वयंसेवी संस्था, दानशूर व्यक्ती, पांढरपेशी समाजातील अनेक व्हीआयपींना फोन करून ऑपरेशनसाठी मदत करावी म्हणून साकडे घातले. निलेशसारख्या हाडाच्या पत्रकाराने पहिल्यांदा मदत मागितल्याने त्याने फोन केलेल्या व्यक्तींपैकी दोघांनीच ५०-५० हजार देत पायलची अडचण सोडविली.

दुसऱ्या दिवशी दुपारी रोहितचे ऑपरेशन झाले. सायंकाळी तो शुद्धीवर आला. ऑपरेशन सक्सेस झाले. त्याच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी आलेल्या निलेशला पाहून रोहित गांगरला. त्याला वाटले याला आपण गुंडाकरवी मारहाण केली. तरी हा आला कसा? त्याच्या चेहऱ्यावरील चलबिचल पायलने ओळखली. ऑपरेशनसाठी निलेशनेच पैसे गोळा करून दिल्याचे सांगितल्यावर रोहितला धक्काच बसला. आपण कृतघ्नता दाखवूनही निलेश आपल्यावर कृतज्ञ झाला. त्याने अंथरुणावर उठून बसत दोन्ही हात जोडून त्याची माफी मागितली. ते पाहून निलेश म्हणाला, ''उगाच मला लाजवू नका. शक्य झाले म्हणून मदत केली. उपकार वगैरे काही मानू नका.'' रोहितला भेटून तो जाण्यासाठी निघाला. हॉस्पिटलच्या गेट लगत आला. त्याच्या पाठोपाठ आलेल्या पायलने त्याला थांबविले. निलेश थांबला. पायल खाली वाकून थेट त्याच्या पायाला स्पर्श करणार तेवढ्यात निलेशने तिच्या दोन्ही खांद्यांना पकडून पाया पडण्यापासून रोखले.

''हा काय वेडेपणा?'' निलेश म्हणाला.

हातात आहे. निलेश सागरासारखा मोठ्या मनाचा आहे. तो तुला टाळणार नाही. प्रयत्न तर कर. तिच्या मनातील वादळ 'निलेश' या तीन अक्षराभोवती फिरू लागलं. दुसऱ्या दिवशी सकाळी तिने निलेशला फोन करून एका हॉटेलवर भेटायला बोलावलं. तिच्या मनातील  सुसाट वादळाची चाहूल निलेशपर्यंत आली नव्हती. तिने सांगितलेल्या वेळेला तो त्या हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये जावून तिची वाट पाहू लागला. तिही आली. निलेशसमोरच्या चेअरवर बसली. निलेशने दोघांसाठी कॉफी सांगितली. तिचा चेहरा त्याला आज खूपच गंभीर वाटत होता. त्यानं भेटायला बोलविण्याचं प्रयोजन विचारलं. वेटर कॉफी घेऊन आला. कॉफी चमच्याने ढवळत निलेश ती बोलण्याची वाट पाहू लागला. ती काही बोलेना. त्याने कॉफी घे म्हणत कॉफीचा कप ओठांना लावला. तेवढ्यात ती म्हणाली, ''निलेश मला हा धंदा सोडायचा.'' तिचं वाक्य कानावर पडताच निलेशची जीभ पोळली. हूस..हूस करत 'काय..? परत सांग' निलेशचा तिच्या बोलण्यावर विश्वास बसेना. तिने तिच्या मनातील वादळाला निलेशपाशी मोकळी वाट करून दिली. देहविक्रीच्या दलदलीतून बाहेर पडण्याचा तिचा प्रयत्न पाहून निलेशचा उत्साह वाढला. त्याने तिला माझ्या ओळखीवर जॉब शोधण्याचे आश्वासन देऊन बेस्टलक दिला. तिने स्वतःच्या पूर्वायुष्यामुळे जॉब मिळण्यामध्ये येणारी अडचण निलेशला सांगण्याचा प्रयत्न केला. पण निलेशने तिचे एकेले नाही. 'जॉब मी देणार आहे, तू नाही' म्हणत त्याने तिचा निरोप घेतला. तो रेस्टॉरंटबाहेर पडला. त्याला कमालीचा आनंद झाला होता. प्रेसवर येताच त्याने ती गुडन्यूज अमितला सांगण्यासाठी त्याचा मोबाईल लावला. पण फोन काही लागेना. त्याला नंतर सांगू आधी पायलसाठी जॉबचं बघू म्हणून त्याने त्याच्या इतर मित्र कंपनीला सांगितले. दैनिकातल्या जॉब व्हॅकन्सीच्या जाहिराती चाळू लागला. रात्री काम आटोपल्यावर अमितला भेटायला प्रेस क्लबवर गेला. अमित भेटला नाही आणि आता भेटणारच नाही, हे क्लबवर गेल्यावर त्याला समजले. पुण्यातल्या एका नामवंत मासिकासाठी मोठ्या पगाराची नोकरी मिळाल्याने तो सकाळीच

देऊन ते तिला तेथेच करायला लावू. यातून तिला चार पैसेही मिळतील, असे त्याने सांगितले. त्याचा फोन ठेवल्याबरोबर निलेशने वेश्यांसाठी धडपडणाऱ्या काळेमामांना फोन केला. त्यांनी त्याला 'मुक्ता'चे लोक आले पण कोठ्यावरील भाई व मम्मींनी त्यांना पिटाळून लावल्याचे सांगितले. निलेशने घाईने पायलला फोन करून 'मुक्ता' विषयी माहिती देऊन तुला पुण्याला ट्रेनिंगसाठी जायचे असल्याचे सांगितले.

पुण्यातल्या मित्राकडून मुक्ताचा फोन नंबर मिळवत त्यांना पायलबाबत सर्व कल्पना दिली. त्यांनी तात्काळ पायलला प्रशिक्षणासाठी बोलविले. रोहितची तब्येत बऱ्यापैकी सुधारल्याने पायलने एका नातलगाकडे त्याच्या जेवणाची व्यवस्था करून प्रशिक्षणासाठी पुण्याला गेली. महिनाभर मुक्ता प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी तिला मुक्ताच्या ध्येयधोरणानुसार ट्रेनिंग दिले. ग्रॅज्युएट असलेली पायल महिनाभरात परफेक्ट झाली. तिची हुशारी पाहून मुक्ताच्या अधिकाऱ्यांनी तिची सोलापूर जिल्ह्यासाठी समन्वयक म्हणून नियुक्ती केली. तिला सुरुवातीला चार हजार रुपये मानधन दिले. मुक्ताच्या नेमणुकीचे पत्र हाती पडताच पायलला ते स्वप्न वाटले. तिने रेकॉर्डवर अधिकाऱ्यांना पायल ऐवजी प्रिती नाव दुरुस्ती करायला लावले. प्रशिक्षण संपताच एका नव्या ध्येयाने प्रेरित होऊन सोलापुरात आलेल्या पायलच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाची नवी लकेर उमटली होती. तिच्या कार्यात भाई व मम्मी यांचा अडथळा नको म्हणून मुक्ताच्या शुभारंभ दिनीच लालबत्ती भागात निलेशने हुशारी दाखवत जिल्हा पोलिसप्रमुखांच्या हस्तेच मुक्ताची मुहूर्तमेढ रोवली. उद्‌घाटनानंतर झालेल्या कार्यक्रमात जिल्हा पोलिसप्रमुखांनी मुक्ताला विरोध करणाऱ्यांना जेलची हवा खावी लागेल, असा इशारा दिल्याने व पायलची पुन्हा प्रिती बनलेल्या प्रितीमागे निलेश असल्याचे भाई व मम्मी लोकांच्या लक्षात आले. त्यांनी कार्यक्रमातच निलेशच्या पुढे पुढे करीत प्रितीला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

मुक्ताची जिल्हा समन्वयक म्हणून लालबत्ती भागात प्रितीने जीव ओतून काम करण्यास सुरुवात केली. वेश्या व्यवसायात ढकलल्या

त्या लेखाची प्रत आहे का म्हणून विचारले. त्या व्यक्तीने बॅगमधून अमितने ज्या मासिकात तो लेख लिहिला होता ते मासिक निलेशसमोर ठेवले. निलेशने अनुक्रमणिका पहात पान नं.१०४ उलटले. अमितने लिहिलेल्या लेखाचे टायटल वाचून त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. लेखाचे टायटल होते, **'बॉटम लाईन ठरली वेश्यांसाठी लाईफलाईन'.**

पत्रकार म्हणून नेहमी दुसऱ्यांचे दुर्लक्षित कार्य समाजासमोर ठेवणाऱ्या निलेशने पायलला सुधारण्यासाठी केलेल्या कामाला आधी विरोध करून नंतर त्याच्या कार्याचा पुरस्कार करणाऱ्या अमितमुळे त्याला जीवनातील पहिला पुरस्कार मिळणार होता. लेखाच्या शेवटी अमितच्या नावाखाली असलेल्या त्याच्या नवीन मोबाईल नंबरवर नजर पडताच निलेशने खिशातून फोन काढीत तो नंबर डायल केला!



# ..आणि पडदा उघडला

'सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २५ फेब्रुवारी रोजी संपन्न होत आहे. ज्या विद्यार्थ्यांना गॅदरींगमध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांनी दि.१५ फेब्रुवारीपर्यंत आपली नावे वढणे व ढसाळ यांच्याकडे द्यावी. उशिरा आलेल्या नावांचा विचार केला जाणार नाही. नोटीस वाचून तिच्याखाली सही करीत प्रा. पाटील म्हणाले, एनीबडी एल्स.. कोण भाग घेणार? त्यांच्या प्रश्नाने मुला-मुलींत सुरू असलेली कुजबूज शांत झाली. कोणीच इच्छुक दिसेना. नोटीसचे बुक शपायाकडे देत पुन्हा प्रा. पाटलांनी तोच प्रश्न विचारला. मग मात्र मुलांमधून पहिल्या बेंचवरील एका मुलाने बोट वर केले. 'कोण रे तो?' पाहण्यासाठी शेवटच्या बेंचवरील मुलासह मुलींनी मुंडकी वर केली. पाटील सरांनी त्यांच्याशी कोणत्या प्रकारचे प्रेझेंटेशन करणार विचारत नाव वेळेत देण्याचे सांगितले.तोपर्यंत मुलांनी बाजार भरविला.मुला-मुलींना शांत करीत त्यांनी 'टू बी कंटीन्यू' म्हणत पुढे शिकवायला सुरुवात केली.

पण मुलांचं क्लासमध्ये लक्ष लागेना! गॅदरींगमध्ये भाग घेतला, तोही एका सेन्सिअर स्टुडंट विक्रमने. ज्यांनी कॉलेजला ॲडमिशन घेतल्यापासून कधी ढुंकूनही पाहिले नव्हते. नेहमी पुस्तकात रमणारा, त्याचे ठराविक मित्र-मैत्रिणी सोडले तर इतरांत न मिसळणारा अन् परीक्षेत गुणांचे वेगवेगळे विक्रम मोडीत काढणारा विक्रम आता रंगमंचावर कोणता विक्रम करतोय, सारीच मुलं-मुली याच विचारात होती. तोच बेल झाली. पाटील सर क्लासबाहेर जाताच विक्रमच्या मित्रांसह इतर टग्यांनीही त्यांच्याभोवती गर्दी केली. 'एम.बी.ए.चे

नागरिकच कसे खतपाणी घालतात, भ्रष्टाचारात भारताची आघाडी हे सारं त्या रिपोर्टमध्ये पाहिल्यावर विक्रम काहिसा बेचैन झाला. भ्रष्टाचारामुळे देशाची झालेली परवड त्याच्या तरुण मनाला बोचली. त्याने टी.व्ही. बंद केला. पुन्हा बेडवर पडला. खरंच लोक भ्रष्टाचार का करत असतील? त्याने स्वतःलाच प्रश्न केला. उत्तर काही मिळाले नाही. पण त्या रिपोर्टमधून एक गोष्ट त्याला क्लिक झाली. त्याने दोन्ही हातांनी टाळी वाजवत 'एस' म्हटलं. त्याच्या चेहऱ्यावरील बेचैनीची जागा उत्साहाने घेतली. त्याला नाटकाला विषय मिळाला भ्रष्टाचाराचा. त्यावरच त्याने नाटक करण्याचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी सकाळी कॉलेजवर पोहोचला. त्याला जरा उशीरच झाला होता. त्यामुळे लेक्चर हॉलच्या मागच्या दरवाजाने तो आत आला. तीन लेक्चर झाली. विक्रमचे लक्ष बेलकडेच होते. कारण मित्रांना नाटकाविषयी कधी सांगेन, असं त्याला झालं होतं. लेक्चर संपताच त्याने गुरुप्रित, अविनाशला गाठलं. तिघे कॅन्टीनवर आले. विक्रम इतकीच उत्सुकता त्या दोघांनाही होती. त्यांची व स्वतःची उत्सुकता ताणविण्यापेक्षा विक्रमने 'नाटक' करायचे सांगून टाकले. ते ऐकून विक्रमच्या नाटकाचा विषय लव्हस्टोरीच असल्याचे गृहीत धरून ओढणी डोक्यावर घेत गुरुप्रित म्हणाली, 'अनारकली तो मै ही होंगी' तिची ॲक्टींग पाहून अविनाशही तशाच अविर्भावात म्हणाला, 'तू अनारकली बनी तो मैं मर जाऊंगा, लेकीन सलीम नही बनूंगा।' त्याचं बोलणं ऐकून गुरुप्रित कमालीची चिडली. ती वही त्याच्या डोक्यात घालायला उठली.विक्रमने तिला शांत केलं. गुरुप्रितचा राग शांत झाल्यावर विक्रम म्हणाला, 'तुमचं भांडण झालं असेल तर पुढे सांगू?'

सांग ना यार, विक्रम आमचं भांडण केव्हाच मिटलं. खुर्ची उलटी करून तिच्यावर बसत अविनाश म्हणाला. विक्रमने प्रेमप्रकरण, हुंडाबळी या त्याच त्याच विषयापेक्षा 'हटके' नाटक करायचे सांगितले. भ्रष्टाचाराचा विषय त्यासाठी निवडल्याचे सांगितले. ते सांगताना त्याने टी.व्ही.वर पाहिलेल्या रिपोर्टमधील आकडेवारी जोडून हा विषय किती गंभीर व ज्वलंत आहे हे त्या दोघांना पटविले. आम्हाला काय काम?

होता. शिपाई लायब्ररी बंद करण्यासाठी खिडक्यांच्या झडपा खाली घेऊ लागला. तो आवाज ऐकून लिहिलेले स्क्रिप्ट वाचण्यात दंग विक्रमला सायंकाळ झाल्याची जाणीव झाली. त्याने लगबगीने स्क्रिप्ट बॅगमध्ये घातलं. बॅग पाठीवर अडकवून तो लायब्ररीच्या पायऱ्या उतरू लागला.त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे तेज चमकत होते. 'नाटका'च्या सादरीकरणाच्या प्रवासातील एक मैलाचा दगड त्याने पार केला होता.

सकाळी भास्कर, सुनील कॉलेजवर आल्या-आल्या विक्रमला भेटले. सांग, आमच्यासाठी कोणतं पात्र निश्चित केलं? दाखव स्क्रिप्ट. सुनील म्हणाला, व्हिलनची भूमिका आपण नाही करणार बुवा. गुरप्रित, अविनाशला घेऊन सर्वजण कॅन्टीनला बसू मग सांगतो, विक्रम त्यांना म्हणाला. ते तिघे गुरुप्रित, अविनाशला शोधायला निघाले. अविनाश जीना चढतानाच भेटला. राहिली गुरुप्रित. भास्कर क्लासरुममध्ये डोकला. तिच्या मैत्रिणींना विचारले. ती काही सापडेना! मग विक्रमच्या सांगण्यावरून चौघांनी लायब्ररीचा रस्ता धरला. त्याचा अंदाज खरा ठरला. पेपर वाचण्यात दंग गुरुप्रितला अखेर विक्रमने बारीक आवाजात मारलेली हाक ऐकू आली. चौघांना बरोबर बघताच तीही खुललीच. बॅग पाठीवर टाकीत बाहेर आलेली गुरुप्रित भास्कर, सुनीलला पाहून म्हणाली, आज सूर्य कोठून उगवला पहा रे अविनाश? तिचा टॉन्ट भास्करच्या लक्षात आला. ''सूर्य जागेवर आहे आणि आम्हीही. तूच कॉलेजला येऊन तुला सापडायला एक तास लागलाय,'' भास्कर तिला म्हणाला. त्याचं बोलणं ऐकून गुरुप्रित पुढे सरसावली. तोच विक्रम तिला म्हणाला, ''आठ दिवसांनी भेटते तरी भांडणाशिवाय होत नाही का तुम्हाला? स्क्रिप्ट ऐकायचं ना?'' स्क्रिप्टचा विषय काढताच भास्कर, गुरुप्रित, भांडण विसरून कधी गोड झाले त्याचं त्यांनाच कळलं नाही. कॅन्टीनवर येताच नेहमीच्या जागेवर न बसता थोडं तुटक चेअर घेत विक्रम बसला. त्यांच्या भोवती चौघांनी चेअर घेऊन रिंगण केले. त्यांचा प्रश्नांचा भडीमार होण्याआधी विक्रमने बॅग खोलून स्क्रिप्टच्या झेरॉक्स बाहेर काढल्या. चौघांच्या हातावर टेकवल्या.

चौघेही स्क्रिप्टवर नजर फिरवू लागले. विक्रम त्यांना आणखी

''तसाही तिच्या आयुष्यात तू व्हिलनचंच काम करतोय'' गुरुप्रित म्हणाली. गुरुप्रितने सुनीलच्या वनवे प्रेमाला वाचा फोडल्याने एकच हशा पिकला. आपली व आपल्या प्रेमाची खिल्ली उडविली जात असल्याचे लक्षात येताच सुनीलने कॅन्टीनमधून काढता पाय घेतला. त्याला जाताना पाहून सारेच उठले. स्क्रिप्ट वाचून उद्या सकाळी पहिलं लेक्चर संपल्यावर मल्टीपरपज हॉलला सर्वांनी या म्हणून विक्रमने सांगितले.

विक्रमची नाटकाची तयारी कॅन्टीनवर पलिकडच्या टेबलावर बसलेल्या एका टार्गट गँगच्या पोरानं ऐकली. विक्रम व त्याचे मित्र निघून जाताना त्याने त्यांच्या गँगचा डॉन रॉकीला मोबाईलवर फोन करून कॅन्टीनमध्ये बोलविले. रॉकी येताच त्याला विक्रमच्या नाटकाची तयारी, त्यात कोणी कोणी भाग घेतला, उद्या ते कोठे प्रॅक्टीस करणार याचा इतिवृत्तांत त्याला ऐकविला. ते ऐकून रॉकी चिडला. त्याने उद्या सकाळी साऱ्या गँगला मल्टीपरपज हॉलमध्ये बोलविले. रॉकीचा राग विक्रमवर नव्हता पण त्याने नाटकात गुरुप्रितला घेतल्याचा त्याला राग होता. कारण त्याची गुरुप्रितवर वाईट नजर होती.

ठरल्याप्रमाणे पहिले लेक्चर संपताच विक्रमसह गुरुप्रित, अविनाश, भास्कर व सुनील सारे मल्टीपरपज हॉलमध्ये जमले. विक्रमने स्क्रिप्ट समोर ठेवून प्रत्येकाला स्वतःचे संवाद बोलण्यास सांगितले. आधी गुरुप्रित व सुनीलचे संवाद होते. ते एकदम वाचल्यासारखे बोलू लागले. त्यांना थांबवत विक्रमने त्यांचेच संवाद खड्या आवाजात त्यांना ऐकविले. हॉल पूर्ण रिकामा असल्याने त्याचा खडा आवाज चांगलाच घुमला. विक्रमने सांगितलेल्या पद्धतीने सुनील संवादफेक करण्याचा प्रयत्न करू लागला. तोच रॉकी व त्याची गँग हॉलमध्ये आली. मोठ्या आवाजात गाणे म्हणून ते विक्रमच्या नाटकाच्या प्रॅक्टीसमध्ये खो घालू लागले. भास्कर त्यांना काही म्हणणार तेवढ्यात विक्रमने त्याला शांत करीत प्रॅक्टीसकडे लक्ष देण्यास सांगितले. आपण अथडळा निर्माण करूनही त्यांची प्रॅक्टीस थांबत नाही म्हणून रॉकीने गुरुप्रितचे नाव घेत 'एक फूल चार-चार माली' असा टोमणा मारला.

दुसऱ्या दिवशी अकरा वाजता चौबलसीट विक्रमच्या गाडीवरून ते फार्म हाऊसवर पोहोचले. त्यांच्या पाठोपाठ गुरुप्रितही स्कुटीवर आली. विक्रमने सर्वांना दहा मिनिटे स्क्रीप्ट वाचायला दिली. भास्करने त्याच्या बांबूच्या फार्म हाऊसचे कुलूप उघडले. विक्रम पाठोपाठ सर्वजण आतमध्ये आले. त्याने दिलेले दहा मिनिटे संपली. भास्करने दोन तुटक्या लाकडी खुर्च्या आणल्या. त्यावर गुरुप्रित व सुनीलला डॉ.व मिस. रॉय फर्नांडीस म्हणून इंटरव्ह्यू घेण्यासाठी बसविले. एक रिकामा टीप पालथा करून मुलाखतीसाठी आलेल्या उमेदवाराला म्हणजे विक्रमला बसण्यासाठी चेअर बनविली. सिटींग अॅरेजमेंट झाली. रिअलसल सुरू करणार तोच अविनाश म्हणाला, ''थांबा-थांबा.. लॉईट कॅमेरा..अॅक्शन..अॅण्ड नाऊ स्टार्ट.'' विक्रम मुलाखतीचा उमेदवार बनून आला. त्याने आत येण्यासाठी परवानगी मागितली. 'येस कमिंग' डायलॉग डॉ. रायचा, पण तो गुरुप्रितनेही उच्चारला. विक्रम आत आला. आधी गफलत झाल्याने त्याला प्लीज सीट म्हणायचे पण डायलॉग कुणाचा हे गुरुप्रित व सुनीलच्या लक्षात येईना. त्याला वाटले ती म्हणेल, तिला वाटले तो ! दोघेही म्हणेना. मग मात्र विक्रम फाईल आदळत म्हणाला, 'अरे मला बस म्हणा ना!' विक्रम चिडल्याचे पाहून दोघे 'प्लीज सीट' बरोबरच म्हणाले. मग मात्र तो आणखी चिडला. ''गुरुप्रित, सुनील तुम्ही लोकांनी स्क्रिप्ट वाचलं नाही यार! कोणी कुणाचे संवाद बोलतंय ! अरे, असं नाटक सादर केलं ना मला अंडे अन् टमाटेच तुम्ही खाऊ घालणार'' विक्रम म्हणाला. ''सुनील तू तुझेच डायलॉग म्हण'' गुरुप्रित सुनीलवर चिडली. ''तू बोलत नाहीस म्हणून तर मला तुझे डायलॉग बोलावे लागले,'' सुनील म्हणाला.

''प्लीज बी कॉन्सट्रेट यार'' विक्रम म्हणाला.

पुन्हा सारेजण स्क्रिप्टमध्ये डोके घालून बसले. भास्करने शेतावरील गड्याकडून चूल पेटवून बनवलेला चहा आणला. गरम चहा प्या व थंड डोक्याने डायलॉग म्हणा म्हणत त्याने सर्वांना चहा वाटला. चहाचा एक घोट घेऊन कप खाली टेकवित गुरुप्रित म्हणाली, आय एम रेडी' सुरू करूया. विक्रमने सुनीलला विचारले. त्यानेही रेडीचा

फार्म हाऊसवर पोहोचला. सुनीलचे संवाद भास्कर वाचून प्रॅक्टीस सुरू केली. तीन तास प्रॅक्टीस झाल्यावर कालच्यापेक्षा आज गुरुप्रितचे संवाद चांगलेच पाठ झाले. अंबादासची भूमिका भास्करने अडखळत सुरू केली. अविनाशमधील इन्स्पेक्टर नाईक प्रमाणापेक्षा जास्तच आवाज वाढवीत असल्याचे विक्रमला जाणवले. पण त्याने उत्साही अविनाशला हटकलेही नाही. सुनील असता तर दुसरा मैलाचा दगड पार झाला असता. दुसऱ्या दिवसाची प्रॅक्टीस दखल घेण्यासारखी नसली तरी इतर सर्व त्यांच्या भूमिकांशी चांगलेच समरस झाल्याचे पाहिल्यांदा विक्रमला जाणवले. त्यामुळे त्याचाही आत्मविश्वास वाढला.

सकाळी पहिले लेक्चर संपल्यावर गुरुप्रितसह अविनाश, भास्करलाही विक्रमने पार्किंगलाच थांबविले. सुनील सायकलस्टँडला सायकल लावून गडबडीने त्यांच्या दिशेने आला. सुनीलजवळ येताच आम्ही थांबायला वेडे आहोत का? म्हणत विक्रमने त्यांच्यावर चांगलेच तोंडसुख घेतले. त्याने बोलण्याचा प्रयत्न केला. पण विक्रम कुठे त्याचं ऐकण्याच्या मनःस्थितीत होता. त्याने झाप झाप झापल्यावर न राहून सुनीलनेही आवाज वाढविला. ''ऐकशील का माझं? वडील आजारी होते, येणार कसं?'' सुनील औंढा गिळत म्हणाला. त्याने न येण्याचं सांगितलेलं कारण ऐकून विक्रमसह सारेच बर्फासारखे गार पडले. विक्रमने त्याच्याजवळ जात त्याची माफी मागितली. सुनीलने 'सोड यार' म्हणत भास्करच्या फार्महाऊसवर जाण्याचा आग्रह धरला. फार्महाऊसवर पोहोचताच रिअलसलची तयारी सुरू झाली. कोणीच हसी-मजाकच्या मूडमध्ये नव्हते. प्रॅक्टीस सुरू झाली. आज पहिल्यांदाच रिअलसलसाठी विक्रमपेक्षाही सर्वचजण सिरीअस होते. एकदा नव्हे दहावेळा आज रिअलसल बिनचूक झाली. संवाद आठवण्याची किंवा अडखळण्याची कुणावरही वेळ आली नाही. त्यामुळे विक्रम तर जाम खूश होता. शेवटी ११ वी रिअलसल करून थांबण्याचं त्याने ठरवले. रिअलसल सुरू झाली. नाटकातील विक्रमची मुलाखत निम्म्यापर्यंत आली. स्क्रिप्टप्रमाणे सुनील डॉ. रॉयच्या भूमिकेतून आवाज देऊन अंबादास (शिपाई) बनलेल्या भास्करला

गुरुप्रित व सुनीलसाठी. शिपायाचा ड्रेस कॉलेजच्या शिपायाकडून घेण्याचे ठरले. मुलाखतीच्या उमेदवाराचा ड्रेस शेजारच्या इंजिनिअरींग कॉलेजच्या मुलाचा ब्लॅक अॅण्ड व्हाईट ड्रेस सूट होईल. तो आणण्याची जबाबदारी सुनीलने स्वीकारली. आता प्रश्न राहिला अविनाशच्या इन्स्पेक्टर नाईकच्या ड्रेसचा. त्याला पर्याय सुचेना. इन्स्पेक्टरच्या ड्रेसचा प्रश्न प्रलंबित ठेवत ते फायनल रिअलसलच्या तयारीला लागले.

दुपारी दोन वाजता फायनल रिअलसलसाठी गॅदरिंगमध्ये भाग घेतलेले सर्वच विद्यार्थी-विद्यार्थिनी मल्टीपरपज हॉलसमोर आले. पण काही कारणास्तव तो हॉल उपलब्ध झाला नाही. मग ढसाळ व वढणे सरांनी जिमखान्याचा हॉल निवडला. सर्व विद्यार्थी तिकडे जाण्यास निघाले. त्यांच्या पाठोपाठ विक्रम व त्यांची नाटक कंपनीही निघाली. जिमखाना विभागाच्या हॉलमध्ये सिलेक्शनची प्रोसेस व गॅदरींगची रंगीत तालीम सुरू झाली. सुरुवातीला डान्स झाले. त्यानंतर गायन, एकपात्री अभिनय, चुटकुले मग नाटकाला सुरुवात झाली. एकूण तीन नाटके होती. पहिलं 'हुंडाबळी', दुसरं 'लोकसंख्या विस्फोट' पण दोन्हीतही कमालीच्या उणिवा, कलाकार अपुरे. त्या तुलनेत विक्रमचा प्रयत्न उजवा ठरावा अशीच परिस्थिती होती. सर्वात शेवटी विक्रम व त्याच्या मित्रांना संधी मिळाली. बेंचचा उपयोग टेबल म्हणून करीत त्यांनी नाटक मोठ्या आत्मविश्वासाने सादर केलं. कुणीही अडखळलं नाही की चुकलंही नाही. विक्रमने लाचखोरी, भ्रष्टाचाराविषयी ज्या पोटतिडकीने भूमिका मांडली ती पाहून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्याला प्रतिसाद दिला. रिअलसल संपताच जिमखान्याबाहेर पडणाऱ्या विक्रमची भेट घेत अनेक मित्रांनी त्याच्या प्रयत्नावर कौतुकाची थाप टाकली. त्यात रॉकीनेही अभिनंदन करण्यासाठी हात पुढे केलेला पाहून विक्रम चमकला. इतरांचे ठीक होते पण रॉकीही. त्यानेही झाले गेले विसरून त्याच्या हातात हात दिला.

नोटीस बोर्डवर फायनल लिस्ट लागली. अपेक्षेप्रमाणे कार्यक्रमाची रेलचेल जास्त असल्याने एकाच नाटकाची निवड करण्यात आली

घेऊन येत असल्याचे त्याने सांगितले. १० वाजता पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने गॅदरिंगला आरंभ झाला. पहिल्या सत्रात मान्यवरांचा गौरव, मनोगत, फिशपॉंड झाल्यावर दुपारी १ वा. अल्पोपाहाराचा ब्रेक झाला. ब्रेकनंतर सांस्कृतिक कार्यक्रमांना आरंभ झाला. आधी डान्स स्पर्धा सुरू झाल्या. त्यानंतर गायन झाल्यावर लगेच नाटक, असा नियोजित कार्यक्रम असल्याने विक्रमने सर्वांना ड्रेस चेंज करून तयार केले. शिपायाने ठरल्याप्रमाणे स्टेजच्या पाठीमागे नाटकाच्या सेटअपसाठी टेबल व चेअर आणून दिल्या. कार्यक्रमाची संख्या जास्त, त्यात गॅदरिंग कमिटीच्या ढिसाळ नियोजनाचा उत्कृष्ट नमुना गॅदरिंग पाहणाऱ्यांनी अनुभवला. नाटकाची अनाऊन्समेंट करूनही सूत्रसंचालकांनी आयत्या वेळेला पुन्हा डान्स सुरू केले. दोन कार्यक्रमानंतर नाटक घेण्याचे विक्रमला आश्वासन दिले. पण नंतर दोनचे पाच कार्यक्रम झाले तरी सूत्रसंचालक नाटक काही घेईना. वेळ संपत चालली. शेवटी विक्रम थेट गॅदरींग प्रमुखाकडे गेला. त्यांनी होईल, थांब जरा म्हणून सांगत त्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले.

दुपार टळली. आता विद्यार्थीनीही कंटाळले होते. एकपात्री प्रयोगानंतर वेळ राहिला तर तुमचे नाटक होईल, असे सूत्रसंचालकाने सांगताच विक्रमने त्यांच्यावर राग काढीत 'आता वेळ दिला तरी आम्हीच नाटक सादर करणार नाही म्हणून सांगितले. नाटकासाठी चढविलेल्या ड्रेसवरील टाय ढिला करीत त्याने गुरुप्रित, अविनाश, भास्कर, सुनीलला ड्रेस उतरविण्यास सांगितले. ते ऐकून सर्वांचे चेहरे पडले. गॅदरिंग संपले. विक्रमचे नाटक ढिसाळ नियोजनाचे बळी ठरले. नाटक झालेच नाही. उदास मनाने त्याने स्वतःसह इतरांचीही समजूत घातली. गॅदरिंग नंतर दोन दिवस कॉलेजवर फिरकलाही नाही. त्याचे नाटक झाले नाही तरी त्याची चर्चा व नाव पोरापोरींच्या ओठावर टिकून होतेच. गॅदरिंगनंतर तो कॉलेजवर आल्यावर मित्रांनी त्याचे सांत्वन केले, तर काहींनी उगाच टॉन्टपासही. विक्रम भूतकाळात रमणारा मुलगा नव्हता. तो झालं गेलं विसरला. अंतिम वर्षाची परीक्षा दीड महिन्यावर आली होती. त्याने अभ्यासाकडे लक्ष केंद्रीत केले. त्याचे

त्या व्यक्तीस एक तास बसवून ठेवले, तरी ती व्यक्ती काही देईना मग तोंड वाकडे करून त्याने त्या वृद्धास आत सोडले.त्या वृद्धाने विक्रमसमोर त्याच्या घराचा प्लॅन मंजुरीसाठी ठेवला. तो काही देता दिसेना मग विक्रमने मी पाहतो, दोन दिवसांनी या म्हणून त्या वृद्धास सांगितले. त्या वृद्धाने इतरांप्रमाणे कागदावर वजन न ठेवल्याने विक्रमच्या टेबलावरील त्याचा प्लॅन केव्हाच उडून गेला. दोन दिवसांनी तो वृद्ध पुन्हा आला. दोन तासांनी शिपायाने त्याला आत सोडले. विक्रमने वेळेच मिळाला नाही तुमचा प्लॅन पहायला सांगत पुन्हा दोन दिवसांनी या म्हणून सांगितले. हताश झालेला वृद्ध बाहेर येताच शिपाई त्याला म्हणाला, 'बाबा गरके मारून काम होणार नाही, प्लॅन दिला पण प्लॅनच्या कागदावर वजन द्यायचे विसरला, ते ठेवा' बघा साहेब कसं लवकर काम करतोय ते. शिपायाचे बोलणे ऐकून आपल्या अडवणुकीमागचा खरा प्रकार त्या वृद्धाच्या लक्षात आला. जाताना उद्या घेऊन येतो म्हणून तो  कार्यालयाबाहेर पडला.

दुसऱ्या दिवशी सकाळी कार्यालय उघडताच तो वृद्ध कार्यालयात आला, पण त्याच्याबरोबर हायफाय साडीतील एक उंचीपुरी महिला होती. ती त्याची मुलगी किंवा सून असावी, असा शिपायाने कयास बांधला.

तो वृद्ध शिपायाजवळ आला. शिपाई त्याला बारीक आवाजात म्हणाला, आणलं का साहेबाचं पाकीट? त्याचा तो बारीक आवाज त्या वृद्धाबरोबर आलेल्या महिलेने ऐकला. ती चढ्या आवाजात म्हणाली, 'आणले ना पैसे कुठंय हे लाचखोर अधिकारी' तिने थेट हल्लाबोल केल्याचे पाहून तो शिपाई गडबडला. त्याने त्या बाईला शांत करण्याचा प्रयत्न केला, पण ती काही ऐकेना. तिचे 'ते' बोलणे ऐकूण ऑफीसमधील इतर कर्मचाऱ्यांनी कान टवकारले. तोपर्यंत तिचा आवाज केबिनमध्ये बसलेल्या विक्रमला ऐकू गेला होता. त्याने बेल मारून शिपायाला आत बोलावले. शिपायाने सारा प्रकार विक्रमच्या कानावर घातला. त्याने त्या महिलेस आत पाठविण्यास सांगितले. शिपायाने त्या महिलेला वृद्धासह आत पाठविले. ती महिला आत आली

कळले नाही. आपण काय होतो आणि आता काय झालो! धावपळीच्या जीवनात कधी आरशासमोर नीट उभा राहून स्वतःला पाहिलं असतं तर असं वाहवत गेलो नसतो. आपणही भ्रष्ट, लाचखोर असल्याचे कटुसत्य गुरुप्रितच्या भेटीमुळे त्याला स्वीकारावे लागले. ऑफीस सुटल्यावर तो घरी आला. मधल्या काळात आई गेली होती. पत्नी होती. कर्वेनगरमधील फ्लॅटवर पोहोचल्यावर पायातील शूजही न काढता तो सोफ्यावर बसला. पत्नीने दिलेले पाणी घेतले नाही. भूतकाळात तो विक्रम आणि आजचा विक्रम यांची तुलना डोळ्यासमोर आल्याने त्याचा चेहरा काळवंडला. पत्नी वसुंधराच्या काही लक्षात येईना.

रात्री जेवतानाही विक्रमने एक पोळी खाऊन हातावर पाणी ओतले. मग मात्र न राहवल्याने वसुंधराने त्याला काय झालं, कामाचं काही टेन्शन आहे का? म्हणून विचारलं. पण तो काहीच बोलला नाही. किचन आवरून बेडरूममध्ये आल्यावर वसुंधराने पुन्हा त्याला बोलते करण्याचा प्रयत्न केला. पण त्याने 'तू झोप मला झोप येत नाही' असे सांगून तिच्याकडे पाठ फिरविली. त्याच्या पाठामोऱ्या शरीराकडे पहात वसुंधरा बळेच झोपण्याचा प्रयत्न करू लागली. तासाभराने तिच्या प्रयत्नांना यश आले. तिला झोप लागली. विक्रम मात्र त्याच कुशीवर पहाटेपर्यंत पडून राहिला. गुरुप्रितने माणसाच्या गर्दीत तो हरवल्याची जाणीव त्याला करुन दिल्याने त्याच्यातील हरवलेला माणूस आज पुन्हा सापडला होता. तो त्याला स्वस्थ झोपू देत नव्हता.

सकाळी वसुंधरा उठली तेव्हा विक्रम उगाच झोपल्याचं सोंग घेत चादर तोंडावर घेऊन पडला. तिने फ्लॅट झाडून दार उघडून दूध, पेपर आत घेतले. तिने आज आवाज देण्याआधी रात्रभर जागाच असलेला विक्रम उठला. आंघोळ करून ब्रेकफास्टसाठी डायनिंग टेबलवर येऊन बसला. पोहे घेऊन वसुंधरा आली. पोह्याची प्लेट ट्रेमधून घेत त्याने तिलाही बस म्हटले. ती त्याच्यासमोर बसली. त्याची शांतता तिची अस्वस्थता वाढवत होती. एक चमचा पोहे तोंडात टाकून विक्रम बोलला. कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असताना केलेल्या नाटकाच्या असफल प्रयत्नापासूनचा आज मीच सफल भ्रष्टाचारी,

दोन कॉफी सांगितली. तिच्या सासऱ्यांना दिलेल्या त्रासाबद्दल गुरुप्रितची त्याने माफी मागितली. गुरुप्रितने 'ते सोडून बोल' म्हणताच त्याने आजपासून लाचखोरी, भ्रष्टाचार बंद केल्याचे स्वतःच्या गळ्याची शपथ घेऊन तिला सांगितले. तिला आधी तो जोकच वाटला. पण विक्रम खूपच सिरीअस होऊन बोलू लागल्यावर दलदलीत फसलेला विक्रम बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे तिला जाणवले. विक्रमने तिला प्रायश्चिताचा मार्ग सांगत जर कॉलेजच्या मुलांना घेऊन आपण न सादर केलेले नाटक सादर केले तर, काही आर्टिस्टकडून भ्रष्टाचार, लाचखोरीला प्रतिबंध करणारे पोस्टर्स बनवू. तज्ज्ञांची व्याख्याने ठेवू, पण तू साथ दिली तर. त्याचे विचार ऐकून गुरुप्रितने त्याला मित्र म्हणून 'लढ, माझी साथ आहे. पण माझी एक अट राहील', ती म्हणाली. 'सांग ना, मी ती पूर्ण करतो' विक्रम म्हणाला.

''तुझ्या त्या मूळ लाचखोरीचे नाटकात मला पुन्हा काम द्यावं लागेल'', गुरुप्रित म्हणाली. तिची अनपेक्षित पण विक्रमला आधार देणारी अट ऐकून विक्रमने तिला 'दिले काम' म्हणत तिचे 'थँक्स' मानले. ती जायला निघाली. विक्रमने तिला थांबवत यात भास्कर, सुनील, अविनाशला सहभागी केले तर? विचारले. 'अरे, पण ती सर्व आहेत कुठे हे तर शोध आधी' म्हणत गुरुप्रित निघून गेली. वसुंधराने दाखविलेल्या वाटेवरून जाताना गुरुप्रितने त्याला मदतीचा हात दिल्याने विक्रम पुन्हा कॉलेज लाईफमध्ये न सादर करू शकणाऱ्या 'त्या' नाटकाच्या रिअल लाईफमधील सादरीकरणासाठी कामाला लागला.

दुसऱ्याच दिवशी ऑफीसला रजा टाकून त्याने गावाची वाट धरली. चार तासाच्या प्रवासानंतर गावात पोहोचला. भास्करच्या घरी आधी गेला. तो इन्शुरन्स कंपनीत कामाला असल्याचे त्याच्या वडिलांनी सांगितले. त्यांच्याकडून नंबर घेत त्याने त्याला फोन केला. विक्रम घरी आल्याचा त्याला विश्वास बसेना. मग त्याने त्याच्या वडिलांकडे फोन दिल्यावर घरीच थांब, तासाभरात आलो म्हणत भास्करने फोन ठेवला. तासाच्या आत तो घरी आला. चहा-पाणी झाला. ख्याली-खुशाली कळली. भास्करने येण्याचे प्रयोजन विचारले. विक्रमने काहीच

भास्करने दिलेल्या पत्त्यावर प्राध्यापक अविनाशला शोधले. अविनाश त्याला घेऊन कॉलेजच्या कॅन्टीनवर गेला. चहा पीत पीत चार वर्षांपूर्वी जसा 'नाटका'चा विषय त्याने अविनाशला सांगितला, तसाच आज पुन्हाही. तेव्हा आणि आजही त्याच अविनाशने त्याच विक्रमला तेवढ्याच आत्मियतेने ऐकले. त्याची चुकातून सुधारण्याची धडपड पाहून 'मला तुझ्या नाटकातला ४इन्स्पेक्टरचा अभिनय जमला नाही तर माझे विद्यार्थी देईल' असे हसत म्हणताच विक्रमने मला तूच पाहिजे असल्याचे बजावून सांगितले. त्याचा मोबाईल नंबर घेऊन तो घरी जाण्यास निघाला.

जाताना रस्त्यात शिवाजीनगरमध्ये आल्यावर त्याला गुरुप्रितची आठवण झाली. त्याने कारचे स्टेअरींग तिच्या बँकेच्या रस्त्याच्या दिशेने वळविले. तिची सुट्टी होण्याची वेळ झाली होती. बँकेच्या गेटवर थांबत तिला फोन करून तुझी वाट पहात असल्याची कल्पना दिली. पंधरा मिनिटाने ती आली. दोघे कॉफी घेण्यासाठी गेले. कॉफी येईपर्यंत नाटकासाठी भास्कर, अविनाश, सुनील सर्वजण तयार असल्याचे तिला सांगितले. तिचा विश्वास बसेना. दोन दिवसात तू या सर्वांना शोधून त्यांना नाटकासाठी तयारही केलं. कसं शक्य आहे? गुरुप्रितची शंका दूर करण्यासाठी त्याने त्याच्या मोबाईलवरून भास्करला फोन लावून त्याच्याशी तिचे बोलणे करून दिले. भास्करनेही तो आल्याचे व आम्ही सर्व त्याच्या पाठीशी आहोत सांगितल्यावर तिने तर विक्रमच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली.

घरी आल्यावर त्याने वसुंधराला माझे प्रायश्चित पूर्ण होणार असल्याचे सांगितले. पतीचा पडलेला चेहरा आठ दिवसानंतर खुललेला पाहून वसुंधरलाही बरे वाटले. त्याच रात्री विक्रमबरोबर जागून तिने जुन्या सामानातून विक्रमने लिहिलेल्या नाटकांची फाईल शोधून काढली. सकाळी ऑफीसला पोहोचताच विक्रमने स्क्रिप्ट मिळवत कधी बसायचं म्हणून गुरुप्रितला फोन करून विचारलं. तिने सर्वांना रविवारीच सुट्टी असेल, फोन करून विचार ते येत असतील तर भेटू सर्व येत्या रविवारी म्हणून सांगितले. विक्रमला कुठं दम होता? त्याने

त्याला थांबवत गुरुप्रित म्हणाली, ''अरे वेड्या तू कशाला लोड घेतोय? प्रायश्चित आपलं नाही विक्रमचं सुरू आहे आणि तो काय कॉलेजमधला कंगाल विक्रम वाटला काय तुला? अरे त्याचे टॉयलेटच नोटांनी भरले असेल.''

गुरुप्रितने शालीतून मारलेले जोडे विक्रमला लागले होते. त्याने सर्वांना तुम्ही फक्त साथ द्या, बाकी कसलीच कळजी करू नका, असा विश्वास दिला. पुढच्या रविवारी पुन्हा भेटायचं ठरवून सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला. विक्रमचे मित्र जाताच त्याने वसुंधराला विचारले, 'कसे वाटले माझे मित्र?' तिनेही 'दि ग्रेट' म्हणत त्याचे कौतुक केले. रात्री जेवताना ती विक्रमला म्हणाली, 'एक विचारू का?'

'विचार ना' विक्रम म्हणाला.

''पण तुम्हाला राग तर येणार नाही ना?'' वसुंधरा म्हणाली.

''अगं कसला राग विचार'' विक्रम म्हणाला.

''गुरुप्रितचं आयुष्य कसं जाणार? तिनं दुसरा काही विचार करायला हवा!'' अडखळत वसुंधरा म्हणाली.

''अगं वसू ती पडली पंजाबी त्याच्यात दुसरा विवाह करणं म्हणजे... अन् कोण भेटेल तिला उगाच आणखी त्रास!'' विक्रम म्हणाला.

जेवण थांबवत वसुंधरा म्हणाली, ''एक पर्याय आहे?''

''काय? कोणता पर्याय?'' विक्रम म्हणाला.

''तुम्ही एक गोष्ट ऑब्झर केली का? आज आल्यापासून अविनाश खूपवेळा चोरून चोरून गुरुप्रितला पहात होता.'' त्यांच्या मनात... वसुंधराने तिच्या मनातील गुरुप्रितसाठी अविनाशचा पर्याय विक्रमला सांगितला.

''छे... छे... तो पडला मराठी, ती पंजाबी. त्यात विधवा.''

''कसं शक्य? पण विचार करायला हरकत नाही'' विक्रम म्हणाला.

''तुम्हीच अविनाश भाऊजींना विचारा'' वसुंधरा म्हणाली.

''ते करतो गं मी पण तुझं ऑब्झर्वेशन कमालीचं ग्रेट'' बायकोची स्तुती करीत विक्रम म्हणाला.

ती ऐकून लाजत वसुंधरा म्हणाली, ''शेवटी बायको कुणाची?''

कॉलेजच्या प्राचार्यांशी चर्चा करून त्यांना विक्रमच्या नाटकाच्या उपक्रमाची माहिती दिली. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करून म.गांधी जयंतीला सादरीकरण करण्याचे सुचविले. अविनाशने विक्रमला फोन करून विचारणा केली, त्यानेही कॅलेंडर पहात आठ दिवस अवकाश असल्याने होकार कळविला. गांधी जयंती सोमवारी येत होती. आदल्या दिवशी रविवारी फायनल प्रॅक्टीस व अविनाश-गुरुप्रित विषयी फायनल करण्याचे विक्रमने ठरविले. फायनलचा 'तो' रविवार उजाडला. विक्रमने कल्पना दिल्याप्रमाणे सुनील, भास्कर दोन दिवसांच्या सुट्या टाकून आले होते. विक्रमने ऑर्डर दिलेले चित्र त्या चित्रकाराने आणून दिले. दिवस नाटकाच्या तालीममध्ये गेला. सायंकाळी झाली. गुरुप्रित व तिचे सासरे जाण्यास निघाले. तोच विक्रमने त्यांना थांबविले.

गुरुप्रितला काही समजेना! तोच वसुंधराने थेट तिला अविनाशविषयी विचारले. ते ऐकून ती कमालीची चिडली. तिला शांत करीत 'तुझ्या सासऱ्यांची तर इच्छा आहे, तू लग्न करावं' विक्रमने तिला सांगितले. विक्रम-वसुंधराने तिला धक्क्यामागे धक्के दिले. तिची अवस्था पाहून तिच्या वृद्ध सासऱ्यांनीही तिला मीच विक्रमला तुला विचारायला लावल्याचे सांगत या सर्वाला माझी संमती व आशीर्वाद असल्याचे सांगितले. इतक्या वेळ भास्कर, सुनीलआड लपलेल्या अविनाशही पुढे येत हिंमतीने सर्वांसमोर तिला मागणीच घातली.तिच्या डोळ्यात आनंदाश्रू पाहून तिचा होकार सर्वांनी ओळखला. वातावरणातील गंभीरता काही कमी झाली. ती आणखी कमी करण्यासाठी भास्कर म्हणाला, ''आताच उडवायचा का बार? तुम्ही दोघं सांगा, लगेच सारी तयारी करतो!''

''आधी आमचं लग्न नाही, आधी विक्रमचं नाटक मग पाहू आधी लगीन विक्रमच्या नाटकाचं मग आमच्या दोघांचं, काय!'' अविनाश गुरुप्रितला म्हणाला. तिनेही मान हलवत अविनाशच्या बोलण्याला संमती दिली. एक फायनल तर विक्रम जिंकला. दुसरी बाकी होती. रात्री झोपण्याआधी नाटकाची सर्व तयारी त्याने पुन्हा एकदा चेक केली.

सुरू केले. ते संपताच स्तब्ध झालेल्या विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि नाटकाचा पडदा पडला. नाटक संपले. रंगमंचावर पडदा पडला असला तरी विक्रमने चूक कबूल करून प्रामाणिकपणे केलेले निवेदन विद्यार्थ्यांच्या काळजाला भिडले. अखेर उशिरा का होईना स्वतःसह भ्रष्टाचारी समाजमनावरील स्वार्थाचा पडदा काहिसा दूर करण्यात विक्रम यशस्वी झाला.

व्यासपीठावरून ड्रेसिंग रुममध्ये आलेल्या विक्रमला सुनील, भास्कर व अविनाशने गळ्यात पडत मिठीच मारली. ते पाहून रूममधील गुरुप्रित, वसुंधरा साऱ्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. पुढे वसुंधरा-विक्रमच्या पुढाकाराने गुरुप्रित-अविनाशचे लग्न झाले. विक्रमने एका नाटकावर न थांबता पुढे भ्रष्टाचार रोखण्यासाठी स्वयंसेवी संस्थेची स्थापना करुन गुरुप्रित, अविनाश, सुनील, भास्करला संस्थेच्या बॉडीवर घेतले. संस्थेच्या माध्यमातून विक्रमने कॉलेज युवक-युवतींना संधी देत अनेक नाटके, भित्तीपत्रके, प्रदर्शने भरून मुळापासून भ्रष्टाचार, लाचखोरी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्याच्या प्रयत्नाने काही अंशी का होईना समाजातील भ्रष्टाचार, लाचखोरी कमी होऊ लागली आणि 'त्या' लाचखोर व्यक्तींच्या मनाचा पडदा उघडला!



माझ्या स्वप्नातील पात्रे
मलाच हवीहवीशी वाटतात
त्यांचं नि माझं नातं ते काय?
त्याच्या शोधात मला रात्र रात्र
जागवतात...
'ते' कोण या शोधातच होते सकाळ
वास्तवाची...
पण मलाही ओढ असते अस्ताला
जाणाऱ्या स्वप्नाची...
का असू नये..?
कारण स्वप्नातील ती पात्रे
असतात तुमच्या नि माझ्या
मनातली...!

# झेंडूची फुलं

- विकास अंत्रे -

संस्कृती

‘माझी पहिली
साहित्यकृती
आई व दादांच्या
चरणी अर्पण’

लेखकाचा लिखाणाचा उद्देश भिन्न असला तरी विचार एकच असतो, वाचकांना दर्जेदार साहित्य वाचायला मिळावे. माझाही विचार हाच आहे. 'ग्लोबलायझेशन'च्या वाऱ्यात, संगणक क्रांतीच्या युगात वावरणारी आजची तरुण पिढी वाचत नसल्याचा ठपका ठेवला जातो. ही झाली नाण्याची एक बाजू. दुसरी बाजू पाहिल्यास वाचण्यासारखं कुणी काही लिहिलंच नाही, असा तरुणांचा सूर आहे. या नाण्याच्या दोन्ही बाजू लक्षात घेत मी माझं लिखाण करताना या दोन्ही बाबींकडे विशेष लक्ष देत ही साहित्यकृती साकारली आहे.

माझी ही पहिलीच साहित्यकृती ठराविक वर्गाच्या वाचकांसाठी नाही तर जीवनाच्या वाटचालीत समस्या, संकटांचे स्पीडब्रेकर पार करीत लढणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी आहे. महाविद्यालयीन जीवनात मी पहिली कथा लिहिली. शिक्षण पूर्ण झाल्यावर पत्रकारितेत आलो. पेशाने पत्रकार म्हणून काम करू लागलो, पण आपण एकेकाळी कथासंग्रह लिहिण्याचे ठरविले होते हेही मिडियाच्या फास्ट लाईफमध्ये विसरलो. पुढे जीवनातील अत्यंत खडतर परिस्थितीत अचानक एका सायंकाळी भेटलेल्या एका मित्राने 'झाला का कथासंग्रह पूर्ण?' हा प्रश्न विचारला. एकेकाळी मी कथासंग्रह लिहिण्याचे ठरविले होते, ही मलाही आठवण झाली. त्याच्या प्रश्नामुळे मी मागे वळून पाहिले. चार वर्षांपूर्वी लिहिलेली पहिली कथा शोधली. तिच्याबरोबर दुसरी अर्ध्यावर सोडलेली कथाही सापडली. दीड कथेच्या भांडवलावर पुन्हा नव्या जोमाने रखडलेला कथासंग्रह पूर्ण करण्याचे ठरविले.

पहिली कथा लिहिली ती माझ्या जीवनातील परिस्थिती आणि आताच्या परिस्थितीत खूपच फरक होता. आता वृत्तपत्रातील नोकरी, एमफिलचा अभ्यास या नव्या जबाबदाऱ्यांबरोबर कौटुंबिक जबाबदारी वाढली होती. त्यात कौटुंबिक जीवनातील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जात असतानाही मी चार वर्षे रखडलेला कथासंग्रह अवघ्या सहा महिन्यांत पूर्ण केला. ड्युटी संपल्यावर रात्र-रात्र जागून मी कथा लिहिल्या. त्या पूर्ण करताना नियतीनेही माझी चांगलीच परीक्षा पाहण्याचे ठरविले. तीन महिन्यांत तीन अपघात. एकदा हात फ्रॅक्चर,

# अणुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मनूचं पत्र | १ |
| २. | प्रतिष्ठा | २१ |
| ३. | लक्ष्मी नव्हे, लक्ष्य मी! | ३५ |
| ४. | मैत्रीची भेट | ४४ |
| ५. | झेंडूची फुलं | ६१ |
| ६. | सूरपारंब्या | ७६ |
| ७. | अग्निपरीक्षा | ९५ |
| ८. | तू तिथं मी | १२७ |
| ९. | बॉटमलाईन | १५१ |
| १०. | ..आणि पडदा उघडला | १७४ |